सत्यमेव जयते

# MANUAL OF REVENUE ACCOUNTS

## गांवचे मुलकी हिशेबाचें पुस्तक

[ मेहेरबान एफ्. जी. एच्. अंडरसन, एम्. ए. आय्. सी. एस्., ह्यांनीं केलेलें ]

[ मे. अंडरसन्साहेब ह्यांनीं सन १९३१ मध्यें प्रसिद्ध केलेल्या इंग्रजी आवृत्तीचे आधारें
रामचंद्र त्र्यंबक देव, बी.ए., मामलेदार, पारोळें, ह्यांनीं मराठींत तयार केलें ]

स्कॅन

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

[ आवृत्ति दुसरी ]
( पुनर्मुद्रित )

( गव्हर्नमेंट मेमोरँडम्, रेव्हेन्यू डिपार्टमेंट नं. ५७३/४५-एफ् तारीख २९-६-१९५१ )

मुंबई :
गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेसमध्यें छापिलें
१९५३

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. |
|---|---|
| साधारण सूचना ... ... ... ... | १ |
| **गांवचे नमुने.** | |
| १—शेतवार पत्रक ... ... ... ... | ३ |
| तेरीज ... ... ... ... | १२ |
| १-अ—फॉरेस्ट रजिष्टर ... ... ... ... | १७ |
| २—इतर कायम उत्पन्नाचे रजिष्टर ... ... ... ... | १८ |
| ३—इनाम जमिनींचें रजिष्टर ... ... ... ... | २३ |
| तेरीज ... ... ... ... | २५ |
| किरकोळ उत्पन्नाबद्दल रिपोर्टाचा फार्म ... ... ... | २८ |
| किरकोळ जमीनबाब ... ... ... ... | ३१ |
| ४—किरकोळ उत्पन्नाचें रजिष्टर ... ... ... ... | ३४ |
| ५—ठरावबंद ... ... ... ... | ३८ |
| **हक्काचें पत्रक.** | |
| भाग २—सामान्य माहिती ... ... ... ... | ४३ |
| भाग ३—नमुन्याचा तपशील व कामाची पद्धत ... ... ... | ४५ |
| पहिली अनुक्रमणिका तयार करणें .... ... ... ... | ४५ |
| ६—हक्काचें पत्रक (१९०८) ... ... ... ... | ४६ |
| ७—अनुक्रमणिका (१९०८) ... ... ... ... | ५२ |
| ६—हक्काचे पत्रक (१९०८ ते १९१३) ... ... ... ... | ६१ |
| ७—अनुक्रमणिका (१-४-१९१३) ... ... ... ... | ६५ |
| वारसाचें रजिष्टर ... ... ... ... | ७२ |
| लेटफीचे रजिष्टर ... ... ... ... | ७४ |
| फेरफाराची नोटीस ... ... ... ... | ७७ |
| तक्रारी रजिष्टर ... ... ... ... | ७८ |
| नवीन हिस्से ... ... ... ... | ८१ |
| विल्हेवारी ... ... ... ... | ८२ |
| भाग ४—इनाम जमिनींतील फेरफार ... ... ... ... | ८४ |
| भाग ५—इतर अंमलदारांचीं कामें ... ... ... ... | ८५ |
| वार्षिक गोषवारा ... ... ... ... | ८७ |
| भाग ६—अनुक्रमणिकेची दुरुस्ती ... ... ... ... | ८८ |
| भाग ७—अनुक्रमणिका पुनः लिहिणें ... ... ... ... | ८८ |
| भाग ८—नकला वगैरे देणें ... ... ... ... | ८९ |
| ७-१२—एकीकरन ... ... ... ... | ९० |
| ७-अ—कुळवहिवाटीचें रजिष्टर ... ... ... ... | ९४ |
| ७-ब—कुळवहिवाटीच्या व लागवडीच्या रीती ... ... ... | ९७ |
| कुळवहिवाटीची अनुक्रमणिका ... ... ... ... | ९८ |
| ८-अ—जमिनीची खातेवही ... ... ... ... | १०० |
| खाते उतारा ... ... ... ... | १०९ |

| | पृष्ठ- |
|---|---|
| ८-ब—जमाखर्चाची खातेवही ... ... ... ... | ११० |
| ९—रोजकीर्द पावतीसह ... ... ... ... | १२८ |
| तेरीज ... ... ... ... | १४१ |
| १०—चलन (संयुक्त जमीनबाबेचें) ... ... ... ... | १४३ |
| १०-अ—इतर बसुलाचें चलन ... ... ... ... | १४७ |
| सर्कीचे उपाय ... ... ... ... | १४८ |
| ११—पडताळापत्रक ... ... ... ... | १५३ |
| तेरीज ... ... ... ... | १६२ |
| खात्याची वर्गवारी (पंचवार्षिक) ... ... ... ... | |
| पोट-खराब ... ... ... ... | १६७ |
| १२—पिकाबद्दल खुलासा ... ... ... ... | १६८ |
| १३—वर्गवार पिकांचें व पडीचें पत्रक ... ... ... ... | १७५ |
| तेरीज ... ... ... ... | १८४ |
| बागाईत पिकांचे तेरीज ... ... ... ... | १८४ |
| फळझाडांचे तेरीज ... ... ... ... | १८४ |
| पिकांचीं अंदाजपत्रकें ... ... ... ... | १८७ |
| पिकांची यादी ... ... ... ... | १९० |
| १४—जन्ममृत्यूचें रजिष्टर ... ... ... ... | १९२ |
| १४-अ—देवी काढल्याचें रजिष्टर ... ... ... ... | १९६ |
| १४-ब—स्पर्शजन्य रोगांचें रजिष्टर ... ... ... ... | १९७ |
| १४-क—स्पर्शजन्य रोगाबद्दल रोजचा रिपोर्ट ... ... ... | १९८ |
| १४-ड—पशूंचे रोगांबद्दल पत्रक ... ... ... ... | २०० |
| १५—जनावरांचे खानेसुमारीचें पत्रक ... ... ... ... | २०१ |
| १६—पाण्याचे पुरवठ्याबद्दल पत्रक ... ... ... ... | २०४ |
| तेरीज ... ... ... ... | २०५ |
| १७—आवकजावक रजिष्टर ... ... ... ... | २०७ |
| १८—सर्क्युलर फाईलस् वगैरे ... ... ... ... | २०९ |
| वार्षिक रिपोर्ट ... ... ... ... | २१० |
| मतदारांचे यादीसंबंधीं ... ... ... ... | २१० |
| रेकार्ड ठेवणेंफाडणेंबद्दल ... ... ... ... | २१४ |


ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

# MANUAL OF REVENUE ACCOUNTS

# गांवचे मुलकी हिशेबाचें पुस्तक.

## साधारण सूचना.

जीं रजिष्टरें छापील नमुन्यांत बांधीव बुकाचे रूपानें पुरविण्यांत येतील त्यांजवर तालुक्याचे शिक्के करण्याची आवश्यकता नाहीं. अशीं रजिष्टरें उपयोगांत आणतांच त्यांचे पानांवर एकपासून अखेरपर्यंत आंकडे घालून अखेरीस कारकुनानें किंवा कुळकर्ण्यानें एकुणातीचा शेरा लिहून सही करावी.

२. खालीं लिहिलेलीं रजिष्टरें बांधीव बुकाचे रूपानें पुरविलीं जाणार नाहींत, सबब त्यांजवर तालुक्याचे शिक्के केले पाहिजेत :—

वार्षिक न. नं. १४ व १७.

पांचसाली गां. न. नं. १२.

लांब मुदतीचीं गां. न. नं. १, १-अ, २ व ३.

३. जेव्हां बांधीव बुकाचे रूपानें एकादें रजिष्टर (उदाहरण गां. न. नं. ६.) पुरविण्यांत येईल व त्यांत, समजा कीं, १०० पानें असून नवीन रजिष्टर लिहिण्याचे सुमारास म्हणजे पांचवे वर्षाचे अखेरीस त्यांत ४० पानें शिल्लक राहिलीं, तर एक दोन पानें कोरीं सोडून त्यांवर कर्णाकृती रेघा मारून तीं रद्द करावीं, व बाकी राहिलेलीं पानें संपेतोंपर्यंत, नवीन रजिष्टर समजून पुढें लिहावीं, व तीं संपल्यावर नवीन रजिष्टर सुरू करावें. जुने रजिष्टरांतील अगदीं अलीकडील नोंदी रिकार्डांत जाण्यास योग्य होईपावेतों (म्हणजे दिलेल्या उदाहरणांतील रजिष्टर पुढील पांच वर्षेपर्यंत) तें चालू रजिष्टर म्हणून ठेविलें पाहिजे. अशा रीतीनें छापील नमुने फारसे वाया जाणार नाहींत, व कागदहि मुदतींपूर्वी फाडले जाणार नाहींत. परंतु फक्त ५ किंवा ६ च पानें कोरीं राहिलीं तर नवीन रजिष्टर सुरू करणेंच बरें.

४. जेव्हां रजिष्टर नक्की अमुकच मुदतीपर्यंत ठेवण्याचें नसून नोंदीनें पूर्ण भरून गेल्यामुळें किंवा फाटल्यामुळें, किंवा मळीण झाल्यामुळें, पुन्हा लिहिण्याचें असेल, तेव्हां त्यांतील चालू असलेल्या नोंदी नवीन रजिष्टरांत उतरून घेण्याबद्दल काळजी घेतली पाहिजे. (उदाहरण गां. न. नं. २ किंवा ३.)

५. इसम बिनलिहिणारा असेल तर सही या शब्दाचा अर्थ आंगठ्याचा ठसा असा समजावा, म्हणजे सही या शब्दांत आंगठ्याचे ठशाचाहि समावेश होतो. ठसा स्पष्ट असला पाहिजे, व रजिष्टर खात्यांत जशी काळजी घेतात तशी त्याबद्दल काळजी घेतली पाहिजे. व त्याचे समोर "आंगठ्याचा ठसा (रामा गोविंदा याचा)" अशासारखा तपशील कुळकर्ण्यानें लिहिला पाहिजे. जेव्हां आंगठ्याचा ठसा घेण्यांत येतो, तेव्हां बिनलिहिणार इसमाचे ठशाचे साक्षीसाठीं बाहेरचा माणूस बोलावण्याची जरूरी नाहीं.

६. कोणत्याहि हिशेबांत किंवा नमुन्यांत आंकडे, शब्द किंवा नांवें, खोडून काढतां कामा नये. खोडून काढणें म्हणजे पहिली चुकीची नोंद खरडून काढून त्याच जागीं नवी नोंद लिहिणें. जर चूक झाली तर चुकीचे नोंदीमधून एक आडवी रेघ मारून ती कमी करावी, अशी कीं तसें करूनहि जुनी नोंद वाचतां येईल. नंतर नवीन वाजवी नोंद जुने नोंदीनजीक ओळीचे वर किंवा खालीं लिहून तेथें आद्य अक्षरांची छोटी सही करावी.

७. (अ) सर्व पावत्यांत, व्हावचरांत, व भरण्याचे यादींत, (चलनांत) अखेरचे आंकडे अक्षरांनीं देखील लिहावे लागतात. कारण पैशाचे हिशेबांत हा एक सावधगिरीचा मुद्दा आहे. व (ब) तसेंच रजिष्टराच्या वार्षिक एकुणाती, व गांवचे रोजकीर्दीची रोजची शिल्लक, हींहि अक्षरांनीं लिहिलीं पाहिजेत.

८. परंतु दरम्यानचे हिशेब, जसें पुरवणी रजिष्टर, किंवा माहिती एक ठिकाणीं जुळविण्याचे नमुने, परिशिष्टाच्या एकुणाती, वगैरे यांचे बाबतींत फक्त आंकडे बरोबर आहेत. आरंभीचे व अखेरचे आंकडे बदल करतां येणेजोगे नसले तर, सहज समजूं न देतां दरम्यानचे आंकड्यांत लबाडीनें फेरबदल करतां येणें शक्य नाहीं.

९. गांवचे हिशेबांत शक्य असेल तितकें करून इंग्रजी आंकड्यांचा उपयोग करावा. कुळकर्ण्यास ते सहज शिकतां येतील, व वास्तविक पुष्कळ कुळकर्ण्यास इंग्रजी आंकडे माहीतहि असतात.



ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

१०. पुज्यांचीं पत्रकें कधीं पाठवूं नयेत. जेव्हां पत्रकांत किंवा नमुन्यांत नोंदी नसतील तेव्हां, एक्स (अमुक एक) पत्रक किंवा नमुना पुज्याचा आहे असें नुसतें कळवावें. अशी खबर नेहमीं पोष्टाचे कार्डावर पाठवितां येईल, व जरूर तर प्रत्येक पुज्याचीं पत्रकें एका कार्डांत दाखल करावीं. सगळीं कोष्टकें आंखून नमुन्याची नक्कल तयार करणें, व विन-नोंदीचें पत्रक पाठविणें, अशी वहिवाट चालूं देऊं नये. तसेंच ज्या रजिष्टरांत किंवा नमुन्यांत भरण्यास तपशील नाहीं असा नमुना तयार करूं नये, किंवा ठेवूंहि नये. (उदाहरणें; पांच नंबरांहून फारिष्ट नंबर जास्त नाहींत असे गांवीं गां. न. नं १-अ. किंवा उजाड गांवात गां. न. नं. १४). यास अपवाद एकदाच कीं, सांथीबद्दलचीं रजिष्टरें वर्षाचे आरंभीं वस्तीचे सर्व गांवीं वापरलीं पाहिजेत. अशासाठीं कीं, गांवांत जरी साथ नसली, तरी गांवीं तपास करूनहि रोग आढळला नाहीं, या गोष्टीचे पुराव्यासाठीं म्हणून पाटलानें दरमहा या पत्रकावर सही करीत जावीं.

११. हिशेबांतील सदरांचे पोटीं पुष्कळ कोष्टकें अशीं आहेत कीं त्यांची प्रत्येक गांवीं कधींहि जरूर लागत नाहीं. कोठें कोठें ह्या मर्जीवरच कोष्टकांस फुल्या केल्या आहेत. त्याचा अर्थ असा कीं, जेथें त्यांत दाखल करण्यास माहिती नसेल, तेथें तीं गाळावीं. तसेंच जेव्हां नमुने हातानें लिहून तयार करावे लागतात, तेव्हां जीं कोष्टकें लागणार नाहींत असें नमुना तयार करणारास वाटत असेल, तीं कोष्टकें नेहमीं गाळावीं. परंतु बाकी कोष्टकांचा नंबर ठरीव नमुन्यांत दिला असेल तसाच कायम ठेवावा.

१२. रेकार्डाचे कोणते कागद राखून ठेवावे, व कोणते फाडावे, याबद्दलचे हुकूम, अ, ब, क, ड यादींचा उतारा यास जोडला आहे त्यांत आढळून येतील.

१३. प्रत्येक गांवांत एक तपासगीबूक ठेवावें. हीं बुकें तालुका कचेरींतून पुरविलीं जातील.

१४. प्रत्येक गांवांत एक शिक्का, * प्याड व शाईसह, असावा, व कागदावर हातानें नांवें लिहिण्याचे ऐवजीं, सर्व पावत्यांवर, चलनावर, रिपोर्टावर, सदरचें नमुन्यावर त्याचा उपयोग करावा. या योगानें कुळकर्ण्याचें पुष्कळ काम वांचेल. शिवाय गांवचा रिपोर्ट मथाळ्यावर स्पष्ट शिक्यासह आला म्हणजे तालुक्यांत विल्हेवारी व निवडीचें काम करण्यास सोपें पडेल. शिक्का बठविल्यानंतर रिपोर्ट लिहावा तो असा "गांवकामगार यांजकडून मे. मामलेदारसाहेब यास" गावचें नाव व तालुक्याचें नांव हीं पुन्हा लिहूं नयेत.

| |
|---|
| * मौजे..... |
| तालुके..... |

१५. कुळकर्ण्याचे राहण्याचा गांव प्रांताचे साहेब यांजकडून ठरविण्यांत येतो (स. ठ. ५४९७-००). कुळकर्ण्यानें ठेवण्याचे डायरीचा नमुना, या नमुन्याचे पुस्तकांत दिलला नाहीं. परंतु यासंबंधानें स. ठ. ४५७३-१५ व स. ठ. ६२७-०१ चा परिपत्रक ४७ पहा. स. ठ. १६८१-०२ व ५७९०-०५ यांत कुळकर्ण्यानें ठेवण्याचे डायरीचा नमुना ठरला आहे. परंतु नकला पाठविण्याची आवश्यकता नाहीं.

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

# गांवचा नमुना नंबर १.

शेतवार पत्रक मौजे नहीगांव, तालुका बलसार.

| | जिराईत. रु. आ. पै | बागाईत. रु. आ. पै | तरी. रु. आ. पै |
|---|---|---|---|
| मुख्य दर, दर एकरीं ... ... | ३ ० ० | १२ ० ० | ७ ८ ० |
| आकाशिया ( पावसाचे पाण्यानें होणार फायद्याचा ) ... | ... | ... | २ ० ० |
| हिमायत ( तलावाचे पाण्याचा ) ... ... | ... | ४ ० ० | ३ ० ० |
| इतर .. ... ... | ... | ... | ... |

सन १९०७-०८.

सेटलमेंट ( तरम जमाबंदी ) लागू केल्याचें साल १८९७ सेटलमेंट संपणारें साल १९२२ ( तालुक्याचें बाकी भागाचें सेटलमेंट सन १९२२ साली संपतें सबब ).

सर्व्हे ग्रुप नंबर २.

पहिला हप्ता ता. ५ जानेवारी. दुसरा ता. ५ मार्च ( ल्या. रे. को. ११६ ).

| सर्व्हे नंबर. | सत्ताप्रकार. | एकूण क्षेत्र. | | पैकीं वजा विनआकारी नाकीदसार व शेतीचे कामास उपयोगीं न पडणारी जमीन. | | शेताचा आकार. | लागणीलायक जमिनीचा व आकाराचा तपशील. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | जिराईत. | | | | बागाईत. | | | | |
| | | | | प्रकार. | क्षेत्र. | | प्रकार. | क्षेत्र. | | आकार. | प्रकार. | क्षेत्र. | | आकार. | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | ९ | १० | ११ | | १२ | |
| | | एकर | गुंठे | | एकर गुंठे | रु. आ. पै | | ए. | गुं. | रु. आ. पै | | ए. | गुं. | रु. आ. पै | |
| १-अ | सरकारी ... ... | (१८<br>१७ | ७)<br>२८ | ... | ... | (२१ ० ०)<br>१८ १५ ० | ... | ... | | ... | ... | ... | | ..... | |
| १-ब | सरकारी ... ... | ०. | २० | इमारती ... | ० २० | ..... | ... | ... | | ... | ... | ... | | ..... | |
| २-अ | नवीन शर्त ... ... | (३४<br>(१६<br>१५ | १०)<br>६)<br>११ | ... | ... | (५२ ० ०)<br>(३२ ४ ०)<br>३१ ४ ० | वरकस ... | (३४<br>(१६<br>१५ | १०)<br>६)<br>११ | (५२ ० ०)<br>(३२ ४ ०)<br>(३१ ४ ०) | ... | ... | | ..... | |
| २-ब | सरकारी ... ... | (१८<br>१४ | ४)<br>२ | ... | ... | (१९ १२ ०)<br>१० १० ० | ... | (१८<br>१४ | ४)<br>२ | (१९ १२ ०)<br>१० १० ० | ... | ... | | ..... | |
| ३ | गांव सरकारी नोकरी इनाम. | ६ | ६ | ... | ... | ७ ० ० | जिरायत ... | ५ | ६ | ४ ० ० | ... | ... | | ..... | |
| ४ | जात इनाम ... ... | १९ | १२ | ... | ... | १९ ० ० | वरकस ... | १५ | ० | ४ ० ० | मोटस्थळ ... | ३ | ० | ९ ८ ० | |
| ५ | सरकारी ... ... | १ | २ | ... | ... | १ ८ ० | जिरायत ... | ० | ९ | ० १४ ० | ... | ... | | ..... | |
| ६ | सदर ... ... | ११ | २९ | नाला ... | ० २५ | ७ ० ० | ... | | | ... | ... | ... | | ..... | |
| ७ | नवीन शर्त ... ... | १० | २० | ... | ... | ५ ८ ० | जिरायत ... | १० | २० | ५ ८ ० | ... | ... | | ..... | |
| ८ | सरकारी ... ... | २० | ० | ... | ... | १० ० ० | ... | ... | | ... | ... | ... | | ..... | |

| सर्व्हे नंबर. | सत्ताप्रकार. | लागणीलायक जमिनीचा व आकाराचा तपशील. | | | | | | कोष्टक १२, १५, १८ यांत नमूद असलेले पाण्याचे हिश्शाचा तपशील. | | सार्वजनिक रस्त्याचे व मामूल हक्क. | फेरफाराचा तपशील. | फेरफाराचे मंजुरीचे हुकूम. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तरी. | | | इतर. | | | | | | | | |
| | | प्रकार. | क्षेत्र. | आकार. | प्रकार. | क्षेत्र. | आकार. | प्रकार. | रक्कम. | | | | |
| १ | २ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| | | | ए. गुं. | रु आ. पै. | | ए. गुं. | रु. आ. पै. | | रु. आ. पै | | | | |
| १-अ | सरकारी ... ... | ... | ... | ... | (अ) माथा . (मळई) ... | (१८ ७) १७ २८ | २१ ० ० १८ १५ ० | ... | ... | ... | १९ गुंठे जमीन रेल्वेकडे घेतलेबद्दल सर्व्हेकडील दुरुस्ती. | मामलेदार यांचा हुकूम, नंबर ३१० ४-११-११. | (अ) गुजराथकडील प्रकार. (ब) कॅनाराकडील प्रकार. |
| | | | | | | | | | | | "हिस्सा १-अ/४-क याचा राजीनामा देण्यांत आल्यामुळें तो "वहिवाटींत नसलेली (बिनवहि १) सरकारी [पड] जमीन" आहे, त्याच्या आकारणीची वसुली इतर हिश्यांच्या वहिवाटदारांकडून (वाहूदारांकडून) सामायिक रीतीनें करावयाची. टीप ३ पहा." | "कलेक्टर यांचा [हुकूम] नंबर ९४, तारीख ९ माहे मार्च सन १९१२." | (क) कोंकणाकडील प्रकार. (ड) सुरतेच्या भागांतील प्रकार. |
| १-ब | सरकारी बिनशेती ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| २-अ | नवीन शर्त ... ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | जमीन खालसा करून कांहीं भाग नवीन शर्तीवर परत दिल्याबद्दल सर्व्हेकडील दुरुस्ती. | मामलेदार यांचा हुकूम नंबर २१/१३-८-१९०८. | ... |
| | | | | | | | | | | | ३५ गुंठे जमीन नदीचे प्रवाहानें वाहून गेलेबद्दल. सदर. | मामलेदार यांचा हुकूम नंबर २२/२०-१२-११. | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २-ब | सरकारी ... ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ४ एकर २ गुंठे जमीन रेल्वेकडे घेतलेबद्दल सर्व्हे कडील दुरुस्ती. | मामलेदार यांचा हु. नंबर ३१०/ ४-४-११. | एक सरकारी विहीर |
| ३ | गांव सरकारी नोकरी इनाम. | जुनी ... | १ ० | ३ ० ० | ... | ... | ... | आकाशिआ... | १ ० ० | ... | ..... | ... | ... |
| ४ | जात इनाम ... ... | सदर ... | १ १२ | ५ ८ ० | ... | ... | ... | कोष्टक १२ मोटस्थळ.. | ३ १२ ० | ... | ..... | ... | ... |
| | | | | | | | | कोष्टक १५ आकाशिआ. | १ १० ० | | | | |
| | | | | | | | | हिमायत ... | १ १० ० | | | | |
| ५ | सरकारी ... ... | ... | ... | ... | पुळण (क) | ० ३३ | ० १० ० | ... | ... | ... | ..... | ... | |
| ६ | सदर ... ... | ... | ... | ... | गझनी (ब) | ११ ४ | ७ ० ० | ... | ... | ... | ..... | ... | शेतीसंबंधीं एक घर आहे. |
| ७ | नवीन शर्त ... ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | सर्व्हे नंबर ९ समोरची टीप पहा. | ..... | ... | दोन आंब्याचीं झाडें सरकारचीं आहेत. |
| ८ | सरकारी ... ... | ... | ... | ... | सदरे ... | २० ० | १० ० ० | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| ९ | सरकारी ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | सर्व्हे नंबर ७ चा धारण करणार याचा या नंबरांतून पाणी घेण्याचा हक्क नाहे; म्हणून दिवाणी कोर्टानें ठराव केला आहे. | ..... | ... | सब्-जज्ज बलसारकडील अव्वल फिर्याद नंबर १९१/१९०५. मामलेदार यांचा हु. नं. १७/ ३-३-०६. |
| १० | देवस्थान इनाम ... | जुनी ... | १ ० | ५ १२ ० | भाथा ... | २ ० | ४ ० ० | कोष्टक १२ घेकुडी. | | ... | ..... | ... | ... |
| | | | | | | | | कोष्टक १५ आकाशिया. | १ ४ ० | | | | |
| | | | | | | | | हिमायत ... | १ ८ ० | | | | |
| | | | | | | | | | १ ८ ० | | | | |
| ११ | वतन इनाम ... | ... | ... | ... | ... | ... | ... | पाटस्थळ... | १० ० ० | ... | ..... | ... | ... |
| १२ | सरकारी .. | सदर ... | ८ ३ | १६ ४ ० | भाथा ... | १ २ | १ १४ ० | कोष्टक १५ आकाशिया. | १० ० ० | ... | ..... | ... | ... |

| सर्व्हे नंबर | सत्ताप्रकार. | एकूण क्षेत्र. | | पैकी वजा बिनआकारी नाकीदसार व शेतीचे कामास उपयोगी न पडणारी जमीन. | | | | शेतीचा आकार. | | | लागणीलायक जमिनीचा व आकाराचा तपशील. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | जिराईत. | | | | | | बागाईत. | | | | | |
| | | | | प्रकार. | | क्षेत्र. | | | | | प्रकार. | क्षेत्र. | | आकार. | | | प्रकार. | क्षेत्र. | | आकार. | | |
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ | | | ७ | ८ | | ९ | | | १० | ११ | | १२ | | |
| | | ए. | गुं. | | | ए. | गुं. | रु. | आ. | पै | | ए. | गुं. | रु. | आ. | पै | | ए. | गुं | रु. | आ. | पै |
| ९ | सरकारी ... ... | २५ | ० | खडकाळ ... | | ० | ४ | १६ | ० | ० | रबी ... | २४ | ३० | १६ | ० | ० | ... | ... | | ..... | | |
| | | | | रस्ता ... | | ० | ६ | | | | | | | | | | | | | | | |
| १० | देवस्थान इनाम ... | १२ | १७ | ... | | ... | | १८ | १२ | ० | जिराईत ... | ८ | १७ | ५ | ० | ० | धेंडी (अ) ... | १ | ० | ४ | ० | ० |
| | | | | | | | | | | | | | | | | | (भुडकी). ... | | | | | |
| ११ | वतन इनाम ... | २२ | १० | ... | | ... | | ४५ | ० | ० | सदर ... | १० | ० | ५ | ० | ० | पाटस्थळ ... | ४ | ० | २० | ० | ० |
| | | | | | | | | | | | | | | | | | डोंग्री (क) ... | ८ | १० | १० | ० | ० |
| १२ | सरकारी ... ... | १० | ५ | ... | | ... | | २० | ४ | ० | ... | ... | | ... | | | उत्तम (ड) ... | १ | ० | २ | २ | ० |
| १३ | गांवचे रयत उपयोगी नोकरी इनाम. | २ | ४ | ... | | ... | | ३ | ० | ० | ... | ... | | ... | | | ... | ... | | ..... | | |
| १४ | परगण्याचे वतनदार बिन-नोकरी इनाम. | १० | १५ | ... | | ... | | १२ | ६ | ० | रबी ... | १० | १५ | १२ | ६ | ० | ... | ... | | ..... | | |
| १५ | सरकारी बितशेती ... | ६ | ८ | कारखाना ... | | ६ | ८ | ..... | | | ... | ... | | ... | | | ... | ... | | ..... | | |
| १६ | सरकारी ... ... | २५ | ० | ... | | ... | | ६१ | ८ | ० | ... | ... | | ... | | | ... | ... | | ..... | | |
| १७ | सदर ... ... | १ | ३५ | ... | | ... | | ६ | १३ | ६ | ... | ... | | ... | | | अ.ी (क) ... | १ | ३५ | ६ | १३ | ६ |
| १८ | सदर (सार्वजनिक उपयोगी). | १० | २५ | तलाव ... | | १० | २५ | ..... | | | ... | ... | | ... | | | ... | ... | | ..... | | |
| १९ | सदर (पड) ... | ४ | ३२ | ... | | ... | | ६ | ८ | ० | ... | ... | | ... | | | उत्तम ... | ४ | ३२ | ६ | ८ | ० |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | सरकारी (पड) ... | ६ | ३ | ... | ... | १० | ० | ० | जिराईत ... | २ | ३० | २ | ० | ० | धेकुडी ... | ४ | ० | ८ | ० | ० |
| २१ | जात इनाम ... | १५ | २० | ... | ... | ३० | ० | ० | सदर ... | ५ | २० | ३ | ० | ० | ... | ... | | ... | | |
| २२-अ | सरकारी (बिनशेती) ... | ५ | ० | विटाचें आवार. | ५ | ० | (१५ ० ०) ० ० ० | | ... | ... | | ... | | | ... | ... | | ... | | |
| २२-ब | सदर ... | २ | २० | इमारती ... | २ | २० | ... | | ... | ... | | ... | | | ... | ... | | ... | | |
| २३ | सरकारी (विशेष कामाकडे). | १५ | ० | फारेष्ट ... | १५ | ० | ... | | ... | ... | | ... | | | ... | ... | | ... | | |
| २४-अ | सरकारी (सार्वजनिक कामाकडे). | १९ | ३० | मोफत चारणीकडे. | ... | | १९ | १२ | ० | सदर ... | १९ | ३० | १९ | १२ | ० | ... | ... | | ... | | |
| २४-ब | सरकारी (विशेष कामाकडे). | ० | १० | शाळेकडे ... | ० | १० | (० १० ०) ० ० ० | | ... | ... | | ... | | | (उत्तम) ... | (० | १०) | (० | १० | ०) |
| २५-अ | सरकारी (बिनशेती) ... | २५ | ० | मिठागर ... | २५ | ० | (२५ ० ०) ० ० ० | | (सदर) ... | (२५ | ०) | (२५ | ० | ०) | ... | ... | | ... | | |
| २५-ब | सदर ... | १०० | ० | ... | १०० | ० | बिन आकारी ... | | ... | ... | | ... | | | ... | ... | | ... | | |
| २६-अ | बिनशेती किरकोळ इनाम. | १ | ० | तालीम ... | १ | ० | (२ ० ०) ० ० ० | | ... | ... | | ... | | | उत्तम ... | (१ | ०) | (२ | ० | ०) |
| २६ ब | सरकारी (सार्वजनिक कामाकडे). | १ | ० | धर्मशाळा ... | १ | ० | (१ ० ०) ० ० ० | | (सदर) ... | (१ | ०) | (१ ० ०) ० ० ० | | | ... | ... | | ..... | | |
| २७ | परगणा वतनदार बिननोकरी इनाम. | २५ | ० | वाळु ... | ० | २० | ६० | ० | ० | जिराईत ... | २४ | २० | ६० | ० | ० | ... | ... | | ..... | | |
| २८ | सरकारी (पडित) ... | १५ | ० | ... | ... | | ३० | ० | ० | सदर ... | १५ | ० | ३० | ० | ० | ... | ... | | ..... | | |
| २९ | सरंजाम ... | १० | ५ | ... | ... | | २० | ४ | ० | सदर ... | १० | ५ | २० | ४ | ० | ... | ... | | ..... | | |
| एकूण | १९०७-०८ | ४९४ | १२ | ... | १३६ | ८ | ५२६ | १३ | ६ | ... | २२२ | १२ | २६५ | १२ | ० | ... | २९ | ७ | ७९ | [illegible] | ६ |
| | १९०८-०९ | ... | | ... | १३७ | १८ | ५२४ | ३ | ६ | ... | ... | | ... | | | ... | २७ | ३७ | ७६ | [illegible] | ६ |
| | १९०९-१० | ... | | ... | १३८ | १८ | ५२३ | ३ | ६ | ... | २२१ | १२ | २६४ | १२ | ० | ... | ... | | ..... | | |
| | १९१०-११ | ४८९ | ३१ | ... | ... | | ५१२ | ० | ६ | .. | २१७ | १० | २५५ | १० | ० | ... | ... | | ..... | | |
| | १९११-१२ | ४८८ | ३६ | ... | ... | | ५११ | ० | ६ | ... | २१६ | १५ | २५४ | १० | ० | ... | ... | | ..... | | |
| | १९१२-१३ | ४८८ | ३६ | ... | १६८ | १८ | ४७१ | ० | ६ | ... | १९१ | १५ | २२९ | १० | ० | ... | ... | | ..... | | |

| सर्व्हे नंबर. | सत्ताप्रकार. | लागणीलायक जमिनीचा व आकारचा तपशील. तरी. प्रकार. | क्षेत्र. | आकार. | इतर. प्रकार. | क्षेत्र. | आकार. | कोष्टक १२, १५, १८ यांत नमूद असलेले पाण्याचे हिस्शाचा तपशील. प्रकार. | रक्कम. | सार्वजनिक रस्त्याचे व मामूल हक्क. | फेरफारचा तपशील. | फेरफारचे मंजुरीचे हुकूम. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| | | | ए. गु. | रु. आ. पै | | ए. गु. | रु. आ. पै | | रु. आ. पै | | | | |
| १३ | गांवचे रयत उपयोगी नोकरी इनाम. | ... | ... | ... | पुळण ... | २ ४ | ३ ० ० | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| १४ | परगण्याचे वतनदार विन-नोकरी इनाम. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| १५ | सरकारी बिनशेती ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| १६ | सरकारी ... | गोडे पाण्या-खालीं नवी<br>खारे पाण्या-खालीं जुनी.<br>गोडे पाण्या-खालीं जुनी. | ५ ०<br>५ ०<br>१० ० | १० ० ०<br>१० ० ०<br>२५ ० ० | पुळण .. | ५ ० | १६ ८ ० | कोष्टक १५ आकाशिया.<br>सदर .. | २ ८ ०<br>५ ० ० | ... | ..... | ... | मालकाकडून फी वसूल झाली असल्यामुळें १० सागाचीं झाडें मालकाचीं आहेत. मामलेदार यांचा हु. नं. २००/ १-७-०६. |
| १७ | सदर ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| १८ | सदर (सार्वजनिक उपयोगी). | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | गांवाकडून तलावाचे माथ्यावरून उत्तरेस विठोबाचे देवळास जाण्याचा सार्वजनिक रस्त्याचा हक्क आहे. | ..... | प्रांत साहेब यांचा हु. ता. १५-६-१२. | आंब्याचीं ५० झाडें लावून रक्षण करण्याची परवानगी मनाजी जाधव यास दिली आहे. |
| १९ | सदर (पड) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | जमीनमहसूल न आल्या-मुळें सन १९०२ सालीं जमीन खालसा करून सरकारी पडांत दाखल केली. |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | सरकारी (पड) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | धेकुडी ... | ५ ० ० | ... | ... | ... | ... |
| २१ | जात इनाम ... | गोडे पाण्याखालीं जुनी<br>खाऱ्या पाण्याखालीं नवी. | ५ ०<br>५ ० | १५ ० ०<br>१२ ० ० | ... | ... | ... | अकाशिया...<br>जागा फायद्याचा चढ.<br>हिमायत ... | ५ ० ०<br>२ ० ०<br>३ ० ० | ... | ... | ... | |
| २२-अ | सरकारी (बिनशेती) ... | गोडे पाण्याखालीं जुनी. | (५ ०) | (१५ ० ०) | ... | ... | | (हिमायत). | ... | ... | विटाकरितां जमीन बिनशेतीचे कामीं गेल्यामुळें सर्व्हेकडील दुरुस्ती. | मामलेदार यांचा हु. नंबर २१/ ११-३-१२. | |
| २२-ब | सदर ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | सरकारी (विशेष कामाकडे). | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | नमुना नंबर १-अ यांत दर्शविल्या प्रमाणें रस्त्याचा हक्क. | ... | ... | ... |
| २४-अ | सरकारी (सार्वजनिक कामाकडे). | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | सर्व्हे नं. ४ यास जाणारे पाण्याचे पाटाचा व सर्व्हे नं. ७, ८, ९ चे धारण करणाराचा रस्त्याचा हक्क. | लागवडीकरितां जरूर लागेपर्यंत मोफत चारणीकडे व गुरें उभीं रहाण्याकडे. | कलेक्टर साहेब यांचा हु. नंबर ६/ ६-५-१८९८. | ... |
| २४-ब | सरकारी (विशेष कामाकडे). | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | लोकलबोर्डास साऱ्याचे माफीनें जमीन दिलबद्दल सर्व्हेकडील दुरुस्ती. | कलेक्टर साहेब यांचा हु. नं ५४/ १०-७-०८. | ... |
| २५-अ | सरकारी (बिनशेती) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | मिठागराकडे जमीन दिल्याबद्दल सर्व्हेकडील दुरुस्ती. | कलेक्टर साहेब यांचा हु. नं. ९५/ २०-३-१२. | ... |
| २५-ब | सदर .. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | दर एकरीं ४ आणेप्रमाणे २५ एकर नवसाध्य करणेंकरितां २० वर्षांचे मुदतीनें दिली. | कलेक्टर साहेब यांचा हु. नंबर ५१० १५-७-०१. | गांवचा नमुना नंबर २ (iii) (i) पहां. |

| सर्वे नंबर. | सत्ताप्रकार. | एकूण क्षेत्र. | पैकी वजा बिनआकारी नाकीदसार व शेतीचे कामास उपयोगी न पडणारी जमीन. | | शेतीचा आकार. | लागणीलायक जमिनीचा व आकाराचा तपशील. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जिराईत. | | | बागईत. | | |
| | | | प्रकार. | क्षेत्र. | | प्रकार. | क्षेत्र. | आकार. | प्रकार. | क्षेत्र. | आकार. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | एकर. गुंठे. | | एकर. गुंठे. | रु. आ. पै | | | | | | |
| | गांवठाण ... | २ ० | ... | २ ० | ... | | | | | | |
| | रस्ते ... | ४ १० | ... | ४ १० | ... | सर्व्हे नंबर १-अ आणि २-अ पहा. | | | | | |
| | रेल्वे ... | (२ २०)<br>७ १ | ...<br>... | (२ २०)<br>७ १ | ...<br>... | | | | | | |
| | नद्या व नाले ... | (४ २०)<br>५ १५ | ...<br>... | (४ २०)<br>५ १५ | ...<br>... | सर्व्हे नंबर २-अ पहा. | | | | | |
| | सर्व्हे नंबरांत सामील नाहीं असें एकूण क्षेत्र. | (१३ १०)<br>१८ २६ | ...<br>... | (१३ १०)<br>१८ २६ | ...<br>... | | | | | | |
| | एकूण एकंदर १९१२-१३. | ५०७ २२ | ... | १८७ ४ | ४७१ ० ६ | | | | | | |

| सर्व्हे नंबर. | सत्ताप्रकार. | लागणीलायक जमिनीचा व आकाराचा तपशील. | | | | | | कोष्टक १२, १५, १८ यांत नमूद असलेले पाण्याचे हिश्शाचा तपशील. | | सार्वजनिक रस्त्याचे व मामूल-हक्क. | फेरफाराचा तपशील. | फेरफाराचे मंजुरीचे हुकूम. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तरी. | | | इतर. | | | | | | | | |
| | | प्रकार. | क्षेत्र. | आकार. | प्रकार. | क्षेत्र. | आकार. | प्रकार. | रक्कम. | | | | |
| १ | २ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| | | | ए. गुं. | रु. आ. पै. | | ए. गुं. | रु. आ. पै. | | रु. आ. पै. | | | | |
| २६-अ | विनशर्ती किरकोळ इनाम. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | अशत: सारामाफीनें जमीन दिलेबद्दल सर्व्हेकडील दुरुस्ती. | कलेक्टरसाहेब यांचा हु. नं. ५४/१०-७-०८. | ... |
| २६-ब | सरकारी (सार्वजनिक कामाकडे). | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | सारामाफीनें जमीन दिलेबद्दल सर्व्हेकडील दुरुस्ती. | कलेक्टरसाहेब यांचा हु. नं. १३-७-०९ | ... |
| २७ | परगणा वतनदार बिननोकरी इनाम. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| २८ | सरकारी (पडित) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | राजीनामा मंजूर केलेबद्दल मामलेदार यांचा हु. नं. जमीन पड असल्यामुळें १० वर्षेपर्यंत कमी साऱ्यानें दिली. | कलेक्टरसाहेब यांचा हु. नं. ४००/२०-७-१०. | गांवचा नमुना नंबर २ (iii) (२) पहा. |
| २९ | सरंजाम ... ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| | | | ४६ १५ | ११७ ८ ० | ... | ६० १० | ६४ ० ० | ... | ६१ १२ ० | ... | ..... | ... | ... |
| | | | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| | | | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| | | | ... | ... | ... | ५९ ३१ | ६१ १५ ० | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| | | | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ..... | ... | ... |
| | | | ४१ १५ | १०२ ८ ० | ... | ... | ... | ... | ५४ १२ ० | ... | ..... | ... | ... |

टीप.—( ) साग, शिसव व चंदन हीं सर्व झाडे सरकारची राखून ठेविलेली मालमत्ता आहे.

(२) परंतु खातेदाराने एकदां आपले शेतांतील उभीं झाडे विकत घेतल्यावर पुढे होणारी सर्व फूट त्याचे मालकीची आहे. (ठिकाणपरत्वें या टिपेच्या शर्ती बदलतील.)

(३) जेव्हां एकाद्या हिश्श्याचा राजीनामा देण्यांत येतो तेव्हां तो वहिवाटींत नसलेली (बिनवहिती) सरकारी [पड] जमीन होतो, परंतु त्यावर ठरविलेली आकारणी ही जमीनमहसुलाचा कायदा कलम ११७-ब याअन्वयें इतर हिश्श्यांच्या वहिवाटदारांकडून (वाहुदारांकडून) सामायिक रीतीनें वसूल केली जाण्यास पात्र असते. असा हिस्सा हा हिशेबांत सर्व ठिकाणीं "वहिवाटदार (वाहुदार)" या सदराखाली व त्याची आकारणी "ठरविलेला जमीनमहसूल" या सदराखालीं कायम ठेवली जाते: मात्र तो वहिवाटींत नाहीं (बिनवहिती) या गोष्टीची जेथें जरूर असेल तेथें नोंद केली जाते."

## तेरीज.

| | क्षेत्र. | | आकार. | | |
|---|---|---|---|---|---|
| | ए. | गुं. | रु. | आ. | पै |
| **अ. लावणी लायक जमीन—** | | | | | |
| (१) आकारी— | | | | | |
| (अ) वहिवाटींत असलेली सरकारी— | | | | | |
| (१) नेहमीचे सत्ताप्रकाराप्रमाणें ... ... | १३२ | १६ | १६२ | १० | ६ |
| (२) नवी शर्तीप्रमाणें ... ... ... | २५ | ३१ | ३६ | १२ | ० |
| †(ब) वहिवाटींत नसलेली सरकारी ... ... ... | ४ | ३२ | ६ | ८ | ० |
| (क) विशेष करारावरून कमी साऱ्यानें किंवा सारामाफीनें दिलेली ... | १२ | ० | ३० | ० | ० |
| (ड) इनामी ... ... ... ... | १२२ | २९ | २१५ | ६ | ० |
| एकूण आकारी ... | ३०० | २८ | ४९१ | ४ | ६ |
| (२) बिनआकारी (२५ एकर जमीन पट्यानें दिली आहे)... ... | १०० | ० | ... | | |
| एकूण अ ... | ४०० | २८ | ४९१ | ४ | ६ |
| **ब. लावणीसारखी नाहीं ती जमीन—** | | | | | |
| (१) नाकीर्दसार— | | | | | |
| (अ) पोट-खराब ... ... ... | १ | ९ | | | |
| (ब) नद्या व नाले ... ... ... | ५ | १५ | | * | * |
| एकूण ... | ६ | २४ | | | |
| (२) सार्वजनिक व विशेष कामाकडे ठेविलेली जमीन— | | | | | |
| (अ) फॉरेष्ट ... ... ... ... | १५ | ० | | | |
| (ब) कुरण ... ... ... ... | ... | | | | |
| (क) मोफत चारणी व गुरें उभीं राहण्याकडे ... ... | १९ | ३० | १९ | १२ | ० |
| (ड) गांवठाण (० एकर ९ गुंठे ६१ यार्ड जमीन भाडेपट्यानें दिली) ... | २ | ० | * | * | |
| (इ) तलाव ... ... ... ... | १० | २५ | | | |
| (फ) मसणवटा ... ... ... ... | ... | | | | |
| (ग) रेल्वे ... ... ... ... | ७ | १ | * | * | |
| (ह) पोट-खराब रस्त्याकडे ठेवलेला (०,६) व पाण्याचे पाट वगैरे ... | ० | ६ | | | |
| (आयू) रस्ते व मार्ग ... ... ... | ४ | १० | * | * | |
| (जे) क्यान्टोन्मेन्ट जमिनी (लष्करी तळ, गोळीबार वगैरेकरितां जागी). | ० | ० | | | |
| (के) शाळा ... ... ... ... | ० | १० | | | |
| (ल) धर्मशाळा ... ... ... ... | १ | ० | | | |
| एकूण ... | ६० | २ | १९ | १२ | ० |

† "४ किंवा ५ हून ज्यास्त सर्व्हे नंबर असल्यास हें तेरीज तयार करण्यासाठीं कुळकर्ण्यास सर्व्हे नंबराची यादी तयार करावी लागेल, व ती त्यानें तपासणी अंमलदाराचे उपयोगासाठीं ठेवावी."

| | क्षेत्र. | | आकार. | | |
|---|---|---|---|---|---|
| | ए. | गुं. | रु. | आ. | पै |
| (३) सर्व्हे नंबरांपैकीं बिनशेतीच्या कामाकरितां भाडेपट्ट्यानें दिलेली जमीन वर्ग ७ यांतील इनामासह— | | | | | |
| (अ) बंगले व माणसें राहण्याचीं इतर ठिकाणें ... ... | ३ | ० | | | |
| (ब) कारखानें, गिरण्या व दुसऱ्या औद्योगिक कामाच्या इमारती ... | ६ | ८ | | | |
| (क) विटांचीं आवारें व इमारती लाकडें ठेवण्याच्या जागा वगैरे (विनबांधलेल्या). | ५ | ० | | | |
| (ड) खेळण्याच्या जागा वगैरे ... ... ... | १ | ० | | | |
| (ई) मिठागरें ... ... ... ... | २५ | ० | | | |
| एकूण ... | ४० | ८ | | | |
| एकूण ब ... | १०६ | ३४ | १९ | १२ | ० |
| गांवची एकूण एकंदर ... | २०७ | २२ | ४७१ | ० | ६ |

* सर्व्हे नंबरांतून कमी केले १८ एकर २६ गुंठे.

तपासलें ( तारीख )

तारीख

तारीख

( सही )

पाटील.

( सही )

( सही )

कुळकर्णी.

जमाबंदी कारकून.

( सही )

मामलेदार.

# गांवचे हिशेब.

## नमुना नंबर १ बाबत खुलासा.

जमीनमहसुलाचे हिशेबास या नमुन्यापासून सुरवात होते हा नमुना गांवच्या सर्व जमिनी व त्यांपासून कायम उत्पन्न किती येतें हें दाखवितो. रिव्हिजन् सेटलमेंट पुरें झाल्यावर लँड रेकार्ड ख त्याकडून आकारबंदाची सहीशिक्यानिशीं पूर्ण नकल पुरविण्यांत येईल. कोष्टक २१ अगर २४ यास जुळणारे वाटेसंबंधाचे हक्क व इतर मुद्दे यांसंबंधीं टिपा जुन्या रजिष्टरावरून नव्या रजिष्टरांत लिहाव्यात व मामलेदार यांनीं त्यांची रुजवात घेऊन त्यांवर सही करावी. तालुक्यांत नकलेची जरूरी नाहीं. जेव्हां हें रजिष्टर (नमुना) फाटून जाईल किंवा मळीण होईल अगर दुरुस्तीनें पूर्ण भरून जाईल, तेव्हां तें नवीन तयार करण्याचा मामलेदार यांनीं कोणतेहि वेळीं हुकूम करावा, व वर सांगितल्याप्रमाणें तो तपासून त्यांवर त्यांनीं सही करावी. बहुतेक गांवीं हा नमुना सेटलमेंटची मुदत पुरी होईपर्यंत ३० वर्षे कायम राहील. ज्या गांवास सेटलमेंट लागू झालेली नाहीं, परंतु हक्काचे पत्रकाचे कामासाठीं फक्त सर्व्हे झालेली आहे अशा इनामी गांवास हा नमुना तयार केला जात नाहीं.

२. याचें तेरीज फार महत्वाचें आहे. जेव्हां त्यांत एकादा फेरफार होईल तेव्हां तें दरसाल नवीनं लिहिलें पाहिजे. या तेरजाचे आधारावर ठराववंद (गांवचा न. नं. ५) तयार होतो.

३. तेरिजेंत प्रथम लागवडींत असलेले, क्यानरांतील हाडी जमिनी (बेटा नसलेल्या) धरून व नंतर लागवडींत नसलेले सर्व जमिनीचा हिशेब असतो. परंतु लागवडींत नसलें जमिनीपासून येणारा वसूल यांत दाखविलेला नाहीं. तो गावचा नमुना नंबर २ यांत दाखविला आहे. साधारण नियम असा आहे कीं, जेव्हां एकादी जमीन—मग तिजवर शेतीचा सारा बसला असो अगर नसो—कायमची किंवा लांब मुदतीनें बिनशर्तीचे कामास (ल्या. रे. को. ३८) देण्यांत येते तेव्हां तिजवरील शेतीचा आकार कमी करण्यांत येतो, व बिनशेर्तीचा आकार बसविला असल्यास तो गांवचा नमुना नंबर २ यांत दाखविण्यांत येतो. नमुना नंबर १ यांतील आकार सर्व्हे खात्याकडून बसविलेले असतात, व नमुना नंबर २ यांतील आकार कलेक्टरसाहेब यांजकडून रुळीप्रमाणें ठरविलेले असतात. कित्येक प्रसंगीं बिनशेर्तीचे कामाकरितां जमीन नेमून देण्यांत येते ती शेतीचे कामाकरितां पुन्हां कांहीं वर्षांनीं परत येणेचा संभव असतो. सबब तिजवरील आकार न बदलतां तसाच कायम ठेवण्यांत येतो, आणि नंतर तो ठराववंदांत वजा करण्यांत येतो. सर्व्हे नंबर २४-अ बद्दल कशी वहिवाट केली आहे ती पहा.

४. जेव्हां सर्व्हे नंबरांत निरनिराळे प्रकारची जमीन निरनिराळे प्रकारचा सारा बसण्यास पात्र अशी सेटलमेंट खात्यास आढळते, तेव्हां तसे जमिनीचे विभाग गांवचा नमुना नंबर १ यांत दाखविले आहेत. व ते लॅंड रेकार्डमध्यें पृथक राहतील. परंतु जुने पोट नंबर, फाळणी नंबर आणि हिशेबीं दाखल केलेले नंबराचे भाग हे जेव्हां प्रत्यक्ष वहिवाटीस जुळते नसतील तर ते बंद करण्यास हरकत नाहीं. (स. ठ. नं. ६६००-१८). (कारण ते जमिनीचे वेगळे प्रकार नसून कबजाचे निरनिराळे प्रकार होते.) होतां होईल तोंपर्यंत प्रत्येक सर्व्हे नंबराचा शेज नंबर न बदलतां कायम ठेवणें हें फार महत्वाचें आहे. नाहींतर शेंकडों वर्षांनतर दस्तऐवजांत कोणती जमीन दाखल केली होती हें शोधून काढणें फार अवघड होईल. सर्व्हे नंबर २ याचे २ विभाग केले तर पहिले विभागास २-अ, व दुसरे विभागास २-ब, व असेच पुढें नंबर दिले पाहिजेत. कोणत्याहि विभागास नुसता स. नं. "२" देऊं नये. दिल्यास या विभागाचा व मूळच्या अविभक्त स. नं. २ चा घोटाळा होईल. तसेंच नंबर २-ब याचे आणखी पोट-विभाग केले तर त्यास नंबर २-ब १, २-ब २, याप्रमाणें पुढें, असे नंबर दिले पाहिजेत, परंतु पुष्कळ लहान सर्व्हे नंबर मिळोन एक नंबर केला असेल, तेथें न. नं. १ मध्यें नवीन नंबरास अशी टीप द्यावी कीं, सर्व्हे नंबर १७/१८-अ. १८-ब. १९-अ. १९-ब. वगैरे मिळून हा नंबर केला आहे. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

५. * * * * * कांहीं गांवांस बागाईत जमीन नसते. कांहीं गांवांस भात जमीन नसते. जमिनीचे प्रकाराबद्दलचीं सर्व कोष्टकें मर्जीवरचीं आहेत आणि सर्व्हे आकारबंदावरून वर नमूद केले सदरांपैकीं ज्यांची आवश्यकता दिसून येईल तितकी दाखल करावीं, ज्यांत जमिनीचे ४ प्रसिद्ध प्रकारांखेरीज जास्त प्रकारची जमीन आहे अशीं गांवें थोडींच असतील. * * * * * *

६. सूटतडकुबीचे हुकुमावरून जमिनीचे दिशाबद्दल सूट न देतां पुष्कळ प्रकारचे भात-जमिनीवर व बागाईत जमिनीवर पाण्याचे जादा सोईसंबंधानें बसविलेले विशेष आकाराची सूट पुष्कळ प्रसंगीं पृथक्पणें देतां येते. * *

प्रत्येक नंबरावर पाण्याचा आकार ताबडतोब ठरविण्यास मदत व्हावी म्हणून कोष्टकें १९ व २० दाखल केलीं आहेत. (स. ठ. नं. ८८६९-०२.)

७ सरकारास अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही प्रकारचे सार्वजनिक हक्क जसे रस्त्याचे हक्क, पाण्याचे हक्क वगैरे, हे नमूद करण्यासाठीं कोष्टक २१ दाखल केलें आहे. असले हक्क हक्कनोंदणीचे कागदांत पूर्णपणे दाखल नाहीत. कारण तो कागद खाजगी हक्काबद्दल आहे खाजगी कबज्यांतील एका जमिनीचे तुकड्यांत दुसरे वहिती तुकड्यांतून येण्याचा रस्त्याचा पुरातनचा हक्क आहे असें दिवाणी कोर्टानें ठरविलें असेल तर तशी हक्काची नोंद करणें इष्ट आहे. कारण अशा जमिनीचा

जेव्हां कधीं राजिनामा होईल तेव्हां त्या हक्काची मालकी सरकारकडे येईल. हक्कासंबंधानें एकदां सरकारविरुद्ध आढळून आलेले अपुरे कागदामुळें नवीन वादविवाद उत्पन्न करणें वाजवी नाहीं. कांहीं ठिकाणीं पाटस्थळ आकार कायमचा अगर अन्य रीतीनें कमी केलेला आहे. (स. ठ. नं. ४९६७–१७) ज्या सर्व्हे नंबरास बंधाऱ्याचें पाणी घेण्याचा हक्क होता तें पाटस्थळ आकार दाखल नसल्यामुळें ओळखतां येणार नाहींत. आणि ज्या गांवीं इरिगेशन हक्काचें पत्रक नाहीं त्या गांवांस गा. न. नं. १ मध्यें प्रत्येक नंबराचे समोर "बंधारा नं. ३ मधून पाणी घेण्याचा हक्क आहे" अशी टीप द्यावी. रिव्हिजन सेटलमेंटचे वेळीं जेव्हां हा नमुना नवीन तयार केला जातो तेव्हां जर अशा टिपा (येथें वर्णन केलेल्या सर्व हक्काबद्दल आणि पोटखराब वर्ग २ बद्दल) पुढें ओढल्या नाहींत तर तो पुरा करण्यासाठीं डिस्ट्रिक्ट सर्व्हे ऑफिसांत पाठविला पाहिजे.

८. कोष्टक २४ हें विहिरी व झाडें यांचा, व तसाच सरकारी व लोकलफंड इमारतींचा दाखला ठेवण्यासाठीं घातलेलें आहे (स. ठ. नं. ३४८०–७८) सर्वसाधारण राखून ठेवलेले झाडांचे हक्क नमुन्याचे शेवटीं दिले आहेत. (रे. को. रु. ९१ पहा.) सरकारी जमिनींतील झाडें खाजगी इसमाचीं असूं शकतात, व खाजगी जमिनींतील झाडें सरकारी असूं शकतात. तसेंच राखून ठेवलेलीं झाडें सरकारकडून कुळास विकतांहि येतात. शिवाय कांहीं इमारती शेतीचे वगैरे कामाच्या म्हणून बिनशेतीचे सान्यापासून माफींत असतात. ही माफी कानाडोळा न करितां लक्षांत घेतली आहे असें दाखविण्याकरितां सर्व्हे नंबर ६ समोर २४ वे कोष्टकांत नोंद केली आहे ती पहा. फॉरेष्ट जमिनीच्या हद्दी ठरल्यानंतर जेव्हां फॉरेस्ट सर्व्हे नंबरांतील राब अथवा डाहाळी तोडण्याचे हक्क दिले जातात तेव्हां ते हक्क गांवास न. नं. १-अ नसला तर ह्या कोष्टकांत दाखल करावेत.

९. गांवठाणचें क्षेत्र गटानें दिलें आहे. गांवठाणापैकीं कांहीं तुकडे भाडेपट्यानें दिले तर त्यांचें क्षेत्र गांव नमुना नंबर २ (i) यांत दाखवावें. असे भाडेपट्यानें दिलेले तुकड्यांचें एकूण क्षेत्र (हिशेबीं आणलें नाहीं तरी) तेरजांत कसें दाखविलें आहे इकडे लक्ष द्यावें. अर्थात गांवठाणचें सबंध क्षेत्र बिनशेतीचें म्हणून एकदां वजा केलें आहे. म्हणून प्रत्येक तुकड्याचें वेगळें क्षेत्र पुन्हा दुबार वजा करितां येणार नाहीं.

१०. * * * * * *

११. गांव नमुना नंबर १ यांत वारंवार फेरफार होण्याचा संभव असतो. क्षेत्रांत किरकोळ फेरफार मोजणीनें किंवा जमीन वाहून वगैरे गेल्यानें आढळून येतात. इनामें खालसा होतील किंवा नवीन देण्यांत येतील. जमीन सार्वजनिक किंवा बिनशेतीचे उपयोगास देण्यांत येईल किंवा त्या उपयोगांतून ती पुन्हा परत येईल. सर्व्हे नंबराचे पोटविभाग केलेमुळें एकर व आकारांत होणारे फेरफारबद्दल पुढे हक्क नोंदणीचा भाग प्यारा २५ पान (९९) पहा. कोणताहि फेरफार, ज्यावरून शेतीचे सान्यांत किंवा स. नं. चे क्षेत्रांत फरक होतो अथवा नवीन सर्व्हे नंबर करावा लागतो, तसा फेरफार सर्व्हे ऑफिसास रिपोर्टानें कळविला पाहिजे. म्हणजे तें ऑफिस आपले हिशेबी कागद (म्हणजे ज्याचे आधारावरून गांव नमुना नंबर १ तयार झाला ते) दुरुस्त करून दुरुस्तीपत्रक (कमजास्तीं पत्रक) पाठवितों. सेटलमेंटच्या मुदतींत आकारांत दुरुस्ती मंजूर करण्याचे अधिकारबद्दल ल्यांड रे. को. रु. पहा. या पत्रकाची नोंद मामलेदार यांनीं तालुका नमुना नंबर ४ (प्यारा ७ पान २१५) यांत ठेवावी, व नंतर गांवचा नमुना नंबर १ यांत जरूर ती दुरुस्ती करण्याबद्दल कुलकर्णी यास हुकूम द्यावा. कुलकर्ण्यानें या हुकुमाचा दाखला कोष्टक २२ व २३ यांत लिहावा. ह्याकरितां गांवचा नमुना नंबर १ यांतील मूळच्या नोंदी फार दाट लिहूं नयेत. प्रत्येक ओळीचे दरम्यान एक इंच (जास्त नको) जागा सोडण्याचें प्रमाण ठेवावें. तेरीज दुरुस्त करावें व संबंध असणारे सदराबद्दल कमिजास्तीचा खुलासा गांवचा नमुना नंबर ५ यांतील शेरेकोष्टकीं लिहावा. नमुन्याचे फार्मांत गांवचा नमुना नंबर १ यांतील दुरुस्तीचीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत व रद्द केलेले आंकडे कौंसांत दाखविलें आहेत. परंतु तेरीज, दुरुस्तीनंतर जसें असावयास पाहिजे तसें तयार केलेलें आहे. दुरुस्त्या केल्यानंतर कुलकर्ण्यानें तसा दाखला देऊन तें दुरुस्तीपत्रक मामलेदार यांजकडे तपासणी (आडिट) वक्तीं उपयोगासाठीं परत पाठवावें.

१२. भोगवट्यांत असले जमिनीचे राजिनामे कबुलायतीबद्दल जसजसे हुकूम येत जातील तसतशी दुरुस्ती कुलकर्ण्यानें जेव्हांचे तेव्हां स्वतः केली पाहिजे. कबुलायत किंवा राजिनामा दाखल झाला या गोष्टीची त्यानें नोंद ठेवली पाहिजे. विशेषेंकरून नवीन शर्तीवर दिले जमिनीच्या कबुलायती घेऊन गांवचा नमुना नंबर १, कोष्टक २२ यांत नोंदून (सरकार ठ. नं. ८२३६-०२) त्या फक्त ५ वर्षे जवळ ठेवाव्या. या दाखल्याशिवाय राजिनामे कबुलायतीबद्दल दुसरी अनुक्रमणिका ठेवण्याचें कारण नाहीं.

१३. इनाम जमीन किंवा त्याजवरील जुडी यांचा तपशील गांव नमुना नंबर १ यांत आतां दिलेला नाहीं. किंवा इनाम जमीन धारण करणारांचीं नांवेंहि दिलेलीं नाहींत हा सर्व तपशील गांव नमुना नं. ३, ६ व ७ यांत आढळून येईल.

१४. गांवचे पहिले सर्व्हे सेटलमेंटचें साल, रिव्हिजन (फेर) सेटलमेंटचें साल, आणि त्यापुढील फेर सेटलमेंट योग्य होणेंचें जें साल प्रसिद्ध झालें असेल तें साल, अशीं कुलकर्ण्यानें ह्या नमुन्याचे मथाळ्याजवळ लिहावीं. तसेंच निरनिराळे वर्गाचे जमिनीबद्दल मुख्य दर जे सेटलमेंट खात्याकडून लिहून आले असतील तेहि दाखल करावे. व सेटलमेंट

रिपोर्टांत ज्या गटांत गांव दाखल केला असेल तो गट दाखल करावा. त्याचप्रमाणें हाल्याच्या ठरविलेल्या तारखा व त्या कोणाचे हुकुमावरून ठरल्या तो दाखलाहि लिहावा. जेव्हां हा नमुना प्रथम तयार करण्यांत येईल किंवा पुन्हा लिहिण्यांत येईल तेव्हां मामलेदार व प्रांतसाहेब यांनीं हा तपशील पडताळून पहावा.

१५. विशेष व सार्वजनिक कामाकरितां ठेवलेले वेगवेगळे जमिनीचे प्रकारचे तपशिलाची पुढील हिशोबास जरूर लागत नाहीं फक्त फॉरेष्टचे क्षेत्राची जरूर लागते. परंतु असें वारंवार होण्याचा संभव असतो कीं तालुक्यांत अमुक एक विवक्षित कामाकडे, म्हणजे मसणवटकडे, शाळेचे खेळण्याचे जागेकडे, किंवा अशाच प्रकारचे दुसरे कामाकडे, एकूण किती जमीन दिलेली आहे हें जाणण्याची सरकार किंवा कलेक्टरसाहेब यांस जरूरी भासते. हीं सर्व कारणें व त्याकरितां ठेवलेलें गांवांतील सर्व क्षेत्र कुळकर्ण्यास एकदम समजावें म्हणून तेरजांत एकदांच असा सर्व तपशील देणें उपयोगाचें आहे. कधीं कधीं एका कारणाची जमीन दुसरे कारणाकडे वर्ग करण्यांत येते. (जसें तलावाची जमीन मसणवटाकडे.) ठराव-बंदांत यामुळें कांहीं एक फरक होणार नाहीं. परंतु गांवचा नमुना नंबर १ व त्याचें तेरीज यांत दुरुस्ती करावी लागेल.

१६. * * * * * * *

१७. जेव्हां योग्य हुकुमानें सर्व्हे नंबरपैकीं जमीन सारामाफीनें कायमची विकण्यांत येईल, किंवा* बिगर शेतीच्या कामाकरितां बक्षिस देण्यांत येईल (पहा ल्यां. रे. को. रूळ ३३; १९३० प्रत) तेव्हां तिचें क्षेत्र व आकार असे ती जमीन सार्वजनिक अथवा खाजगी असेल त्याप्रमाणें ब (२) अथवा ३ खालीं वजा केले पाहिजेत. आकार बसला असेल तो सर्व्हेकडील कमजास्ती पत्रकानें कमी होईल आणि अशा तुकड्याचा हमेष वेगळा नंबर करण्यांत येईल. परंतु असा तुकडा गांवठाणपैकीं, रस्त्यापैकीं किंवा सर्व्हे नंबरांत सामील नाहीं अशा दुसरे जमिनीपैकीं असेल तर त्याचें क्षेत्र "विशेष किंवा सार्वजनिक कामाकडे" ठेवले क्षेत्रांतून कमी करून "ब (२) चे योग्य पोट-सदराखालीं" या सदराखालीं वर्ग केलें पाहिजे. जेव्हां जमीन साऱ्याचे माफीनें कांहीं मुदतपर्यंत विकण्यांत येईल, किंवा सदर मुदतीचा (पान १६४, १६५ पहा) सारा (नेहमीं बिनशेतीचा) एकदम ठोक एक रकमेनें घेण्यांत येईल (लोकल फंडासह) तेव्हां मूळचा आकार सर्व्हेकडील कमजास्ती पत्रकानें कमी करणेचा नाहीं—परंतु तो आकार व क्षेत्र हीं शेतीकरितां असल्यास "साऱ्याचे माफीनें किंवा मुद्दाम कमी साऱ्यानें दिलेली जमीन" या सदराखालीं * अगर बिनशेतीकरितां असल्यास ब (२) या सदराखालीं वजा केलें पाहिजेत. आणि ठरीव मुदतीपुढें माफी चालू राहूं नये, याचे खात्रीसाठीं गांवचा नमुना नंबर २ यांत योग्य सदराखालीं नोंद केली पाहिजे. दोन्ही प्रसंगीं वसूल कधींच घ्यावयाचा नाहीं किंवा कांहीं मुदतपर्यंत घ्यावयाचा नाहीं असा शेरा गांवचा नमुना नंबर ६ यांत लिहून ठेवला पाहिजे. जेव्हां जमीन रेल्वे किंवा लोकलबोर्ड संस्थांस विकण्यांत येते तेव्हां वसुलाचा भरणा हुजुरास किंवा तालुक्यास येतो. गांवीं येत नाहीं. फक्त क्षेत्राची सर्व्हे दुरुस्ती कुळकर्ण्यानें करावयाची आहे.

१८. * * * * * * *

१९. वर सांगितलीं हीं किंमत वसूल आलेबद्दल व्यापारी व्यवहारांचीं कामें झालीं. परंतु जेव्हां सारा (शेतीचा अगर बिनशेतीचा) सार्वजनिक किंवा धार्मिक कारणासांठीं अजीं किंवा कांहीं अंशीं काढून टाकण्यांत येईल तेव्हां "हा दुमाला" गांवचा नमुना नंबर ३ यांत दाखल केला पाहिजे. हा दुमाला कोणतेहि वर्गाचे नोकरीसंबंधीं किंवा देवस्थान इनामसंबंधीं असेल तर तो ज्या त्या सदराखालीं जाईल. परंतु किरकोळ सार्वजनिक व धर्मार्थ देणग्या ह्या नवीन वर्ग ७ खालीं येतात. (स. ठ. नं ५५-०२.) मग सार्वजनिक वगैरे उपयोगाकडे जमीन दिल्यामुळें सर्व्हे कमजास्ती पत्रकावरून सारा कमी केला असो किंवा सारा हिशोबी कायम ठेवून "नुकसान" म्हणून वजा केला असो. त्यावर लोकलफंड घेतला जात नाहीं (स. ठ. ब/३४-२२).

जमीन देण्यासंबंधीं व सारा माफ अगर कमी करण्यासंबंधीं अधिकाराविषयीं सविस्तर खुलासा ल्यांड रे. को. रूळींत पहा.

२०. * * * * * * *

## गांवचा नमुना नंबर १-अ.

फॉरेष्ट जमिनचिं रजिष्टर, मौजे नहीगांव, तालुका बलसार, सन १९०७-०८.

| सर्व्हे नंबर. | फॉरेष्टचें क्षेत्र. | | | | | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|
| | फॉरेष्टचा नंबर असल्यास. | गांवचें फॉरेष्ट किंवा मुलकी खात्याचे ताब्यांतील फॉरेष्ट (फॉरेष्ट आक्टाप्रमाणें असलें तरी). | रक्षण केलेलें फॉरेष्ट (प्रोटेक्टेड). | राखून ठेवलेलें फॉरेष्ट (रिझर्व्ह). | फॉरेष्ट सेटलमेंट ऑफिसर यांनीं आक्टाअन्वयें हक्क ठरविले असतील ते. | |
| | | | | एकर. गुंठे. | | |
| २३ | | | | १५ ० | गांवापासून खडोबाचे देवळास जाण्याचा रस्त्याचा हक्क आहे. (मासल्याकरितां एक नोंद दिली आहे.) | राखून ठेवलें फॉरेष्ट म्हणून नोटीस प्रसिद्ध झाली. सरकारी ठराव नंबर १२३४/१०-४-१८८२. फॉरेष्ट सर्व्हे प्रमाणें क्षेत्र १६ एकर १७ गुंठे होतें. |

तारीख १ ऑगष्ट १९०७.

तपासलें. (सही) रामचंद्र रघुनाथ,
गांवकामगार.

(सही) कारकून.

फॉरेष्ट सेटलमेंट ऑफिसर. मामलेदार.

---

## गांवचा नमुना नं १-अ बाबत खुलासा.

ज्या गांवात पांचाहून जास्त फॉरेष्ट नंबर आहेत त्या गांवीं फक्त ह्या नमुन्याची जरूरी आहे. जेथें फक्त पांचचा किंवा त्याहून कमी नंबर असतील तेथें जरूर तो तपशील गांवचा नमुना नंबर १ यांत द्यावा, व हक्काची नोंद कोष्टक २१ यांत करावी. हा नमुना किंवा नमुना नंबर १ चें तेरीज यांजवर सही करण्यापूर्वी मामलेदार यांनीं फॉरेष्ट खात्याचे कागदाशीं रुजुवात घेऊन हमेष मेळ ठेवावा; फॉरेष्ट आक्टाखालील जाहिरात (ठ. नं. १४२६२-१९) आणि राखून ठेवलेले फॉरेष्ट, संरक्षण केलेलें फॉरेष्ट, (स. ठ. नं. १९६३-०७ पहा.) किंवा मुलकी खात्याचे ताब्यांतील फॉरेष्ट, अशी वर्गवारी दाखवावी. अर्थात फॉरेष्टास जोडलेल्या किंवा फारेष्टांतून कमी केलेल्या जमिनीची नोंद ह्यांत व तशीच नमुना नंबर १ यांत करून आधार लिहिला पाहिजे. असे हुकूम करणारे कामगार म्हणजे सेटलमेंट ऑफिसर किंवा कलेक्टर असले पाहिजे. फॉरेष्टाकडे जमीन देण्यांत आली म्हणजे तिचा आकार हमेष कमी केला पाहिजे.

२. * * * * * * *

३. * * * * * * *

४. * * * * * * *

# गांवचा नमुना नंबर २.

इतर कायम उत्पन्नाचें रजिष्टर, मौजे नहीगांव, तालुका बलसार, सन १९०७-०८. "ल्यांड रेव्हिन्यू कोडाचे रुळ ८१/८२ प्रमाणें ज्या वर्गांत गांव दाखल केला असेल तो वर्ग."

| अनुक्रम नंबर. | जमिनीचें वर्णन. | दिलेलें क्षेत्र. | कौलनाम्याचा (पट्याचा) प्रकार व मुदत. | कबजाहक्काची किंमत, असल्यास. | वार्षिक उत्पन्न. | मुदत. पासून. | मुदत. पर्यंत. | मंजुरीचा हुकूम. | तालुक्याचा नमुना नंबर ३१-अ अथवा तालुक्याचा नवीन नमुना नंबर २ यांतील नोंदीचा नंबर. | ज्यास दिली त्याचें अगर कौलदाराचें नांव. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | बिनशेतीचें उत्पन्न. | | | | | | |
| | | | भाग १.—गांवठाण पैकीं (सर्व्हे नंबरांत सामील नाहीं अशा जमिनीपासून.) | | | | | | | | |
| | | ए. गुं. यार्ड. | | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | | | |
| १ | गांवठाण रस्त्यापैकीं जमीन. | ० ० ५० ६¾ आणे. | पडवी वाढविणें-करितां. | १२ ८ ० | ० ८ ४ | तारीख १ आगष्ट १९००. | तारीख ३१ जुलै १९९९. | कलेक्टरसाहेब यांचा हु. नं. ५५/१-८-१९००. | १ | नरसिंहराव बळवंतराव. | |
| २ | गांवठाण रस्त्यापैकीं जमीन. | ० ० १०० १३½ आणे. | पागोळ्या वाढविणें-करितां. | ० ० ० | १ ० ८ | तारीख १ आगष्ट १९०१. | तारीख ३१ जुलै २०००. | कलेक्टरसाहेब यांचा हु. नं. ५५/२१-६-०१. | २ | नरसिंहराव बळवंतराव. | |
| ३ | गांवठाणची खुली जागा. | ० ८ ३२ ८ ४½ आणे. | घरांकरितां ... | ११० ० ० | १० ६ ८ | तारीख १ आगष्ट १९०१. | तारीख ३१ जुलै २०००. | कलेक्टरसाहेब यांचा नंबर ६०/१-८-०१. | ६ | मनाजी आनंदराव. | |
| | भाग १ ची बेरीज ... | ० ९ ६१ ९ ८½ आणे. | | | ११ १५ ८ | | | | | | |

## भाग २.—सर्व्हे नंबरपैकीं.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व्हे नंबर १-ब ... | ० २० ० | बंगले व कंपाऊंडा-करितां साष्टीरुळ-प्रमाणें दर एकरीं ४० रुपयेप्रमाणें. | | २० ० ० | तारीख १ आगष्ट १९००. | तारीख ३१ जुलै १९५०. | कलेक्टरसाहेब यांचा नंबर ५६/१-८-१९००. | ३ | मनाजी आनंदराव. | |
| २ | सर्व्हे नंबर १५ ... | ६ ८ ० | कारखान्याकरितां नेहमींचे रुळीप्रमाणें दरएकरीं २० रुपये-प्रमाणें. | | १२४ ० ० | तारीख १ आगष्ट १९००. | तारीख ३१ जुलै १९५०. | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ६५/१-८-१९००. | ४ | नरसिंहराव बळवंतराव. | |
| ३ | सर्व्हे नंबर २२-ब... | २ २० ० | बंगला व कांपाऊंड-करितां ल्यां. रे. को. रु. ५६ II वरून दर एकरीं २० रुपयेप्रमाणें. | | ५० ० ० | तारीख १ आगष्ट १९०१. | तारीख ३१ जुलै १९५१. | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ९०/१-८-०१. | ७ | नारायण कुलकर्णी. | पन्नास वर्षांचे आकाराची तडजोड करून ठोक एक रकमेनें वसूल म्हणजे (५०+३८२) × २५= १३२८-२-० घेतला तर कोष्टक ६ कोरे राहील : मात्र या कोष्टकीं आणि गांव नमुना नंबर ६ यांत एकदम वसूल आल्याचा शेरा लिहिला पाहिजे. |
| ४ | सर्व्हे नंबर २६-अ... | १ ० ० | तालमीकरितां कमी दरानें. | | (२० ० ०) जुडी रुपये. २ ० ० नुकसान १८ ० ० | ११-७-०८ | उपयोग बंद होई-पर्यंत. | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ५४/१०-७-०८. | ८ | रेव्हर्ड जे. शिलीडी मिशन हाऊसचे म्यानेजर. | "हा सर्व्हे नंबर बिनशेतीचा असून इनामहि आहे. येथें, बिनशेतीचा पूर्ण आकार दर्शविण्यासाठीं व गां. न. न. ३ यांत नुकसान वगैरे दर्शविण्या-साठीं, दाखल केला आहे." |
| ५ | सर्व्हे नंबर २५-अ... | २५ ० ० | मिठागराकरितां ५ रुपये एकर- | १०६ ० ० | १२५ ० ० | १-८-१९१२ | ३१-७-१९५२. | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ९५/२०-३-१२. | १० | बाळकृष्ण वासुदेव. | |
| ६ | सर्व्हे नंबर २२-अ... | ५ ० ० | विटांचे आवारा-करितां दरसाल १० रुपये एकर प्रमाणें. | | ५० ० ० | ३१-३-१२ | उपयोग संपेपर्यंत. | सदर नंबर २१/११-३-२२. | ११ | नरसिंगराव बळवंतराव. | |
| | भाग २ ची बेरीज ... | ४० ८ ३ | | | ३८९ ० ० | | | | | | |
| | | | | | −१८ ० ० | | | | | | |

## शेतीसंबंधी.

### भाग ३.—विशेष शर्तीचे भाडेपट्टे.

| अ-क्रम नंबर. | जमिनीचें वर्णन. | दिलेलें क्षेत्र. | कौलनाम्याचा (पट्याचा) प्रकार व मुदत. | कबजा-हक्काची किंमत असल्यास. | वार्षिक उत्पन्न. | मुदत. पासून. | मुदत. पर्यंत. | मंजुरीचा हुकूम. | तालुक्याचा नमुना नंबर ३१-अ अथवा तालुक्याचा नवीन नमुना नंबर २ यांतील नोंदीचा नंबर | ज्यास दिली त्याचें अगर कौलदाराचें नांव. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | ए. गुं. यार्ड. | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | | | | | |
| ९ | एकूण बिनशेतीचे उपयोगाकडे ... | १० | ८ | | | | ४० | ८ | | | | | | | | | ३० | ० | | | सदर ५ एकर जमीन विटांचे आवाराकरितां दिली कलेक्टरसाहेब यांचा हु. नं. २१, तारीख ११-३-१२. |
| १० | शेतीचे उपयोगी नाहीं अशी एकूण जमीन. | १७१ | १८ | १९ | १२ | ० | २०६ | ३४ | १९ | १२ | ० | | | | | | ३५ | १६ | | | |
| ११ | बाकी शेतीकरितां ... | ३३६ | ४ | ५०३ | ७ | ६ | ३०० | २८ | ४५१ | ४ | ६ | ३५ | १६ | ५२ | ३ | ० | | | | | |
| १२ | **वजा.**—इनाम गां. न. नं. ३, वर्ग १ ते ६ प्रमाणें. | | | १६१ | १४ | ६ | | | १४८ | २ | ६ | | | १३ | १२ | ० | | | | | पूर्ण आकार बसविला. कलेक्टरसाहेब यांचा *हुकूम नंबर १३५६/१२-६-०७ हा फेरफार १९०७ सालीं घडला. परतु कुळकर्ण्याचे हयगईमुळें नजरेस आला नाहीं. आतां १९११-१२ चे तपासणी नंतर हिशेबीं आणला. |
| १३ | लागणीलायक आकारी पडजमीन ... | ४ | ३२ | ६ | ८ | ० | ४ | ३२ | ६ | ८ | ० | | | | | | | | | | |
| १४ | विशेष करारानें सारा माफ केलेलीं किंवा सारा कमी केलेली जमीन. | | | २६ | ४ | ० | | | २६ | ४ | ० | | | | | | | | | | सूचना.—इनाम क्षेत्र १२ खालीं, १८ खालीं नव्हे, हे दाखविण्याची जुनी वहिवाट दुसरें इनाम व कमी केलेलें (तालुकेदारी मेवासी वगैरेचें क्षेत्र व सारा) एकाच तत्त्वावर दाखविण्यांत यावा म्हणून बदलण्यांत आली आहे. |
| १५ | बाकी लागणीलायक वहिती जमीन-सारा, धाऊक धारा व जमा येणारी. | ३३१ | १२ | ३०८ | १३ | ० | २९५ | ३६ | २७० | ६ | ० | ३५ | १६ | ५२ | ३ | ० | | | १३ | १२ | ० |
| १६ | **यापैकीं**—सरकारी नेहमीचे शर्तीवरची. | १६६ | ३७ | २१३ | १३ | ६ | १३२ | १६ | १६२ | १० | ६ | ३४ | २१ | ५१ | ३ | ० | | | | | |
| १७ | नवीन शर्तीवरची ... | २६ | २६ | ३७ | १२ | ० | २५ | ३१ | ३६ | १२ | ० | ० | ३५ | १ | ० | ० | | | | | |

| | | गुदस्त साल. | | | | | | चालू साल. | | | | | | कमी. | | | | | | जास्ती. | | | | | | कमीजास्तीचे कारणाबद्दल शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र. | | आकार. | | | | क्षेत्र. | | आकार. | | | | क्षेत्र. | | आकार. | | | | क्षेत्र. | | आकार. | | | | |
| | | ए. | गुं. | रु. | आ. | पै | | ए. | गुं | रु. | आ. | पै | | ए. | गुं. | रु. | आ. | पै | | ए. | गुं. | रु. | आ. | पै | | |
| १८ | इनाम जुडीमुद्दां ... | १२२ | २९ | ५३ | ७ | ६ | | १२२ | २९ | ६७ | ३ | ६ | | | | | | | | | | १३ | १२ | ० | | जरी पूर्ण आकार बसविला तरी जमीन अजून इनाम वर्गाखाली व आकार जुडी सदराखाली धरलेली आहे. |
| १९ | जमेसुद्दां मुद्दाम कमी केलेली ... | १५ | ० | ३ | १२ | ० | | १५ | ० | ३ | १२ | ० | | | | | | | | | | | | | | |
| २० | अधिक—गांवचा नमुना न. २ (३) पत्र्यानें दिलेले बिनआकारी जमिनीचे शेतीचें उत्पन्न. | २५ | ० | ६ | ४ | ० | | २५ | ० | ६ | ४ | ० | | | | | | | | | | | | | | |
| २१ | एकूण शेतीचे उपयोगाचें कायम क्षेत्र व उत्पन्न. | ३५६ | १२ | ३१५ | १ | ० | | ३२० | ३६ | २७६ | १० | ० | | ३५ | १६ | ५२ | ३ | ० | | | | १३ | १२ | ० | | |
| | अधिक—बिनशेतीचे उपयोगाची जमीन व तिचें उत्पन्न. | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २२ | सर्व्हे नंबरपैकीं (गां. नं. २) (२) बरहुकूम. | १० | ८ | २१४ | ० | ० | | ४० | ८ | २८९ | ० | ० | | | | | | | | ३० | ० | १७५ | ० | ० | | बिनशेतीचा विशेष आकार गां. नं. न. २ (ii) प्रमाणें; मिठागराकरितां व विटाचे आवाराकरितां जमीन दिल्याबद्दल. |
| २३ | गांवठाण वगैरेपैकीं (गां न. नं. २) (१) बरहुकुम. | ० | ९½ | ११ | १५ | ८ | | ० | ९½ | ११ | १५ | ८ | | | | | | | | | | | | | | |
| २४ | वजा—इनाम वर्ग ७ ... | | | १८ | ० | ० | | | | १८ | ० | ० | | | | | | | | | | | | | | |
| २५ | बाकी—बिनशेतीचें निवळ उत्पन्न व क्षेत्र. | १० | १७½ | २०७ | १५ | ८ | | ४० | १७½ | ३८२ | १५ | ८ | | | | | | | | ३० | ० | १७५ | ० | ० | | |
| २६ | एकूण कायम उत्पन्न ... | ३६६ | २९½ | ५२३ | ० | ८ | | ३६१ | १३½ | ६५९ | ९ | ८ | | ३५ | १६ | ५२ | ३ | ८ | | ३० | ० | १८८ | १२ | ० | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | अधिक—किरकोळ जमीनबाब— | | | | | | | | | | | | | | | | | |
| | (१) लोकलफंडास पात्र ... | | | ९४ | ० | ८ | | | १५० | ५ | ० | | | | | | ५६ | ५ ० |
| | (२) लोकलफंडास पात्र नाहीं बाबी. | | | १५ | ० | ० | | | १५ | १२ | ० | | | | | | ० | १२ ० |
| २८ | एकूण वसूल होणेची जमीनबाब ... | ३६६ | २९½ | ६३२ | ० | ८ | ३६१ | १३½ | ८२५ | १० | ८ | ३५ | १६ | ५२ | ३ | ० | ३० | ० २४५ १३ ० |
| | अधिक—लोकलफंड— | | | | | | | | | | | | | | | | | |
| २९ | कायम जमीनबाबेवर ... | | | ४३ | १४ | ११ | | | ५१ | ९ | ९ | | | | | | ७ | १० १० |
| ३० | किरकोळ उत्पन्नावर २७ (१) ... | | | ५ | १४ | ० | | | ९ | ६ | ९ | | | | | | ३ | ८ ९ |
| ३१ | पंचे अंशामुळें नफा किंवा तोटा, मां. न. न. ११ शी रुजवाती-बद्दल. | | | | | | | | ० | १ | ९ | | | | | | ० | १ ९ |
| ३२ | एकूण निवळ लोकलफंड ... | | | ४९ | १२ | ११ | | | ६१ | २ | ३ | | | | | | ११ | ५ ४ |
| ३३ | संयुक्त जमीनबाबेची व जमीन-महसूल येणारे क्षेत्राची एकूण एकंदर वेरीज. | ३६६ | २९½ | ६८१ | १३ | ७ | ३६१ | १३½ | ८८६ | १२ | ११ | ३५ | १६ | ५२ | ३ | ० | ३० | ० २५७ २ ४ |

निवळ कमी क्षेत्र ए. ५ गुं. १६ व जास्ती रुपये २०४–१३–१.

एकूण जमाबंदी रुपये आठशें शहायशीं बारा आणे अकरा पै फक्त.

तपासलें.

तपासलें, तारीख

कारकून. पाटील. कुळकर्णी.

प्रांताचे साहेब
मामलेदार.

## नमुना नंबर ५ बाबत खुलासा.

या नमुन्यांत जमीनबाबेचें येणें कायम व फिरतें, एक ठिकाणीं आणलेलें आहे, व गुदस्त सालाशीं तुलना करून कायम उत्पन्नांत जे काय फरक झाले आहेत, त्यांची कारणें दिलीं आहेत. हा नमुना तपासणीचे कामीं फार महत्त्वाचा आहे. कारण कायम उत्पन्नाचे बाबतींत फक्त प्रत्येक फरकाची तपासणी व्हावयास पाहिजे असते. परंतु फिरते उत्पन्नासंबंधानें प्रत्येक रकमेची तपासणी व्हावयास पाहिजे. ज्याअर्थी, फिरतें उत्पन्न आवश्यकतेप्रमाणें फिरलेंच पाहिजे, त्याअर्थी, क्षुल्लक कमजास्तीचीं कारणें देण्याची जरूरी नाहीं. फरक मोठा व चित्तवेधक असला तर "इमारती जागेकरितां मागणी फार" असें मोघम कारण द्यावें, व इतकेच कारणाची अपेक्षा केलेली असते.

२. कुळकर्ण्यास जसजसें हुकूम पोहोंचतील तसतशी त्यानें गां. न. नं. २ व ३ यांत वेळचेवेळीं दुरुस्ती केली पाहिजे. असे सर्व हुकूम गांवांत फैल न होतां तालुक्यास परत जातात. किरकोळ उत्पन्न गांवचा न. नं. ४ यांत व त्याचें अंगभूत पत्रकांत जेव्हांचे तेव्हां नोंदलें पाहिजेत. परंतु गांवचा न. नं. ५ हा साल. पुरें होईपर्यंत वास्तवीक पूर्ण भरतां येणार नाहीं. कुळकर्ण्यानें मे किंवा जून महिन्यांत जर निःसंशय असें अनुमान केलें कीं, साल अखेरपर्यंत आतां कायम उत्पन्नांत आणखी फरक होणेंचा संभव, क्वचित आहे, तर कायम उत्पन्नापर्यंत तरी निदान त्यानें सुरक्षितपणें हा नमुना भरण्यास हरकत नाहीं. हा नमुना पुरा होतांच तो तालुक्याचे नमुने भरण्यासाठीं तालुक्यास पाठविला पाहिजे. कोणतेहि सबबीनें हा नमुना तारीख ३१ जुलैचे रात्रीचे आंत पुरा करण्यांत, व तालुक्यास रवाना करण्यांत कुळकर्ण्यानें चूक होऊं देऊं नये.

३. या नमुन्याचा महत्त्वाचा भाग म्हटला म्हणजे शेऱ्याचे कोष्टकांतील कमजास्तीचे कारणाचे शेरे हा होय. हीं कारणें ज्या ओळींत कमीं जास्तीं होतील त्या ओळीसमोर दिलीं पाहिजेत. एकूण किंवा बाकी दाखविणारी ओळीसमोर तीं पुन्हा देऊं नयेत. कारण मागला तपशील बदलेल त्याप्रमाणें पुढील एकूण रकमा अर्थात बदलतील. दुसरे शब्दांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे प्रत्येक कमी व जास्तीचा खुलासा एकदांच व एकच वेळ करावा. ठरावबंद बरोबर असल्याची परीक्षा यापुढें सांगितले "पडताळा पत्रका" चे रुजुवातीनें करावी.

---

## हक्काचें पत्रक.

[ सरकारचा मुलकी खात्याचा ठराव नंबर ७७८८, सन १९१० वरून रद झाले नियमांऐवजीं सरकार ठराव नंबर ११२११, सन १९१२ वरून एकवट केलेले आणि क्र. नं. ३९५-ब, तारीख २८-२-१९२३ नें नवीन पद्धतीला लागू होतील असे दुरुस्त केलेले नियम. ]

### भाग १.

कायदा.

* * * * * * *

---

### भाग २.

सामान्य.

हक्क नोंदणी हें एक रजिष्टर आहे व त्यांत प्रथमतः रोजनाम्याचे नमुन्याप्रमाणें जसजसे हक्क संपादन केले असतील त्या क्रमानें जमिनीवरील सर्व खाजगी हक्कांचा तपशील दिला असतो, मग तें हक्क नोंदलेले अगर बिननोंदलेलें दस्तैवजानें अगर वारसानें, तोंडी करारानें किंवा इतर प्रकारानें प्राप्त झालेले असोत. तसेंच मालकाचे खातेदाराचे, गहाण घेणाराचे, कुळाचे, भाडें किंवा महसुल घेण्याचा हक्क ज्यांना तबदील करून दिला अशाचे हक्क; तसेंच कांहीं सार्वजनिक हक्क, इजमेंट म्हणजे दुसऱ्याच्या जमिनींतून जाण्यायेण्याचे, पाणी आणण्याचे वगैरे भोगवट्याचे हक्क व सरकारी हक्क (हे हक्क गांवचा नमुना नंबर १ व ३ यांतहि दाखल असतात) हे सर्व यांत नोंदले जातात. त्यानंतर प्रत्येक गांवांतील सर्व्हे नंबरच्या अनुक्रमानें जमिनीच्या अनुक्रमणिकेंत या हक्कांचा गोषवारा लिहिला जातो व सर्व्हे नंबरांतील प्रत्येक वेगळे विभागाची नोंद वेगळी करण्यांत येते. मुलकी हिशेबहि या पत्राचे आधारावर ठेवण्यांत येतात. यामुळें हें पत्रक हक्काच्या नोंदीप्रमाणेंच सरकार येण्याबद्दलहि प्रमाणभूत आहे व प्रत्येक निरनिराळा कबजेदार आपले कबजांत असलेले जमिनीचे तुकड्याबद्दल सरकारास परभारें सारा व इतर देणें देण्यास जबाबदार आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पोकळीस्त खातेदार म्हणजे त्याचे नांवानें लागलेल्या जमिनीचा प्रत्यक्ष कबजा नसणारा खातेदार यापुढें कोणीच दिसून येणार नाहीं. यापुढें खातेदार या शब्दाचा अर्थ, गांवचा नमुना नंबर ८ यांत ज्याचें नांवें खातें आहे तो, असा समजला पाहिजे, कारण प्रत्यक्ष कबजा असल्याशिवाय खातें असूं शकणार नाहीं. इनाम जमिनीबद्दल जुडी देण्यास खातेदारापैकीं कोणता इसम जबाबदार आहे हें हक्कनोंदणीवरून दिसून येईल. भाडेपट्ट्यानें अगर विशेष सत्ताप्रकारानें कबजांत असलेल्या जमिनीचे बाबतींत, सरकार देण्याबद्दल सरकारास जबाबदार असलेल्या इसमास कबजेदार समजलें जातें. खालसा, इनामी अगर कोणत्याहि जमिनीचे बाबतींत जबाबदार असलेल्या इसमाबद्दल कबजेदार या शब्दाचा उपयोग केला जाईल.

२. या कारणास्तव मुंबईच्या जमीनमहसुलाच्या पद्धतींत हक्कनोंदणी हें एक अत्यंत महत्त्वाचें पत्रक झालें आहे. परंतु यांत सरकार येण्याचे जबाबदारीची नोंद करावयाची असल्यानें सान्याची फिरून वांटणी करावी लागतें. कारण महसुलाचे कारणासाठीं सर्व्हे नंबर ही शेवटची मर्यादा आहे असें (जमीनमहसुलाच्या कायद्यांत १९१३ सालीं झालेली सुधारणा होण्यापूर्वी समजलें जात असे तसें) यापुढें समजण्यांत येणार नाहीं. प्रत्येक वेगळा तुकडा मग तो कितीहि लहान असला, तरी, त्याचा निराळा आकार दाखल करण्यांत येतो. सर्व्हे नंबरचा आकार त्यांतील निरनिराळ्या भागांवर बिनचूक विभागतां येण्यासाठीं भागांची मोजणी करणें अवश्य आहे. हें काम आतां बहुतेक सर्वत्र आटोपत आलेलें आहे. ज्या ठिकाणीं हें काम अद्याप पुरें झालें नाहीं, तेथें मामूल आकार म्हणजे कबजेदारांनीं आपसांत ठरविलेले आकाराचे हिस्से हिशेबाकरितां घेण्यांत येत आहेत (पान ५८, पॅरीग्राफ १४ पहा). सर्व्हे नंबरच्या पोटविभागाचे मोजणीचें व त्यावरील आकाराचें सर्व काम मुद्दाम नेमिलेल्या कामगाराकडून करण्यांत येत आहे व कुळकर्ण्यानें हक्काचे पत्रकांतून उतारे काढून व खातेदारास नोटीस देऊन या कामगारांना मदत द्यावयाची असते. सदरहू पोटहिस्सा-मोजणीबद्दलची पद्धत व हिशेब यांचा खुलासा जमिनीची मोजणी व जमिनीसंबंधीचे इतर हक्क दाखविणारे कागदपत्र यांची व्यवस्था लावणारें जें खातें आहे त्या खात्याच्या पुस्तकांतून केला आहे.

* * * * * * * *

३. सदरहू पत्रकांत कबजाचे हक्काशिवाय आणखी कबजेगहाण, बिनकबजेगहाण, कायम, अगर पुष्कळ मुदतीच्या कुळाचे हक्क व दुसरे प्राप्त झालेले किंवा अवलंबून असणारे जमिनींतील हक्क-संबंध नोंदण्यांत येतात व मर्जीवरचीं म्हणजे उपरी कुळें व थोडे मुदतीचीं कुळें वेगळे पत्रकांत नोंदलीं जातात. यास्तव हें रजिस्टर आंकडेशास्त्राच्या दृष्टीनें विशेषतः जमिनीचा धारा ठरविण्याचे कारणासाठीं फार महत्त्वाचें आहे. कोणत्याहि मनुष्यास

कोणताहि हक्क (दत्तकाचे बाबतींत पान ७२ पॅरिग्राफ ३५ पहा.) प्राप्त झाला असतां त्याबद्दल [illegible] झाल्या तारखेपासून तीन महिन्याचे आंत खबर दिली पाहिजे अशी त्याजवर या कायद्यानें जबाबदारी ठेविली आहे. ज्या ज्या इसमास नोंदलेले दस्तैवजावरून हक्क प्राप्त झाला असेल त्यानें अशी खबर दिली असें मानण्यांत येतें. जे कोणी दस्तैवज नोंदवीत नाहींत अगर या कायद्यानें द्यावी लागणारी खबर देत नाहींत ते २५ रुपयांहून अधिक नाहीं इतकी फी देण्यास पात्र होतात. सदरहू कायदा ज्या गांवांस लागू झाला असेल अशा गांवांतील जमिनीच्या संबंधाच्या प्रत्येक दाव्यांत वादीनें सदरहू जमिनीसंबंधानें हक्काच्या पत्रकांतील नोंदीची दाखलेमुद नक्कल हजर केली पाहिजे आणि पोटहिश्शाचे नकाशे तयार झाल्यावर संबंध असणाऱ्या जमिनीचा हिस्सा नंबर दिल्याशिवाय (जाहीरात नंबर ६ व १२, सन १९१०) दस्तैवज नोंदतां येणार नाहीं [नोंदणीचा कायदा १९१८ चा १६, कानू (२२)]. यास्तव सदरहू पत्रक प्रत्येक बाबतींत पूर्ण व बिनचूक असणें अतिशय महत्त्वाचें आहे. गांवांत काय चालले आहे इकडे कुळकर्णी लक्ष ठेवील व नवीन प्राप्त झालेल्या हक्काची खबर देण्यांत लोक तत्पर राहातील तरच हें पत्रक पूर्ण व बिनचूक होणार आहे. कुळकर्ण्याचीं कामें खाली तपशीलवार दिलीं आहेत. लोकांचीं कर्तव्यें काय आहेत तीं त्यांचे मनावर ठसविलीं पाहिजेत व त्याचा योग्य मार्ग म्हटला म्हणजे त्यांजकडून हयगय झाली असतां ताबडतोब फी वसूल करून घेणें हा होय.

४. * * * * * *

५. ज्या नमुन्यांत हल्लीं रेकॉर्ड ठेविलें जातें ते नमुने ठराव नंबर ३९५-ब, तारीख २८-२-१९२३ नें मंजूर झाले आहेत. बहुतेक सर्व ठिकाणीं पूर्वीचीं (१९०३ ते १९२३ चे दरम्यान तयार केलेलीं) हक्क नोंदणीचीं जुनीं रजिष्टरें आहेत असें गृहीत धरलें आहे व त्यावरून हक्काचें पत्रक तयार करतां येईल. सन १९०७ ते १९२३ पावेतों प्रसंगविशेषीं फिरकोळ फेरफार होऊन अमलांत असलेले हक्कनोंदणीचे जुने नमुने आरंभीचे सुरवातीस जास्त योग्य होते. काम चालू तारखेवर ठेवण्यास ते योग्य नव्हते. कारण प्रत्येक वेळीं पुन्हा लिहिणेचें काम फार वाढत असे व दर ५ वर्षांनीं पुन्हा त्याची नक्कल करावी लागे. हल्लींचे नमुने नोंदी चालू तारखेवर ठेवण्यास जास्त सोईचें आहेत. फेरफाराचा रोजनामा हें नवीन उत्पन्न होणाऱ्या हक्काचें खरें रजिष्टर आहे व तें कधींहि पुन्हा लिहावें लागत नाहीं व निरंतर ठेविलें जातें. नवीन संपादन केलेले सर्व हक्काबद्दल आरंभी वाद असला तरी फिर्याद दिली नाहीं तर, निवळ कबजामुळें त्याचें खाजगी व्यक्तीचे विरुद्ध १२ वर्षांनी स्थानिक संस्थाचे विरुद्ध ३० वर्षांनीं व सरकारविरुद्ध ६० वर्षांनीं पूर्ण मालकींत पर्यवसान होतें. सबब हें फेरफाराचें रजिष्टर (रोजनामा) गांवचा नमुना नंबर ६, प्रत्यक्ष खरें हक्क नोंदणीचें रजिष्टर होतें व त्यांतील मजकूर "जमिनीची अनुक्रमणिका गांवचा नमुना नंबर ७" या रजिष्टरांत पहाण्यास सोपें जावें म्हणून खतविला जातो व त्यांत सन १९२३ पावेतों जुन्या नमुन्यांत लिहिलेले फेरफाराचे रजिष्टराबरून अखेरची नोंद केली जाते व त्यानंतरचे फेरफारही नोंदले जातात. पूर्वीच्या नमुन्यापेक्षां हल्लींचा नमुना लहान आकाराचा आहे व दुरुस्त्यांची गर्दी फार झाली तर जादा मदतीशिवाय सहज नवीन लिहितां येईल. तसेंच या नमुन्याचे "कार्ड इंडेक्स" मध्यें सहज रूपांतर होऊं शकेल व त्याबद्दल हल्लीं चालू असलेले प्रयोग यशस्वी झाले तर अनुक्रमणिका सुद्धां पुन्हा लिहावी लागणार नाहीं.

६. हक्काचे पत्रकाचे तीन भाग केलेले आहेत: गांवचा नमुना नंबर ६, ७ आणि १२. उपरी व थोड्या मुदतीच्या कुळवहिवाटी गांवचा नमुना नंबर १२ यांत नोंदण्यांत येतात. हा नमुना कुळवहिवाट व पिकें दोन्ही दाखवितो. याशिवाय इतर सर्व हक्क गांवचा नमुना नंबर ६ यांत कायमचे नोंदले जातात. व त्यावरून गांवचा नमुना नंबर ७ यांत खतविले जातात. हा नमुना पुष्कळ वर्षें टिकतो व नंतर पुन्हा लिहिते वेळीं त्यांतील नवीन हक्क लिहिले जातील व रद्द झालेले हक्क वगळले जातील. गांवचा नमुना नंबर ६ प्रथम लिहिल्यानंतर नवीन संपादित झालेले सर्व हक्क नोंदण्यासाठीं फेरफाराचें रजिस्टर अगर रोजनामा (नमुना नंबर ६) ठेविला आहे. फेरफाराची नोंद पसंत अगर कबूल झाल्याशिवाय नमुना नंबर ७ यांत दुरुस्ती करितां येत नाहीं. तथापि संपादन केलेले व निश्चितपणें जाहीर केलेले सर्व हक्क याबद्दल कुळकर्ण्याचे रिपोर्टावरून किंवा स्वतःचे निरीक्षणावरून माहिती मिळतांच त्यानें ते फेरफाराचे रजिष्टरांत ताबडतोब नोंदले पाहिजेत. अशा हक्कासंबंधानें चौकशी व्हावी व हितसंबंध असणाऱ्या पक्षकारांस तक्रार करण्यास संधी मिळावी म्हणून त्या सर्वांस (पुढील कलमांत तपशीलवार सांगितल्याप्रमाणें) नोटीस दिली पाहिजे. तसेंच इनाम जमिनींत सरकारचा हितसंबंध असेल तर पुढें सांगितल्याप्रमाणें सरकारास नोटीस दिली पाहिजे (पान नं. ८४, ८५ बाब ४ पहा) तक्रारी वेगळ्या रजिष्टरांत नोंदल्या जातात व त्यांचा निकाल मामलेदार यांजकडून करण्यांत येतो. तक्रार नसेल तर सर्कल इन्स्पेक्टरनें आणि वरिष्ठ कामगारानें तपास केल्यावर ती नोंद कायम करण्यांत येते. याप्रमाणें जमिनीच्या अनुक्रमणिकेंत वर्ग होण्यापूर्वी नवीन संपादन केलेले प्रत्येक हक्काबद्दल तपास होतो म्हणून फेरफाराचें रजिष्टर व तदवलंबित अनुक्रमणिका जमिनीचे प्रत्यक्ष कबजाप्रमाणें व भोगवट्याप्रमाणें बिनचूक व पूर्ण अशा स्थितींत ठेवण्याविषयीं प्रत्येक अंमलदाराचें लक्ष असलें पाहिजे.

७. "पृष्ठ ९४ वरील कुळवहिवाटीच्या तपासणीसंबंधीं विस्तृत टीपा पहा".

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

## भाग ३.

### नमुन्याचा तपशील व कामाची पद्धत.

१. * * * * * *

२. हल्लीं जो अधिक सोपा व सुटसुटीत जमिनीच्या अनुक्रमणिकेचा नमुना ठरविला आहे तो मुख्यत: १९२४ सालचे पूर्वी बरेच वर्षेपर्यंत जुन्या नमुन्यांत जीं रजिष्टरें होतीं त्यांवर ठरविला आहे. बहुतेक ठिकाणीं जुनीं हक्क नोंदणीची पत्रकें १९०४ ते १९०६ चे दरम्यान तयार झालीं. म्हणजे आतां या नमुन्यांत लिहिणेंपूर्वी सरासरी १८ वर्षेपर्यंतचीं जुनीं रजिष्टरें आहेत. क्वचित् प्रसंगीं एखादें गांव अगर गांवचा गट वेगवेगळ्या वेळीं लिहिला गेला असेल त्या रजिस्टरावरून, सन १९२३ सालांत हल्लींचे नमुन्यांत जमिनीची पहिली अनुक्रमणिका तयार करणें फारसें कठीण नव्हते. हल्लींचे पद्धतींत फेरफार पसंत झाले बरोबर अनुक्रमणिकेंत दुरुस्ती होते. फेरफाराचें रजिस्टर हेंच हल्लीं हक्कनोंदणीचें मुख्य रजिस्टर झालें आहे. व तें सोपें नमुन्यांत असून नवीन संपादन केलेल्या प्रत्येक हक्काचा रोजनामा (डायरी) आहे, त्यांत एकदां लिहिलेला मजकूर पुन्हा लिहावा लागत नाहीं अगर दुरुस्त करणेंचा नाहीं. परंतु फेरफार होतील तसतसे ते आणखी नोंदी करून दाखवून या प्रत्येक नोंदीचा अनुक्रम नंबर जमिनीच्या अनुक्रमणिकेंत ज्या त्या हिश्यासमोर लिहावा लागतो व नावें अगर आंकडे दाखल करावे लागतात. जमिनीचे अनुक्रमणिकेंत दोन्ही रजिष्टरमधील अन्योन्य नंबर मिळतील. फेरफाराचे रजिस्टर आतां बरेच वर्षेपर्यंत (६० वर्षांहून कमी नाहीं) राखून ठेवलें जाईल. आतां पुढें दुरुस्ती करणेस जागा नाहीं इतकी दुरुस्तीची गर्दी होईपर्यंत जमिनीची अनुक्रमणिका पुन्हा लिहिणेची जरूरी नाहीं. व ते वेळींसुद्धां शेवटपर्यंत न खोडलेले जे शब्द अगर अंक अगर नावें शिल्लक असतील तेवढींच पुन्हा लिहिणेचीं असतात. कारण नवीन नक्कल करते वेळीं तीच अखेरची वस्तुस्थिति दर्शविणारी नोंद असते. ज्या ज्या वेळीं हुकूम होईल त्या त्या वेळीं कुळकर्णी यानें ही अनुक्रमणिका पुन्हा लिहिणेची आहे व यासाठीं जादा मदतनीसाची अगर तपासणी अंमलदाराची जरूरी नाहीं. जुनी अनुक्रमणिका निदान ३० वर्षेपर्यंत राखून ठेवली जाईल. व नवीन लिहिलेले रजिस्टरवर प्रांत साहेब लिहिले दिवसाची तारीख घालून सह्या करतील. यावरून पुन्हा लिहिणेचे काम कधीं झालें व जुनें रजिस्टर पाहण्यास मिळण्याजोगें आहे किंवा नाहीं हें केव्हांहि सांगता येईल. कोणत्याहि पुसलेखनाच्या वेळीं फेरफाराच्या नंबरांचा सांखळीच्या सांखळीच उतरली जाते आणि फेरफाराचा रोजनामा किमानपक्ष ६० वर्षे राखून ठेवण्यांत येत असल्यानें कायद्यानें ठरविलेल्या मुदतीपेक्षां कितीतरी जास्त दिवसांचे हक्कांची माहिती रोजनाम्यांत मिळूं शकते.

३. * * * * * * *

### पहिली अनुक्रमणिका तयार करणें.

४. प्रत्येक सर्व्हे नंबर अनुक्रमानें जंगलांत जाऊन तपासावा व त्यांत एकापेक्षां जास्त माणसाचे हक्कसंबंध असतील तर त्या प्रत्येक हक्कदाराचे तुकड्यास हिस्सा अगर त्या सर्व्हे नंबरांतील विभाग समजावे म्हणजे यासाठीं गांवचे सर्व्हे नंबराचा नकाशा पाहिजे व सर्व्हे नंबरांत हिस्से असतील तर त्या हिश्शांचाहि नकाशा तयार केला पाहिजे. पृथक् हक्कानें धारण केलेले जमिनीचे विभागास, मग तो सर्व्हे नंबर असो अगर हिस्सा असो, त्यास तुकडा म्हणावें. असा प्रत्येक तुकडा ज्या हक्कानें धारण केलेला असेल त्याबद्दल तोंडी चौकशी करून, अगर दस्तैवज पाहून माहिती लिहावी. हे दस्तैवज जमीनमहसुलाचा कायदा, कलम १२५-ई (१) प्रमाणें दाखवलेच पाहिजेत. गांवांत इकडेतिकडे पसरलेले पुष्कळ तुकडे एकाच वेळीं एकाच हक्कानें धारण केलेले आढळतील व या सर्वांची यादी आपणास जर आगाऊ मिळाली तर गांवचा नमुना नंबर ६ चा हल्लीं जो नमुना दिला आहे त्या नमुन्यांत आपणास ताबडतोब माहिती लिहिता येईल. परंतु हा नमुना प्रथम लिहिते वेळीं आपण सर्व्हे नंबर १०-१ याची नोंद करूं. त्यावेळीं त्याच हक्कानें पुढील सर्व्हे नंबर २१-अ धारण केला आहे हें आपणास कदाचित् समजणार नाहीं. १-८-१९०८ रोजीं असलेले स्थितिप्रमाणें रजिस्टर, गांवचा नमुना नंबर ६, छापते वेळीं एकाच हक्कानें धारण केलेले सर्व वेगळे वेगळे तुकडे एकाच नोंदीत (हक्कनोंदणीचीं पूर्वीचीं रजिस्टरें असल्यामुळें) सांपडतील, परंतु अगदीं नवीन गांवांत नवीन रजिस्टर लिहिणें असल्यास ज्या वेळीं पूर्वी नमूद केलेल्या तुकड्यासमोर दाखल केलेल्या हक्काने पुढें आणखी एकादा तुकडा धारण केलेला आढळेल तेव्हां पूर्वीच्या नोंदासमोरच कोष्टक ३ यांत त्या तुकड्याचा नंबर दाखल करावा, पुन्हां लिहूं नये. यामुळें गांवांतील प्रत्येक तुकड्याबद्दल माहिती घेणेचें संपलें अशी खात्री झालेवर आपणास कदाचित् अनुक्रमणिकेची नवी नक्कल करावी लागेल.

## गांवचा नमुना नंबर ६.

हक्कनोंदणीपत्रक (तारीख १-८-१९०८ रोजीं असलेले स्थितीप्रमाणें).

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | तपासणी अंमलदाराचे संक्षिप्त सह्या व शेरे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | त्र्यंबक नारायण याकडे नारो जनार्दनाकडून वारशानें आली. मुख्य इनामदार रघुनाथ बळवंत याजकडून नारो जनर्दन यानें जमीन विकत घेतली होती (दस्तवैज नाहीं). | ४—१ | |
| २ | रामचंद्र बळवंत देशपांडे याकडे, मुख्य इनामदार रघुनाथ बळवंत देशपांडे याजपासून विभक्त झाल्यानें (तोंडी करार) आली. | ४—२ | |
| ३ | बळवंतराव यादवराव, जुना खातेदार (हक्क कसा प्राप्त झाला समजत नाहीं); शिवाय ६—२ चा जुना खातेदार, सन १८८३ पासून. | ५—१<br>६—२ | |
| ४ | शिवराम शंकर भट, सनदेवरून ... ... ... | १४ | |
| ५ | बाळकृष्ण वासुदेव, जुना खातेदार, सर्व्हेपूर्वीचा ... ... | १७—१<br>२५-अ | |
| ६ | नारायण कुळकर्णी, वतनदार, कबजेदार ... ... ... | ११ | |
| ६-अ | गोविंद आबा लोणकर, १२ एकर १० गुंठे जमिनीचें मिरासी कूळ, ठरीव खंड ३० रुपये देतो. | ... | |
| ६-ब | गुलापा शिवलिंगापा, १० एकर जमिनीनें मिरासी कूळ, ठरीव खंड २५ रुपये देतो. | ... | |
| ७ | गणेश सुबराव, एकर १० गुंठे जमिनीचा मुळगेणीदार, रुपये १० खंडे देतो, लेखी कबुलायत, तारीख १ जून सन १८७०. (नों.) | २०—१ | |
| ८ | क. ड. १ एकर जमिनीचा पोट-मुळगेणीदार, हा गणेश यास ४ रुपये खंडे देतो. | २०—१ | |
| ९ | बाळकृष्ण वासुदेव, सनदेवरून वतनदार ... ... ... | २७ | |
| १० | सर्जेराव भिवराव, सनदेवरून सरंजाम इनामदार ... ... | २९ | |
| ११ | रामचंद्र बळवंत देशपांडे, फार दिवसांचे वहिवाटीचे हक्कावरून कबजेदार, मूळ हक्क कसा प्राप्त झाला हे समजत नाहीं. | ८ | |
| १२ | रामचंद्र बळवंत देशपांडे यानें पुष्कळ वर्षांपूर्वी अ. ब. कडून खरेदी घेतला, दस्तैवज उपलब्ध नाहीं. | ९—१ | |
| १३ | नारायण कुळकर्णी, सर्व्हेपूर्वीचा जुना खातेदार ... ... | २० आणि ब २२ | |

टीप.—(नों.) म्हणजे नोंदलेला दस्तैवज.

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | तपासणी अंमलदाराच्या संक्षिप्त सह्या व शेरे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १४ | गणपतराव बळवंतराव, सनदी खातेदार ... ... ... | १३ | सरकार ठराव नंबर ४२९०, तारीख २८-४-१९०८ अन्वयें गैरकायदा भोगवट्यासंबंधीं तपास चालू आहे. |
| १५ | मनाजी ( हल्लींचा वतनदार ) चा बाप अनंदराव आणि अनंदरावचा चुलतभाऊ यादवराव, यांनीं राधाबाई कोम अमृतराव हीस, रुपये २००, सन १८८५ सालीं कबजेगहाण दिले. (नों.) | ३ | |
| १६ | नरशींगराव बळवंतराव, जुना खातेदार (१८८७) व अविभक्त कुटुंबाचा कारभारी. या जमिनीवर ५०० रुपयांचा तगाईचा बोजा आहे. | १५ | |
| १७ | रघुनाथ बळवंत देशपांडे, रामचंद्र याचा विभक्त भाऊ (तोंडी कबुलायत.) ... | ९—२ | |
| १८ | पुंजाजी सखाराम, जुना खातेदार. १८९९ पासून ... ... | १ अ १ | |
| १९ | भाऊ सखाराम, पुंजाजीचा विभक्त झालेला भाऊ, वांटणीपत्र, तारीख १-१०-१८९० (नों.). | १ अ २ | |
| २० | १ मणीलाल हिराशंकर ... ४ वर्षे<br>२ हिरालाल मोतीलाल ... २ ,,<br>३ चुनीलाल भाईलाल ... ५ ,,<br>४ अंबालाल हरीशंकर ... ५ ,,<br>} समाईक इनामदार, नावासमोर दाखल केलेल्या पाळीप्रमाणें कबजा मिळतो. नंबर १ चा कबजा १९०७-०८ पासून सुरू झाला. वांटणीपत्रकावरून तारीख १५-१०-१८८९ (नों). | २९ | |
| २१ | नरशींगराव बळवंत यांनें बाळंभट रामभट पुजारीपासून खरेदी घेतला, रुपये २००, तारीख १२-५-१८८९ (नों.), प्रांत साहेबाचा हुकूम नंबर १३५६, तारीख १२-६-१९०९ वरून खातेदाराकडून पूर्ण आकार वसूल करण्यांत येतो. | १० | |
| २२ | राघू रामा माळी, जुना खातेदार, १८९१ पासून ... ... | २—१ | |
| २३ | गेनू रामा माळी, राघू रामाचा विभक्त झालेला भाऊ (तोंडी करार) ... | २—२ | |
| २४ | मारुती कुसा कुंद, जुना खातेदार, १८९३... ... ... | १ अ ३ | |
| २५ | मथू कुसा, मारुती कुसाचा विभक्त झालेला भाऊ (तोंडी करार) ... | १ अ ४ | |
| २६ | शिवाजी बाळाजी ... ०-२-८<br>मानाजी बाळाजी ... ०-२-८<br>बापुजी बाळाजी ... ०-२-८<br>गोपाळ गणेश ... ०-४-०<br>सखाराम तुकाराम ... ०-४-०<br>} समाईक खातेदार, १८९५ पासून. | १६ | |

टीप.—(नों.) म्हणजे नोंदलेला दस्तैवज.

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | तपासणी अंमलदाराच्या संक्षिप्त सह्या व शेरे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २७ | सर्जेराव भिवराव, बळवंतराव यादवराव याचा विभक्त झालेला पुतण्या यास, दिवाणी कोर्टाचा वाटप हुकुमनामा नंबर ३५४, तारीख १-१२-१८९६ नें मिळाली. | ५—२<br>६—१ | |
| २८ | मानाजी आनंदराव, बळवंतरावचा विभक्त झालेला चुलतभाऊ, वरील हुकुमनाम्याप्रमाणें. | ६—३ | |
| २९ | वरील वाटपाअन्वयें ठरलेला पोट-हिस्सेदार, यशवंतराव, यानें आपला हिस्सा आपला भाऊ आनंदराव याची विधवा लक्ष्मीबाई, हीस तिच्या हयातीपावेतों दिला. | ५—३ | |
| ३० | सर्व्हे नंबर ६—१, ६—२, ६—३ चे कबजेदार यांनीं हीं खराबाचा तुकडा गुरें चारणीकरितां समाईक ठेविला. | ६—४ | |
| ३१ | गोविंद विठोबा यानें मुळगेणीदार गोविंद सुबराव याजपासून १० रुपये खंड असलेल्या ३ एकर २० गुंठे जमिनीचा हक्क सन १८९८ च्या जानेवारी महिन्यांत खरेदी केला. (नों.) अमृता भोई हा १ एकर २० गुंठे जमिनीचा पोट मुळगेणीदार, खंड रुपये ५ देतो, बहादूर कासीम, २ एकर जमिनीचा पोट मुळगेणीदार, खंड रुपये ७ देतों. | २०—२ | |
| ३२ | मानाजी आनंदराव शिंदे, खातेदार, नवीन मर्यादीत शर्तीप्रमाणें प्रांताचे साहेब यांचा हुकूम, तारीख ३ जुलै १८८८. | ७ | |
| ३३ | कलेक्टर साहेब यांचा हुकूम नंबर ५५, तारीख १ ऑगस्ट १९०० वरून जमीन दरसाल ०-८-४ भाड्यानें नरशींगराव बळवंतराव यास ९९ वर्षे भाडेपट्ट्यानें दिली. गांवचा नमुना नंबर २ (१) (१) पहा. | गांवठाण. १ | |
| ३४ | मानाजी आनंदराव शिंदे, खरेदीदार, पुंजाजी सखारामपासून रुपये २००, १-८-१९०० (नों). | १ब | |
| ३५ | विठ्ठल रामचंद्र यानें ४ आंब्याचीं झाडें १९०२ सालीं (तोंडीं) खरेदी घेतलीं ... | १अ ३ | |
| ३६ | कलेक्टर साहेब यांचा हुकूम नंबर ५५, तारीख २१ जून १९०१ वरून ही जमीन नरशींगराव बळवंतराव यांस दरसाल रुपये १-८-० प्रमाणें भाड्यानें ९९ वर्षांचे भाडेपट्ट्यानें दिली, गांवचा नमुना नंबर २ (१) (३) पहा. | गांवठाण. २ | |
| ३७ | कलेक्टर साहेब यांचा हुकूम नंबर ६०, तारीख १ ऑगस्ट १९०१ वरून ही जमीन मानाजी आनंदराव यांस दरसाल रुपये १०-६-८ प्रमाणें भाड्यानें ९९ वर्षाचे भाडेपट्ट्यानें दिली, गांवचा समुना नंबर २ (१) (३) पहा. | गांवठाण. ३ | |
| ३८ | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ५१०, तारीख १५-७-१९०१ वरून ही जमीन नवसाध्य करणेंकरितां दरसाल रु. ६-४-० प्रमाणें बाळकृष्ण वासुदेव यांस दिली. | २५ब-१ | |

टाप.—(नों.) म्हणजे नोंदलेला दस्तैवज.

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

| नोंदीचा अनुक्रम नंबर. १ | हक्काचा प्रकार. २ | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. ३ | तपासणी अंमलदाराच्या संक्षिप्त सह्या व शेरे. ४ |
|---|---|---|---|
| ३९ | हा सर्व्हे नंबर पूर्वी गांव-नोकर (सरकार-उपयोगी) इनाम होता व सन १९०२ सालीं-सरकार खालसा झाला, हल्लीं पडीत. | १९ | |
| ४० | बळवंतराव यादवराव यानें गोविंदराव हरी देशपांडे यास तारण गहाण दिली, रुपये १००, तारीख ७-४-१९०२ (नों). | ६—२ | |
| ४१ | लक्ष्मण कुशाबा, नवीन खातेदार, मामलेदार यांचा हुकूम नंबर मे सन १९०३... | २—३<br>२—४<br>२—५<br>२—६ | |
| ४२ | रामचंद्र बळवंत देशपांडे, खरेदीदार, लक्ष्मण कुशाबाकडून, रुपये ५००, २-५-१९०४. (नों.) लक्ष्मण कुशाबा यास खरेदीची रक्कम दिल्यावर हा पोटहिस्सा परत मिळणेचा हक्क आहे. दरम्यान तो जमिनीची लागवड कूळ नात्यानें करितो व व्याज म्हणून रुपये ५० खंड देतो. | २—४<br>२—६ | |
| ४३ | विठ्ठल रामचंद्र यास बाळकृष्ण वासुदेवपासून बक्षीसपत्रानें तारीख २० जानेवारी १९०५ (नों.) मिळाली. | १७—२ | |
| ४४ | सर्जेराव भिवराव, नवीन खातेदार मामलेदार यांचा हुकूम, एप्रिल सन १९०५. | १२ | |
| ४५ | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ५४५, तारीख १० जुलै १९०७ वरून ही जमीन प्रेमचंद रायचंद यास धर्मशाळेकरितां सारामाफीनें दिली, इनाम वर्ग ७ | २६-ब | |
| ४६ | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ५४५, तारीख १० जुलै १९०७ वरून ही जमीन डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डास गांवचे शाळेस सारा माफीनें दिली, इनाम वर्ग ७. | २४-ब | |
| ४७ | कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ५४, तारीख १० जुलै १९०८ वरून ही जमीन तालमीचे उपयोगासाठीं रेव्हरंड जे. सीलीडी यांस विनशेतीचा आकार रुपये २० पैकीं २ रुपये आकारानें दिली, गांवचा नमुना नंबर २ (II) (४) पहा, इनाम वर्ग ७. | २६-अ | |
| ४७-अ | खंडू रघू, कबजेदार (सरंजामदार सर्जेराव) याचा वारसानें सर्व्हेचा आकार देतो. | २९ | |

टीप.— (नों.) म्हणजे नोंदलेला दस्तैवज.

तारीख ३१ जुलई सन १९०८ अखेर दुरुस्त केल्याबद्दल जाहीर करून दाखला दिला.

क्ष. य.
असिस्टंट कलेक्टर.

तारीख ३० नोव्हेंबर १९०८.

Bk Co : 5—8

## गांवचा नमुना नंबर ६.

### हक्क नोंदणीचें रजिस्टर व फेरफाराची रोजनिशी.

९. मागील पानावर गांवचा नमुना नंबर ६, रोजनामा अगर हक्कनोंदणीपत्रक, तारीख १ ऑगस्ट १९०८ रोजी असलेले स्थितीप्रमाणें छापलें आहे, या नमुन्यांत फक्त ४ कोष्टकें आहेत.

कोष्टक १.—अनुक्रम नंबर—नोंद पडताळून पाहाणेसाठीं याची जरूरी आहे. हा अनुक्रम सालोसाल १,००,००० (एक लक्ष) पावेतों खंड न पडतां चढता चालू राहील. अनुक्रमाचा आंकडा १,००,००० पयत आल्यावर पुढील आंकडा १,००,००१ (एक लक्ष एक) न देतां अ १ द्यावा. याप्रमाणें पुढें अनुक्रम अ १, अ २, अ ३ याप्रमाणें अ १,००,००० होईपावेतों द्यावा, याची पुढची नोंद ब १ याप्रमाणें पुढें नंबर द्यावे.

कोष्टक २.—संपादन केलेल्या हक्काचा प्रकार लिहावा. कल्पनेनें जाणतां येतील इतके सर्व जमिनीवरील हक्क अगर हक्क संपादन करण्याचे प्रकार यांचीं सर्व उदाहरणें देणें अशक्य आहे. गैरलागू मजकूर कांहींएक न लिहितां हक्कसंबंध दाखविणारी प्रत्येक गोष्ट अगदीं थोडक्यांत स्पष्ट लिहावी असा उद्देश आहे. जर अनें बला जमीन विकली "कारण तो त्याचा जुना स्नेही आहे" तर हें कारण गैरलागू आहे, त्यामुळें बच्या कायदेशीर हक्कसंबंधास बाध येत नाहीं. परंतु अनें बला जमीन विकली कारण "पुन्हां ज्यावेळीं त्याची इच्छा असेल त्यावेळीं अला पुन्हा विकणेचें बनें कबूल केलें आहे" असे प्रसंगीं ही कबुली दाखल केली पाहिजे, कारण तिजवर पुढील व्यवहार अवलंबून आहे. किंमत अगर मोबदला व नोंदीस आधार (व्यवहार तोंडी झाला कीं काय आणि तो तोडी कळविला अगर लेखी कळविला आणि तो नोंदलें दस्तैवजानें झाला असल्यास नोंदणी कामगाराकडील उताऱ्यावरून माहीत झाला अगर दिवाणी कोर्टाचे अगर मुलकी अधिकाऱ्याचे हुकुमावरून माहीत झाला) ही सर्व माहिती स्पष्टपणें तारीख व नंबर घालून नमूद केली पाहिजे.

प्रत्यक्ष कबजा असलेले इसमाचे मुख्य अगर श्रेष्ठ हक्क असें ज्यांना आपण म्हणूं शकूं तेवढेच हक्क नमूद करावयास असें नव्हे तर त्याशीं संलग्न असलेले इतर हक्कसुद्धां दाखल करावे लागतात. त्याचे प्रकार दोन—

(अ) हल्लींचे कबजेदाराचे हक्कापूर्वीचे हक्क व श्रेष्ठ हक्क आणि ज्यावर हल्लींचे कबजेदाराची मालकी अवलंबून असते असे हक्क.

(ब) नवीन—अगर मुख्य हक्कांवर अवलंबून असलेले गौण हक्क.

याशिवाय आणखी हक्क असे असतात कीं, त्यामुळें मुख्य हक्कास दुजोरा येतो अगर ते कमी होतात हे सर्व हक्क, जे समजतील तसे, दाखल केले पाहिजेत. नाहींतर चुका होतील.

ज्याचे प्रत्यक्ष कबजांत जमीन असते व जो सरकारास सारा अथवा जुडी अथवा इतर बोजे देणेस जबाबदार असतो त्यास मुख्य कबजेदार म्हणावें. याचे पूर्वीचे हक्क म्हणजे वारचे वतनदाराचा हक्क, मुख्य इनामदाराचा हक्क, गहाण सोडवण्याचा हक्क, राखून ठेवणाऱ्या गहाणदाराचा हक्क, देणगी देणाराचा हक्क, जे देणगीबद्दल पंच नेमून देतात किंवा व्यवस्थापक करून देतात किंवा बेचन करून देतात व त्यामुळें कांहीं प्रसंगीं मूळची देणगी त्यांच्याकडे परत येते अशांचा, यांपैकीं कोणताहि हक्क विसरूं नये.

हक्काबद्दल खबर दिल्यावर हक्क नाकबूल केल्यास हा मजकूर शेरेकोष्टकीं लिहावा. याबद्दल वरिष्ठ अधिकारी ज. म. का., क. १३२-ई व फप्रमाणें तजवीज करतील. कबजा जरी गैरकायदा असेल, जबरीनें अगर लबाडीनें घेतला असेल, तरी गैरकायदा कबजेदारास जमिनींतून काढून टाकीपर्यंत प्रत्यक्ष कबजा आहे तोंपर्यंत त्याची नोंद झाली पाहिजे.

ज्या गैरकायद्याप्रकारें जबरीनें अगर लबाडीनें जमीन कबजांत असेल त्याचा उल्लेख करावा. ज्यावेळीं हक्काचा प्रकार व हक्क कसा प्राप्त झाला हें समजत नसेल परंतु कबजेदार याचा बिनतक्रार कबजा बरेच वर्षांपासून अगर कांहीं विविक्षित वर्षांपासून असेल तर त्याचें नांव फार वर्षांपासूनचा कबजेदार अगर अमूक वर्षांपासूनचा कबजेदार असें लिहावें. व सरकारसारा, अगर इनाम गांव असल्यास इनामदारास सारा देतों असें लिहावें.

जर कबजेदार आणखी विशेष हक्क सांगत असेल तर ते दस्तैवजानें अगर इतर लेखी पुराव्यानें शाबीत करण्याचा बोजा त्याचेवर आहे. उलटपक्षीं जर इनामदार अगर सरकार नेहमींच्या साऱ्यापेक्षां जास्ती रक्कम वसूल करण्याचा हक्क सांगत असतील तर तो शाबीत करण्याचा हक्क त्यांचेवर आहे. कधीं कधीं नामधारी कबजेदार अ असतो व प्रत्यक्ष कबजा ब चा असून तो असा कांहीं देत नाहीं व ब हा अचें कूळ आहे अगर नाहीं याबद्दल शंका आहे असें प्रसंगीं अला आपण वरिष्ठ हक्क दस्तैवजानें अगर इतर पुराव्यानें शाबीत करतां आला नाहीं व ब कां खंड देत नाहीं याचें कारण सांगत येत नाहीं तर असा पोकळ हक्क नाकबूल करावा व बचें नांव पूर्णकबजेदार म्हणून दाखल करावें. परंतु जर जमीन इनाम असेल, तर बला ती जमीन धारण करण्याचा हक्क आहे अगर नाहीं याचा विचार करावा लागेल. मागील हक्क व या जातीचे दुसऱ्याच्या जमिनीवर असणारे भोगवट्याचे इतर हक्क यांची नोंद ज्या इसमाचे हक्क असतात व ज्या

इसमाविरुद्ध हक्क असतात त्या दोघांच्या जमिनीसमोर करावी. उदाहरण : —सर्व्हे नंबर ६/१ व ६/३ मधून सर्व्हे नंबर १८१ मध्यें जाण्याचा हक्क सर्व्हे नंबर १८१ समोर तसेंच सर्व्हे नंबर ६/१ व ६/३ समोर लिहावा. कोष्टक २ मध्यें हे सर्व्हे हक्क लिहिलेनंतर असें लक्षांत ठेवावें कीं, संपादन केलेले हक्काची माहिती न दिल्यामुळें द्यावा लागणारे दंडाचें कलम अशा भोगवट्याच्या हक्कांना लागू नाहीं.

कोष्टक ३ यांत संबंध असलेले तुकड्यांची नोंद करावी. आरंभींचे नोंदीपैकीं एकादा तुकडा खोडून टांकणें अथवा एखादा तुकडा जास्त दाखल करणें सुलभतेनें करतां आलें तर लबाडी अगर भयंकर चुका फार होण्याचा संभव राहील. अशी सवड मिळूं नये म्हणून संबंध असलेले तुकड्यांचे यादीखालीं तुकड्यांची संख्या अक्षरीं लिहून ठेवण्याची तरतूद केली आहे, पान ६१-६४ पहा. यामुळें आणखी नवीन नंबर दाखल करणें व नोंदलेला खरडून काढणें जवळ जवळ अशक्य झालें आहे. असा आणखी एक नियम आहे कीं, हक्कनोंदणीपत्रकांत खोडाखोड बिलकूल करावयाची नाहीं. कांहीं गोष्टींत जमिनीचे अनुक्रमणिकेमध्यें लिहिल्याप्रमाणें अधिक मजकूर घालावा लागेल अगर दुरुस्ती करावी लागेल ; पण तेव्हां मूळची खोडलेली नोंद नीट वाचतां येईल अशा बेतानें दुरुस्ती अगर खोडाखोड करावी आणि जेव्हां दुरुस्ती करणें असेल तेव्हां ती मूळ नोंदीखालीं अगर बाजूला लिहावी [ ज. म. का क. १०६ (४) ]. अशा दुरुस्त्या होतील तेव्हां त्या दुरुस्त्या जो अंमलदार करील त्यानें त्यावर आपली पूर्ण सही केली पाहिजे. उदाहरणार्थ, गंगाधरचे ऐवजीं गणपति लिहिलें गेलें अगर ९४० चे ऐवजीं ४५० चा आंकडा लिहिला गेला तर ते चुकीचे आंकडे अगर शब्द चाकूनें न खोडतां त्यांना कंस करावा व त्यामधून एक रेघ ओढावी व दुरुस्तीचा आंकडा अगर शब्द त्याचे खालीं अगर बाजूला लिहून आपली स्पष्ट सही करावी. लिहितांना होणाऱ्या असल्या हस्तदोषांच्या चुकांशिवाय ह्या पत्रकांत दुरुस्ती करावयाची नाहीं. जर नोंद नंबर ६९ ही चुकीनें लिहिली गेली अगर तींत कांहीं चुका आहेत असें आढळलें अगर तिचें वर्णन चुकीचें आहे असें आढळून आलें तर ती नोंद आहे तशीच ठेवावी व ती नोंद दुरुस्त करणेसाठीं दुसरी नवी नोंद (नंबर ७७) त्या ऐवजीं लिहावी, व शेरे कोष्टकीं रद्द झालेल्या नोंदीचे समोर "नोंद नंबर ७७ नें रद्द झालेली" असें लिहावें. अनुक्रमणिकेंत संबंध असलेल्या हिश्यासमोर शेवटची दुरुस्ती म्हणून नोंद ७७ लिहावी ६९ लिहूं नये. नोंदणीखात्यांतील पुस्तकाप्रमाणें या पत्रकाच्या प्रत्येक पुस्तकाचे शेवटीं ज्या पानावर व नोंदीवर दुरुस्ती झाली असेल तीं पानें व नोंद नंबर लिहावेत [ ज. म. का. कानू १०६ (४) अन्वयें ]. पुढें कधीं लबाडीनें दुरुस्ती होऊं नये अगर त्यांत फेरफार होऊं नये ह्यासाठीं वरील सावधगिरी उपयोगाची होईल.

शेवटील कोष्टक अगर पत्रकांतील जागा ही सह्या, छोट्या सह्या व तपासणी करणारे अंमलदार यांचे शेऱ्यासाठीं आहे असें समजावें. प्रत्येक नोंद शक्य तितकी काळजीनें तपासून अधिकार असणाऱ्या अंमलदारानें सर्व तक्रारींचा निकाल दिल्यावर जेव्हां पत्रक पहिल्यानें तयार होतें तेव्हां जाहीर नोटीस गांवास देण्यांत यावी व ज. म. का. कानू १११ यांत सविस्तरपणें दिलेल्या सूचनाप्रमाणें तपासल्यावर प्रसिद्ध करावें.

६. हें पत्रक तयार झाल्यावर जमिनीची पहिली अनुक्रमणिका लिहावी. तारीख १ ऑगस्ट १९०८ रोजीं असले स्थितीप्रमाणें अनुक्रमणिका लिहून पुढील पानावर छापली आहे. त्यांत पुढील फेरफार दाखल केले नाहींत.

# गांवचा नमुना नंबर ७.

जमिनीची अनुक्रमणिका, तारीख १ महे ऑगस्ट सन १९०८ रोजीं असलेले स्थितीप्रमाणें.

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असेल तर). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्कनोंदणीपत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | नोंदणीपत्रकांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | |
| १-अ. भोईवाडा ... | ... | १८-७ | २१ ० ० | ... | ..... | ... | ..... | |
| | १ | ६-३ | ६ ८ ० | ... | पुजाजी सखाराम ... | १८ | ..... | |
| | २ | ६-२ | ७ ० ० | ... | भाऊ सखाराम ... | १९ | ..... | |
| | ३ | ३-१ | ३ १२ ० | ... | मारुती कुसा कुंध ... | २४ | विठ्ठल रामचंद्र याची ४ आंब्याची झाडें आहेत. | |
| | ४ | ३-१ | ३ १२ ० | ... | मथू कुसा ... | २५ | ..... | |
| १-ब. बिनशेतकी, गिरणी. | ... | ०-२० | ... | २० ० ० | मानाजी आनंदराव शिंदे. | ३४ | ..... | |
| २. लोणी जमीन ... | ... | ३४-१० | ५२ ० ० | ... | ..... | ... | ..... | |
| | १ | ८-३ | १६ २ ० | ... | रघू रामा माळी ... | २२ | ..... | |
| | २ | ८-३ | १६ २ ० | ... | गणू रामा माळी ... | २३ | ..... | |
| | ३ | ४-२ | ८ २ ० | ... | लक्ष्मण कुशाबा ... | ४१ | ..... | |
| | ४ | ४-२ | ९ २ ० | ... | रामचंद्र बळवंत ... | ४२ | लक्ष्मण कुशाबा, शर्तीनें विकणारा. | |
| | ५ | ५-० | १ ४ ० | ... | लक्ष्मण कुशाबा | ४१ | ..... | |
| | ६ | ५-० | १ ४ ० | ... | रामचंद्र बळवंत ... | ४२ | लक्ष्मण कुशाबा, शर्तीनें विकणारा. | |
| ३. सरकारी उपयोगी गांव नोकरी इनाम लांबडमाळ. | ... | ६-६ | ७ ० ० | २ ० ० हिस्सेरसीनें (सर्व्हे नंबर ३ १२५, १३० मि. रु. २७). | राधाबाई कोम अनंतराव. | १५ | मानाजी (वारसा वतनदार). | |
| ४. जात इनाम ... | ... | १९-१२ | १९ ० ० | ५ १५ ० (आपसांत वाटणी केलेली). | ..... | ... | ..... | |
| | १ | १६-४ | १५ १३ ६ | ५ ० ० | त्र्यंबक नारायण ... | १ | ..... | |
| | २ | ३-८ | ३ २ ६ | ० १५ ० | रामचंद्र बळवंत देशपांडे. | २ | ..... | |
| ५. जात इनाम ... | ... | १-२ | १ ८ ० | ... | ..... | ... | ..... | |
| | १ | ०-११ | ० ९ ० | ... | बळवंतराव यादवराव... | ३ | ..... | |
| | २ | ०-१० | ० ९ ० | ... | सर्वेराव शिवराव ... | २७ | ..... | |
| | ३ | ०-२१ | ० ६ ० | ... | लक्ष्मीबाई कोम अनंदराव. | २९ | यशवंतराव | |

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असेल तर). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | | | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क नोंदणीपत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्कनोंदणीपत्रकांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर. | रु. | आ. | पै | रु. आ. पै | | | | |
| ६. दगडाचा नंबर... | ... | ११-४ पोट-खराब ०-२५ | ७ | ० | ० | ... | ..... | ... | ..... | ... |
| | १ | ०-१० | ० | २ | ० | ... | सर्वेराव भिवराव ... | २७ | ..... | ... |
| | २ | ०-१० | ० | २ | ० | ... | बळवंतराव यादवराव... | ३ | गोविंदराव हरी देशपांडे, बिनकबजे गहाण घेणारा. | ४० |
| | ३ | १०-२४ पोट-खराब. | ६ | १२ | ० | ... | मानाजी आनंदराव ... | २८ | ..... | ... |
| | ४ | ०-२५ | | ... | | ... | सर्जेराव भिवराव ०-८-०, बळवंतराव यादवराव ०-४-०, मानाजी आनंदराव ०-४-०, समाईक. | ३० | ..... | ... |
| ७. जंगली अस्वलाचा नंबर. | ... | १०-२० | ५ | ८ | ० | ... | मानाजी आनंदराव शिंदे. | ३२ | नवीन मर्यादीत शर्तीनें. | ३२ |
| ८. ..... | ... | २०-० | १० | ० | ० | ... | रामचंद्र बळवंत देशपांडे. | ११ | ..... | ... |
| ९. देसायाची गुहा. | ... | २४-३० पोट-खराब. ०-१० | १६ | ० | ० | ... | ..... | ... | ..... | ... |
| | १ | १२-१६ पोट-खराब. ०-४ | ८ | ० | ० | ... | रामचंद्र बळवंत देशपांडे. | १२ | ..... | ... |
| | २ | १२-१४ पोट-खराब. ०-६ | ८ | ० | ० | ... | रघुनाथ बळवंत देशपांडे. | १७ | ..... | ... |
| १०. देवस्थान इनाम, बहिरोबाची भात-जमीन. | ... | १२-१७ | १८ | १२ | ० | ५ ० ० भर आकार देणेचा आहे. | नरशींगराव बळवंतराव. | २१ | ..... | ... |
| ११. कुलकर्णी वतन इनाम. | ... | २२-१० | ४५ | ० | ० | १५ ८ ० | ..... | ६ | ..... | ... |
| | १ | १२-१० | २५ | ० | ० | ... | नारायण कुळकर्णी, गोविंद आबा लोणकर, मिराशी कूळ, खंड रु. ३०. | ६-अ | ..... | ... |
| | २ | १०-० | २० | ० | ० | ... | गुल्लापा, शिवलिंगापा, मिराशी कूळ, खंड रु. २५. | ६-ब | ..... | ... |
| १२. ... ... | ... | १०-५ | २० | ४ | ० | ... | सर्जेराव भिवराव ... | ४४ | ..... | ... |
| १३. रयत उपयोगी (गांव जोशी) गांव नोकर इनाम. | ... | २-४ | ३ | ० | ० | जुडी नाहीं ... | गणपतराव बळवंतराव. | १४ | ..... | ... |

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असेल तर). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | | | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | | | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्कोत्पत्ति-कांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणी हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २ | ३ | ४ | | | ५ | | | ६ | ७ | ८ | |
| | | एकर. | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै | | | | |
| १४. नाऽगिरी बाग. | ... | १०–१५ | १२ | ६ | ० | ३ | ८ | ० | शिवराम शंकरभट ... | ४ | ..... | |
| १५. बिनशेती ... | ... | ६–८ | ..... | | | १२४ | ० | ० | नरशींगराव बळवंत ... | १६ | तगाई, रुपये ५०० ... | |
| १६. ... | ... | २५–० | ६१ | ८ | ० | ..... | | | शिवाजी बाळाजी, मानाजी बाळाजी, बापूजी बाळाजी, गोपाळ गणेश व सखाराम तुकाराम, समाईक. | २६ | ..... | |
| १७. नवकीर्द ... | ... | १–३५ | ६ | १३ | ६ | ..... | | | ..... | ... | ..... | |
| | १ | ०–३० | ३ | २ | ६ | ..... | | | बाळकृष्ण वासुदेव ... | ५ | ..... | |
| | * पोट नं. १, | ०–२० | ३ | ० | ० | ..... | | | ..... | ... | ..... | |
| | फाळणी नं. १, ६, ७ आणि ८. | ०–१० | ० | २ | ६ | ..... | | | ..... | ... | ..... | |
| | २ | १–१ | ३ | ११ | ० | ..... | | | विठ्ठल रामचंद्र ... | ४३ | ..... | |
| | * पोट नं. १, २ | ०–३० | ३ | ८ | ० | ..... | | | ..... | ... | ..... | |
| | फाळणी न. १, २, ३, ४, आणि ५ | ०–१५ | ० | ३ | ० | ..... | | | ..... | ... | ..... | |
| १८. गांव तलाव ... | ... | १०–२५ | ..... | | | ..... | | | सरकारी ... ... | ... | ..... | |
| १९. खारी जमीन... | ... | ४–३२ | ६ | ८ | ० | ..... | | | सरकारी पडीत ... | ३९ | ..... | |
| २०. .. ... | ... | ६–३० | १० | ० | ० | ..... | | | नारायण कुळकर्णी ... | १३ | ..... | |
| | १ | ३–१० | ५ | ० | ० | ..... | | | गणेश सुबराव, मुळ-गेणीदार, रु. १०. | ७ | पोट मुळगेणीदार चिन्नाप्पा दुर्गाप्पा. | |
| | २ | ३–२० | ५ | ० | ० | ..... | | | गोविंद विठोबा, मुळ-गेणीदार, रु. १०. | ३१ | अमृताभोई, पोट मुळगेणीदार, १ ए. २० गुं. जमिनीचा खंड रु. ५ बहादूर करीम, पोट मुळगेणीदार, २ ए. जमिनीचा खंड रु. ७. | |
| २१. जात इनाम ... | ... | १५–२० | ३० | ० | ० | ९ | ८ | ० | (फेरपाळीनें) ... १. मणीलाल हिराशंकर. २. हिरालाल मोतीलाल. ३. चुनीलाल भाईलाल. ४. अंबालाल हरीशंकर, | २० | ..... | |
| २२-अ. ... | ... | ५–० | १५ | ० | ० | ..... | | | सरकारी पड ... | ... | ..... | |
| २२-ब. कुळकर्ण्यांची चाळ, बिन-शेती. | ... | २–२० | ..... | | | ७० | ० | ० | नारायण कुळकर्णी ... | १३ | ..... | |
| २३. जंगल ... | ... | १५–० | ..... | | | ..... | | | जंगल ... | ... | ..... | |
| २४-अ. गुरचरण ... | ... | १९–३० | १९ | १२ | ० | ..... | | | मोफत गुरचरणीकडे ... | ... | ..... | |
| २४ब शाळा ... | ... | ०–१० | ..... | | | ..... | | | डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड शाळा. | ४६ | ..... | |

* हिस्सा सर्व्हे झाली नाहीं; सबब पोट-फाळणी नंतर दिले आहेत.

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असेल तर). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्कनोंदणी पत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्कनोंदणीपत्रकांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | |
| २५-अ. ... | ... | २५—० | २५ ० ० | ..... | बाळकृष्ण वासुदेव ... | ५ | ..... | ... |
| २५-ब. बिनआकारी खारी भात खाजण. | ... | १००—० | ... | ..... | ..... | ... | ..... | ... |
| | १ | २५—० | ... | ६ ४ ० | बाळकृष्ण वासुदेव .. | ३८ | ..... | ... |
| | २ | ७५—० | ... | ..... | सरकारी पडीत ... | ... | ..... | ... |
| २६-अ. इनाम वर्ग ७. | ... | १—० | २० ० ० | २ ० ० | रेव्हरंड जे. शीलीडी मिशन हाऊस मॅनेजर. | ४७ | ..... | ... |
| २६-ब. धर्मशाळा इनाम वर्ग ७. | ... | १—० | ... | ..... | प्रेमचंद रायचंद ... | ४५ | ... | ... |
| २७. देसाई वतन इनाम वर्ग ५. | ... | २४—२० पोट-खराब ०—२० | ६० ० ० | ७ ३ ० | बाळकृष्ण वासुदेव ... | ९ | ..... | ... |
| २८. ... | ... | १५—० | ३० ० ० | ..... | सरकारी पड ... | ... | ..... | ... |
| २९. इनाम वर्ग १. | ... | १०—५ | २० ४ ० | ४ ८ ६ | सर्जेराव भिमराव ... | १० | ..... | ... |
| | | | | | खंडू रघू ... | ४७-अ | ..... | ... |
| *गांवठाण जागा. | | ए. गुं. चौ. वार | | | | | | |
| १. ... ... | | ० ० ५० | ... | ० ८ ४ | नरशींगराव बळवंतराव. | ३३ | ..... | ... |
| २. ... ... | | ० ० १०० | ... | १ ० ८ | नरशींगराव बळवंतराव. | ३६ | ..... | ... |
| ३. ... ... | | ० ८ ३२ | ... | १० ६ ८ | मानाजी आनंदराव ... | ३७ | ..... | ... |

* गांवठण जमिनीचे सर्व्हे नंबर केले नसल्यामुळे त्यास हक्कनोंदणीचा कायदा लागू केलेला नाहीं, सरकार ठराव नंबर ११५८१-१९१३ ; तरी पण गांवचा नमुना नंबर ८-अ लिहिण्यास सोपें जावें म्हणून ह्या नोंदी केल्या आहेत ; फेरफाराबद्दल खबर न दिल्यास फी घेतां येणार नाहीं ; तसेंच दाखले, नकला हजर करण्याचा कायदा त्यास लागू नाहीं.

## गांवचा नमुना नंबर ७ यावरील खुलासा.

जमिनीचें व जमिनीवरील हक्कांचें इंडेक्स ( अनुक्रमणिका ).

७. हा नमुना तयार करतेवेळेस प्रत्येक नोंदीच्या खालीं निदान एकतरी नवी फेरफाराची नोंद करण्यापुरती नेहमीं सोडली पाहिजे. लागोपाठ दोन नांवें लिहिण्याची सोय असल्यास अधिक चांगलें.

कोष्टक १.—बिगरशेतीच्या कारणासाठीं केलेला प्रत्येक नवीन सर्व्हे नंबर किंवा गट नंबरांतून फोड करून पडलेले प्रत्येक सर्व्हे नंबर या कोष्टकांत अनुक्रमानें येतील तसे दाखल करावे, पत्रकाचे शेवटीं दाखल करूं नयेत. जमिनीची मोजणी व जमिनी संबंधींचे कागदपत्र ठेवणारें जें खातें आहे त्याची अशी हल्लींची पद्धत आहे कीं, सर्व्हे नंबर २५ मधून कांहीं भाग [illegible] जर नवीन नंबर केला तर या नवीन नंबरास २५-ब व मूळ नंबरच्या शिल्लक राहिलेल्या भागास सर्व्हे नंबर २५-अ म्हणावें. य राहिलेले जमिनीस नंबर २५ असें म्हटल्यास ( नवीन नंबर २५-अ मानून ) अशी गैरसमज होण्याचा संभव आहे कीं, न म्हणजे आतांचा कमी क्षेत्राचा सर्व्हे नंबर २५ हाच मूळ सर्व्हेच्या वेळचा सर्व्हे नंबर २५ आहे. व अशी समजूत [illegible] अर्थातच चूक आहे.

नवीन ज. म. का., कानू ११ अन्वयें कोणाहि मनुष्यास एकाच हक्कानें प्राप्त झालेले एकमेकांस लागलेले सर्व्हे नंबर [illegible] करितां येतात; असें करणेस कलेक्टरची परवानगी घेतली पाहिजे. परंतु एकादे रस्त्यामुळें, नाल्यामुळें, नालीमुळें [illegible] अशाच प्रकारच्या निसर्गसिद्ध स्थितीमुळें अगर अडचणीमुळें सर्व्हे नंबर विभागलेले असल्यानें एकत्र पीक होऊं [illegible] नसल्यास व नंबर एकत्र करणें फायदेशीर नाहीं असें आढळून आलें तर कलेक्टरसाहेब अशी परवानगी देणारहि नाहीं.

एकादे सर्व्हे नंबराचा कांहीं भाग सरकारनें ( अक्वायर ) संपादित केला तर तो भाग बहुतकरून रस्ता, त[illegible] अगर अशाच प्रकारचे मोठे क्षेत्रात सामील करण्यांत येतो. तसें झालें नाहीं तर त्या भागांत मूळ सर्व्हेचा अ[illegible] कायम ठेवून त्याचा नवीन हिस्सा समजावा.

सर्व्हे नंबर २३ व २५ एकत्र केले असतां या नवीन जमिनीचे क्षेत्रास सर्व्हे नंबर २३+२५ असे म्ह[illegible] व याचा क्रम सर्व्हे नंबर २२ खालीं लिहावा. त्यामुळें अर्थातच सर्व्हे नंबर २४ व २६ यांचे दरम्यान मुळींच नों[illegible] होणार नाहीं. ( ज. म. का. खालील कानू ११ प्रमाणें ) सर्व्हे नंबर २३ यांत सर्व्हे नंबर २५ चा कांहीं भाग स[illegible] करणेंत आला तर त्यामुळें असें उघड दिसतें कीं, सर्व्हे नंबर २५ यांत हिस्से आहेतच अथवा प्रथम नसल्यास [illegible] तरी हिस्से पडले आहेत. सामील केलेला हिस्सा $\frac{२५}{२}$ आहे असें गृहीत धरून चालल्यास नवीन सर्व्हे नंबरास २३+$\frac{२५}{२}$ असें म्हणावें. परंतु सर्व्हे नंबर २५ यांत २५-अ, २५-ब असें दोन सर्व्हे नंबर पडले असल्यास स[illegible] नंबरास २३+२५-अ असें म्हणावें. असावे तितके हे नियम सोपे नाहींत हें खरें. परंतु दुसरी कोणतीहि पद्ध[illegible] स्वीकारली तर सर्व्हे नंबरच्या पूर्वीच्या इतिहासाची परंपरा भंग पावेल व पूर्वीची मोजणी, प्रत फाळणी, आकार [illegible] संबंधींच्या दाखल्यास व जमिनीची खरेदी, विक्री, गहाण वगैरे व्यवहाराची संगतवार माहिती मिळण्यास अडचण [illegible] उदाहरणार्थ, समजा सर्व्हे नंबर २५ याचे दोन सर्व्हे नंबर २५ व १९१ असे केले व नवीन सर्व्हे नंबर २५ हा नं[illegible] २३ मध्यें सामील केला व ह्या मोठ्या शेतास सर्व्हे नंबर २३ असें नांव दिलें तर खालील प्रमाणें तीन प्रका[illegible] अडचणी येतील :—

(अ) मूळच्या कागदांत सर्व्हे नंबर २५ ची जमीन कोणती होती हें पहाण्यास येणार नाहीं.

(ब) पूर्वीचे मोजणी व प्रतीचे कागदांत सर्व्हे नंबर २३ बद्दल जो मजकूर आहे तो हल्लींचा सर्व्हे नंबर [illegible] च्या सर्व जमिनीबद्दल आहे अशी चुकीची समजूत होण्याचा संभव आहे.

(क) नकाशांत सर्व्हे नंबर १९१ पहाणेसाठीं तासाचेतास घालवावे लागतील. कारण क्रमानें येणारे टि[illegible] मुळींच तो आढळणार नाहीं.

८. कोष्टक १ यांत सत्ताप्रकाराचेंहि वर्णन दिलेलें असतें. कांहींच वर्णन दिलेलें नसलें म्हणजे जमी[illegible] नेहमींच्या सत्ताप्रकाराने म्हणजे जमीन सरकारी असून सारा देण्याच्या अटीवर धारण केलेली आहे असें समजावें. [illegible] गांव इनाम असेल तर त्या इनाम सत्ताप्रकारांत सामील असलेल्या सर्व जमिनीसमोर कोष्टक १ यांत वेगळा सत्ता[illegible] लिहिण्याचें कारण नाहीं. फक्त ( इनाम गांवांतील ) खालसा, कदीम इनाम, जदीद इनाम, अगर सार्वजनिक काम[illegible] ठेविलेल्या जमिनी असतील, तेवढ्यांच्या बाबतींत तो सत्ताप्रकार कोष्टक १ यांत लिहावा.

तालुकदारी व खोतीचे गांवांसंबंधीं स्वतंत्र भागांत वर्णन आहे. परंतु बहुतांशीं खालसा गांवांत जर तालु[illegible] प्रकाराचे अगर खोतीचे कांहीं सर्व्हे नंबर असतील तर मात्र त्या त्या जमिनीस तालुकदारी उद्धद जमाबंदी अगर [illegible] असेल तसें, सत्ताप्रकारचें वर्णन दिलें पाहिजे. असल्या जमिनीसंबंधीं जर हक्काचें स्वतंत्र पत्रक ठेविलें असेल [illegible] या यादींतून ते सर्व्हे नंबर अजीबात गाळावेत.

इनाम एवढेंच वर्णन पुरेसें नाहीं. इनामाचा वर्ग व प्रकार पूर्णपणें लिहिला पाहिजे (जसें राजकीय सरंजाम, बिननोकरी, देसाई वतन, जसें असेल तसें). वर्ग ७ चे इनामास मात्र वर्ग दिला म्हणजे पुरें आहे.

नवीन मर्यादित शर्तीवर धारण केलेल्या जमिनी (कानडा जिल्ह्यांतील हद्दी या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या जमिनी याच सत्ताप्रकारें धारण केलेल्या आहेत), बिगरशेतीच्या जमिनी, अगर बिनआकारी पडजमिनी, हे सर्व सत्ताप्रकारच समजून त्यांची नोंद केली पाहिजे. सार्वजनिक अगर विशिष्ट जातीचे कारणासाठीं राखून ठेवलेली अगर वर्ग केलेली जमीन अगर रस्ते, जंगल वगैरेकडेस दिलेले जमिनीचेंहि वर्णन लिहावें. तसेंच कोंकणांतील कौली जमिनीचा प्रकारही द्यावा.

## शेताचें नांव (डागाचें).

९. पुष्कळ अडाणी लोकांस आपआपले जमिनीचे सर्व्हे नंबर मुळींच कळत नाहींत. परंतु ते लोक आपल्या जमिनी शेताचे नांवानें ओळखतात. उदाहरणार्थ, लोण्याचें शेत, रानडुकराचें बावर, देसायाची गुहा, नव्या गिरणीचें शेत (कापसाची गिरणी असलेलें) वगैरे वगैरे. हल्लीं असलेलीं सर्व नांवें ह्याच कोष्टकांत लिहावीं. इंग्रजी अंमलांतील अवल मोजणी झाली त्यावेळीं सर्व्हे नंबर नसून फक्त असल्या प्रकारचीं शेतीचीं नांवें होतीं.

## कोष्टक २.

### पोट-हिस्सा नंबर.

१०. जुने मोजणीचे वेळीं प्रत्येक धारण करणाराचे जमिनीस वेगळा सर्व्हे नंबर दिला होता परंतु त्यामुळें कित्येक सर्व्हे नंबर फार मोठे तर कित्येक फारच लहान झाले होते. कित्येक वेळीं असे लहान लहान तुकडे एकाच नंबरांत सामील केले गेले व मोजणीनंतर पुष्कळ सर्व्हे नंबरांत भाऊहिश्शामुळें अधिक तुकडे झाले. कांहींतील कांहीं भागाची खरेदीविक्री झाली असें होतां होतां कित्येक प्रसंगीं एका सर्व्हे नंबराचे १०० किंवा अधिक तुकडे झाले. हल्लीं या तुकड्यांसच आम्ही पोट-हिस्से अगर हिस्से अशी संज्ञा दिली आहे. एकाच माणसाकडे नजीकचे दोन तुकडे (सारख्याच) एकाच प्रकारच्या हक्कानें आले तर कुळकर्णी यानें त्या दोन तुकड्याचा एकच तुकडा केला पाहिजे. परंतु जर एक तुकडा मालकी हक्कानें व त्याचेच शेजारीं दुसरा हिस्सा दुसरे कांहीं हक्कानें (उदाहरणार्थ गहाण घेणारा या नात्यानें) कबजांत आला तर मात्र दोन हिश्शाचा एकच हिस्सा करतां कामा नये. सर्व्हे नंबर २५ यांत तीन हिस्से असून त्याचे नंबर २५/१, २५/२, २५/३ असे आहेत पण २५/३ मध्यें पुन्हा आणखी दोन हिस्से झाले तर या नवीन हिश्शांस २५/३-अ, २५/३-ब, अगर २५/३ (१), २५/३ (२) असे नंबर द्यावेत जर हिस्सा नंबर २ चे धारण करणारानें हिस्सा नंबर ३ पैकीं कांहीं भाग आपले कबजांत घेतला तर हिस्सा ३ याचे ३-अ व ३-ब असे निरनिराळे हिस्से पाडून ३-अ हा हिस्सा नंबर २ यांत सामील करून त्याचा नंबर हिस्सा नंबर २+३-अ असा केला पाहिजे. अशाप्रकारें नवीन हिस्सा पडल्यास अगर हिश्शांत सामील झाल्यास नकाशांत दुरुस्ती करणें ती विभाग दर्शविणाऱ्या रेषा नवीन घालून अगर असलेल्या रेषा मोडून दुरुस्ती करावी.

(२) निव्वळ मर्जीवरच्या म्हणजे उपरी कुळवहिवाटीमुळें किंवा थोड्या मुदतीच्या कुळवहिवाटीमुळें स्वतंत्र हक्कसंबंध प्राप्त होत नाहीं. कारण त्या ठिकाणीं मालक हाच स्वतः धारण करणारा असतो; मात्र त्याचा कबजा कुळाचे मार्फत असतो (खालील पॅरा १६ पहा). एकाच तुकड्यामध्यें धारण करणाराचीं दोन अगर अधिक कुळें असलीं तरी त्या कुळवहिवाटीसाठीं अधिक हिस्से पाडणें नाहींत.

(३) अनुक्रम बदलल्यामुळें त्या तुकड्याच्या इतिहासास कांहीं बाध येत नसेल तर अशा प्रकारें नंबर सामील करण्यास कांहीं हरकत नाहीं. हिस्से एकमेकांत सामील करण्यांस मोजणीचें ज्ञानच लागतें असें नाहीं. फक्त आकाराची व क्षेत्राची बेरीज करितां आली व हिश्शामधली विभागणारी रेषा काढून टाकतां आली म्हणजे पुरे आहे. गांवचा नमुना नंबर ७ यांतील नोंदीची संख्या कमी करणेचे कामी व जास्त विभागाचे वाईट परिणामास आळा बसविणेसाठीं नंबर एकमेकांत सामील करूं देणें हा एक फारच उपयुक्त मार्ग आहे. जेव्हां या अनुक्रमणिकेंत अधिक पडलेले पोट-हिस्से किंवा जुन्या सर्व्हे नंबराचे नवीन पडलेले सर्व्हे नंबर योग्य क्रमानें लिहिणेस पुरेशी जागा नसेल तेव्हां तलाठी यांनीं कागदाचा नवीन तुकडा चिकटवून लिहावें. अनुक्रमणिकांची टिकेवार यादी नवीन लिहून काढणेचा प्रसंग येईपर्यंत हाच उपाय उत्तम होय.

११. * * * * *

१२. जमीन शेतीची असून शेतीचा आकार बसला असेल तर एकंदर क्षेत्र दोन ठिकाणीं विभागले जाईल: (१) कीर्दसार एकर, (२) खराब एकर. उदाहरणार्थ, सर्व्हे नंबर १०१ याचे ऐन क्षेत्र ६ एकर ३० गुंठे आहे. परंतु त्यापैकीं १५ गुंठे पोट-खराब आहेत. या गोष्टीची नोंद कोष्टक ३ मध्यें अशी करावी :—

६—१५

पो. ख —१५

या दोन क्षेत्रांची बेरीज केली म्हणजे ऐनक्षेत्र येईल. परंतु गांवचा नमुना नंबर ८-अ व १२ यांत फक्त एकर ६ गुंठे १५ एवढ्याच जमिनीची जरूरी आहे.

१३. पोट-खराबा सहज ओळखण्यासारखा असून तो निव्वळ काहीं विविक्षित पोट-हिश्शाच्या चतु:सीमेंत असेल तर तो त्या त्या हिश्शांत धरावा व त्या पोट हिश्शांतील कीर्दसार क्षेत्राखालीं लिहावा. (सर्व्हे नंबर १ व ३ पहा). जर सहज समजण्यासारखा नसेल तर प्रत्येक हिश्शाचें कीर्दसार क्षेत्र लिहून झाल्यावर तो खालीं निराळा दाखवावा. प्रत्येक हिश्शाच्या कीर्दसार क्षेत्राच्या प्रमाणात हा खराबा प्रत्येकांत आहे असें समजावयाचें. पुष्कळ भागिदारांच्या समाईक कबजांत अगर समाईक भोगवट्यांत असणाऱ्या पोट-खराबाचा, उदाहरणार्थ: गुरें चारण्याकरितां तसेंच ज्यांचा उपयोग करण्याचा लोकांना हक्क आहे (उदाहरणार्थ, तळीं वगैरे) अशांचा निराळा हिस्साच करावा (पहा सर्व्हे नंबर ६-४).

### आकार.

१४. जेव्हां सर्व्हे नंबराचे पोट-हिश्शाची मोजणी झाली नसेल व आकार फोडपत्रकें गांवांस दिली नसतील त्या वेळीं कुळकर्णी यांनीं सबंध सर्व्हे नंबरच्या आकाराची विभागणी हिश्शावर खालीं दिल्याप्रमाणें करावी :—

(१) धारण करणारे एकमतानें ठरवितील त्याप्रमाणें.

(२) त्यांचा एकमताचा ठराव होत नसल्यास अंदाजी अगर प्रत्यक्ष आढळून येणारे क्षेत्राचे प्रमाणांत फाळूनें लिहावी. परंतु हिश्शाची मोजणी जेव्हां केली असेल त्या वेळीं हिश्शावर आकार विभागणें तो मोजणी-अंमलदार व जमिनविभागणी व जमिनींतील हक्कासंबंधाचे कागद वगैरेची तजवीज करणाऱ्या खात्याचे अंमलदार ठरवितील त्याप्रमाणें विभागावा. करार करणारामध्यें आपसांत कांहीं ठराव अगर करार झाला असला तरी त्यामुळें प्रत्येक तुकड्याचा आकार जमीनमहसुलाचे कायद्यास अनुसरून बसविण्याच्या सरकारचे हक्कास मुळींच बाधा येत नाहीं.

### जुडी आणी विशेष सारा अगर बिगरशेतीचा सारा किंवा भाडें

(गांवचा नमुना नंबर २ व ३ वरून घेतलें तें.)

१५. जेव्हां कित्येक सर्व्हे नंबर मिळून गट, जुडी अगर उद्धर जमा बसविली असेल त्या वेळीं आणि ती एकच धारण करणारा देत असेल तर, त्या त्या सर्व्हे नंबरावर जुडी विभागावयाची ती, धारण करणारानें आपल्या मर्जीप्रमाणें विभागावी. परंतु धारण करणारे लोक अनेक असल्यास त्यांचेकडून जुडी अगर जमा आकाराचे प्रमाणांतच फाळूनें घेतली पाहिजे. (सरकार ठराव नंबर ४१७९, सन १८८९) प्रथम सर्व सर्व्हे नंबराचा आकार व जुडी त्या सर्व्हे नंबरासमोर लिहिली पाहिजे, हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे आणि, जर त्या सर्व्हे नंबरांत हिस्से असतील तर प्रत्येक हिश्शाचे अनुक्रम नंबर, क्षेत्र, आकार, जुडी निरनिराळ्या ओळींत लिहावीं व सर्व हिशाचें क्षेत्र वगैरेची बेरीज त्या सर्व्हे नंबराचें क्षेत्र वगैरे बरोबर मिळतें ठेवण्याची खबरदारी घ्यावी व असें लक्षांत ठेवावें कीं, क्षेत्र व आकार सर्व्हे नंबर समोर व पोट-हिश्शासमोर दाखल होत असल्यामुळें कोष्टक ३, ४, ५ याची बेरीज होते वेळीं सर्व्हे नंबर समोरील व पोट-हिश्शा समोरील आंकडे दुबार होणार नाहींत अशी काळजी घेतल्याखेरीज बेरीज बरोबर येणार नाहीं.

### कोष्टक ५.

या कोष्टकांत इनाम जमिनीची जुडी, तालुकदारी जमिनीची जमा, कौली अगर बिनशेतीच्या जमिनीचें भाडें, विशेष सारा हे दाखल करावेत. लोकलफंड मुळींच दाखल करणें नाहीं कारण ती रक्कम ठरीव नियमांप्रमाणें हिशेबांनीं काढण्याची असते व ते हिशेब गांवचा नमुना नंबर ८-अ मध्येंच केलेले असतात.

### विद्यमान कबजेदार, कोष्टक ६.

१६. निरनिराळा तुकडा निरनिराळे कबजे हक्कानें धारण केलेला असल्यानें स्वतंत्रपणें दाखल केला आहे. म्हणून शेताचा एखादा भाग जर कबजेगहाण दाखल असेल तर तो वेगळा तुकडा अगर हिस्सा म्हणून दाखल असतो म्हणून या कोष्टकांत गाहाणदाराचें नांव वेगळें लिहावें. परंतु केवळ नजरगहाण दिलें असेल तर त्याचा वेगळा हिस्सा पडत नाहीं व नोंदहि वेगळी होत नाहीं. कुळामार्फत वहीत केले जमिनीचा कबजा अर्थातच मालकाचाच समजावा. (ठ. नं. ५०९४, तारीख १-२-२३ व ३-७-२३.)

१७. जर तिघां भावांनीं एका शेताची वांटणी करून तीन वेगळीं पिकें केली तर तीन हिस्से झाले ; परंतु ते जर एकत्र काम करून एकच पीक काढतील व पिकाचे उत्पन्नाची वांटणी करतील तर फक्त एकच हिस्सा समजून त्यांना समाईक कबजेदार मानावें. त्याच शेतांत निरनिराळे विभाग अगर वांटे आहेत पण (विभक्तपणा मात्र नाहीं); त्यांनीं जर शेत एकाच कुळास लावलें व खंडांत वांटणी केली तरीपण ते समाईक कबजेदार होत. जर वडील भाऊ हा जमिनीची व्यवस्था पाहात असेल व बाकीचे दोघे त्याचेजवळ राहात असतील तर किंवा शेतांत कबजाहि वेगळा नाहीं व उत्पन्नाची विभागणी होत नसेल किंवा दाखवितां येण्याजोगा विभाग पडत नसेल परंतु सर्वच एकत्र उपभोग घेत असतील तर ते समाईक धारण करणारेच होत. सरकारकागदीं जर एकाचेंच नांव दाखल असलें तरी सर्वच समाईक धारण करणारे इ

पृथक् अथवा सर्व मिळून सरकारसारा संयुक्त जमीनबाब देणेंच जबाबदार आहेत. (ठ. ५०१९—८८३, ७८५९—८६.) समाईक धारण करणारे प्रत्येकाचीं नांवें कोष्टक ६ मध्यें दाखल करावींत. सर्व्हे नंबर ६—४ ही नोंद पहावी. त्या ठिकाणीं १—८ आण्याचा हिस्सेदार व दोन चार चार आण्याचे हिस्सेदार आहेत परंतु विभक्त मात्र नाहींत. त्याप्रमाणें (स. नं. २१ पहा) या नोंदीवरून दिसेल कीं, प्रत्येक जण निरनिराळे वर्षी आळीपाळीनें त्या सर्व जमिनीचे धारण करणारे आहेत. असली पद्धत कोंकणांत व वसई तालुक्यांत बरीच प्रचारांत आहे. असे हिस्से व पाळ्या करणें जमिनीच्या दृष्टीनें वाईट दिसतें हें खरें परंतु एकच कूळ दरवर्षी निरनिराळे मालकास खंड देऊन नेहमी वहीत कौत असल्यानें हा दोष पुष्कळ अंशानें कमी होतो.

एकत्र कुटुंबासाठीं फक्त वहिवाट करणारे माणसाचें नांव कोष्टक ६ अगर ८ यांत दाखल करावें. त्याचे मरणामुळें फेरफाराची नोंद अवश्य होते. परंतु कुटुंबांतील इतर माणसाचीं नांवें कोष्टक ६ मध्यें दाखल करणेचें कारण नाहीं. [खालील प्यारा ३९ (ब) पहा.]

१८. जेव्हां एखादा तुकडा थोडे मुदतीनें (५ वर्षांपेक्षां कमी) सरकार वहितीस देतें त्या वेळीं धारण करणार सरकारच समजावें व कुळाचें नांव फक्त गांवचा नमुना नंबर १२ यांत येईल; परंतु अधिक लांब मुदतीनें दिलेल्या जमिनीचे बाबतीत कोष्टक ८ मध्यें सरकारकडून ज्या कुळास दिली त्यांचे नांव कूळ म्हणून लिहावें व कोष्टक १ मध्यें सत्ताप्रकार म्हणजे "भाडेपट्ट्यानें दिली" असें लिहावें. असा प्रकार जसी इनामाचे भाडेपट्ट्यासंबंधीं करावा लागेल.

१९. कित्येक प्रसंगीं कोष्टक ६ मध्यें धारण करणाराचे दोन प्रकार कबूल करणें भाग पडेल. उदाहरणार्थ, सरंजामदार यांस राजभाग म्हणजे सरकारचा सारा घेण्याचा हक्क दिलेला असतो. जमिनी अ, ब, क याचे कबजत 'अगोदरपासूनच असतात. या लोकांचे हक्क सर्व्हे केलेले खालसा गांवांतील धारण करणाऱ्याप्रमाणेंच असतात व खालसा गांवांतील जमीन धारण करणारे लोकांप्रमाणेंच जमिनीचा राजीनामा देऊन अगर खालसाची नोटीस मिळूनहि पट्टी न दिल्यामुळें त्यांचा हक्क नाहींसा होऊं शकतो. अशांचीं नांवें योग्य तऱ्हेनें दाखविण्याची तऱ्हा म्हणजे ही अशी—स. नं. २९ कोष्टक ६ पहा:—

सर्जेराव भि. / खंडू रघू — म्हणजे सर्जेराव हा रेघेवरील धारण करणारा अगर वरिष्ठ धारण करणारा समजावा. व खंडू हा रेघेखालील धारण करणारा समजावा व ह्याच ठिकाणीं मिराशी कुळें व कायमचीं कुळें यांचीं नोंद करावी. जुने हक्काचे पत्रकात हा भेद केला गेला नव्हता व त्यामुळें दोहों बाजूस साशंकपणा वाटत असे. कोष्टक ६ (त्या वेळचें कोष्टक ९) यांत त्याचें नांव नसलें कीं मिराशी कुळाल भिती वाटे; तसेंच इनामदार, सरंजामदार व मुळगेणी हक्काचे जमीनदार ह्यांसहि त्यांचीं नांवें कोष्टक ६ यांत नसलीं कीं भीती वाटे. या पद्धतीचा अम्मल केल्यास रेघेवरील फेरफार हे इनामदाराचे फेरफार होत (पान ३६, पॅरिग्राफ १ पहा) रेघेखालील नव्हेत. न. नं. ६ मध्यें हें फरक नोंदतांना ते रेघेवरील फरक आहेत का रेघेखालील आहेत याचा खुलासा कुळकर्णी यांनीं स्पष्टपणें लिहिलेला पाहिजे.

२०. लेखी भाडेपट्टे नसतील तर वाहुदार हीं उपरीं कुळें आहेत किंवा कायम कुळें आहेत हें ओळखणें नेहमींच सोपें नसतें (मुं. लॉ. रि. १७,४७५) (२९ मुं. ४१५). धारण करणारा फक्त सरकारसारा देतो परंतु कायमचें कुळ, मुळगेणीदार अगर मिरासदार कूळ हें सरकारसारा देऊन शिवाय कांहींतरी कदाचित अधिक देत असतील: मात्र त्यांची खंडाची रक्कम कायम असते.

### कोष्टकें ७ व ९.

२१. या दोन कोष्टकांत हक्काचे पत्रकांतील फक्त अनुक्रम नंबर लिहावा (वरील ७ पॅरा पहा.) पहिली अनुक्रमणिका तयार करतेवेळीं या कोष्टकांत नवीन नमुना नंबर ६ अगर जुने नमुना नंबर ६ चा अनुक्रम नंबर लिहावा म्हणजे मागील हकीकत समजून येईल. पुढील प्रत्येक फेरफाराबद्दल नवीन नमुना नंबर ६ चा हक्काच्या रोजनाम्याच्या नोंदीचा अनुक्रम नंबर लिहावा.

### कोष्टक ८.

२२. या कोष्टकांत देखील दोन प्रकारचे इतर हक्क नोंदणेची सोय ठेवावी:—

(अ) रेघेवरील—कोष्टक ६ यांत दाखल असलेले हक्काचे पूर्वी अस्तित्वांत असलेले हक्क;

(ब) रेघेखालील हक्क म्हणजे कोष्टक ६ यांतील हक्कावर अवलंबून असणारे व त्या हक्काचे नंतर उत्पन्न झालेले हक्क;

जसें—रेघेवरील हक्क—(सर्व्हे नंबर ३ यांतील) मानाजी वतन घराण्यांतील एका तक्षिमेंतील वारचा वतनदार आहे. (वतनाच्या कायद्याप्रमाणें मानाजी ज्या वतन घराण्यांपैकीं आहे तें घराणें अस्तित्वांत आहे तोंपर्यंतच ही जमीन वतनी समजली जाईल. मानाजी मेल्यास वतनाचे कायद्याअन्वयें (सामान्य कायद्याअन्वयें नव्हे) त्यास कोणीतरी वारस असला

पाहिजे; जर तसा नसला तर तक्षीम नष्ट होवून त्याबरोबर इनाम जमीनहि नष्ट होईल. कोष्टक ६ मध्यें प्रत्यक्ष [illegible] करणारा म्हणून जो इसम असेल त्याचे वारसाचे नोंदीचा व रेघवरील नोंदीचा कांहीं संबंध नाहीं. "संरक्षित कुळाचा हक्क कोणत्याहि कायद्याच्या कामामध्यें प्रस्थापित होईल तेव्हा तो रेघेवरील हक्क म्हणून कोष्टक ८ मध्यें दाखल करावा. तारीख १ माहे सप्टेंबर सन १९४० रोजींचा (ठराव नं. १११८/२४)".

* * * * * * *

२३. पुन्हां उदाहरण.—सर्व्हे नंबर १ अ-३ यांत मारुती कुसा हा गहाण देणारा आहे. त्यानें हरी रामचंद्र यांचे आपले कर्ज फिटेपर्यंत कबजा दिला आहे; तसेंच सर्व्हे नंबर ५-३ या जमिनींत यशवंत यानें आपले विधवा भावजईस हयातीपावेतों अगर पुनर्विवाह करीपावेतों अन्नवस्त्रासाठीं कबजा दिला आहे, म्हणून वरील दोन्ही ठिकाणीं मारुती व यशवंतराव या दोघांची नांवें कोष्टक ८ यांत रेघेवर लिहिलीं पाहिजेत, नाहीं तर कर्ज फिटल्यानंतर अगर लक्ष्मीबाईचे मरणानंतर भलतींच माणसें मारुती व यशवंतराव अगर त्यांचे वारस यांना बाजूला सारून आपला हक्क सांगूं लागतील. म्हणून त्यांची नांवें अगर त्यांचेसारखेच हक्क असणारांची नांवें—मग त्यांचा प्रत्यक्ष कबजा जमिनीवर नसला तरी हरकत नाहीं—कोष्टक ८ मध्यें रेघेवर ठेविलीं पाहिजेत म्हणजे त्यांचे हक्काचें संरक्षण होईल.

रेघेखालील हक्क हे कोष्टक ६ यांतील हक्कानें प्राप्त होणारे हक्क असलेमुळें बहुधा कोष्टक ६ यांत हक्क नष्ट झाला [illegible] तेहि नष्ट होतात; याचीं उदाहरणें:—नजर गहाणदार (सर्व्हे नंबर ५/२, ६/१ वगैरे), कायम कुळाचीं सततचीं किंवा जास्त मुदतीचीं पोट-कुळें (यांसच कानडा जिल्ह्यांत पोट मुळगेणीदार म्हणतात; याचें उदाहरण सर्व्हे नंबर २० झाडावरील, स. नं. १ अ-३, पाण्याचा, विहिरीवरील अगर अशाच प्रकारचे जमिनीच्या तदंगभूत वस्तूवरील—पण प्रत्यक्ष सर्व जमिनीवरील नव्हे—हक्क धारण करणारे. जमिनीवर काढलेली तगाई (सर्व्हे नं. १५) या कर्जाचा निर्देश फक्त तगाई शब्दानेंच केला तरी बस्स आहे. कारण तगाईची रक्कम, हप्ते वगैरेची माहिती कुळकर्णी याचे दप्तरांतच असते. म्हणून एवढा एक शब्द—"तगाई"—लिहिला कीं जमिनीवर तगाईचा बोजा आहे या गोष्टीचें विस्मरण होणार नाहीं.

## गांवचा नमुना नंबर ६.

हक्कनोंदणीचें पत्रक ( ता. १-८-१९०८ पासून पुढें ).

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | शेरा व तपासणीबद्दल टांचण. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | टीप.—पाटलास लिहितां येत असेल तर त्यानें प्रत्येक नोंदीवर सही करावी. निदान ज्या नोंदी बरोबर असल्याबद्दल त्यास माहिती आहे त्या नोंदीवर त्यानें सही करावी. नोंदीबद्दलची जबाबदारी कुळकर्णी याचेवर आहे. | | |
| ४८ | ६ एप्रिल १९०८, रामचंद्र बळवंत देशपांडे, तारीख १५ मार्च १९०८ रोजीं मयत झाला, त्यास वारस, मुलगा, विठ्ठल रामचंद्र आहे, वारसाचे रजिष्टरप्रमाणें. | २—४<br>२—६<br>४—२<br>८<br>९—१<br>एकूण पांच. | ... |
| ४९ | १० मे १९०८, सर्जेराव यानें रामलाल गिरधरलाल मारवाडी यास बिनकबजे गहाण दिले, रुपये ५००, तारीख २ माहे मे १९०८ ( नों. ) | ५—२<br>६—१<br>१२<br>एकूण तीन. | सर्जेराव कबूल करितो.<br>तारीख २०-२-०९.<br>सही A B,<br>सरकल इ. |
| ५० | १० आगस्ट १९०८, मथू कुसा एप्रिल १९०८ मध्यें मयत झाला, त्याची मुलें, गेनू, बाळू व काळू, यांनीं सर्व्हे नंबर १ अ-४ यांतील वांटण्या करून घेतल्या ( तोंडी खबर व आकार फोड पत्रक ).<br>सर्व्हे नंबर. हिस्सा नंबर. एकर गुंठे.<br>१ अ ४ अ १—१<br>१ अ ४ ब १—०<br>१ अ ४ क १—०<br>यकीं आकार रुपये १-४. | १ अ-४ अ<br>१ अ-४ ब<br>१ अ-४ क<br>एकूण तीन | सर्वांस नोंद कबूल.<br>२०-२-०९.<br>सही<br>सरकल इन्स्पेक्टर. |
| ५१ | १५ आगस्ट १९०८, बाकीसाठीं खालसा होऊन पूर्वीचे मालकासच नवीन शर्तीवर दिली, मामलेदार यांचा हुकूम नंबर २१, तारीख २३ आगस्ट १९०८. | २ अ-१<br>२ अ-२<br>एकूण दोन | सर्व्हे नं. २ पैकीं उरलेल्या जमिनीस २ब नंबर दिला आहे, कारण सत्ताप्रकार बदलला आहे. |
| ५२ | १७ सप्टेंबर १९०८, मारुती कुशा कुंद यानें हरी रामचंद्र ढमढेरे यांस कबजेगहाण दिले, रुपये ५०, तारीख ५-९-१९०८. (नों.) | १ अ-३<br>एकूण एक | मारुती कबूल करितो.<br>२०-२-०९. स. इ. |
| ५३ | १४ नोव्हेंबर १९०८ ( मामलेदार यांचा हुकूम नं. २३५ ता. ५-१०-१९०८ ) प्रमाणें दिवाणी कोर्टाचे हुकूमनाम्यावरून विक्री केली त्यांत सर्व्हे नंबर १२ पैकीं ५ एकर २ गुंठे जमीन आकार रुपये १०-२ ची २०० रुपयेवर रामलाल गिरिधारीलाल मारवाडी यानें लिलांवांत घेतली, त्याचे दोन हिस्से झाले, १२-१ वर बिनकबजेगहाणाचा बोजा ( नोंद नंबर ४९ ) रद्द झाला. | १२-१<br>१२-२<br>एकूण दोन | नवीन हिस्सा पडला.<br>कुणकर्णी तपासलें.<br>तारीख २०-२-०९.<br>सरकल इन्स्पेक्टर. |
| ५४ | ९ जानेवारी १९०९, बळवंतराव यादवराव, डिसेंबर १९०८ मध्यें मयत झाला व त्यास वारस मुलगा नरसिंगराव आहे, वारसाचे रजिष्टरप्रमाणें. | ५-१<br>एकूण एक | ... |

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | शेरा व तपासणीबद्दल टांचण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ५५ | ९ जानेवारी १९०९, बळवंतरावाचा वारस गणपतराव. (६-२ वरील गोविंद हरी देशपांडे यांचें गहाण कायम ) | ६-२<br>६-४<br>एकूण दोन | ..... |
| ५६ | १० जानेवारी सन १९०९, विठ्ठल रामचंद्र यानें लक्ष्मण कुशाबा-कडून खरेदी घेतले, रुपये ५००, ता. २०-१२-०८ (नों.) | २ ब-३<br>एकूण एक | २ब-५ व २ब-३ एकत्र [illegible] लक्ष्मण कबूल, ता. २०-२-१९०९. स. [illegible] |
| ५७ | १०-२-०९, रामलाल गिरिधारीलाल मारवाडी यानें विठ्ठल रामचंद्र-कडून कबजेगहाण घेतले, रुपये १५०. (नों.) | ८<br>एकूण एक | विठ्ठल कबूल. दस्तै[illegible] सर्व्हे नंबर ८१ चु[illegible] लिहिला गेला आहे. तपासलें. ता. २-१२-[illegible] स. [illegible] |
| ५८ | १३-५-०९, रामलाल गिरिधारीलाल, एप्रिल १९०९ मध्यें मयत, वारस मुलगा, भोगीनाथ, बारसाचे रजिस्टरबरहुकूम. | ५-२<br>६-१<br>८<br>१२-२<br>१२-१<br>एकूण पांच | ..... |
| ५९ | २५-४-१९१०, दरवर्षी वतनदार मानाजी यांस राधाबाईनें २० रुपये भाडें द्यावें असा कलेक्टरसाहेब यांचा हुकूम, तारीख १ एप्रिल सन १९१० चा आहे ; परंतु कबजा तिचेचकडे तिचे गहाण रकमेची फेड होईपर्यंत राहावयाचा असून व तोंपर्यंत जमीन-महसूल तिनेंच द्यावयाचा आहे. | ३<br>एकूण एक | तपासलें. २-१२-१९१०. सरकल इन्स्पेक्टर. |
| ६० | तारीख २१ आक्टोबर १९२०, भोगीनाथ रामलाल यांस ४ एकर जमीन विठ्ठल रामचंद्र यानें नजर गहाण दिली. रु. १०० (नों.) | ९-१<br>एकूण एक | विठ्ठल कबूल. ता. २-१[illegible] स. [illegible] |
| ६१ | तारीख ८ नोव्हेंबर १९११, रेल्वे कंपनीनें सर्व्हे नंबर १-अ पैकीं १९ गुंठे जमीन, आकार रुपये २-१, ही संपादन केली. कमजास्ती पत्रकाप्रमाणें बाकी जमीन खालीं दिल्याप्रमाणें :— | | |
| | हिस्सा. — संपादन केलेली.<br>१ ५ ३९ ६ २ ० ४<br>२ ५ ३९ ६ १२ ० ३<br>३ २ ३५ ३ ३ ० ६<br>४-अ ० ३८ १ १ ० ३<br>४-ब ० ३८ ० १४ ० २<br>४-क ० ३९ ० १५ ० १<br>० १९ | १अ-१<br>१अ-२<br>१अ-३<br>१अ-४अ<br>१अ-४ब<br>१अ-४क | कमीजास्ती पत्रकाशीं [illegible] आहे. ता. १९-१-१[illegible] सरकल इ. |
| | आणि सर्व्हे नंबर २-ब पैकीं २-ब्चा ४ संबंध हिस्सा, ४ एकर २ गुंठे. | २-ब ४<br>एकूण सात | ..... |

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | शेरा व तपासणीबद्दल टांचण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ६२ | ता. १२ नोव्हेंबर १९११, तारीख १५ आक्टोबर सन १९११ इ. रोजीं हरी रामचंद्र ढमढेरे यांनीं पुंजा सखारामापासून रक्कम रुपये २५० खरेदी घेतला. (नों.) | १-अ एकूण एक | तपासले. एकत्र करण्यास हरकत नाहीं. ता. १५-१२-१९११. मामलेदार. |
| ६३ | व त्याच तारखेस भाऊ सखारामापासून रुपये ३०० यास खरेदी घेतला. (नों.) | १अ-२ एकूण एक | |
| ६४ | तारीख ३० नोव्हेंबर १९११, हरी रामचंद्र ढमढेरे, मयत, वारस मुलगा, शंकर, वारसाचे रजिष्टरबरहुकूम. | १अ-१ १अ-२ १अ-३ एकूण तीन | ..... |
| ६५ | तारीख १ डिसेंबर १९११, मानाजी आनंदराव यानें तारीख २० आक्टोबर १९११ रोजीं रक्कम रुपये ७०० चें करून दिलेलें खरेदीखत (नों.) भोगीनाथ रामलाल यानें हजर केलें परंतु कांहीं तंटा असल्यानें भोगीनाथ यास कबजा मिळाला नाहीं म्हणून कांहीं फरक करणेचा नाहीं. | ६-३ एकूण एक | भोगीनाथ कबूल. ता. १९-१-१९१२. सं. इ. |
| ६६ | तारीख २० डिसेंबर १९११, कलेक्टरसाहेब यांचे मंजुरी शिवाय गेनू रामापासून तुकाराम अंताजी यानें तारीख ११ आक्टोबर १९१० रोजीं ३०० रुपयांस विकतें घेतलें. (नों.) | २अ-२ एकूण एक | तक्रारी रजिष्टर नंबर १४. कुळकर्णी. |
| ६७ | तारीख ३१ डिसेंबर १९११, पुरानें वाहून गेल्यानें ३५ गुंठे, आकार रुपया १ ची जमीन कमी. | २अ २अ-२ एकूण दोन | तपासलें. ता. १९-१-१९१२. हा फेरफार गांवचा नमुना नं. ६ मध्यें सन १९११-१२ सालांत येण्यास पाहिजे होता; परंतु तो कुळकर्णी यांचे चुकीनें आला नाहीं. |
| ६८ | तारीख १० जानेवारी १९१२. तारीख १२ डिसेंबर १९११ इ. रोजीं गोपाळ गणेश, मयत, वारस मुलगा, संखूजी, शिवाय इतर समाईक धारण करणारे आहेत. | १६ एकूण एक | ..... |
| ६९ | तारीख १० जानेवारी १९१२. तारीख ३१ डिसेंबर १९११ रोजी भोगीनाथ रामलालपासून सर्जेराव भिवरीवें यानें गहाण सोडविलें. | ५ २ ६-१ १२-१ एकूण तीन | भोगीनाथ कबूल. ता. १९-१-१२. स. इ. |
| ७० | तारीख ३० जानेवारी १९१२. गहाणदार, मारुती कुसा, सप्टेंबर १९०९ त मयत झाला; त्याचा मुलगा, मथू, यानें तारीख १ जानेवारी सन १९१२ रोजीं शंकर हरी ढमढेरे याजपासून गहाण सोडविलें. | १अ-३ एकूण एक | रद्द झालेलें गहाणखत मथूनें हजर केलें. ता. २७ आगस्ट १९१२. स. इ. |
| ७१ | तारीख ४ फेब्रुवारी १९१२. तारीख १५ जानेवारी १९१२ इ. रोजीं सर्व्हे नंबर १२ चा १ पैकीं एक एकर भाताची जमीन, आकार रु २-२ ची, रक्कम रुपये १४५ यास भोगीनाथ रामलाल यानें सर्जेराव याजपासून १४५ रुपयांस खरेदी घेतली (नों.) आणि ती जमीन सर्व्हे नंबर १२-२ यांत सामील केली; याप्रमाणें ६ एकर २ गुंठे, आकार रुपये १२—४, झाले.. | १२-१ १२-२ एकूण दोन | सर्जेराव कबूल. ९ सप्टेंबर १९१२. मामलेदार. |

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | संबंध असलेले सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर. | शेरा व तपासणीबद्दल [illegible] |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ७२ | तारीख १४ मार्च सन १९१२, काळू मथू यानें राजीनामा दिला म्हणून मे. कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ९४, तारीख ९-३-१९३२ प्रमाणें (ज. म. को., क. ११७-ब प्रमाणें) शंकर हरी, मथू कुसा, गनू मथू, व बाळू मथू, यांजपासून ते अगर दुसरा कोणी कबुलायत देऊन घेईपर्यंत या हिश्शाची जमीनबाब घेणेची आहे. | १अ-४क एकूण एक | तपासलें. ता. ९-९-१९[illegible] मा[illegible] |
| ७३ | तारीख २०-३-१९१२, मे. कलेक्टसाहेब यांचा हुकूम नंबर ९५, तारीख २० माहे मार्च सन १९१२ प्रमाणें बालकृष्ण वासुदेव यास दरसाल १२५ रुपयांचे करारानें मिठागराचे कारखान्यासाठीं भाड्यानें दिली आहे. गांवचा न. नं. २ (२) [५] पहा. | २५अ एकूण एक | तपासलें. ता. ९-९-१[illegible] मा[illegible]दा |
| ७४ | तारीख ३१ मार्च सन १९१२, नरसिंह बळवंतराव यांस दरसाल ५० रुपये करारानें विटासाठीं माती खणण्याकरितां मे. कलेक्टर-साहेब यांचा हुकूम नंबर २१, तारीख ११ मार्च १९१२ इ. रोजीं दिली आहे. | २२अ एकूण एक | ता. २० आगस्ट १९[illegible] |
| ७५ | तारीख ३० जुलै १९१२. मे. कलेक्टरसाहेब यांचा हुकूम नंबर ४००, तारीख २० जुलै १९१० च्या हुकुमाप्रमाणें दरसाल रुपये ३-१२ भाडें घेऊन कांहीं कमी अटीनें विठ्ठल रामचंद्र यास भाड्यानें दिली आहे. | २८ एकूण एक | २० ऑगस्ट १९[illegible] |
| ७६ | तारीख १ आगष्ट १९१२, फेरमोजणी झाल्यावर सर्व जमिनीचे आकारांत फेरफार होतो व कांहीं जमिनीचे क्षेत्रांतहि नवीन आकारबंद तक्ता व सुधारलेले आकार फीडपत्रकाप्रमाणें (हिस्से-वार) बदल होतो. | ... | टीप.—फेरमोजणीच्या अनुक्रमणिका पुन[illegible] पाहिजे. घोंटाळा न म्हणून नमुन्याचें [illegible] णिकेंत या दुरुस्त[illegible] नाहीं. |
| ७७ | तारीख २० आगष्ट १९१२, नंबर ६-१ चें गहाण सर्जेराव भिवराव यानें सोडविलें नाहीं असा रिपोर्ट आला आहे व त्याबद्दल चुकीनें नोंद नं. ६९ केली होती. | ६-१ | सर्जेराव कबूल. ता. [illegible] १९१२. |
| ७८ | हिस्सेवार हिमायत (पाटस्थळ) पत्रक हें दाखल होऊन फाईल केलें त्यामधील हक्क जमिनीचे अनुक्रमणिकेंत दाखल केले आहेत व पत्रकांत असलेले अनुक्रम नंबरचा दाखला दिला आहे. | ४-१ ४-२ व आणखी दुसरे पुष्कळ | ..... |
| ७९ | तारीख १४-३-१९१३, वहिवाटी खटला नंबर २१-१९१३ यांतील मामलेदार यांच्या ठराबाप्रमाणें सर्व्हे नंबर ६-१ व ६-२ यांचेमधून गाड्या व जनावरें जाणेसाठीं रस्ता व पायरस्ता असणेंबद्दल स. नं. १८१ चे मालकास हक्क आहे. | ६-१ ६-२ १८१ एकूण तीन | ..... |

# गांवचा नमुना नंबर ७.

जमिनीची अनुक्रमणिका ( तारीख १-४-१९१३ रोजीं असले स्थितीप्रमाणें. )

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असल्यास). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कब्जेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क नोंदणीपत्र-कांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजे आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्क नोंदणीपत्र-कांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | |
| १-अ. भोईवाडा ... | ... | [१८–७] | [२१ ० ०] | ... | ... | ६१ | ... | ... |
| | | १७–२८ | [१८ १५ ० | ... | | | | |
| | १ | [६–३] | [६ ८ ०] | | [पुंजाजी सखाराम] ... | १८ | ... | ... |
| | | ५–३९ | ६ २ ० | ... | ... | ६१ | ... | ... |
| | | | | | [हरी रामचंद्र ढमढेरे]... | ६२ | ... | ... |
| | | | | | शंकर हरी ... | ६४ | १ अ-४ क पहा. | ७२ |
| | २ | [६–२] | [७ ० ०] | ... | [भाऊ सखाराम] ... | १९ | ... | ... |
| | | ५–३९ | ६ १२ ० | ... | ... | ६१ | ... | ... |
| | | | | | [हरी रामचंद्र ढमढेरे].. | ६३ | ... | ... |
| | | | | | शंकर हरी ... | ६४ | १ अ-४ क पहा. | ७२ |
| | ३ | [३–१] | [३ १२ ०] | ... | [मारुती कुसा कुंध] ... | २४ | विठ्ठल रामचंद्र यांची ४ आंब्यांचीं झाडें आहेत. | ३५ |
| | | | | | [हरी रामचंद्र ढमढेरे]... | ५२ | [मारुती कुसा कुंध गहाण देणार] १ अ-४ क पहा. | ५२ |
| | | २–३५ | ३ ३ ० | ... | ... | ६१ | ... | ... |
| | | | | | [शंकर हरी] ... | ६४ | ... | ७२ |
| | | | | | मथू मारुती ... | ७० | ... | ७० |
| | ४ | [३–१] | [३ १२ ०] | ... | [मथू कुसा] ... | २५ | ... | ... |
| | ४अ | [१–१] | [१ ४ ०] | ... | ... | ५० | १ अ-४ क पहा. | ७२ |
| | | ०–३८ | १ १ ० | ... | गेनू मथू ... | ६१ | ... | ... |
| | ४ब | [१–०] | [१ ४ ०] | ... | बाळू मथू ... | ५० | १ अ-४ क पहा. | ७२ |
| | | [०–३८] | ० १४ ० | ... | ... | ६१ | ... | ... |
| | ४क | [१–०] | [१ ४ ०] | ... | [काळू मथू] ... | ५० | ... | ... |
| | | ०–३९. | ० १५ ० | ... | ... | ६१ | ... | ... |
| | | | | | सरकारी पड ... | ७२ | शंकर हरी, मथू, गेनू, बाळू, आकार देण्यास पात्र आहेत, ज. म. का., क. ११७ ब पहा. | ७२ |
| १ब. बिनशेतकी, गिरणी. | ... | ०–२० | | २० ० ० | मानाजी आनंदराव शिंदे. | २४ | ... | ... |
| २अ. लोणी जमीन. | ... | [३४–१०] | [५२ ० ०] | ... | ... | ... | ... | ... |
| | | [१६–६] | [३२ ४ ०] | ... | ... | ५१ | ... | ... |
| | | १५–११ | ३१ ४ ० | ... | ... | ६७ | ... | ... |
| | १ | ८–३ | १६ २ ० | ... | रघू रामा माळी ... | २२ | नवीन शर्तीने ... | ५१ |
| | | [८–३] | [१६ २ ०] | ... | [गेनू रामा माळी] ... | २३ | नवीन शर्तीनें ... | ५१ |
| | | | | | तुकाराम भाताजी ... | ६६ | ... | ... |
| | २ | ७–८ | १५ २ ० | ... | ... | ६७ | ... | ... |
| २ब. ... | ... | [१८–४] | [१९ १२ ०] | ... | ... | ५१ | ... | ... |
| | | १४–२ | १० १० ० | ... | ... | ६१ | ... | ... |
| | ३ | ४–२ | ८ २ ० | ... | [लक्ष्मण कुशाबा] ... | ४१ | ... | ... |
| | | | | | विठ्ठल रामचंद्र ... | ५६ | ... | ... |
| | ४ | [४–२] | [९ २ ०] | ... | [रामचंद्र बळवंत] ... | ४२ | [लक्ष्मण कुशाबा शर्तीने विकणारा] | ४२ |
| | | | | | [विठ्ठल रामचंद्र] ... | ४८ | ... | ६१ |
| | | नाहीं | नाहीं | ... | सर्व जमीन रेल्वेकडे गेली | ६१ | ... | ... |
| | ५ | ५–० | १ ४ ० | ... | [लक्ष्मण कुशाबा] ... | ४१ | ... | ... |
| | | | | | विठ्ठल रामचंद्र ... | ५६ | ... | ... |
| | ६ | ५–० | १ ४ ० | ... | [रामचंद्र बळवंत] ... | ४२ | लक्ष्मण कुशाबा शर्तीने विकणारा. | ४२ |
| | | | | | [विठ्ठल रामचंद्र] ... | ४८ | ... | ... |

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असल्यास). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क-नोंदीपत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजे आणि हक्क धारण करणाराचे अथवा बोजा असणाराचें नांव. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | |
| ३. सरकार उपयोगी गांव नोकरी इनाम, तांबडा माळ. | ... | ६–६ | ७ ० ० | २ ० ० | राधाबाई कोम अमृतराव | १५ | मानाजी (वारचा वतनदार). |
| | | | | हिस्सेरसीनें (सर्व्हे नंबर ३, १२५, १३०, मि. रुपये २७). | | ५९ | आनंदराव व त्याचा चुलतभाऊ यशवंतराव गहाणदार परंतु खंड रुपये २० मानाजी घेतो. |
| ४. जात इनाम ... | ... | १९–१२ | १९ ० ० | ५ १५ ० (आपसांत वांटणी केली). | ... | ... | ... |
| | १ | १६–४ | १५ १३ ६ | ५ ५ ० | त्र्यंबक नारायण ... | १ | २ एकरावर हिमायत हक्क |
| | २ | ३–८ | ३ २ ६ | ० १५ ० | [रामचंद्र बळवंत देशपांडे] विठ्ठल रामचंद्र ... | २ ४८ | हिमायती नाहीं ... |
| ५. ... | ... | १–२ | १ ८ ० | ... | ... | ... | ... |
| | १ | ०–११ | ० ९ ० | ... | [बळवंतराव यादवराव]. | ३ | ... |
| | | | | | नरसिंगराव बळवंत ... | ५४ | ... |
| | २ | ०–१० | ० ९ ० | ... | सर्जेराव भिवराव ... | २७ | [रामलाल गिरधर मारवाडी बिनकबजे गहाणदार.] [भोगीनाथ रामलाल.] |
| | ३ | ०–२१ | ० ६ ० | ... | लक्ष्मीबाई कोम आनंदराव. | २९ | यशवंतराव ... |
| ६. दगडाचा नंबर... | ... | ११–४ पो. ख. ०–२५ | ७ ० ० | ... | ... | ... | ... |
| | १ | ०–१० | ० २ ० | ... | सजराव भिवराव ... | २७ | [रामलाल गिरधर मारवाडी बिनकबजे गहाणदार.] [भोगीनाथ रामलाल]. भोगीनाथ रामलाल . सर्व्हे नंबर १८१ यास जाणेचा रस्ता आहे. |
| | २ | ०–१० | ० २ ० | ... | [बळवंतराव यादवराव]. | ३ | सर्व्हे नंबर १८१ यास जाणेचा रस्ता आहे. |
| | | | | | गणपतराव बळवंत ... | ५५ | गोविंद हरी देशपांडे बिनकबजे गहाण घेणारा. |
| | ३ | १०–२४ | ६ १२ ० | ... | मानाजी आनंदराव ... | २८ | भोगीनाथ रामलाल खरेदीदार याचा ताबा नाहीं. |
| | ४ | पो. ख. ०–२५ | ... | ... | सर्जेराव भिवराव ०-८-० [बळवंत यादवराव] ... गणपतराव बळवंत ०-४-० मानाजी आनंदराव ०-४-० समाईक. | ३० ५५ | ... ... |

| [illegible]मीचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असल्यास). | पोट हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क-नोंदणीपत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजे आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्क-नोंदणीपत्रकांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | |
| ७. जंगली अस्वलाचा नंबर. | ... | १०–२० | ५ ८ ० | ... | मानाजी आनंदराव शिंदे. | ३२ | नवीन शर्तीनें ... | ३२ |
| ८. ... ... | ... | २०–० | १० ० ० | ... | [रामचंद्र बळवंत देशपांडे] | ११ | ... | ... |
| | | | | | [विठ्ठल रामचंद्र] ... | ४८ | ... | ... |
| | | | | | [रामलाल गिरधारीलाल मारवाडी]. | ५७ | विठ्ठल रामचंद्र गहाण देणार. | ५७ |
| | | | | | भोगीनाथ रामलाल ... | ५८ | ... | ... |
| ९. देसायाची गुहा. | ... | २४–३० पो. ख.०–१० | १६ ० ० | ... | ... | ... | ... | ... |
| | १ | १२–१६ पो. ख.०–४ | ८ ० ० | ... | [रामचंद्र बळवंत देशपांडे]. | १२ | पैकीं ४ एकर भोगीनाथ रामलाल याजकडे तारण गहाण. | ६० |
| | | | | | विठ्ठल रामचंद्र ... | ४८ | ... | ... |
| | २ | १२–१४ पो. ख. ०–६ | ८ ० ० | ... | रघुनाथ बळवंत देशपांडे. | १७ | ... | ... |
| १०. देवस्थान बहिरोबाची भातजमीन. | ... | १२–१७ | १८ १२ ० | [५ ० ०] भर आकार देण्याचा आहे. | नरशिंगराव बळवंतराव. | २१ | ... | ... |
| ११. कुळकर्णी वतन इनाम. | ... | २२–१० | ४५ ० ० | १५ ८ ० | नारायण कुळकर्णी ... | ६ | ... | ... |
| | १ | १२–१० | २५ ० ० | ... | गोविंद आबा लोणकर, मिराशी कूळ, ठरीव खंड, रु. ३०. | ६अ | ... | ... |
| | २ | १०–० | २० ० ० | ... | गुल्लाप्पा शिवलिंगप्पा, मिराशी कुळ, ठरीव खंड, रु. २५. | ६ब | ... | ... |
| १२. ... ... | ... | १०–५ | २० ४ ० | ... | ... | | ... | ... |
| | १ | [५–३] | [१० २ ०] | ... | सजराव भिवराव ... | ४४ | (रामलाल गिरधर मारवाडी बिनकबजे गहाण घेणारा) (भोगीनाथ रामलाल). | ४९ ५८ ६९ |
| | | ४–३ | ८ ० ० | ... | ... | ५३, ७१ | ... | ... |
| | २ | [५–२] | [१० २ ०] | ... | [रामलाल गिरधारीलाल मारवाडी]. | ५३ | ... | ... |
| | | ६–२ | १२ ४ ० | ... | भोगीनाथ रामलाल ... | ५८, ७१ | ... | ... |
| १३. रयत उपयोगी गांव नोकर, जोशी. | ... | २–४ | ३ ० ० | जुडी नाहीं ... | गणपतराव बळवंतराव. | १४ | ... | .. |
| १४. नोडगिरी बाग. | ... | १०–१५ | १२ ६ ० | ३ ८ ० | शिवराम शंकरभट ... | ४ | ... | ... |
| १५. बिनशेतकी ... | ... | ६–८ | ... | १२४ ० ० | नरशिंगराव बळवंत ... | १६ | तगाई रुपये ५०० | १६ |

| सर्व्हे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनीचें स्थानिक नांव (असल्यास). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमीनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क-नोंदणीपत्रकांतील नंबर. | इतर हक्क अर्थ[illegible] आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्क-नोंदणी[illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | |
| १६. ... ... | ... | २५–० | ६१ ८ ० | ... | शिवाजी बाळाजी, मानाजी बाळाजी, बापूजी बाळाजी, [गोपाळ गणेश,] सकुजी गोपाळ व सखाराम तुकाराम, समाईक. | २६<br>६८ | ...<br>... | ... |
| १७. नवी तरी ... | ... | १–३५ | ६ १३ ६ | ... | ... | ... | ... | ... |
| | १ | ०–३० | ३ २ ६ | ... | बाळकृष्ण वासुदेव ... | ५ | ... | ... |
| | पो. न. १–१ | ०–२० | ३ ० ० | ... | ... | ... | ... | ... |
| फाळणी नंबर ... | १–१, ६, ७, ८ | ०–१० | ० २ ६ | ... | ... | ... | ... | ... |
| | २ | १–५ | ३ ११ ० | ... | विठ्ठल रामचंद्र ... | ४३ | ... | ... |
| | पो. नं. १–२ | ०–३० | ३ ८ ० | ... | ... | ... | ... | ... |
| फाळणी नंबर ... | १–२ २, ३, ४, ५ | ०–१५ | ० ३ ० | ... | ... | ... | ... | ... |
| १८. गांवतलाव ... | ... | १०–२५ | ... | ... | सरकारी ... | ... | ... | ... |
| १९. खारी जमीन. | ... | ४–३२ | ६ ८ ० | ... | सरकारी पड .. | ३५ | ... | ... |
| २०. ... | ... | ६–३० | १० ० ० | ... | नारायण कुळकर्णी ... | १३ | ... | ... |
| | १ | ३–१० | ५ ० ० | ... | गणेश सुबराव, मुळगेणीदार. | ७ | पोट-मुळगेणीदार, चिन्नाप्पा दुर्गाप्पा, एकर १. | ... |
| | २ | ३–२० | ५ ० ० | ... | गोविंद विठोबा, मुळगेणीदार, रु. १०.<br>(फेरपाळीनें.) | ३१ | अमृता भोई, पोट-मुळगेणीदार, एकर १–२०, खंड रु. ५, बहादूर कासीम, पोट-मुळगेणीदार, २ एकराचा खंड रु. ७ देतो. | ... |
| २१. जात इनाम ... | ... | १५–२० | ३० ० ० | ९ ८ ० | १. मणीलाल हरींशंकर.<br>२. हिरालाल मोतीलाल.<br>३. चुनिलाल भाईलाल.<br>४. अंबालाल हिराशंकर. | २०<br>...<br>...<br>... | ...<br>...<br>...<br>... | ... |
| २२अ. ... ... | ... | ५–० | १५ ० ० | ...<br>५० ० ० | सरकारी पड ...<br>नरशिंग बळवंतराव ... | ...<br>७४ | ...<br>... | ... |
| २२ब. कुळकर्ण्याची [illegible]ळ, बिनशेतकी. | ... | २–२० | ... | ५० ० ० | नारायण कुळकर्णी ... | १३ | ... | ... |
| २३. फॉरेस्ट ... | ... | १५–० | ... | ... | फॉरेस्ट ... | ... | ... | ... |
| २४अ. गुरचरण ... | ... | १९–३० | १९ १२ ० | ... | मोफत चारणीकडे ... | ... | ... | ... |

| [illegible]नीचा [illegible]कार, जमिनीचें स्थानिक नांव (असल्यास). | पोट-हिस्सा नंबर. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमीनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क नोंदणीपत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजे आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्क नोंदणीपत्रकांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर. | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | |
| २४ब. शाळा ... | ... | ०–१० | ... | ... | डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड शाळा. | ४६ | ... | ... |
| २५अ. ... ... | ... | २५–० | [२५ ० ०] | ... | बाळकृष्ण वासुदेव ... | ५ | ... | ... |
| | | | | १२५ ० ० | ... | ७३ | ... | ... |
| २५ब. बिनआकारी. | ... | १००–० | ... | ... | ... | ... | ... | ... |
| खारी भात... | १ | २५–० | ... | ६ ४ ० | बाळकृष्ण वासुदेव ... | ३८ | ... | ... |
| खाजण ... | २ | ७५–० | ... | ... | सरकारी पड ... | ... | ... | ... |
| २६अ. इनाम, वर्ग ७. | ... | १–० | २० ० ० | २ ० ० | रेव्हरेन्ड जे. शिलीडी, मिशनहाऊस मॅनेजर. | ४७ | ... | ... |
| २६ब. धर्मशाळा इनाम, वर्ग ७. | ... | १–० | ... | ... | प्रेमचंद रायचंद ... | ४५ | ... | ... |
| २७. देसाई वतन, वर्ग ५. | ... | २४–२० पो. ख. ०–२० | ६० ० ० | ७ ८ ० | बाळकृष्ण वासुदेव ... | ९ | ... | ... |
| २८. ... ... | ... | १९–० | [३० ० ०] | ... | [सरकारी पड] ... | ... | ... | ... |
| | | | | ३ १२ ० | विठ्ठल रामचंद्र ... | ७५ | ... | ... |
| २९. इनाम, वर्ग १. | ... | १०–५ | २० ४ ० | ४ ८ ६ | सर्जेराव भिवराव ... | १० | ... | ... |
| | | | | | खंडू रघ ... | ४७अ | ... | ... |
| *गांवठाण जागा. | | ए. गुं. यार्ड. | | | | | | |
| १. ... ... | ... | ० ० ५० | ... | ० ८ ४ | नरशिंग बळवंतराव ... | ३३ | ... | ... |
| २. ... ... | ... | ० ० १०० | ... | १ ० ८ | नरशिंग बळवंतराव ... | ३६ | ... | ... |
| ३. ... ... | ... | ० ८ ३२ | ... | १० ६ ८ | मानाजी आनंदराव ... | ३७ | ... | ... |

* गांवठाण जमिनीचे सर्व्हे नंबर केले नसल्यामुळें त्यास हक्कनोंदणीचा कायदा लागू केलेला नाहीं, सरकार ठराव नंबर ११५८१ – १९१३, तरी पण गांवचा नमुना नंबर ८-अ लिहिणेस सोपें जावें म्हणून या नोंदी येथें केल्या आहेत. फेरफाराबद्दल खबर न दिल्यास फी घेतां येणार नाहीं. तसेंच दाखले, नकला, हजर करण्याचा कायदा त्यांस लागू नाहीं.

## गांवचा नमुना नंबर ६.

### फेरफाराचा रोजनामा.

२४. येथपर्यंत आपण मूळ पत्रक कसें तयार करावें व जुने पत्रकावरून पहिली अनुक्रमणिका कसकशी करावी तें सांगितलें. तेथून पुढें त्यानंतर होणारे फेरफार नोंदून हक्कांचें पत्रक अगदीं चालू तारखेपर्यंत कसें तयार व त्याबद्दलच्या माहितीकडे वळूं. कोणत्याहि हक्कांत बदल झाल्यास त्यास फेरफार म्हणावें. अनुक्रमणिकेच्या कोणत्या कोष्टकांत बदल होऊं शकेल. तो असा—

कोष्टक १.—सरकारच्या हुकुमानें किंवा कलेक्टरसाहेब यांच्याशीं नवीन करार केल्यामुळें त्यांचे हुकुमानें सत्ता प्रकारांतील फेरफार. त्याबद्दल कुळकर्णी यांस लेखी हुकूम दिले जातात.

२५. कोष्टक २.—नवीन हिस्से पडतात अगर हल्लीचे हिस्से एकत्र होतात. कुळकर्णी यानें हिस्से एकत्र करणें मात्र त्यानें असें डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टरसाहेब यांजकडेस ताबडतोब कळवावें. तसेंच कुळकर्णी यास नवीन हिस्से पाडी मोजण्यास हरकत नाहीं. विशेषत: जर त्यास मोजणीचें थोडेंसें ज्ञान असेल तर तें काम त्यानें अवश्य करावें; पण नवीन हिश्याचें क्षेत्र व आकार डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर, लँड रेकार्डस, यांचेकडून आकार फोडपत्रक येऊन कायम होई बरोबर आहेत असें समजूं नये.

२६. कोष्टक ३, ४, ५.—कोष्टकें १ व २ यांत फेरफार झाला अगर साऱ्याची फेरतपासणी झाली तर, अगर सरकार दुसऱ्या कांहीं कृत्यामुळें क्षेत्र, आकार व जुडी यांत फेरफार होतील. धारण करणाराचें आपसांत होणारे करारामुळें किंवा आपसांतील व्यवहारामुळें या कोष्टकांत मुळींच फरक होऊं शकत नाहीं; यामुळें या कोष्टकांतील फेरफार नेहमींच मामलेदाराकडून अगर मामलेदारामार्फत अगर डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टरकडून येणारे हुकुमानेंच होणार आहेत. यावरून लक्ष येईल कीं जमीन धारण करणाराचे नांवांत जरी कांहीं फरक झाला नाहीं तरी जमिनींत कांहीं बदल झाल्यानें अगर कोष्टकांतील हक्कसंबंधांत फरक झाल्यानें त्याचे हक्कांत बदल होऊं शकेल; असले सर्व फरक व बदल हक्कांत होणारे फेरफारच होत.

२७. कोष्टक ६.—कबजांत होणारे प्रत्येक बदलामुळें या कोष्टकांत फेरफार होतो. त्याचप्रमाणें जमीन सरकारास केल्यानें, तिचा राजिनामा दिल्यानें, वाटपामुळें आणि सर्व जमीन किंवा तिचा कांहीं भाग सरकारनें संपादित करून दुसरे कोणास दिल्यानें, हे फेरफार होतात. त्यांतले त्यांत फेरफाराचीं मुख्य कारणें म्हणजे वारसा, खरेदी, विक्री, ताबेगहाण हींच होत. एकत्र कुटुंबाबद्दल गांवचा नमुना नंबर ७ यांतील कोष्टक ६ संबंधीं खुलासा, पॅरा १५ धारण करणारानें आपले जमिनीपैकीं कांहीं थोड्याशा जमिनीवरील हक्क तबदील केला असेल तर त्यामुळें त्याचे बा राहणारे जमिनीचे हक्कास बाध न आणतां फक्त तेवढ्यापुरता नवीन हिस्साच पाडून दाखल करावा व बिनतबदील तुकड्यास अर्थातच त्याचें नांव कायम राहील, पॅरिग्राफ १७, पान ५८, ५९ पहा.

२८. कोष्टक ७.—पूर्वी दाखल केलेला फेरफार चुकीचा असल्याचें आढळून आलें अगर अनुक्रमणिकेंत केलेले फेरफार योग्य असून त्याचें फेरफाराच्या पत्रकांत दिलेलें कारण चुकीचें असेल तर नवीन बरोबर लिहिलेल्या नोंदीचा अनुक्रम नंबर कोष्टक ७ अगर ९ यांत दाखल करावा. कोष्टक ७ अगर ९ यांत दुरुस्ती कधींच करावयाची नाहीं, तर नवीन नोंदीचा अनुक्रम नंबर दाखल करावा. अशा पद्धतीनें आपणांस समजून येईल कीं, अनुक्रमणिकेंत ग्रंथित केलेले स्थिति ही कोष्टक ७ आणि ९ यांत दाखल केलेल्या गांवच्या नमुना नंबर ६ तील नोंदीनें उत्पन्न झाली आहे.

२९. गांवचा नमुना नंबर ७ यासच अनुक्रमणिका म्हणण्याचें कारण हें कीं: (डचा वारस म्हणून बचें नांव दाखल झालें, वीस वर्षांपूर्वी पचे नांवावर असलेली जमीन मकडे कशी आली?). अशा प्रकारचे कसलेहि प्रश्न झाले तर नमुना नंबर ७ यांतील कोष्टक ७ व ९ वरून नमुना नंबर ६ मधील कोणच्या नोंदीनें हे फेरफार झाले हें कळून येतें; व तक्रारीरजिष्टरांतील अगर वारसाचे रजिष्टरांतील कोणच्या गोष्टीमुळें अगर दुसऱ्या कोणत्या आधारावर ही नोंद केली आहे व ती तपासून कोणी मंजूर केली हे नमुना नंबर ६ वरून समजेल.

३०. कोष्टक ८.—या कोष्टकांत देखील मोबदल्यामुळें, वारसामुळें व नवीन होणारे सर्व प्रकारच्या कायमच्या चालू नोंदींत फेरफार होऊं शकेल किंवा पूर्वी मुळींच नोंद नसले ठिकाणीं नवीन नोंद करावी लागेल; त्याप्रमाणें सरकार हुकुमावरूनहि या कोष्टकांत असलेले हक्कांत अगर हक्क धारण करणाराचे नांवांत फेरफार होऊं शकेल. उदाहरणार्थ 'अ' नें आपली जमीन 'ब' स ताबेगहाण दिली तर त्यामुळें अचें नांव कोष्टक ६ तून कोष्टक ८ मध्यें रेघेचेवर व बचें नांव कोष्टक ६ मध्यें येईल. जेव्हां अ आपली जमीन सोडवून घेतो अगर कर्ज देऊन टाकतो तेव्हां त्यांचें पुन्हां कोष्टक ६ मध्यें जाईल व पुन्हां कोष्टक ८ कोरें राहील. जेव्हां मूळची नोंद नाहींशी होऊन त्या ठिकाणीं नवीन नोंद करणेंची जरूर नसते त्या वेळीं रद्द झालेल्या जुन्या नोंदीवर काट मारला (खरडून नाहींशी करूं नये) म्हणजे पुढें जास्त तजवीज करण्याची जरूरी नाहीं.

३१. अनुक्रमणिकेमध्यें दोन प्रकारचे बदल असे आहेत कीं, त्यामुळें फेरफार होत नाहींत व ते कुळकर्णी यानें स्वतःचेच जबाबदारीवर कोणतेहि वेळीं करावेत व त्याबद्दल तपासणी करणेची जरूर नाहीं किंवा जमीन इनाम असली तरी रिपोर्ट करण्याची मुळींच जरूर नाहीं. हे फरक थेट गांवचा नमुना नंबर ७ यांत दुरुस्ती करून ( प्रकार अ ) अगर गांवचा नमुना नंबर ६ मधल्या पूर्वीच्या नोंदीत अधिक मजकूर लिहून ( प्रकार ब ) करावेत.

प्रकार अ.—" अण्णाजी अज्ञान, पालक आत्या क्ष. य. " अशा नोंदींत जेव्हां अण्णाजी सज्ञान होतो ( वयानें १८ वर्षांचा ) त्या वेळीं अधोरेखांकित शब्द ( गांवचा नमुना नंबर ७ ) अनुक्रमणिकेंतच खोडावेत व खोडले ठिकाणीं कुळकर्णी यानें तारीख घालून छोटी सही करावी. या फरकाबद्दल तपासणी करण्याची अगर दाखला देणेची मुळींच जरूरी नाहीं. कारण या फरकामुळें कोणत्याहि हक्कास कांहीं बाध येत नाहीं.

प्रकार ब.—जेव्हां तोंडी झालेला करार लेखी दस्तऐवजांत ग्रथित होतो किंवा बिनदस्तऐवजानें प्रत्यक्ष तबदील करून दिलेल्या जमिनीसंबंधीं मागाहून लेखी दस्तऐवज होतात ( पारिग्राफ ३६-अ पहा ) त्यावेळीं पूर्वीचे हक्कांत फेरफार होत नसून त्या हक्कास दुजोरा येतो. गांवचा नमुना नंबर ६ आणि कदाचित् ७ मध्यें सुद्धां तोंडी व्यवहाराची अगोदर नोंद केलेली असल्यामुळें, त्या नोंदींत कुळकर्णी यानें फक्त " पहा नों. दस्तैवज तारीख " एवढीं अक्षरें नमुना नंबर ६ मध्यें दाखल करावीं व तसें केल्याचा शेरा नोंदणी अंमलदाराकडून येणारे पत्रकावर करावा. हीं नोंदीला जोडलेली पुस्ती म्हणजे वास्तविक फेरफार नव्हे : मात्र दस्तैवजानें वेगळा व्यवहार ठरत असेल तर ( उदाहरणार्थ, ते पूर्ण खरेदीखत नसून फक्त गहाणस्वरूपी खरेदीखत असेल किंवा अशाच प्रकारचा फरक ) ते फेरफार समजून नवी नोंद करावी व जुनी रद्द करावी.

३२. कोर्टाकडील जप्ती ( सरकार ठराव नंबर ८७२३-१२ ) किंवा जमीनबाब अगर तगाईसाठीं जमीन खालसा करण्याच्या नोटिसा यामुळें प्रत्यक्ष कबजांत फरक होईपर्यंत ते फेरफार नाहींत. तथापि पुढें मागें नजरचुका अगर लबाडी होऊं नये म्हणून त्याबद्दल पेन्सिलीनें गांवचा नमुना नंबर ७ ( संयुक्त ) यांत 'इतर हक्क' या सदराखालीं त्याबद्दल लिहून ठेविलें पाहिजेत. सन १९२५ चा मुंबईचा सहकारी मंडळ्यांबाबत आक्ट याच्या ४९ व्या कानूअन्वयें काढलेले जाहीरनामे, जोडनमुना ७-१२ [ किंवा जेथें जोडनमुना अजून सुरू झालेला नसेल तेथें गांवचा नमुना नंबर ७ ( जुना ) ] यांच्या " इतर हक्क " या कोष्टकांत खालीं दाखविल्याप्रमाणें नोंद करून दाखल करण्यांत यावेत :—

" सन १९२५ चा मुंबईचा सहकारी मंडळ्यांबाबत आक्ट याच्या कलम ५९ अन्वयें दाखला नं.
तारीख "

कर्जाच्या तडजोडीबाबत बोर्डाकडून सूचना मिळाल्याबरोबर, कर्जदार शेतकऱ्याच्या मालकीचे जे सर्व्हे नंबर व पोट विभाग असतील व जे सन १९३९ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याविषयीं आक्ट या अन्वयें केलेल्या निवाड्यांत समाविष्ट करण्यांत आलेले असतील असे सर्व्हे नंबर व पोट विभाग या समोर " इतर हक्क " या नोंदीखालीं " कर्जदार शेतकरी " हे शब्द शाईनें लिहिले पाहिजेत. हे शब्द जादा दाखला केल्यानें त्याचा अर्थ असा होईल कीं, सरकारच्या अगाऊ मंजुरीनें असेल ते खेरीजकरून ती जमीन दुमाला न करतां येण्याजोगी असेल.

३३. इनामजमिनींत होणारे फेरफाराबद्दल निराळेच भागांत अधिक खुलासेवार माहिती दिली आहे. ( भाग ४ ) त्या फेरफाराबद्दल विशेष प्रकारची तजवीज करणेची असते. या बाबतींत कुळकर्ण्याला वर कळविण्यापलीकडे फारसें कांहीं करावें लागत नाहीं.

३४. नमुना नंबर ७ यांत दाखल केलेले हक्कांत झालेले फेरफार ( थोडे मुदतीचे कूळबाबीचे हक्क सोडून, पान ९४ पहा ) व मुद्दाम कळविल्यावरून किंवा स्वतःचे चौकशीवरून कुळकर्ण्याचे नजरेस त्या हक्कासंबंधानें जे दावे येतील ते सर्व त्यानें फेरफाराचे रजिष्टरांत ताबडतोब दाखल केले पाहिजे. जरी त्यास नुसती उडत उडत बातमी मिळाली तरी त्यानें त्याबद्दल बाजवी चौकशी केली पाहिजे. त्यानें खालील व्यवहारासंबंधानें माहिती मिळविली पाहिजे :—

(अ) नोंदणी अमलदारांनीं नोंदलेले व्यवहार.

(ब) वारसासंबंधीं बाबी.

(क) बिननोंदलेले दस्तऐवजांनीं किंवा तोंडी करारानें झालेले सर्व व्यवहार—यांतच गहाण सोडविले व्यवहाराचा व राजिनामे वगैरे यांचा समावेश होतो.

(ड) वरिष्ठाचे हुकुमावरून झालेले व्यवहार, उदाहरणार्थ, दिवाणी कोर्टाच्या व कलेक्टरच्या ( त्याचे हाताखालच्या अमलदाराच्या मार्फत ) हुकुमावरून झालेले व्यवहार.

नोंदलेले व्यवहार.—अ नोंदणी कामगार याचेकडे नोंदलेले दस्तऐवजांनीं दर महिन्यांत जे जे व्यवहार होतील ते सर्व ज्यांत लिहिले आहेत असें एक पत्रक नोंदणीदाराकडून मामलेदार यांचे मार्फत कुळकर्ण्यांत दरसाल मिळेल. हें पत्रक मिळाल्याबरोबर त्यानें तपशीलवार सांगितल्याप्रमाणें, नमुना नंबर ६ यांत ( कूळ वहिवाटीचे हक्क खेरीजकरून )

जरूर त्या नोंदी कराव्या व त्या पत्रकाच्या शेवटच्या कोष्टकांत नमुना नंबर ६ मधल्या त्या त्या नोंदीचा अनुक्रम दाखल करावा. दस्तऐवज नोंदले म्हणजे हक्क तबदील झाल्याबद्दल द्यावयाची नोटीस त्या दस्तऐवजांतील पक्षकारांना दिली असें समजावें. हक्क संपादन केला असून ज. म. का. कलम १३५-क प्रमाणें तीन महिन्यांचे आंत द्यावी लागणारी खबर न दिल्याचें या नोंदलेल्या दस्तऐवजावरून समजून आल्यामुळें जे कोणी फी घेणेस पात्र झाले असतील त्यांची नोंद फीचे रजिष्टरांत करावी म्हणजे कसूरीबद्दल त्यांचेवर फी बसवितां येईल.

३५. वारसासंबंधी बाबी.—या बाबी महत्त्वाच्या असल्यामुळें त्यांच्यासंबंधानें काम चालविण्यास विशेष रीतीची आवश्यकता आहे. ती रीत खालीं दिली आहे :—

(१) मयत झालेले कबजेदार व इतर हक्कदार व त्यांचे वारस यांचें पत्रक दरएक गांवीं खालीं लिहिलेल्या नमुन्याप्रमाणें ठेवावें :—

| अनुक्रम नंबर. | मयत कबजेदाराचें अगर हक्कदाराचें नांव. | मरणाची तारीख अगर अजमासें तारीख. | गां. न. न. ८ यांतील जुना खाते नंबर (अथवा गां. न. ७ पैकीं को ८ मधील बाबी). | कबजा असलेले वारस अगर वारसांचीं नांवें. | कोणाचें नांव दाखल करावें याबद्दल मामलेदारसाहेब यांचा हुकूम. | या हुकुमावरून नमुना नंबर ६ यांत नोंद केली तिचा नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

[दत्तकपत्राबद्दल (ज्या थोड्या प्रसंगीं तें स्वसंपादित मिळकतीचें फरोक्तखतहि असतें असें थोडे अपवाद खेरीजकरून) नोंदणी अंमलदाराकडून माहिती देण्यांत येणार नाहीं. दत्तकपत्र झाल्याबरोबरच कधींकधीं (जसें, हिंदू विधवेनें घेतला असेल तेव्हां) ताबडतोब स्थानापन्न वारस म्हणून दत्तकास हक्क येतो. कधींकधीं दत्तक घेणाऱ्याचे मरणानंतर असे हक्क प्राप्त होतात. सबब ज्या वेळीं दत्तकास प्रत्यक्ष कबजा मिळतो, त्या वेळीं त्यानें इतर वारसाचे प्रमाणें कुळकर्णी यास माहिती दिली पाहिजे.]

(२) दर महिन्यास कुळकर्णी यानें गांवचा नमुना नंबर १४—जननमरणाच्या नोंदीचे रजिस्टर तपासावें. आणि तें (पान ६५ वरील) नांवाचे अनुक्रमणिकेशीं ताडून पाहतांना अगर इतर रीतीनें जेव्हां त्यास समजेल कीं, कोणी कबजेदार अगर अज्ञान कबजेदाराचा पालन करणार अगर नमुना नंबर ७ चें कोष्टक ८ यांतील इतर हक्कदार मेला आहे, तर त्यानें पाटलाचे मदतीनें ताबडतोब चौकशी करून मयताची जमीन किंवा अज्ञानाचे इस्टेटीची वहिवाट त्याचे पश्चात् कोणाचे ताब्यांत गेली आहे, मयतानें धारण केले जमिनीचा प्रत्यक्ष कबजा कोणाचा आहे, व नमुना नंबर ७, कोष्टक ८ यांतील हक्कास कोण वारस झाला आहे हें शोधून काढावें. वारसांनीं हक्क संपादन केल्यापासून तीन महिन्यांचे आंत खबर देण्यास चुकल्यास १३५-फ प्रमाणें होणारा दंड त्यांना द्यावाच लागेल.

(२-अ) हिंदु स्त्रियांच्या मिळकती वरील हक्काबाबत आक्ट (सन १९३७ चा हिंदुस्थानचा आक्ट नंबर १८ वा) आणि सन १९३८ चा (सदरहू आक्ट) सुधारण्याबाबत आक्ट, हे दोन्ही आक्ट गव्हर्नरांच्या प्रांतांतील शेत-जमिनींना लागू नाहींत. सदरहू आक्ट आणि सदरहू सुधारणा ह्या मुंबई प्रांताला लागू करतांना त्यामुळें हिंदु विधवांच्या शेतकीखेरीज इतर मिळकतीबाबतच्या हक्कांनाच फक्त लागू आहेत. अशा मिळकती-वरील हक्क जमीनमहसुलाचा कायदा यांचीं कलमें ९५ व १३१ यांअन्वयें सर्व्हे केलेल्या शहरांत आणि गांवांतच फक्त नोंदण्यांत असल्यामुळें अशा भागांतील हक्कपत्रकें सुस्थितींत ठेवण्याचें काम स्वाधीन असणाऱ्या मुलकी अंमलदार यानें सन १९३७ चा हिंदु स्त्रियांच्या मालमिळकतीवरील हक्काबाबत आक्ट आणि सन १९३८ ची (त्यांतील) सुधारणा यांच्या ठरावांची माहिती करून घेतली पाहिजे आणि या आक्टानें हिंदु विधवांना मिळालेले हक्क प्रसंग येईल ते ते वेळीं योग्य रीतीनें नोंदण्यांत येत आहेत या गोष्टीकडे लक्ष्य दिलें पाहिजे.

टीप.—इनाम अगर वतन जमिनी धारण करणारे कबजेदार मयत झाल्यास त्यांचे वारसांची नांवें पाहून काढणें हें सरकारचें काम नाहीं. त्यांनीं होऊनच पुढें आलें पाहिजे व जर ते पुढें येऊन माहिती कळविणार नाहींत, तर इनाम खालसा होण्यास पात्र होतें, परंतु तें बेवारस अगर बिनधनी म्हणून समजणेंचें नाहीं.

(३) मिळकतीचे निरनिराळे भाग निरनिराळे इसमाचे ताब्यांत गेले असतील तर त्या सर्वांचीं नांवें कोष्टक ६ यांत लिहावी. व गांवचा नमुना नंबर ६ यांत प्रत्येक इसम कोणकोणते भाग धारण करितो तें दाखवावें. जर एखादे सर्व्हे नंबरांत अगर हिश्शांत आणखी विभाग पडले तर त्या विभागास ७-अ, ७-ब म्हणावें, व आकारफोडपत्रक येईपर्यंत त्यांतील हिश्शांचें क्षेत्र व आकार लिहूं नये. तोपर्यंत कुळकर्णी यानें प्रत्येकाकडील वसूल त्याच्या संमतीनें अगर तारतम्य पाहून करावा.

(४) तक्रार नसेल तेव्हां वरिष्ठ अमलदाराचा हुकूम घेतल्याशिवाय या वारसपत्रकांत (कोष्टक ६) व गांवचा नमुना नंबर ६ यांत नोंद करण्याचा अधिकार कुळकर्णी यास आहे. मामलेदार त्यावर सह्या करतील.

(५) मयताच्या जमिनी प्रत्यक्ष कोणाचे कबज्यांत व भोगवट्यांत आहेत याविषयीं शंका असेल किंवा एखादा वाद असेल व दोन किंवा अधिक इसम मिळकत आपले कबजांत आहे असा हक्क सांगत असतील तर कुळकर्ण्यानें या पत्रकांत दोन्हीं हक्कदारांचीं नांवें लिहून नोंद करावी, असे प्रसंगीं मामलेदार यानें गांवीं जाऊन पक्षकारा-समक्ष स्वतः चौकशी करून निकाल द्यावा व कोष्टक ६ यांत लिहिलेले हुकुमास अनुसरून नमुना नंबर ६ यांत नोंद करून घ्यावी. वारसाचें रजिष्टर हें वारसामुळें उत्पन्न होणाऱ्या तक्रारींचा निकाल देण्याचें रजिस्टर आहे म्हणून असे प्रसंगीं तक्रारीरजिस्टरचा उपयोग करीत जाऊं नये. कोणी विचारलें कीं, जर वारसासंबंधीं तक्रार उत्पन्न झाली तर ती या वारसाचे बुकांत नोंदावी, कीं तक्रारीरजिष्टरीं नोंदावी? तर त्याचे उत्तर असें आहे कीं, या रजिष्टरांत नोंदावी, कारण सर्व वारसासंबंधींच्या गोष्टीकरितांच हें रजिष्टर मुद्दाम ठेविलें आहे, रेघेवर कोष्टक ८ यांत जीं नांवें येतात, उदाहरणार्थ (उत्तराधिकारी) त्यांस कबजांचें तत्त्व लागू पडणार नाहीं असें प्रसंगीं कुळकर्णी यास संशय असेल तर त्यानें मामलेदार यांचा हुकूम होईपर्यंत वाट पहाणेंच इष्ट आहे.

(६) अविभक्त कुटुंबांतील व्यवस्थापक मयत झाला तर त्याचे जागीं त्याचे स्वतःचा वारस येत नाहीं, परंतु त्याचे जागीं अविभक्त कुटुंबांतील दुसरा मयताच्या खालोखाल वडील असणारा पुरुष वारस म्हणून येतो (सरकार ठराव नंबर ६३५३-१२ पहा.)

३६. बिननोंदलेले दस्तैवज व तोंडी कबुलायती.—(अ) नोंदलेल्या दस्तैवजाप्रमाणें या व्यवहाराची पद्धतशीर खबर मिळत नाहीं; पण हक्क संपादन करणारानें हरएक बाबतींत हक्क संपादन झाल्यातारखेपासून तीन महिन्यांचे आंत त्याबद्दल खबर दिली पाहिजे, असे कायद्याप्रमाणे त्याच्यावर बंधन आहे. अशी तोंडी किंवा लेखी माहिती मिळतांच कुळकर्णी यानें सब्-रजिष्टारकडील उतारा मिळाल्यावर ज्याप्रमाणें काम चालवावयाचें त्याप्रमाणें काम चालविलें पाहिजे, म्हणजे त्यानें मिळालेल्या माहितीचा सारांश फेरफाराचे रजिष्टरांत लिहिला पाहिजे, व संबंध असलेले पक्षकारांचे माहितीसाठीं व त्यांच्या तक्रारी असल्यास त्या त्यांनीं एक महिन्यांत सादर कराव्या म्हणून गांवांतील नोटिशीच्या बोर्डावर नोंदीची नक्कल लावून प्रसिद्ध केली पाहिजे व तक्रारीरजिष्टरांत तक्रारी व नियमबाह्य गोष्टी नोंदल्या पाहिजेत.

मिळकत देण्याघेण्यासंबंधीच्या कायद्याच्या ५४, ५९, १००, १२३ या कलमाअन्वयें १०० रुपये व त्यापेक्षां जास्त किंमतीची खरेदी व गहाणखतें व एक वर्षापेक्षां जास्त मुदतीच्या कबुलायती व स्थावर मिळकतीचीं बक्षीसपत्रें याबद्दल लेखी दस्तैवज झालेच पाहिजेत व म्हणून ते (सन १९०८ चा कायदा १६, कलमें ४८, ४९) याखालीं नोंदलेहि पाहिजेत; असें असून मुद्दां पक्षकार जोखीम शिरावर घेऊन तोंडी व्यवहारच सुरू ठेवितील तर (मुंबई लॉ रिपोर्ट, व्हा. XVII, पान ४९, व सरकार ठराव नंबर ५२-१७) यांत सांगितल्याप्रमाणें नोंदीचे खरेपणाबद्दल अनुमान काढलें जाईल. याशिवाय इतर सर्व तोंडी करारानें झालेले व्यवहार जर त्याबरोबर प्रत्यक्ष कबजा देऊन झाले असतील तर, तसेंच वारस, हक्क वाटण्या, वगैरेहि सर्व कायदेशीर आहेत, व यासंबंधाचे हक्क नोंदणीपत्रकांतील सहीशिक्क्यानिशीं दिलेले दाखले, अगर नकला, पुराव्याच्या कायद्याचें कलम ६४ खालीं मागतां येईल अशा दुसऱ्या दस्तैवजी पुराव्याच्या अभावीं चांगला पुरावा म्हणून समजला जाईल. याप्रमाणें तोंडी व्यवहाराबद्दल एकदां नोंद झाल्यानंतर जर त्याच व्यवहाराबद्दल पुढें दस्तैवज जाहला तर त्यामुळें फेरफार झाला असें समजण्याचें कारण नाहीं: मात्र त्यामुळें पूर्वी नोंदलेल्या हक्कांत बदल झाला नसला म्हणजे झालें (पान ७१, प्यारा ३१ पहा).

(ब) पक्षकारांनीं हक्काची खबर दिली नाहीं परंतु हक्काची देवघेव झाली आहे असें मानण्यास सबळ कारण आहे असें कुळकर्णी यास वाटल्यास, त्यानें पूर्ण चौकशी करून सदरहू व्यवहाराची त्याला जी खरी हकीकत आहे असें वाटत असेल ती त्यानें फेरफाराचे रजिष्टरांत दाखल करून त्या नोंदीची एक नक्कल गांवच्या नोटीसबोर्डावर लाविली पाहिजे. वरील व्यवहारसंबंधीं बिनचूक माहिती कुळकर्णी यास मिळावी म्हणून त्याचे माहितीप्रमाणें हितसंबंध असलेल्या सर्व लोकांना बरोबर माहिती देण्यास भाग पाडण्यास किंवा जरूर ते दस्तऐवज त्याकडे हजर करण्यास लावण्याचा अधिकार कुळकर्णी यास दिला आहे. दस्तैवज कुळकर्ण्यापुढें हजर केल्यावर त्यानें ते ताबडतोब परत न केले तर याबद्दल त्यानें पावती दिली पाहिजे व दस्तैवजावर ते आल्याच्या व परत दिल्याच्या तारखा दाखल केल्या पाहिजेत. कोणताहि तपास चालू असतां गांवच्या नमुना नंबर ६ किंवा ७ यांत चुका आहेत असें दिसून आल्यास त्याजबद्दलची व्यवस्था पान ७०, पॅरा २८, यांत सांगितल्याप्रमाणें करावी.

(क) जमीन म. का. क. १३९-क प्रमाणें द्यावी लागणारी खबर (कुळांच्या हक्कांसंबंधींची सुद्धां धरून पहा) देण्यास चुकल्यामुळें फी बसविण्यासंबंधीं पत्रव्यवहार न चालवितां गांवाला दिलेल्या भेटीच्या वेळीं जाग्यावरच तेथें हुकूम देण्यास मामलेदार (अगर प्रांत किंवा कलेक्टर) यांना सोईस्कर व्हावें म्हणून कुळकर्णी यानें एक रजिस्टर खालीं दिले नमुन्याप्रमाणें ठेविलें पाहिजे. फारकरून वर्षास कागदाचे एक पानाहून जास्त कागद लागणार नाहींत (पान ६९ वरील टीप पहा):—

| नमुना नंबर ६ यांतील अनुक्रम नंबर. | हक्क संपादन करणार अगर दस्तऐवज धारण करणार त्याचें नांव. | फी वसूल करण्यासंबंधीं मामलेदार यांचे हुकूम. | पोंचल्याचा नंबर व तारीख. |
|---|---|---|---|
| | गांवचा नमुना नंबर ६ यांत तारखेबद्दल व माहिती देण्यास कां वेळ झाला वगैरेबद्दलचा सर्व खुलासा आढळून येईल म्हणून त्याबद्दलची हकीकत पुन्हां येथें दिली नाहीं. | | |

गांवचा नमुना नंबर ६ यांत एकादी नोंद केली किंवा अशा नोंदीबद्दल तक्रार उत्पन्न झाली आणि कायद्यानें ठरलेले मुदतींत एकादा इसम माहिती देण्यास चुकला आहे असें कुळकर्णी यास आढळून आलें तर त्यानें नमुन्याचे सदराप्रमाणें नोंदी कराव्या. त्याप्रमाणें एकादे इसमानें आपले ताब्यांतील दस्तैवज, नोटीस बजावली असूनहि, मुदतींत हजर केला नाहीं तर त्याचीहि नोंद या रजिष्टरांत करावी. मामलेदार (त्याचप्रमाणें महालकरी व डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर, लँड रेकार्डस्) यांस १५ रुपयेपर्यंत फी वसूल करण्याचा अधिकार आहे (सरकार ठराव नंबर ७१७६-१२, ७६२३, १३-४-२३). जास्त दंड बसविणें इष्ट आहे व प्रांताचे साहेब स्वतः गांवीं जाऊं शकणार नाहींत असें जेव्हां मामलेदार यांस वाटेल, तेव्हां त्यांनीं प्रांताचे साहेब यांजकडेस हकीकतीचा रिपोर्ट करावा व प्रांत साहेब यांचा हुकूम या रजिष्टरास जोडण्यासाठीं कुळकर्ण्याकडे पाठवावा. मामलेदार यांनीं फी मंजूर केल्याबरोबर कुळकर्णी यानें ती किरकोळ जमीनबाब म्हणून वसूल केली पाहिजे. जुलै अखेर हें रजिष्टरच या बाबतींत खालील सर्व फीस आधार म्हणून फाईल करण्यास हरकत नाहीं. ही फी गांवचा नमुना नंबर ४ यांत दाखल करून गांवचे त्यावर्षाचे हिशोबांत दाखविली जाते. जुलै अखेरचे आंत हुकूम दिले नाहींत तर तें रजिष्टर पुढील सालास चालू ठेवावें. परंतु कांहीं नोंदीबद्दल हुकूम दिले व कांहीं नोंदीबद्दल हुकूम दिले नाहींत तर निकाल होणे राहिलेल्या पुढील सालचे रजिष्टरीं न्याव्या. फीसंबंधीं कोणास अपील करण्याची इच्छा असलीं तर त्यानें या रजिष्टरचे उताऱ्याकरितां व गांवचा नमुना नंबर ६-७ यांतील नोंदीचे नक्कलेकरितां नेहमींचे पद्धतीप्रमाणें फी दिली पाहिजे. खरोखर माहिती देण्याची राहिली नाहीं असें निर्विवाद शाबीत झालें नाहीं तर प्रत्येक प्रसंगीं फीचा हुकूम केलाच पाहिजे. कलेक्टर अगर प्रांत साहेब यांनीं फीचें प्रमाण ठरवूंन द्यावें व सुशिक्षित व समजूतदार माणसें जाणूनबुजून माहिती देण्याचें टाळतील तर त्यांजवर जास्तीत जास्ती दंडाची आकारणी करावी; त्याचप्रमाणें अशिक्षित मूर्ख इसमावर तो खरोखरच अज्ञानी असल्यास जुजबी आकारणी करावी, परंतु खरोखर अज्ञानामुळें माहिती देण्याचें चुकलें तरी कांहीं तरी फी घेतलीच पाहिजे; नाहीं तर असेंच सर्वसाधारण अज्ञान पुढें चालत राहील (पान ६९ वरील टीप पहा).

३७. गहाण सोडविल्याचे व्यवहार.—या वर्गाचे व्यवहाराकडे वेगळें लक्ष्य देण्याचें कारण हे कीं, दुसऱ्या कोणत्याहि व्यवहारापेक्षां या व्यवहारासंबंधानें हयगय करण्याची प्रवृत्ति जास्त असते. कुळकर्णी यानें विशेषेंकरून लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, इतर व्यवहाराप्रमाणें याचीहि खबर तीन महिन्यांचे आंत मिळाली पाहिजे व तसें न झाल्यास फी घेतली पाहिजे. यास्तव कोणत्या गहाणाची फेड झाली याबद्दल कुळकर्णी यानें वेळोवेळीं विशेष चौकशी केली पाहिजे व त्या फेडीची नोंद गांवचा नमुना नंबर ६ यांत सदरील नमुन्यांतील खुलाशाचा पॅरिग्राफ ३८ यांत सांगितल्याप्रमाणें केली पाहिजे.

३८. बिनकब्जे गहाणाचे बाबतींत हमेश फेडीची मुदत लिहिली पाहिजे. या मुदतीपासून १२ वर्षांनंतर (गहाण घेणारानें त्यापूर्वी फिर्याद केली नाहीं तर) मुदतीच्या कायद्याप्रमाणें गहाणाचा बोजा नाहींसा होतो. (सन १९०८ चा कायदा ११, परिशिष्ट १, अनुक्रम नंबर १३२, पहा). परंतु ही (१२) बारा वर्षांची मुदत पुरी होण्याचे अगोदर जर:—

(अ) गहाण देणार कर्जाबद्दल नवीन लेखी पावती देईल तर, अगर

(ब) मुदलाच्या कांहीं भागाची फेड करून तसें केल्याचा लेख देईल तर,

(क) व्याज देईल (याबद्दल तोंडी पुरावा चालेल) तर,

यामुळें कर्जाची मुदत वाढते व या नवीन घडलेल्या व्यवहारापासून १२ वर्षांची मुदत मोजली जाते. गहाण घेणार जर अज्ञान असेल, वेडा असेल अगर पर ठिकाणचा राहाणार असेल तर मुदत कायद्याप्रमाणें वाढविली जाते (कलमें ६, ७, ८ पहा).

कांहीं मुदतीपर्यंत दिलेली जमीन, उदाहरणार्थ, एकादे विधवेस तिचे हयातीपर्यंत अगर पुनर्विवाह करीपर्यंत अन्नवस्त्राबद्दल दिलेली जमीन, मूळच्या अटीप्रमाणें ती मुदत भरतांच ज्याची त्यास परत मिळते.

या सर्व बाबतींतसुद्धां माहिती कोणी देत नाहीं म्हणून फेडीचे तारखेपासून १२ वर्षांपेक्षां जास्त मुदतीनंतर विनकबजेगहाणखताचे बाबतींत पुन्हां मुदतींत आणल्याचा पुरावा नसल्यास गहाणखत मुदतीबाहेर गेलें असें समजून नमुना नंबर ६ यांत गहाण कमी झाल्याची नोंद करावी. नजरगहाण घेणार याची या बाबतींत तक्रार असेल तर त्यानें गहाण देणारापासून नवीन कबुलीचा कागद घेऊन हजर करावा अगर गहाणाबद्दल फिर्याद करावी. अन्नवस्त्राबद्दल दिलेली जमीन परत मालकाचे कबज्यांत आल्याबरोबर त्याची नोंद करावी. त्याचें नांव नमुना नंबर ७, कोष्टक ८ यांत दिसेल.

३९. वरिष्ठाचे हुकूम.—हे हमेश मामलेदार यांजकडून येतील, त्यांत खालील बाबी असतील :—

दिवाणी कोर्टाचे हुकूम (हायकोर्ट सिव्हिल सरक्युलर नंबर ६०-अ, पान ४७०, मुंबई गॅझेट, भाग १, सन १९१०) सरकार ठराव नंबर ८१०७-१४; हुकुमनामे झाल्यानंतरसुद्धां असे हुकूम आले नाहींत तर त्याबद्दल रिपोर्ट करावा.

राजिनामे व कबुलायती.

जमिनी संपादन केल्याबद्दल माहिती व नंबराचे क्षेत्रांतील इतर फेरफार जे कमजास्ती पत्रकांत दाखल असतील असे व किरकोळ मुलकी हुकूम (गां. न. नं. १, २, ४ वरील खुलासा पहा.)

सदरहू व्यवहाराची माहिती असल्यावर ते ताबडतोब नेहमींच्या पद्धतीप्रमाणें नोंदले पाहिजेत आणि ते नोंदण्याची रीत इतर बाबींहून कोणत्याहि प्रकारें भिन्न नाहीं मात्र दिवाणी कोर्ट, कलेक्टर किंवा मामलेदार यांचे हुकुमाचा नंबर व तारीख हीं नोंदीचा आधार म्हणून लिहिलीं पाहिजेत. विशेष प्रकारच्या व्यवहाराच्या समजुती मासल्यासाठीं उदाहरणें देऊन दुसरीकडे दिल्या आहेत.

४०. अनुक्रमणिकेंतील कोणत्याहि कोष्टकांतील फेरफार करणें असल्यास त्याची नोंद पहिल्यानें नमुन्याच्या नोंदींत लिहून दाखविल्याप्रमाणें सोप्या भाषेंत नमुना नंबर ६ यांत केली पाहिजे.

खात्रीलायक माहिती मिळविल्याबरोबर कुळकर्णी यानें फेरफाराची नोंद केली पाहिजे. जर त्यास आणखी तपशील पाहिजे असेल किंवा जास्त खात्री करून घ्यावयाची असेल तर त्यानें दस्तैवज हजर करावयास लावण्याचा (ज. म. का. कलम १३५-इ) अगर तोंडी साक्षीदार बोलावण्याचा अधिकार बजाविला पाहिजे. तसेंच ज्यास खात्रीलायक माहिती असेल असे इसमाकडे जाऊन त्यास विचारून त्यानें स्वत: चौकशी केली पाहिजे. नमुना नंबर ६ व ७ यांत जी पूर्वीची नोंद असेल ती व आतां केलेली नोंद नीट पाहून तिचा सदर हकीगतीशीं मेळ आहे किंवा नाहीं व जो हक्क तबदील करून दिला असें म्हणतो त्यास तो हक्क तबदील करून देण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं, हें त्यानें पाहावें. "स्वाभाविक (नॅचरल्) पालक अथवा कोर्ट ऑफ् वॉर्ड्स् आक्ट अगर गार्डियन्स अँड् वार्डस् आक्ट, याअन्वयें नेमलेला पालक याखेरीज दुसऱ्या इसमाकडून जेव्हां अज्ञानाची मिळकत तबदील केली जाते तेव्हां हक्कांच्या पत्रकांत (रेकॉर्ड ऑफ् राईस्मध्यें) अशा व्यवहाराची नोंद करतेवेळीं कुळकर्ण्यानें सदरहू गोष्ट विशेषेंकरून मामलेदाराच्या नजरेस आणिली पाहिजे. व त्यानें जुजबी चौकशी केली पाहिजे. व जर सदरहू तबदिली अज्ञानाच्या हितसंबंधाच्या विरुद्ध आहे असें त्यास वाटलें तर त्यानें गार्डियन्स अँड् वार्ड्स् आक्टाअन्वयें पालक नेमण्याबद्दल डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे कळविण्याचा इष्टतेबद्दल कलेक्टरास सूचना केली पाहिजे." जर दरम्यान कांहीं व्यवहार गाळला गेला आहे असें त्यास आढळेल तर सदरहू व्यवहार पक्षकार लोकांस कबूल आहे अगर त्याबद्दल वाद आहे याची खात्री करून घेऊन त्याची नोंद केली पाहिजे.

हक्कांत बदल झाला अशी पुरेशी खात्री झालेबरोबर कुळकर्णी यानें कोष्टक १ यांत (पान ४६ पहा) अनुक्रम नंबर लिहावा. प्रत्येक प्रकारच्या फेरफारास एकच अनुक्रम नंबर द्यावा, मग त्यामुळें त्या गांवांतील १,००० तुकड्यांचा संबंध आला तरी हरकत नाहीं.

कोष्टक २ यांत प्रथम लिहिण्याचा मजकूर म्हणजे ज्या तारखेस कुळकर्णी स्वत: ती नोंद लिहितो ती तारीख होय. ज्या तारखेस व्यवहार घडला असें कुळकर्ण्यास वाटतें अगर ज्या तारखेस हक्क संपादन झाला अगर कबजा झाला ती अगर तशा प्रकारची तारीख लिहूं नये, परंतु ती नोंद ज्या तारखेस कुळकर्णी प्रत्यक्ष लिहितो तीच तारीख लिहावी. त्यानंतर व्यवहाराचें वर्णन अगदीं सोप्या व स्पष्ट भाषेंत लिहावें. वाजवीपेक्षां जास्त मजकूर लिहूं नये. बहुतेक सर्व व्यवहार भानगडीचे नसतात, व त्यांचें थोडक्या शब्दांत वर्णन लिहितां येतें. एकर व आकार, सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर, हे कोष्टक २ मध्यें लिहिण्याचें नाहींत. कारण ते कोष्टक ३ यांत पूर्णपणें दिलेले असतात. परंतु झालेल्या व्यवहारामुळें एकर, आकार वगैरे यांत फरक होतो अशीं उदाहरणें आहेत (नों. नं. ६१—७१). असे प्रसंगीं अर्थात झालेला फरक कोष्टक २ मध्यें लिहिला पाहिजे. बहुतेक प्रसंगीं हक्कांत बदल झाल्यामुळें त्या जमिनीचे क्षेत्र, आकार, जुडी वगैरे यांत फरक होत नाहीं.

कोष्टक ३ हें अतिशय महत्त्वाचें आहे. फेरफाराचा जमिनीच्या नक्की कोणत्या कि हें कुळकर्ण्यानें पहिल्यानें निश्चित करावें. जरी ही माहिती नोंदलेल्या दस्तैवजावरून मिळाली असली तरी पक्षकार सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर यांचा तपशील देतांना एखादा तुकडा गाळतात अगर चुकीचा नंबर देतात किंवा हिस्सा-नंबर देण्याचा इरादा नाहीं असा हिस्सा-नंबर चुकून लिहितात. ज्या वेळीं अशी चूक झाली आहे असें कुळकर्ण्यास वाटेल त्या वेळीं त्यानें पक्षकार बोलाविले पाहिजेत. संबंध असलेली जमीन दस्तैवजांत लिहिलेल्या जमिनीहून वेगळीच आहे असें त्यास आढळेल तर (याबद्दल संशय आल्यास त्यानें प्रत्यक्ष जमिनींत जाऊन काळजीपूर्वक आपली खात्री करून घेतली पाहिजे) काय चूक झाली आहे याबद्दल आपली नोंद लिहितांना स्पष्ट खुलासा करावा. तसेंच त्यानें सब्-रजिस्ट्रार यांसहि कळविलें पाहिजे व दस्तैवज मागवून त्यावर दस्तैवज पोहोंचल्याची व परत दिल्याची तारीख लिहून काय दुरुस्ती केली पाहिजे याबद्दल शेरा लिहावा. (२) वर्णन केलेल्या जमिनीच्या मानानें दस्तैवजांत लिहिलेले जमिनीची किंमत अगर खंड बाजवीपेक्षां फारच भिन्न आहे असें कुळकर्ण्यास आढळेल तर त्यानें पक्षकारास बोलावून चौकशी करून चूक झाली आहे कीं काय हें शोधून काढावें. पक्षकार गोंधळून गेले आहेत व त्या विवक्षित हिश्शाचा सर्व भाग देण्याचा त्यांचा इरादा नाहीं असें कुळकर्णी यास समजेल तर त्यानें आपले गांवचा व पोट-हिश्शाचा नकाशा घेऊन प्रत्यक्ष जमिनींत जावें व पक्षकारासमक्ष खात्री करून घ्यावी.

वर दिलेल्या (१) व (२) प्रसंगांशिवाय नोंदलेल्या दस्तऐवजांतील पक्षकारास कुळकर्णी यानें बोलवूं नये व त्यास त्रास देऊं नये.

४१. कोष्टक ३ यांत एखादे अप्रामाणिक इसमानें मागाहून एखादा तुकडा जास्ती दाखल केला अगर दाखल केलेला तुकडा कमी केला तर, लबाडी होण्याचा संभव आहे, असा फरक करितां येऊं नये म्हणून कोष्टक ३ यांत तुकड्याचें वर्णन लिहिल्यानंतर त्याखालीं संबंध असणारे तुकड्यांची संख्या अक्षरीं लिहावी (पान ६१ वरील नमुना पहा). मग कोष्टक ३ यांत दिलेल्या यादींत एखादा तुकडा जास्ती दाखल केला पाहिजे अगर एखादा कमी केला पाहिजे असें पुढें आढळल्यास, या व्यवहाराबद्दल नवीन फेरफाराची नोंद करावी (फेरफार नंबर ७७ पहा) (व फेरफार ६७ कसा लिहिला आहे तें पहा). त्याच सर्व्हेनंबरापैकीं एका हिश्शांतून दुसऱ्या हिश्शांत जमीन गेली असेल असे प्रसंग खेरीजकरून हिश्शाचे क्षेत्रांत बदल झाल्यास नंबराचे एकंदर क्षेत्रांतही बदल होणारच. असे प्रसंगीं प्रथम कोष्टक ३ मध्यें सबंध सर्व्हे नंबर लिहून नंतर हिस्सा-नंबर दिल्यानें सकृद्दर्शनीं दोन तुकड्यामध्यें बदल झाल्यासारखा दिसतो, पण वास्तविक एकाच तुकड्यांत बदल झालेला असतो हें थोड्या विचाराअंतीं कळून येईल. सबंध सर्व्हे नंबर लिहिण्याचें कारण एवढेंच कीं, कुळकर्णी यास हिश्शाच्या क्षेत्रांत दाखल झालेला फरक सबंध सर्व्हे नंबराच्या क्षेत्रांतसुद्धां दाखल करावयाचा असतो.

४२. कोणत्या आधारावरून फेरफाराची नोंद केली हें कुळकर्ण्यानें स्पष्ट लिहावें (लेखी रिपोर्ट, रजिस्ट्रारकडील उतारा, कमजास्तीपत्रक, नवीन आकारबंद, मामलेदाराचा हुकूम वगैर). नंतर त्यानें सर्व कागद ते ताबडतोब सांपडतील अशा रीतीनें फैल करून ठेवावे. आकारबंद, कमजास्तीपत्रक हीं अर्थातच नमुना नंबर १ ला जोडून ठेवावयाचीं असतात. परंतु लेखी रिपोर्ट, फेरफाराबद्दल पत्रव्यवहार हे गांवचा नमुना नंबर ६ तील नोंदीच्या अनुक्रमानें चढती फैल करून ठेवावे. तसेंच नोंदणी कामगाराकडून आलेले उतारेहि महिन्याच्या अनुक्रमानें लावून ठेवावेत.

नोंद लिहिल्यावर कुळकर्णी यानें तिच्या पुढें सही करावी व पाटलालाहि सही करण्यास सांगावें.

४३. गांवचा नमुना नंबर ६ यांत फेरफार दाखल केल्यानंतर या नोंदीबद्दल तक्रार आहे किंवा काय याची कुळकर्णी यानें खात्री करावी. एकादे प्रत्यक्ष घडलेल्या फेरफाराबद्दल (उदाहरणार्थ, देवस्थान जमीन, अगर नवीन शर्तीची जमीन कलेक्टरसाहेब यांचे हुकुमाशिवाय तबदील करून दिली असेल तर) तलाटी यानें स्वतः सरकारतर्फे तक्रार करावी. अशा प्रसंगीं त्यानें मामलेदार यांजकडून हुकूम घ्यावेत. नोंद करण्याचें वेळीं फेरफाराबद्दल तक्रार आहे असें त्यास माहीत असेल तर त्यानें तक्रारी रजिष्टरमध्यें मजकूर लिहावा व तसें केल्याचा उल्लेख गांव न. नं. ६, कोष्टक ४ यांत करावा. तक्रार जर वारस हक्काबद्दलची असेल व तिचा निकाल वारसाचे रजिष्टरांत झाला नसेल तर ती तक्रार वारसहक्काबद्दलचा दावा म्हणून नमूद करावी. झालेला फेरफार गैरकायदा दिसतो अगर त्याबद्दल तक्रार उत्पन्न झाली आहे म्हणून त्याबद्दल नोंद करण्याचें तहकूब ठेवूं नये. फार भानगडी वाढण्यापूर्वीच तक्रारींचा शेवट लवकर लागावा व त्यांच्या कायदेशीरपणाची छाननी व्हावी हाच नोंदी न. नं. ६ मध्यें दाखल करण्याचा उद्देश आहे. कबजाबद्दल अगर इतर हक्क प्रत्यक्ष कोणीं संपादन केला तर कुळकर्णी यानें त्याबद्दल तक्रार असली तरी अगर तो गैरकायदा मिळविला असला तरी त्याची नोंद केली पाहिजे. परंतु आपणांस कबजा मिळाला पाहिजे अगर विवक्षित हक्कदार म्हणून आपलें नांव दाखल केलें पाहिजे असें कोणा इसमाचें म्हणणें असेल, पण जमिनीचा प्रत्यक्ष कबजा अगर तो विवक्षित हक्क आपण सांप्रत उपभोगीत नाहीं अशी तो कबुली देत असेल तर ही त्याची मागणी फेरफार म्हणून दाखल केली जाणार नाहीं. दुसऱ्या कोणाच्या नोंदलेल्या हक्काविरुद्ध तक्रार म्हणून फार झालें तर त्याचें म्हणणें खरोखर विश्वसनीय आहे असें पटवून दिल्यास तक्रारी रजिष्टरांत लिहून ठेवावें.

[illegible] जमीन कोणी बिगरपरवानगीनें कबजांत घेतली असली व सदरहू कबजा फार दिवसांचा (म्हणजे [illegible] असल्यानें जमिनींतून काढून टाकण्यापूर्वी आपलें म्हणणें ऐकून घेतलें पाहिजे असें म्हणण्याचा हक्क पोंचत [illegible] कुळकर्णी यास आढळलें तर असा अनधिकारी कबजा नवीन संपादन केलेला हक्क म्हणून दाखल न करितां त्यास जमिनींतून एकदम काढून टाकण्याच्या तजविजीस लागावें. तसें काढून टाकणेस हरकत उत्पन्न झाली व कायदेशीर तक्रारीमुळें व हरकतीमुळें ताबडतोब काढून टाकणेस व्यत्यय आला, तर हल्लीं असलेल्या गैरकायदेशीर कबजाची नोंद त्यास काढून टाकीपर्यंत नमुना नंबर ६ यांत दाखल करावी.

४५. यापुढील तजवीज म्हटली म्हणजे तक्रारी मागविणें व चावडींत ठळक ठिकाणीं फेरफाराची समग्र नकल लावून आणि हक्काच्या पत्रकावरून किंवा फेरफारांच्या रजिस्टरवरून सदरहू फेरफारामध्यें ज्यांचा हितसंबंध असल्याचें दिसून येईल त्या सर्व इसमांस आणि ज्याचा हितसंबंध आहे असें मानण्यास त्यास कारण असेल अशा कोणत्याहि इतर इसमाला लेखी कळवून (नोंदीची) शक्य तितकी प्रसिद्धी करणें.

पुढील फेरफार सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. सदरहू फेरफारांबाबत तक्रार करूं इच्छिणाऱ्या कोणत्याहि इसमानें अगर स्त्रीनें एक महिन्याच्या आंत आमच्याकडे आपली तक्रार दाखल करावी.

(सही)

पाटील.

(सही)

कुळकर्णी.

## परिशिष्ट.

ता. ते

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्कांचें स्वरूप. | संबंध असलेले सर्वे नंबर व हिस्सा नंबर. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ६८ | १० जानेवारी १९१२—गोपाळ गणेश हा तारीख १२ डिसेंबर १९११ रोजीं मरण पावला आणि त्याच्यामागें सखूजी हा समाईक खातेदारामध्यें त्याचा वारस झाला. वारसांचें रजिष्टर पहा. | १६ (एक) |
| ६९ | १० जानेवारी १९१२—सर्जेराव भिवराव यानें भोगीलाल रामलाल याजकडून तारीख ३१ डिसेंबर १९११ रोजीं गहाणें सोडविलीं. | ९—२<br>६—१<br>१२—१<br>(तीन) |
| ७० | ३० जानेवारी १९१२—गहाण देणारा मारुती कुशा सप्टेंबर १९०९ मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा मथू यानें तारीख १ जानेवारी १९१२ रोजीं शंकर हरी ढमढेरे याजकडून गहाण सोडविलें आहे.<br>व याप्रमाणें पुढें. | १ अ-३ (एक) |

(अखेरच्या नोंदीच्या तारखेनंतर ३ महिन्यांनीं फाईल करणें).

(तारीख १३ माहे सप्टेंबर सन १९३८ चा कमिशनर्स इन् कॉन्फरन्स नं. एल्.एन्.डी. ०/३३५).

यांतील नोंदी स्पष्ट व सुवाच्य लिहाव्या (मराठी भाषेंत असल्यास बाळबोध लिपींत लिहाव्या. मोडींत लिहूं नयें). या नोटिशींत प्रत्येक फेरफार दाखल केलाच पाहिजे, मग तो फेरफार, तक्रारीची चौकशी होऊन किंवा इनाम जमिनींतील फेरफाराची चौकशी होऊन आणि चौकशीच्या वेळीं पक्षकारांना नोटिसा देऊन व त्यांचें म्हणणें पूर्णपणें ऐकून घेऊन, नोंदलेला असेल तरी हरकत नाहीं व त्याच्याविरुद्ध मुलकी अधिकाऱ्याकडे तक्रार करितां येत नसली तरी हरकत नाहीं. त्याचप्रमाणें सरकारचे हक्क कमी करणारे अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून केले जाणारे फेरफारसुद्धां या नोटिशींत दाखविले पाहिजेत. (नोंदी ७३, ७४ पहा.) त्याबरोबरच दिवाणी कोर्टाचे हुकुमनाम्याबद्दलही नोटीस दिली पाहिजे. यामुळें हस्तदोष अगर दुसरी एकादी चूक नजरेस येण्याचा संभव आहे.

"(ब) नोटीस तीन महिने लावून ठेवली पाहिजे. यासंबंधीं सर्वोत्कृष्ट व्यवस्था म्हटली म्हणजे पुढीलप्रमाणे :—

तारीख १ जानेवारी रोजीं नोटिशीची एक प्रत नोटिशीचे तक्त्यावर अगर चावडीचे भिंतीवर लावावी. प्रत्येक फेरफार करण्यांत आल्याबरोबर तो तिच्यांत दाखल करावा. सबंध प्रत भरली म्हणजे नवीन प्रत सुरू करावी आणि नंतर पहिली प्रत तिच्यांत अखेरची नोंद झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत तक्त्यावर तशीच राहूं द्यावी आणि नंतर ती काढून फेरफार प्रसिद्ध केल्याचा पुरावा म्हणून एक वर्षपर्यंत [ गांव 'क' मध्यें ] फाईल करून ठेवावी.

या नोटिशीशिवाय ( ज. म. का. कलम १३९-डी-२ ) फेरफारामुळें ज्यांचे हितसंबंधांत कमीपणा आला आहे हें कुळकर्ण्यास समजतें अगर तसें मानण्यास त्याला जागा असते अशा सर्व इसमांस कुळकर्णी यानें नोटीस दिली पाहिजे. ही नोटीस ( ठ. नं. ३९५-ब, तारीख २८-२-२३, पॅरिग्राफ ३ मध्यें हा नमुना मंजूर झाला आहे )—जाहीर नोटीस ज्या भाषेंत असेल त्या भाषेंत असावी. याबद्दल छापील नमुने पुरविले जातील.

या नोटिशीमुळें कुळकर्णी यास कांहीं जास्त माहिती अगर दुरुस्ती समजून येईल व त्यावरून त्यानें जुनी नोंद तीमध्यें जरूर तर नंतर मिळालेली माहिती नमुद करून अगर नवीन नोंद करून दुरुस्त करावी. याप्रमाणें नवीन नोंद केल्यावर तो नवा फेरफार समजून त्याची प्रसिद्धी करावी. जर कोणी तक्रार आणिली तर तक्रारी रजिष्टरांत नोंद करून नियमाप्रमाणें तिचा निकाल करून घ्यावा. तक्रारीचा निकाल झाल्यानंतर त्या हुकुमाप्रमाणें नवीन नोंद करावी अगर पूर्वीची नोंद कायम झाल्याबद्दल शेरा लिहावा.

४६. आतां आपण तक्रारी रजिष्टरकडे वळूं.

तक्रारीचें रजिष्टर.

जेव्हां एखादा खाजगी पक्षकार वारसाचे हक्काशिवाय (त्याचा निकाल वारसाचे रजिष्टरांत केला जातो), इतर बाबतींत फेरफाराचे नोंदीबद्दल तक्रार करील किंवा नवीन शर्तीची किंवा नोकरीकरितां दिलेली जमीन गैरकायद्यानें दुसऱ्यास दिली अशा संबंधानें कुळकर्णी सरकारतर्फे हरकत घेईल तेव्हां तक्रारी रजिष्टर खालीं दिलेल्या नमुन्याप्रमाणें लिहिलें पाहिजे. रजिष्टरावरूनच त्याचा सर्व खुलासा होतो :—

तक्रारी बाबीचें रजिष्टर.

| अनुक्रम नंबर. | नमुना नंबर ६ यांतील नंबर. | सर्व्हे नंबर. | क्षेत्र, गांवचा नमुना नंबर ७, कोष्टक ३ यांत दिल्याप्रमाणें | हरकत आल्याची तारीख. | तक्रारीची हकीकत व नांवें. | मामलेदार अगर प्रांतसाहेब यांचा हुकूम. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | मागील खातेदार ब मयत झाला. त्याची बायको अ अज्ञान असून ती दुसऱ्या गांवीं बापाजवळ राहाते. बची वारस म्हणून तिचें नांव दाखल केलें होतें. परंतु बची आई क ही आपलें नांव दाखल व्हावें असें म्हणते. जमिनीची लागवड क ही करते. | क व अ चा बाप ड असे हजर. क ही जमिनीची प्रत्यक्ष लागवड करते व अ चा बाप ही गोष्ट कबूल करतो. अ ला कांहींएक देण्यांत येत नाहीं सबब क चें नांव दाखल करावें.<br>एक्सू. बाय्., मामलेदार. |
| २ | | | | | हकीकत वर प्रमाणेंच; परंतु या बाबतींत क ही अ ला नेमणूक देते; परंतु कबजा आपला असून नेमणूक फक्त मेहेरबानी म्हणून देते असें म्हणते. | अ चा बाप ड व क असे हजर. ड चें म्हणणें सोय म्हणून अ वयांत येईपर्यंत क कडे कूळ म्हणून जमीन दिली आहे. क नेमणूक देत असल्याचें कबूल करते. अ ही खरी वारस असल्यामुळें नेमणूक हा खंड आहे असें समजावें. अ चें नांव दाखल करावें व क चें नांव नमुना नंबर १२ यांत कूळ म्हणून दाखल करावें.<br>एक्सू. बाय्., मामलेदार. |

| [illegible] | [illegible]र ६ यांतील नंबर. | सर्व्हे नंबर. | क्षेत्र, गांवचा नमुना नंबर ७, कोष्टक ३ यांत दिल्याप्रमाणें | हरकत आल्याची तारीख. | तक्रारीची हकीकत व नांवें. | मामलेदार अगर प्रांतसाहेब यांचा हुकूम. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ३ | | | | | अ मयत झाला आहे व त्याच्या दोन बायका ब आणि क या त्याच्या मागें विधवा आहेत. ब नें ड ला जमीन विकली आहे व क नें ई ला जमीन विकली आहे. ड लागवड करण्यास गेला असतां ई नें त्याला बळजबरीनें बाहेर काढून देऊन आपण त्या शेतांत ज्वारी पेरली आहे. तर आतां कबजेदार म्हणून कोणाचें नांव दाखल करावें. | ड व ई हजर. ड कबूल करतो कीं, हल्लीं प्रत्यक्ष कबजा ईचा आहे. वहिवाटीचे कायद्याप्रमाणें त्यानें फिर्याद करावी असा त्यास उपाय आहे. तशी फिर्याद केली तर निकालाप्रमाणें नोंद करण्यांत येईल. तोपर्यंत अ ची विधवा बायको क हिच्यापासून खरेदीच्या हक्कानें कबजेदार म्हणून ई चें नांव दाखल करावें.<br><br>एक्स्. वाय्., मामलेदार. |
| ४ | | | | | ब चा आजा कयानें हा सर्वे नंबर अ यास कबजेगहाण दिला होता. ब चा आजा व बाप खंड देत होते, परंतु बाप मयत झाल्यापासून ४ वर्षें ब नें खंड दिला नाहीं व आपलें नांव सबंध खातेदार म्हणून दाखल करावें असा हक्क सांगतो. अ जवळ अजून गहाणखत आहे. | ब व अ चे तर्फे ड हजर. गहाण सोडविल्याबद्दल ब कांहींएक पुरावा पुढें आणूं शकत नाहीं, परंतु ३० वर्षें आपणास खंड दिला असा अ जवळ पुरावा आहे. सबब गहाण अजून अमलांत आहे असें समजावें; परंतु ज्याअर्थी भाडें दिलें जात नाहीं व अ नें फिर्यादही केली नाहीं किंवा आपला हक्क बजावून घेतला नाहीं त्या अर्थी त्याचा कबजा नाहीं. अ आपला हक्क सिद्ध करीपर्यंत हें बिनकबजा गहाण असें समजावें.<br><br>एक्स्. वाय्., मामलेदार. |
| ५ | | | | | अ, ब, क व ड ह्या चार बंधूंची आई ई मयत झाली. ब, क व ड असें सांगतात कीं, ही जमीन तिचे ताब्यांत होती व ती अ जवळ राहात असल्यामुळें अ जमिनीची लागवड करीत असे. सदर नंबर चौघा भावांनीं मिळून आपल्या आईस हयातीपर्यंत दिला होता. अ चें म्हणणें शेत आपलें आहे व तें आपले बापानें विशेष देणगी म्हणून आपणास दिलें होतें. ब, क व ड यांनीं अलिकडे जमिनींतील ½ हिश्शाचा कबजा घेतला आहे. | सर्व इसम हजर आहेत. अ आपले हक्काचे पुष्टीकरणार्थ कांहीं पुरावा हजर करूं शकत नाहीं व असें म्हणतो कीं, तिघां भावांनीं अलिकडे बळजबरीनें ती कबजांत घेतली आहे व त्यांस जमिनींतून काढून टाकण्यास आपण समर्थ नाहीं. ब, क व ड यांची हकीकत खरी असण्याचा संभव दिसतो, व त्यांचा प्रत्येकाचा हल्लीं ½ जमिनींत कबजा आहे. त्याप्रमाणें नोंद करावी. अ चे म्हणण्याप्रमाणें अ चा कबजा बळजबरीनें काढला असला तर त्यानें मामलेदार कोर्ट ॲक्टाप्रमाणें फिर्याद करावी.<br><br>एक्स्. वाय्., मामलेदार. |

| अनुक्रम नंबर. | नमुना नंबर ६ यांतील नंबर. | सर्व्हे नंबर. | क्षेत्र, गांवचा नमुना नंबर ७, कोष्टक ३ यांत दिल्याप्रमाणें | हरकत आल्याची तारीख. | तक्रारीची हकीकत व नांवें. | मामलेदार अगर प्रांत साहेब यांचा हुकूम. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ६ | | | | | अ सबंध नंबरावर हक्क सांगतो. ब व क म्हणतात कीं, आपला प्रत्येकाचा ⅓ हक्क आहे व आपले हिस्से गहाण दिल्यामुळें अ चे ताब्यांत आहेत. | सर्व हजर आहेत. ब व क गहाणाबद्दल कांहीं पुरावा आणीत नाहींत. पाटील म्हणतो कीं, मला जी काय माहिती आहे त्याप्रमाणें ब व क यांनीं जमिनींची कधीं वेगळी लागवड केलेली नाहीं. अ चें नांव सबंध खातेदार म्हणून दाखल करावें.<br>एक्स्. वाय्., मामलेदार. |
| ७ | | | | | ब, क, ड, ई हे आपलीं नांवें कायमचीं कुळें म्हणून दाखवावीं असा हक्क सांगतात; अ त्यांचा हक्क नाकबूल करितो. | सर्व हजर आहेत. ही तक्रार फक्त कुळवहिवाटीचे प्रकाराबद्दल आहे. अ कबूल करतो कीं, दुसरे इसम आपले बाडबडिलांपासून कुळें म्हणून आहेत व त्यांनीं कधीं कबुलायत दिलेली नाहीं, परंतु नेहमीं रुपये ५० देत असतात. हा खंड वाढविण्याचा हक्क अ सांगतो. भाडें पूर्वी कधीं वाढविलेलें नाहीं व कुळांचा कबजा फार प्राचीन काळापासूनचा असल्यानें त्यांचीं नांवें रुपये ५० खंड देणारीं कायमचीं कुळें म्हणून दाखल करावींत.<br>एक्स्. वाय्., मामलेदार. |
| ८ | | | | | नवीन शर्तीवरील खातेदारानें जमीन सावकार ब यास विकली. | कलेक्टर साहेब यांचे हुकुमावरून जमीन खालसा केली. ती कोणी घेईपर्यंत सरकारी पड म्हणून दाखल करावी.<br>एक्स्. वाय्., मामलेदार. |

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

[illegible]चा व अपिलांचा निकाल करणेसंबंधाची पद्धत भाग ५, ज. म. वरील रुळीं (१९२१)तील नंबर १०८, १०७ [illegible]त्यावरील टिपा यांत सांगितली आहे. वर जीं तक्रारीचीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांत थोडे मुदतीचे कुळवहिवाटीच्या अगर वारसाच्या तक्रारीचा समावेश होत नाहीं. अनुक्रम नंबर ५ यांत वारस हक्काबद्दल (तो कबूल केलेलाच आहे) तेंहे नसोन नेहमींचा वारसा सोडून देणगी दिल्याची तक्रार केली आहे.

४७. कुळवहिवाटीबद्दल तक्रारी यांत लिहिणेच्या नाहींत. त्यांस ज. म. कानू ११३ लागू आहे. तक्रार असल्याबद्दलचा शेरा गांवचा नमुना नंबर १२ यांत लिहावा. गांवचा नमुना नंबर १२ यांत खंड वगैरेसंबंधीं या किंवा त्या तक्रार करणाऱ्या पक्षकाराचें म्हणणें विशेष पाल्हाळ न लावतां मान्य करण्याखेरीज दुसऱ्या तक्रारींचा निकाल मुलकी अधिकारी करीत नाहीं.

## नवीन हिस्से.

४८. तक्रारींचा निकाल झालेनंतर अगर तक्रार नसेल तेव्हां फेरफाराबद्दल गांवचा नमुना नंबर ६ यांत नोंद केल्यानंतर, यामुळें सर्वे नंबरच्या अगर त्या नंबरांतील पोट-विभागाच्या नकाशांत बदल होतो किंवा कसें याबद्दल कुळकर्णी यानें विचार करावा. ज्यावेळीं हल्लीं असलेला सर्वे सर्व्हे नंबर अगर त्यांतील हिस्सा यांत फेरफारामुळें नवीन हिस्से झाले असतील तेव्हां या विभागांची मोजणी करून ते नकाशांत दाखल करणें जरूर होईल. त्याबद्दल खालील पद्धतीचा अवलंब करावा. एक रजिस्टर घेऊन त्यांत खालीं दिलेलीं कोष्टकें आखावीं:—

| फेरफाराचे पत्रकांतील नोंद, गांवचा नमुना नंबर ६. | सर्व्हे नंबर. | नकाशांत दुरुस्ती पाहिजे तिचा प्रकार. | कोणी केली व तारीख. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ५० | १अ/४अ | वांटणीमुळें ... | स. इ., रा. शुक्ल, यांनीं, तारीख ८-४-११. |
| ५३ | १२ | नवीन विभाग ... | |
| ५५ | ६/२, ६/४ | हिस्से एकत्र झाले ... | रा. ल. म. कुळकर्णी, तारीख १९-३-११. |
| ६२ | १अ१/१अ२ | | |
| ६३ | | | |
| ६१ | १अ/१, २, ३, ४अ, ४ब, ४क आणि २ब-४. | रेल्वेसाठीं जमीन घेतली ... | पूर्वीच कमजास्ती पत्रक नंबर नें झाली, तारीख २९-९-११. |
| ७१ | १३/१, १२/२ | हिस्सा नंबर १ यांतील कांहीं जमीन हिस्सा नंबर ३ यांत गेली. | रा. ल. म. कुळकर्णी. |

४९. जेव्हां जेव्हां गांवचा नमुना नंबर ६ यांतील फेरफारामुळें जास्ती विभाग करणें अगर विभाग एकत्र करणें अथवा चालू पोट विभागांत फेरफार करणें या गोष्टींची आवश्यकता उत्पन्न होईल तेव्हां कुळकर्णी यांनीं या रजिस्टरचें कोष्टक १ ते कोष्टक ३ यांत त्यांचा तपशील दाखल करावा. असा प्रकार जमीन लोकोपयोगी कार्याकरितां संपादन करण्याचे कामांत अगर पद्धतशीर मोजणीनंतर (उदाहरणार्थ, नगररचनेकरितां केलेल्या) उत्पन्न झाला असला तर अर्थात् नवीन क्षेत्रफळ वगैरे कुळकर्ण्यास कळवावें, म्हणजे तो "सर्व्हे-दुरुस्तीपत्रकावरून अगोदरच झालेली आहे" असें दुरुस्तीपुढें नमूद करील. ज्या सर्व्हेअरनें पूर्वी तें काम केलें असेल त्यानें विभागांचा नकाशा दुरुस्त करावा. हिस्से सामील करण्याचें काम कुळकर्ण्यानें स्वतः करावें. बाकी कामांत त्यानें रजिस्टर भरूनच समाधान मानून घेतलें पाहिजे. वर्षाचे अखेरीस अशीं तहकूब प्रकरणें कितीं आहेत त्यांची संख्या मामलेदार यांजकडे त्यानें ती पान ८७ वरील आंकडेवार अहवालांत सामील करावी म्हणून कळविली पाहिजे.

गांवचा नमुना नंबर ७ ची विल्हेवारी ( तारीख १-८-२२ चे स्थितीप्रमाणें ).

| वर्णानुक्रमानें कबजेदारांचीं नांवें. १ | | गांवचा नमुना नं. ८-अ व ब यांतील खाते नंबर.* २ | कोष्टक ८ यांतील सर्व्हे नंबर किंवा हिस्सा नंबर. ३ | शेरा, पत्ता, वगै. ४ |
|---|---|---|---|---|
| अंबालाल हिराशंकर | ... | २० | ... | |
| अमृता भोई | शे. | ... | २०/२ | |
| आनंदराव शिंदे | ... | ... | ३ | |
| खंडू रघू | शे. | स. नं. २९ | ... | |
| गणपतराव बळवंतराव | ... | २ | ... | |
| गणेश सुबाराव | शे. | स. नं. २०१ | ९/१ | |
| गुल्लाप्पा शिवलिंगप्पा | शे. | स. नं. ११/२ | ... | |
| गेनू मथू | शे. | ५ | १अ/४क | |
| गोविंद आबा लोणकर | शे. | स. नं. ११/१ | ... | |
| गोविंद विठोबा | ... | स. नं. २०/२ | ... | |
| गोविंद हरी देशपांडे | ... | ... | ६/२ | |
| चिन्नाप्पा दुर्गाप्पा | शे. | ... | २०/१ | |
| चुनीलाल भाईलाल | ... | २० | ... | |
| जाधवराव शिंदे | शे. | ... | ३ | |
| तुकाराम अंताजी | शे. | २२ | ... | |
| त्र्यंबक नारायण | शे. | २१ | ... | |
| नरसिंगराव बळवंतराव | ... | १२ | ... | |
| नारायण कुळकर्णी | ... | ११ | ... | |
| प्रेमचंद रायचंद | ... | ... | ... | |
| बहादूर कासीम | ... | ... | २०/२ | |
| बापूजी बाळाजी | शे. | १९ | ... | |
| बाळकृष्ण वासुदेव | ... | १ | ... | |
| बाळू मथू | शे. | ३ | १अ/४क | |
| भोगिनाथ रामलाल | ... | ४ | ६/१, ६/२ | |
| मणिलाल हिराशंकर | ... | ९ | ... | |
| मथू मारुती | शे. | १० | १अ/४क | |
| मानाजी आनंदराव शिंदे | ... | ८ | ३ | |
| मानाजी बाळाजी | शे. | १९ | ... | |
| यशवंतराव | ... | ... | ५/३ | |

* **टीप.**—गांवचा नमुना नंबर ७ यांतील कोष्टक ६ मधील धारण करणारा ज्या वेळीं जमीनमहसूल देत नाहीं, व म्हणून त्याचें गांवचा नमुना नंबर ८ यामध्यें खातें नसेल तेव्हां या कोष्टकांत सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर लिहावा.

| वर्णानुक्रमानें कबजेदारांचीं नांवें. | | गांवचा नमुना नं. ८-अ व ब यांतील खाते नंबर.* | कोष्टक ८ यांतील सर्व्हे नंबर किंवा हिस्सा नंबर. | शेरा, पत्ता, वर्णन. |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ |
| रघुनाथ बळवंत | ... | १४ | ... | |
| रघू रामा माळी | शे. | १३ | ... | |
| राधाबाई कोम अमृतराव | ... | ... | ... | |
| रामलाल गिरधरलाल | ... | १९ मयत | ... | |
| रेव्हरंड जे. शिलीडी | ... | १६ | ... | आय्. पी. मिशन हाऊस, सुरत. |
| लक्ष्मण कुशाबा | शे. | ... | २ब/६ | |
| लक्ष्मण वामनराव | ... | ६ खातें बंद | ... | |
| लक्ष्मीबाई कोम आनंदराव | ... | ७ | ... | |
| विठ्ठल रामचंद्र | शे. | २३ | १अ/३, ८ | |
| शंकर हरी ढमढेरे | शे. | १८ | १अ/४क | |
| शिवराम शंकर भट | शे. | ... | ... | |
| शिवाजी बाळाजी | शे. | १ | ... | |
| सखाराम तुकाराम | शे. | १९ | ... | |
| सखूजी गोपाळ | शे. | १९ | ... | |
| हजेराव भिवराव | ... | १७ | ... | अजरेकरांचा वाडा, सदाशिव पेठ, पुणें. |
| हिरालाल मोतीलाल | ... | २० | ... | कारकून, सेंट्रल बँक, हॉर्नबी रोड, मुंबई. |

*टीप.—गांवचा नमुना नंबर ७ यांतील कोष्टक ६ मधील धारण करणारा ज्या वेळीं जमीनमहसूल देत नाहीं, व म्हणून त्याचें गांवचा नमुना नंबर ८ यामध्यें खातें नसेल तेव्हां या कोष्टकांत सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर लिहावा.

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

## भाग ४.

### इनाम जमिनींतील फेरफार.

१. वरील टीपा व हुकूम सर्व जमिनींस लागतात. मग त्या जमिनी इनाम असोत अगर नसोत. परंतु इनाम जमिनीचे बाबतींत धारण करणाऱ्याप्रमाणेंच सरकारचाहि तींत हितसंबंध असतो. देवस्थान इनाम धारण करणाराने जमीन विकली आहे व ती खरेदीदाराच्या ताब्यांत आहे इतका तपास अर्थात् पुरेसा होणार नाहीं. शिवाय जरी कांही विक्रया व मोबदले करण्यास मोकळीक असते तरी अशी गोष्ट झाल्यावर सरकारास नजराणा घेण्याचा हक्क असतो व वारसाचे बाबतींत सर्वसाधारण कायदा नेहमीं लागू पडत नाहीं म्हणून खालसा गांवांतील इनाम जमिनीबद्दल व सबंध गांवाबद्दल किंवा गांवचे हिश्श्याबद्दल व इनाम गांवांतील कदीम इनाम जमिनीबद्दल (जर तेथें हक्कनोंदणी लागू असेल तर) फेरफाराचे नियम खालीं दिले आहेत.

जेव्हां एखादा अज्ञान सज्ञान होतो (पॅरिग्राफ ३१, पान ७१) तेव्हां नवीन हक्क प्राप्त झाला आहे असें क्वचितच म्हणतां येईल. इनामांत बाध येत नसल्यामुळें रेवेच्या खालीं लिहिलेले पोट-हिस्सेदाराचे नांवांत बदल झाल्यास तो फेरफार समजतां येणार नाहीं. (पॅरा १९, पान ५९.)

२. जमिनीसंबंधीं सर्व इनामाचे, गांवचा नमुना नंबर ३ यांत, सात वर्ग केले आहेत. प्रत्येक गांवांतील दुसऱ्या वर्गांतील जमिनीचे दोन विभाग केले पाहिजेत, म्हणजे फुली केलेले व फुली न केलेले (सरकार ठराव नंबर ६४०९ सन १९१४). वर्ग २ यांतील विनफुलीचे जमिनीसंबंधीं सर्व फेरफार कुळकर्ण्यानें खालसा जमिनीचे नियमाप्रमाणेंच दाखल करावे. त्याचप्रमाणें खालीं लिहिलेले फेरफार कुळकर्ण्यानें करावे, कारण या फेरफारांत इनामाचा संबंध येत नाहीं :—

सरंजामदाराच्या मिराशी कुळाचे नांवांतील फेरफार, गांव इनाम देण्यापूर्वीपासून ज्यांच्याकडे जमीन आहे असले कबजेदाराचे नांवांतील फेरफार, निरंतरचीं कुळें ज्यांना कूळ या नात्याचा हक्क गांव इनाम दिल्यानंतर प्राप्त झाला आहे, पण तो फार दिवसांपासून मिळाला असल्यानें त्यांची कूळवहिवाट नक्की कधीं सुरू झाली हें समजत नाहीं अशा संबंधाचे फेरफार. (ज. म. का. कलम ८३.) वरील फेरफारांबद्दल त्यांस रिपोर्ट करण्याची जरुरी नाहीं. पण खालसा जमिनीचे फेरफाराप्रमाणें त्यांची तपासणी होऊन ते मंजूर केले जातील.

३. त्याची पद्धत अशी : मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर महिन्याचे अखेरचे दिवशीं कुळकर्ण्यानें गांवचा नमुना नंबर ६ चे दोन सुटे फार्म घ्यावे व तीन महिन्यांत जे फेरफार नोंदले असतील त्या प्रत्येकाची संपूर्ण नकल त्यावर करावी. एका फार्मांत वर्ग ३, ४, ६ व ७ यांतील जमिनीसंबंधीं व दुसरे फार्मांत वर्ग १, २, ५ यांतील जमिनींसंबंधीं फेरफार लिहावेत. फेरफारांमध्यें पुरामुळें गाळ सांचून जमिनींत झालेली वाढ अगर पुरामुळेंच जमीन वाहून गेल्यानें क्षेत्रांत झालेला बदल या दोहोंचाहि समावेश होतो. तसेंच लोकोपयोगी कामाकरितां जमीन संपादन करण्यानें झालेला अथवा दुसरा कोणताहि क्षेत्रांत अगर जुडींत झालेला बदल—आकाराच्या फेरतपासणीमुळें आकारांत हीणारा बदल तेवढा सोडून या सर्वांचा अंतर्भाव फेरफारांत होतो. नवीन जमीन बक्षीस देणें, दिलेल्या सरकाराकडे परत येणें, सरकारी अंमलदाराच्या हुकुमावरून जमीन काढून घेणें (अगर अपीलानंतर घेतलेल्या परत करणें) हे सर्व विशेषत: इनाम वर्ग १, २ आणि ५ मधील फेरफार होत. तसेंच प्रत्यक्ष कबजा नसला तरी गां. न. नं. ७ मधील ८ व्या कोष्टकांत रेवेवर दाखविलेले (पान ५९ व ६०, पॅरिग्राफ २२-२३ पहा) मुख्य धारण करणाऱ्याच्या नांवांतील बदल हेहि फेरफारच होत. अशा माहितीची आवश्यकता आहे असें जेव्हां जेव्हां कुळकर्णी यास वाटेल तेव्हां तेव्हां त्यानें शेरेकोष्टकी टीपा द्याव्या, जसें देवस्थानची नोकरी $\frac{\text{करितों}}{\text{करीत नाहीं}}$, गहाण घेणारा हा तक्षीमेचा $\frac{\text{वतनदार आहे}}{\text{वतनदार नाहीं}}$ ह्या गोष्टीची सत्यता पाहण्यास हें अनवश्यक होणार नाहीं, परंतु चौकशीचे कामी मदत होईल. क्षेत्रांत अगर जुडींत होणाऱ्या फेरफाराची नक्कल करतांना कुळकर्ण्यानें केवळ हिश्शाकरितां नव्हे परंतु सबंध सर्वे नंबराकरितां नवीन आंकडे लिहिले पाहिजेत. [पहा पान ८२, अनुक्रम ६१ (खालसा असला तरी).] फेरफाराच्या या प्रतीवर कोष्टक ३ मध्यें सबंध असलेले जमिनीचे तुकडे येतील व कांहीं प्रसंगीं त्यांची संख्या बरीच असेल.—उदाहरणार्थ, जेव्हां फेरफार एका सबंध गांवच्या किंवा एकाहून जास्त गांवच्या वारसहक्कामुळें होतो त्यावेळीं, परंतु इनाम जमिनींसंबंधीं पेशव्याचें दप्तर व सनदा वगैरेची व इनाम संबंधींच्या कागदपत्रांची व्यवस्था ठेवणारी जी कचेरी आहे तीमध्यें गांवचा नमुना नंबर १ ची अगर ६ ची प्रत नसल्यानें चुका होऊं नयेत म्हणून वर सांगितलेल्या दोन कागदांपैकीं दुसरे कागदाबरोबर कुळकर्णी यानें गांवचा नमुना ७ च्या लागू नोंदीचा उतारा पाठवावा. सबंध गांवचे इनामदार किंवा गांवचा कांहीं ठराविक भाग (उदाहरणार्थ) धारण करणारा पोट हिस्सेदार यांच्या एकंदर जमिनीबद्दल फेरफार असल्यास नक्कल पाठविण्याची जरुरी नाहीं. कुळकर्ण्यानें दोन्ही तक्ते (नमुना नंबर ६ च्या नकला) तक्ता नंबर २ सोबत नमुना नंबर ७ चा उतारा जोडून मामलेदारकडे पाठवावे. बहुतेक तिमाहींत इनामांत फेरफार मुळींच झाले नसतील अगर फक्त एकाच वर्गांत असतील. पहिले अगर दुसरे

इनामांत फेरफार नसल्यास कुळकर्ण्यानें याबद्दल रिपोर्ट करावा, परंतु त्याबद्दल त्यानें कोरे तक्ते पाठवूं नयेत. जमीन नाहीं अशीं गांवें खेरीजकरून बाकी गांवांबद्दल मामलेदार यांनीं एक पत्रक ठेवावें आणि आलेल्या पत्रकांना खुणा करून प्रत्येक कुळकर्ण्यानें दोन तक्ते भरून अगर नसल्यास रिपोर्ट पाठविलें आहेत त्याबद्दल खात्री करून घ्यावी; नंतर त्यांनीं पहिलें पत्रक प्रांतसाहेबांकडे व दुसरें पत्रक कलेक्टरसाहेबांकडे पाठवावें. सकृद्दर्शनीं असें दिसेल कीं, हें काम फार मेहनतीचें आहे, परंतु असें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, बहुतेक तिमाहींत फेरफार मुळींच नसतात व मोठ्या इनाम जमिनी क्वचितच—१२-२० वर्षांतून—एकादे वेळीं तबदील केल्या जातात.

४-९ * * * * * * *

१०. प्रांतसाहेबांनीं तो तक्ता हुकुमासह मामलेदार यांजकडे परत करावा, व मामलेदार यांनीं प्रांताचे साहेबाचे हुकूम कुळकर्ण्यास कळवावे. प्रत्येक गांवास मामलेदार यांनीं साधा हुकूम पाठवावा —

मार्च ३१ पर्यंतचें तिमाही पत्रक.

नहीगांव—फेरफार नंबर १७ : केला.

१८ ते २१ पर्यंत : मंजूर केले, परंतु जोंपर्यंत पूजा केली जाईल तोंपर्यंतच इनाम चालू राहणेचें.

२२ : पुढील हुकूम मिळेपर्यंत तक्रार रजिष्टरांत दाखल कराव्यात.

११. नंतर कुळकर्णी यानें गां. नं. नं. ६ तील त्या त्या फेरफाराच्या नोंदीपुढें हे हुकूम दाखल करावेत व प्रांतसाहेबांनीं कळविल्याप्रमाणें कांहीं अटी असल्यास त्याही त्या त्या फेरफाराच्या नोंदींत नमूद कराव्यात. हक्क देणाराचे मरणानंतर जमीन वतनदाराचें वराण्यांत परत जाते. ही गोष्ट ताबिगहाण खतांची भरपाई करून तें सोडविण्याचा हक्क असण्यासारखी आहे. या नोंदीची त्यास पान ३९ पॅरिग्राफ ५ यांत सांगितलेली चौकशी करण्यास पुढील फेरफारांत मदत होईल.

१२-१४. * * * * * * *

१५. फेरफाराबद्दल रिपोर्ट केल्यानंतर इनाम खालसा करण्याबद्दल, मोबदला रद्द करण्याबद्दल अगर अशाच तऱ्हेचें हुकूम आल्यास या हुकुमांची अंमलबजावणी केल्यावर पुन्हा हे नवीन फेरफार समजून कुळकर्णी यांनीं नमुना नंबर ६ यांत नोंद करावी व त्याबद्दल नेहमींप्रमाणें तिमाही रिपोर्ट करावा. यावरून पूर्वीचे हुकुमाचा अंमल झाला आहे कीं नाहीं हें स्पष्ट समजेल. प्रांत व कलेक्टर यांनीं असे रिपोर्टांवर नजर ठेवावी व हुकुमाप्रमाणें अंमल न झाल्यास जरूर ते हुकूम द्यावे.

१६. तिमाही पत्रकाची ही तपासणी व ज्यामधील लागू बाबतीची खात्री केली पाहिजे अशा प्रकरणाची निवड यामुळें संशयातीत अगर सार्वजनिक हितसंबंधास बाध न आणणाऱ्या बाबतींतसुद्धां पूर्वीचे पद्धतींत जसें प्रत्येक फेरफाराबद्दल निरनिराळें रिपोर्ट करून, प्रकरणें सुरू करून, चौकशी करावी लागत असें तसें आतां करण्याची आवश्यकता नाहीं. त्या पद्धतींत नोंदलेले कबजेदाराबद्दलच चौकशी केली जात असे. त्याचे पोट-हिस्सेदार अगर त्यानें ज्यांना जमीन तबदील करून दिली अशा इसमांची चौकशी केली जात नसे. परंतु या हक्क नोंदणीवरून कबजेदार कोण आहे हें आपणास समजलें. तसेंच कोणत्याहि प्रकारच्या इनाम जमिनी तबदील झाल्यास ज्यास इनाम जमिनी कबज्यांत ठेवणेचा अधिकार नाहीं असें इसमाचे ताब्यांत इनाम जमीन आहे कीं काय हें सरकारास ताबडतोब समजतें म्हणून गांवचा नमुना नंबर ३ यांत दर्शविलेप्रमाणें तेथें हल्लींच्या मुख्य धारण करणाराचें अगर कबजेदाराचें नांव दाखल करण्याचें बंद केलें आहे. तसेंच वारसामुळें अगर मोबदल्यामुळें होणारे फेरफार त्या रजिष्टरांत दाखल करण्याचें यापुढें बंद केलें आहे. या सर्व बाबतींचा समावेश आतां हक्कनोंदणीपत्रकामध्यें होईल.

---

## भाग ५.

### इतर अमलदारांचीं कामें.

१. पाटील.—हक्काचें पत्रक चालू तारखेवर ठेवण्यास पाटलानें कुळकर्णी यास मदत केली पाहिजे. फेरफाराचे रजिष्टरांत कुळकर्णी यानें केलेल्या प्रत्येक नोंदीवर नोंद केल्याबरोबर त्यानें सही करण्यास हरकत नाहीं. खोट्या नोंदी न होऊं देणेचें बाबींत पाटलाची स्थानिक माहिती हा एक सुरक्षितपणा आहे.

२. संबंध असणाऱ्या इसमावर कुळकर्णी किंवा सर्कल-इन्स्पेक्टर यांनीं काढलेल्या नोटिसा किंवा हुकूम बजावणें आणि वरिष्ठ अंमलदार पत्रक तपासतील तेव्हां, लोकांनीं त्यांस मदत करणें जरूर असेल तेव्हां, त्यांस बोलावण्याचीं पाटलाचीं कर्तव्यकर्मे आहेत. तसेंच जे जे व्यवहार त्याचे नजरेस येतील ते ते कुळकर्ण्यानें बरोबर नोंदलें आहेत हेही

त्यानें पाहिलें पाहिजे. हें सर्व करून, शिवाय त्यानें हक्काचे पत्रकाची माहिती लोकांत प्रसिद्ध करून, त्यासंबंधानें लोकांस काय जबाबदाऱ्या आहेत हेंही त्यांस माहीत करून दिलें पाहिजे. जबाबदाऱ्या थोडक्यांत सांगावयाच्या म्हणजे ह्या कामी, जमिनीच्या प्रत्येक कबजेदारानें किंवा कुळानें—

(१) जमिनीवरील कोणताहि हक्क संपादन केल्याच्या किंवा तिचेवरील बोजे कमी झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांचें आंत रिपोर्ट केला पाहिजे.

(२) पत्रक तयार करण्याकरितां किंवा फिरून लिहिण्याकरितां गांवचे कुळकर्ण्यापुढें तो मागेल ती माहिती किंवा हजर करण्यास सांगेल ते दस्तऐवज एक महिन्याचे आंत हजर केले पाहिजेत.

३. प्रत्येक रयत इसमानें आपले कबज्यांतील प्रत्येक जमिनीचे तुकड्याचा सारा आपण स्वतः किंवा आपल्या गुमास्त्यामार्फत भरण्याची फार काळजी घ्यावी म्हणून त्यास बजावलें पाहिजे. तो तसें न करील तर ती जमीन दुसऱ्या कोणाचे तरी नांवें लावली आहे असा बहुधा अर्थ होईल. खरा प्रकार समजून घेण्याची त्याची इच्छा असेल तर हक्कनोंदणीचे पत्रकाची नोंद त्यास दाखविणें कुळकर्ण्यास भाग आहे व गांवचा नमुना नंबर ८ ची नक्कल, (खाते उतारा) ही त्यास मिळूं शकेल.

४. फेरफाराचें रजिष्टर कसें लिहावें हे हाताखालचे कुळकर्ण्यास माहीत आहे व त्यास समजूत व वटहुकूम मिळाले आहेत हें सर्कल-इन्स्पेक्टरनें पाहिलें पाहिजे. समजुती वटहुकूम यांतील प्रत्येक तपशिलाप्रमाणें काम चाललें आहे हें पहाणेची जबाबदारी त्याच्यावर आहे. वर वर्णन केलेल्या जबाबदाऱ्या लोकांस कळल्या आहेत हें समजणेसाठीं त्यांच्याशीं दळणवळण ठेवणेची तसदी त्यानें घेतली पाहिजे. केलेली प्रत्येक नोंद तपासून तो बिनचूक असल्याबद्दल आपली खात्री झाल्यावर आपलें समाधान झाल्याची खूण म्हणून तारीख घालून आद्याक्षराची छोटी सही करणें हें त्याचें कर्तव्यकर्म आहे. हक्काचे नामधारी संपादकास नुसते प्रश्न विचारून सर्कल-इन्स्पेक्टरची खात्री होणें शक्य नाहीं. तर जमीन तबदील करून देणारास व जमिनींत ज्याचा पूर्वी हितसंबंध होता असें पूर्वीच्या पत्रकांवरून दिसून येईल अशा इसमासही प्रश्न केले पाहिजेत. तबदील करून देणारा अथवा त्याचा प्रतिनिधी अगर ज्याचा हक्क कमी झाला आहे तो सदरहू नोंद बरोबर आहे असें कबूल करीत असेल तर सर्कल-इन्स्पेक्टर यांनीं आद्याक्षराचे सहीचे वरचे बाजूस तसा शेरा लिहिला पाहिजे. तपास केल्यावर एकादी नोंद चुकीची आढळली तर मिळालेल्या माहितीवरून जी बरोबर आहे असें त्यास दिसेल अशी नवी नोंद त्यानें केली पाहिजे. परंतु असें करितांना जुन्या नोंदीचा कोणताहि शब्द अगर अंक खरडून काढूं नये तर ज. म. का., कानू १०६, (१९२१) यांत सांगितल्याप्रमाणें बरोबर करावें व नोंदीबद्दल सर्व लोकांस कळेल अशी नोटीस देण्यांत कुळकर्ण्यानें हयगय केली असेल तर त्या नोंदीची नक्कल योग्य रीतीनें प्रसिद्ध कण्याची तजवीज केली पाहिजे. अशा तजविजीमुळें एखादी तक्रार उत्पन्न झाली तर तिची हकीकतही त्यानें तक्रारीचे रजिष्टरांत नोंदून ठेविली पाहिजे.

५. झालेली प्रत्येक नोंद बिनचूक झाली आहे एवढेंच पाहाण्याचें काम त्याचें आहे असें नाहीं तर पत्रक चालू तारखेपर्यंत भरलेलें आहे म्हणजे ज्या नोंदी करण्यास पाहिजे होत्या त्या गाळल्या नाहींत अशाबद्दल खात्री करून घेणें हेंही त्याचें काम आहे. हें तपासण्याच्या पुष्कळ रीती आहेत, त्यापैकीं खालीं दिलेल्या रीतींकडे लक्ष द्यावें :—

(१) कबजेदार व इतर हक्कदार यांच्या मृत्यूमुळें होणारे फेरफार योग्य रीतीनें नोंदले गेले आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां जन्ममृत्यूचें रजिष्टर व खात्याची नांववार अनुक्रमणिका हीं दोन्हीं ताडून पहावीं. गांवांतील लोकांस ही अनुक्रमणिका वाचून दाखवावी म्हणजे मयत झालेले कबजेदार दुसरे गांवचे असतील त्यांचीं नांवें समजतील.

(२) कबजेदाराचे कबजांत असलेले दरएक नंबरासंबंधानें त्या नंबरावर कांहीं बोजा झालेला आहे कीं काय किंवा बोजाची फेड झाली आहे कीं काय अगर दुसरा कांहीं फेरबदल झाला आहे कीं काय याबद्दल प्रत्येक कबजेदाराची तपशीलवार चौकशी करावी.

(३) फेरफार योग्य रीतीनें नोंदले आहेत हें पाहाणेसाठीं नोंदणीखात्यांतील उतारे, कमीजास्ती पत्रकें व तगाईचे शेरे (तगाई न. नं. २) तपासावे.

(४) नोंदीची नक्कल प्रसिद्ध करून तिच्यासंबंधानें तक्रार करण्यास पूर्ण सवड देण्यांत आली होती व तक्रारीच्या सर्व बाबी तक्रारीच्या रजिष्टरांत दाखल केल्या आहेत अशाबद्दल त्यानें पाहिलें पाहिजे.

(५) पॅरा ३६ (ब) व पॅरा ४०, पानें ७३, ७५ यांत सांगितल्याप्रमाणें पक्षकाराकडून मिळालेले दस्तऐवज तातडीनें परत करण्यांत येत आहेत हें त्यानें पाहावें.

(६) वारसासंबंधींच्या चौकशीकडे त्यानें विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. अशा शिलकी कामाची व तक्रारी प्रकरणांची संख्या फार मोठी असेल तर ती गोष्ट त्यानें मामलेदाराचे नजरेस आणिली पाहिजे.

(७) एका गांवांतील जमिनीचे बरेचसे कबजेदार शेजारच्या गांवीं रहात आहेत असें पुष्कळदां आढळतें; अशा बाबतींत जेव्हां सर्कल-इन्स्पेक्टर शेजारच्या गांवीं जातील तेव्हां अशा चौकशीच्या कामाकरितां येत आहेंत अशी योग्य नोटीस त्या गांवचे लोकांस देऊन आधीच्या गांवाचें पत्रक त्यानें आपल्याबरोबर घेऊन जावें.

(८) इनाम जमिनीच्या फेरफाराच्या नक्कला कुळकर्ण्यानें पाठविल्या आहेत अशाबद्दल काळजी घेतली पाहिजे.

(९) कुळकर्ण्यास देणेचे हुकूम पुढें त्यानें त्याप्रमाणें तजवीज करावी म्हणून गांवचे तपासणी वहींत लिहून ठेवूं नये, परंतु शक्य तेवढ्या प्रकरणांत त्यानें त्याप्रमाणें स्वतःच सर्व तजवीज करावी. सर्वसाधारण हुकूम पुढें मार्गदर्शक व्हावेत म्हणून, अगर ज्या गोष्टी कुळकर्ण्यावर सोंपविल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशा बाबती तेवढ्या वहींत लिहाव्या.

६—१९. * * * * * * *

२०. जुलई महिनाअखेर हक्कनोंदणीच्या कामाची वस्तुस्थिति आंकडे देऊन दिग्दर्शित करणारें खालीं लिहिलेल्या तपशिलाचें पत्रक प्रत्येक गांवाहून मामलेदार यांनीं मागवून जमा करावें. हा एक प्रकारचा वार्षिक अहवालच होईल व हा प्रांत, कलेक्टर व सुपरिंटेन्डेंट, लँड रेकॉर्ड, यांचे रिपोर्टासाठीं उपयोगी पडेल. याबद्दल कुळकर्णी यांचेकडून कोणताहि लेखी रिपोर्ट मागूं नये, परंतु जे वेळीं गांवचे हिशेब पुरे होऊन तालुक्याचे हिशेब त्यावरून करितात ते वेळीं ही माहिती गोळा करावी. नवीन बिनमोजणी हिश्शाची मोजणी करणेबद्दल प्रांतसाहेब, डि. इन्स्पेक्टर यांचे संमतीनें व्यवस्था करतील. ही माहिती खालीलप्रमाणें तयार करावी :—

| | | मौजे अ. | मौजे ब. | मौजे क. | बेरीज. |
|---|---|---|---|---|---|
| अ. | फेरफाराची संख्या. ... | ४२ | | | |
| | १. पैकीं तक्रारी नोंदी (मागील शिलकेसुद्धां) ... | ३ | | | |
| | २. प्रांत, मामलेदार व डि. इन्स्पेक्टर, लँड रेकॉर्ड, यांनीं निकाल केलेल्या नोंदी. | २ | | | |
| | ३. सालअखेर शिलकी तक्रारी नोंदी ... | १ | | | २२ |
| ब. | १. झाले दंडाच्या नोंदी (शिलकेसुद्धां) ... ... | ८ | | | |
| | २. पैकीं वसूल ... ... ... | ७ | | | |
| | ३. बाकी शिल्लक ... ... ... | १ | | | ४ |
| क. | १. नवीन पोट-हिस्से झालेल्या नोंदीची संख्या (शिलकेसुद्धां) | ३ | | | |
| | २. पैकीं निकाली ... ... ... | १ | | | |
| | ३. बाकी शिल्लक ... ... ... | २ | | | ३२ |
| ड. | १. वारसाचे नोंदीची संख्या (शिलकेसुद्धां) ... | १० | | | |
| | २. पैकीं निकाली ... ... ... | १० | | | |
| | ३. बाकी शिल्लक ... ... ... | ० | | | २ |

जुलै महिन्यांत कुळकर्णी गांवचा नमुना नंबर ९ ची तालुका नमुना नंबर ४ शीं रुजुवात करणेसाठीं येतात ते वेळीं ही माहिती भरून द्यावी व ती प्रांतसाहेब यांजकडे तारीख १५ ऑगष्टचे आंत पाठवावी. शिलकी नोंदी फार सांचल्या असतील तर त्याचीं कारणें द्यावीं व त्या निकाल करणेसाठीं काय तजवीज केली पाहिजे याबद्दल आपला अभिप्राय कळवावा. अ (१), ब (१), क (१), ड (१), पैकीं सर्व शिल्लक नोंदी कुळकर्ण्याच्या माहितीप्रमाणें कोष्टक (३) यांत शक्य तितक्या बरोबर दाखविल्या जाव्या म्हणून मागील सालचे शिलकी नोंदी धरून घ्याव्या, म्हणजे ३१ जुलै १९२५ चे सुमारास हें पत्रक लिहिते वेळीं तारीख ३१ जुलै १९२४ रोजीं शिल्लक असलेल्या नोंदी धरून घ्याव्या, म्हणजे कोष्टक २ यांतील निकाल झालेल्या नोंदी यांपैकीं अगर जुन्यांपैकीं असा भेद न ठेविता सर्व धरण्यांत येतील.

दर पांच वर्षांनीं म्हणजे १९२५–१९३० वगैरे सालीं आणखी कोष्टकें लिहून माहिती गोळा करावी ती—

(१) नमुना नंबर ७ यांतील निरनिराळ्या तुकड्यांची (नोंदीची) संख्या,

(२) नमुना नंबर ८-अचे खात्यांची संख्या,

म्हणजे त्यावरून एकंदर नोंदीशीं फेरफाराच्या नोंदीचें, वारसाचे, दंडाच्या नोंदीचें काय प्रमाण बसतें तें समजेल.

## भाग ६.

### जमिनीच्या अनुक्रमणिकेंतील दुरुस्ती.

१. अमुक एका तारखेपर्यंतच्या सर्व फेरफाराच्या नोंदी तपासून मंजूर झाल्यावर कुळकर्णी यानें गांवचा नमुना नंबर ७, जमिनीची अनुक्रमणिका, शाईनें दुरुस्त करण्यास लागावें. नमुना नंबर ६ यांत नोंद करतेवेळीं नमुना नंबर ७ यांत हलके पेन्सिलीनें त्याची दुरुस्ती लिहावी व नमुना नंबर ६ यांतील अनुक्रम नंबर पेन्सिलीनें लिहावा. फेरफाराची खबर मिळाली असून तो फेरफार नजरेस न येतां गा. न. नंबर ७ ची नक्कल देणें, किंवा मयत झालेल्या इसमाकडे, अगर ज्या इसमाचा जमिनींत संबंध उरला नाहीं, अशा इसमाला, जमीनबाबेची नोटीस देणें यासारख्या नजरचुका होण्याचा संभव राहूं नये म्हणून ही आगाऊ तजवीज आहे. तपासणीनंतर फेरफाराची नोंद, वस्तुस्थितीस सोडून आहे असें दिसून आल्यानें रद्द झाली तर नमुना नंबर ७ यामधील पेन्सिलीची नोंद रबरानें पुसून टाकावी, व यामुळें खरडून न काढण्याच्या नियमास बाध येत नाहीं. नमुना नंबर ७ ची नक्कल मागितली असतां त्यावेळीं फेरफाराची नोंद मंजूर झाली नसेल तर कुळकर्णी यानें फेरफाराच्या पूर्वी जशी नोंद असेल तशी नोंद द्यावी व त्याखालीं टीप द्यावी कीं, "फेरफार अनुक्रम नंबरवरून अ ब चे ऐवजीं ल. म. चें नांव लागलें आहे परंतु या नोंदीसंबंधीं चौकशी व्हावयाची आहे." जर वसुलाचा हंगाम नजीक नसेल तर गा. न. नं. ८-अ मध्यें ताबडतोब फेरफार करूं नये. कुळकर्णी यानें नोंद तपासून मंजूर होईपर्यंत वाट पहावी, परंतु वसुलाचा हंगाम नजीक असल्यास अगर सुरू असल्यास फेरफाराबद्दल माहिती मिळाल्यावर त्या फेरफाराचा वसुलाशीं संबंध येत असेल तर (खातेदाराकडील येणें) फेरफाराची नोंद केल्याबरोबर त्याचें नांव दुरुस्त करावें, व येण्याची रक्कम दुरुस्त करावी. जर पुढें तपासणींत फेरफाराची नोंद फिरली तर ८-अ दुरुस्त करावा. नोंदीची खरी चांचणी म्हणजे जमिनीवरील सारा नवीन कबजेदार देतो किंवा नाहीं, व जुना कबजेदार तो सारा देण्याची जबाबदारी सोडतो किंवा नाहीं हें पाहाणें ही होय. अवल कारकून, मामलेदार अगर दुसरा कोणी अंमलदार यांनीं नमुना नंबर ६ च्या नोंदी मंजूर करून त्यांवर सह्या केल्यावर मग कुळकर्णी यानें खालील नियमास अनुसरून नमुना नंबर ७ दुरुस्त करावा :—

(अ) नमुना नंबर ७ यांतील कोणतेहि शब्द, अंक अगर नांवें खरडून काढण्याचीं नाहींत.

(ब) जें नांव, शब्द अगर अंक कायम ठेवण्याचे नाहींत त्यांवर मधून रेघ ओढून ते अशा रीतीनें खोडावे कीं, पूर्वीची मजकूर चांगला वाचतां यावा.

(क) जें नांव, शब्द अगर अंक खोडले असतील त्याखालीं नवीन नांव, शब्द व अंक लिहावे अथवा पुरेशी जागा नसेल तर बाजूस लिहावे; ते अशा रीतीनें लिहावे कीं, नवीन मजकूर कशाचे बदला लिहिला आहे हें स्पष्ट समजावें.

(ड) नवीन लिहिलेलें नांव, शब्द व आंकडे यासमोर कोष्टक ७ अगर ९ यांत नमुना नंबर ६ च्या ज्या नोंदीमुळें हा फरक झाला आहे त्या नोंदीचा नंबर लिहावा.

(ई) यांतील लिहिलेलें नवीन नांव अगर अंक यांत पुढील फेरफारानें पुन्हा बदल होईल तर याप्रमाणेंच तजवीज करावी.

(फ) जर फेरफारामुळें पूर्वीचें नांव अजीबात कमी होऊन त्याऐवजीं दुसरें कांहीं लिहावयाचें नसेल तर (ब) मध्यें सांगितल्याप्रमाणें तें खोडावें. नवीन कांहीं लिहूं नये. (पहा सर्व्हे नंबर १ अ-३, कोष्टकें ८, २ व ४.)

नमुना नंबर ७ च्या नोंदी आरंभीं लिहितांना मूळच्या नोंदीखालीं निदान एक फेरफारापुरती जागा सोडून लिहिलेल्या असतात. चांगला व्यवस्थेनें लिहिणारा दरम्यान निदान दोन फेरफार लिहूं शकेल. परंतु याहून जास्त फेरफार झाल्यास खालील युक्तीचा अवलंब करावा :—

(१) नमुन्याच्या इतर कोष्टकांत पुष्कळ कोरी जागा असते. तेथें नवीन नांव, शब्द अगर अंक लिहावे आणि रद्द केलेल्या मजकुरापुढें चिन्हानें दर्शवावें.

(२) नमुना नंबर ७ च्या एक दोन पानांत वर सांगितलेल्या युक्तीचा अवलंब करण्याइतकीहि जागा न मिळाली तर नवें पान अगर पानें घालावी. भरलेल्या पानांतील शेवटची नोंद नवीन पानावर घ्यावी व पुढील फेरफार या नवीन घातलेल्या पानांत दाखल करावे

---

## भाग ७.

### अनुक्रमणिका पुन्हां लिहिणें.

१. बरीचशीं पानें याप्रमाणें भरल्यावर प्रांतसाहेब यांनीं सबंध नमुना नंबर ७ पुन्हां लिहिणेबद्दल हुकूम द्यावेत. नमुना नंबर ७ पहिल्यानें तयार करतेवेळीं, १ ऑगष्ट १९०८ रोजीं असले स्थितीप्रमाणें नमुना दिला आहे. त्यानंतर ४ वर्षांतील फेरफार धरून तारीख १ एप्रिल १९१३ रोजीं असले स्थितीप्रमाणें नमुना नंबर ७ यांत दुरुस्ती करून पान ८२ वर छापला आहे. त्यांतील पहिले पानांत वारंवार फेरफार झाले आहेत. इतर पानांवर फारच थोडे फेरफार

[illegible] सबब तीं पानें पुन्हा लिहिण्याची जरूरी नाहीं. परंतु पहिल्या पानांतील नोंदी नवीन पानावर [illegible] लिहिण्यास हरकत नाहीं. कारण त्यांत फेरफार लिहिण्यास जागा उरली नाहीं. तारीख १ ऑगष्ट १९१२ रोजीं नहीगांव येथील पहिलें पान कसें दिसेल, त्याचा शिळा छापखान्यांत छापलेला नमुना पुढें दिला आहे. (पान ९३ ड. पहा.)

* * * * * * * *

२. गांवचा नमुना नंबर ७ पुन्हां लिहून काढणेचा हुकूम झालेनंतर खालीलप्रमाणें तजवीज करावी :—

(१) कुळकर्णी यानें नमुना नंबर ६ यांत शक्य तितके सर्व फेरफार दाखल झाले आहेत असें पहावें.

(२) यांतील बहुतेक सर्व मंजूर केले आहेत असें पाहावें.

(३) नंतर त्यानें ७ दुरुस्त करावा.

(४) नजरचूक होऊं नये, अगर एखादी नोंद गळली जाऊं नये म्हणून नमुना नंबर ७ यांतील कोष्टक ७ व ९ यांत दाखल केलेले नमुना नंबर ६ च्या नोंदींचे अनुक्रम नंबर बरोबर आहेत कीं, नाहीं हें तपासावें; तसेंच नमुना नंबर ६ ची प्रत्येक नोंद नमुना नंबर ७ यांत आली आहे किंवा नाहीं हें तपासावें.

(५) त्यानें नमुना नंबर ७ पुन्हां लिहितांना खोडलेला मजकूर गाळून शेवटची स्थिति दाखविणाऱ्या तेवढ्याच नोंदी लिहाव्यात.

(६) अनुक्रमणिका पुन्हां लिहितांना जरी शेवटच्या नोंदींतील क्षेत्र, आकार व नांवें लिहिलीं असलीं तरी फेरफाराचे सर्व नोंदींचे नंबरहि कोष्टक ७ व ९ यांत लिहिले पाहिजेत. पूर्वीच्या नोंदींच्या माहितींचा सांखळी जुळावी म्हणून असें लिहिणें महत्त्वाचें आहे. ३० वर्षांनंतर कदाचित जुन्या नोंदींत महत्त्व राहणार नाहीं म्हणून अमूक एका एका वर्षाच्या पूर्वीच्या ३० वर्षांचे मागील अनुक्रम नंबर कोष्टक ७ व ९ यांत लिहूं नये, असा हुकूम न. नं. ७ पुन्हां लिहितांना कलेक्टरसाहेब यांनीं देण्यास हरकत नाहीं; उदाहरणार्थ, एप्रिल १९४३ मध्यें नहीगांवची अनुक्रमणिका पुन्हां लिहितांना अनुक्रम नंबर ८० च्या पूर्वीच्या नोंदींचे नंबर लिहूं नयेत असा हुकूम कलेक्टरसाहेब यांनीं देण्यास हरकत नाहीं.

(७) नवीन नक्कल जुन्या प्रतीसह प्रांतसाहेब यांचेकडे सहीला पाठवावी. नंतर प्रांतसाहेब यांनीं अनुक्रमणिका पुन्हां लिहिली आहे, कोणास पाहाणें असल्यास पाहावी व कांहीं हरकती असल्यास दाखवाव्या, अशी जाहीर नोटीस गांवांत प्रसिद्ध करावी (ज. म. का., क. १११).

(८) अनुक्रमणिका पुन्हां लिहिल्यानंतर लिहितेवेळीं कांहीं वगळलेला मजकूर पुन्हां लिहिला असल्यास व लिहिलेला मजकूर खोडून त्याच्यावर दुसरा लिहिला असल्यास अशा चुका ज्या हिश्शासमोर झाल्या असतील त्या हिश्शाचे नंबर व कोष्टकें शेवटीं नमूद करावीं. नाहीं तर अशी दुरुस्ती मागाहून लबाडीनें कोणीं दाखल केली असेल अशी शंका येईल. अथवा हेतुपुरस्सर नवीन अयोग्य दुरुस्ती करून लिहितेवेळीं ही दुरुस्ती झाली होती अशी सबब कुळकर्णी आणूं शकेल. शेवटीं पुरें झाल्याची तारीख दाखल करावी.

नमुना नंबर ७ बिनचूक व स्वच्छ लिहिला आहे याची खात्री करणेसाठीं प्रांतसाहेब यांनीं न. नं. ७ पैकीं शेंकडा १० नोंदी हाताखालच्या लोकांकडून तपासून घ्याव्या.

---

## भाग ८.

### नकला वगैरे देणें.

१. नमुना नंबर ६ पुरा करणें अगर त्याची नक्कल करणें असा प्रसंग केव्हांच येणार नाहीं. परंतु जेव्हां कोणी अंमलदार विवक्षित तारखेपर्यंतच्या नोंदा तपासून मंजूर करताल तेवेळीं ते खुजनाम्यावर तारीख घालून सही करतील व नोंद नंबर—पर्यंतच्या सर्व नोंदी तपासून मंजूर केल्या आहेत असा शेरा लिहितील. नमुना नंबर ६ चें पुस्तक भरल्यामुळें नवीन पुस्तक सुरू करणें झाल्यास जुने पुस्तकावर शेवटचे नोंदीअखेर दाखला देऊन मंजुरी घ्यावी व (त्यांतील सर्व नोंदीं नमुना नंबर ७ यांत दाखल केल्यानंतर) १२ महिन्यानंतर तें पुस्तक तालुक्याच्या दप्तरांत (अ-कायम) राहणेसाठीं पाठवावें.

* * * * * * * *

२. नमुना नंबर ६ व नमुना नंबर ७ कोणतेहि वेळीं पाहाणेचा व त्यावरून दाखले, नकला मागणेचा लोकांस हक्क आहे व तसेंच वारसाचें रजिष्टरवरून अगर तक्रारीवरूनहि नकला मागणेचा हक्क आहे, परंतु या नकला अपुरे नोंदीबद्दल देऊं नयेत. यांचीं उदाहरणें म्हणजे हीं: वारसाचे अगर तक्रारी रजिष्टरचे नोंदीवर कोणा अंमलदाराचा

हुकूम झाला नाहीं अशी नोंद, अगर तपासून कायम न केलेल्या फेरफारावरून नमुना नंबर ७ यांत पेन्सिल[illegible] फेरफाराची नोंद. अशा नोंदीबद्दल कोणास तक्रार करणें असल्यास अगर तक्रारी नोंदीबद्दल मामलेदार या[illegible] कळविणें असल्यास ते गांवीं चौकशी करणेसाठीं जेव्हां येतील तेवेळीं त्यानें हजर राहाणेची खबरदारी घ्यावी. अ[illegible] कागदावरून नकला देऊं नये. (सरकार ठराव ५१३८-९३ पहा.)

३. जमिनीसंबंधीं प्रत्येक फिर्यादीचे अर्जाबरोबर हक्कनोंदणीचा उतारा हजर करावा लागतो या व इतर कारणास[illegible] नकला कुळकर्णी यानें ताबडतोब फी घेऊन द्याव्या. तलाटी असला तरी ही फी घेण्याची त्यास परवानगी आहे (ठ. ९२५०-१५) (ठ. ७६६९-८४) याबद्दल रूजू फी घेणेची नाहीं.

४. हल्लींची फी नोंदीबद्दल ०-१-० व छापील नमुन्याबद्दल ०-०-३ अशी आहे (ठ. नं. ८७७-१४-१४८९-१५ ज. म. का. ची रूढी). नकलेबद्दल तोंडी अर्ज असल्यास त्यास कोर्ट फी माफ आहे. तसेंच, कोणतेहि कारणास[illegible] कुळकर्णी याजकडेस लेखी अर्ज दिल्यास त्यास कोर्ट फीची माफी आहे (ठ. १४२१-१६). त्याहून वरिष्ठ अंमलदाराकडे कोर्टात दाखल करणेसाठीं नकला मागितल्यास त्यांवरहि कोर्ट फी माफ आहे (ठ. ८८५६-०-३).

५. * * * * * * *

नमुना नंबर ८-अ हा कोष्टक ६ च्या नोंदीबद्दल वर्णानुक्रमानें विल्हेवारी आहे. परंतु नांवाबद्दल शिवा[illegible] एक वर्णानुक्रमानें विल्हेवारी ठेवणें सोईचें असतें असें सर्वत्र आढळून आलें आहें. त्यानंतर मग कोष्टक [illegible] यांतील नांवाचीही विल्हेवारी ठेवावी. अशी विल्हेवारी तयार करणेची अतिशय जलद व उत्तम पद्धत म्हणजे ही की प्रत्येक नांव कागदाचे तुकड्यावर लिहावें व नमुना नंबर ७ यांतील नांवावरून हयात असलेले प्रत्येक इसमाचें नांव लिहून झाल्यावर ते सर्व तुकडे गोळा करून वर्णानुक्रमानें विल्हेवारीनें लावावेत व त्या अनुक्रमानें विल्हेवारी सहज लिहितां येई[illegible] कोष्टक ६ व ८ बद्दल एकच विल्हेवारी ठेवावी. पुष्कळ इसमांचीं नांवें दोन्ही कोष्टकांत येतील म्हणून प्रत्येक इसमासमो[illegible] कोष्टक ६ अगर ८ यांतील नोंदीचा नंबर लिहावा. विल्हेवारींतील इसम शेतकरी आहेत अगर बिनशेतकरी आहेत [illegible] लिहिलें पाहिजे, म्हणून सरकारी हुकूम आहेत. ही माहिती जिल्ह्याचा न. नं. ६ साठीं व इतर कारणासाठीं लाग[illegible] शेतकरी याची व्याख्या बरोबर झालेली नाहीं. (सरकार ठराव नं. ६९४९-२८-६-१५ प्रमाणें) ज्याचा मुख्य धंदा शेतीचा आहे त्यास शेतकरी म्हणावें, मग तो स्वतः शेतकी करो अगर दुसऱ्याकडून करवो. प्रत्येक शेतकऱ्यासमोर (शे[illegible] असें लिहिल्यावर बाकीचे इसम—म्हणजे ज्यांचे नांवावर कांहीं लिहिलें नाहीं ते बिगरशेतकरी समजणेस अडच[illegible] पडणार नाहीं.

६. शेतसारा देणारा कोणी इसम इतर ठिकाणीं राहात असेल (जसें मुंबई अगर कलकत्ता) तर त्याच्या कायमचा पत्ता या विल्हेवारींत शेरेकोष्टकीं लिहून ठेवावा, म्हणजे त्यास नोटीस वगैरे टपालानें पाठविणेस उपयोगी पडे[illegible] (८२ पानावरील विल्हेवारी पाहा).

---

## गांवचा नमुना नंबर ७/१२ एकीकृत

तीन नमुने आतां एका पानावर एकत्र करण्यांत आले आहेत ते खालीलप्रमाणें :—

(१) गां. न. नं. ७, १९२२ मध्यें सुधारल्याप्रमाणें (मॅक्स्वेल पद्धत).

(२) गां. न. नं. १२ मधील पूर्वीचा कूळवहिवाटीबद्दलचा भाग (आतांचा गां. न. नं. ७-अ).

(३) पीकपहाणीपत्रक, पूर्वीचा गां. न. नं. १२.

या एकीकरणामुळें पुष्कळ श्रम व जागा वांचेल; कारण गां. न. नं. ७ मधील पुष्कळ गोष्टी गां. न. नं. १२ (पीकपहाणी व कुळवहिवाटी पत्रकांत) पुन्हां लिहाव्या लागत.

या तिहेरी एकत्र केलेल्या नमुन्याचा वरील भाग हा गां. न. नं. ७ आहे. एक पान एकाच जमीनविभागाबद्द[illegible] (पान १२४-ब पहा) उपयोगांत आणलें आहे. तगावी, गहाण सोडवण्याचा हक्क, जमीन परत घेण्याचा हक्क, वगैरे हक्क धारण करणाऱ्याचे बाबत टीप लिहिणेकरतां जागा रिकामी सोडली आहे. ज्या ठिकाणीं "रेघेच्या वरील हक्क" अगर "रेघेखालील हक्क" असतील तेव्हां रेघ ओढावी (पॅरा २२-२३ व पान ५९ पहा). सर्व फेरफार ज्याप्रमाणें पूर्वी गां. न. नं. ६ मध्यें लिहिल्याबरोबर जुन्या गां. न. नं. ७ (१९२२ सालच्या) मध्यें लिहीत, त्याचप्रमाणें आतांहि या नवीन नमुन्यामध्यें लिहिल्या पाहिजेत. जर पुढें एखादी चूक आढळून आली तर, नेहमींप्रमाणें गां. न. नं. ६ मध्यें प्रथम दुरुस्ती करून गां. न. नं. ७ मध्यें दुरुस्ती करावी. अर्जदारानें हक्कनोंदीचा उतारा मागितला तर हल्लीच्या नमुन्याच्या वरील भागाची नक्कल देण्यांत येईल. कूळवाहवाटीबाबत व पिकाबाबतच्या नोंदी मुद्दाम मागितल्या तरच देण्यांत येतील.

[illegible]कदा फेरफार करण्यांत येईल तेव्हां रद्द करण्यांत आलेलें नांव अगर माहिती ही कंसांत लिहून नवीन नांव [illegible]ही योग्य ठिकाणीं लिहावी. फेरफार नंबर हा नवीन नोंदीपुढें लिहून त्याच्या भोंवतीं नमुन्यांत दाखविल्याप्रमाणें एक वर्तुळ काढावें. सहा निरनिराळ्या तऱ्हेचीं उदाहरणें घेतलीं आहेत. त्यावरून असें दिसून येईल कीं, ज्याप्रमाणें गां. न. नं. ७ ( जुना कॉलम असलेला ) व त्यावरून गां. न. नं. ६ मधून सर्व माहिती मिळत असे. त्याप्रमाणें आतांहि ती सर्व माहिती मिळेल. पण स. नं. १-अ, हिस्सा ३, यांत कायम कुळाची माहिती कशाप्रकारें लिहावी हें दाखवण्यांत आलें आहे. ( या पूर्वीचे हक्कनोंदीचे पत्रकांत कायम कुळांचीं उदाहरणें आलीं नव्हतीं. )

जरी गां. न. नं. ८-अ मधील खात्यांत प्रत्येक जमीनविभागाचें क्षेत्र व आकार ही दिलेलीं असतात, तरी या नवीन नमुन्यावर खातेनंबर दिलेला नाहीं. कारण कबजेदाराच्या नांवांत होणाऱ्या हरएक फरकाबरोबर साधारणपणें नेहमीं खातेनंबरांतहि फरक होतो. शिवाय खातें हें ( प्रत्येक लिहिण्याच्या सुरवातीस लिहिलेल्या ) वर्णवार अनुक्रमणिकेच्या साहाय्यानें चटकन् सांपडतें. शिवाय खात्यांचीहि निराळी सूची असते.

जेव्हां स. नं. हा विभागण्यांत आला नसेल तेव्हां त्याचें क्षेत्र व आकार हीं खालील कोष्टकांपुढें लिहावी :—

जेव्हां एकाद्या स. नं. चे हिस्से पाडण्यांत येतील ( अगर अन्य तऱ्हेचे विभाग होतील ) तेव्हां त्या स. नं. च्या हिस्सा नंबर १ च्या पहिल्या पानावर त्या संबंध स. नं चें क्षेत्र व आकार व नांव ( जर असेल तर ) हीं या नमुन्यांतील स. नं. या अक्षरांच्या वरील बाजूस लिहावींत. ( नमुने पहा. )

क्वचित्प्रसंगीं एकाच जमीनविभागाचे अनेक समाईक कबजेदार, कायम कुळें, अगर गहाणदार असतात. हीं सर्व नांवें खुलासेवार, नमुन्यांत सोडलेल्या जागेंत लिहिणें शक्य नसते. ज्या ठिकाणीं तीं लिहितां येतील त्याठिकाणीं तीं अवश्य लिहावींत. कमींत कमी ३ नांवें लिहितां येतील इतकी जागा आहे. पण समजा जर २० नांवें लिहावयाचीं असतील तर त्यांपैकीं पहिलीं अगर मुख्य हीं गां. न. नं. ७ मध्यें सोडलेल्या जागीं लिहून त्यांचेपुढें "वगैरे" असें लिहावें. नंतर एक कोरा बळकट ( चिवट ) कागद नमुन्याच्या कागदाएवढा कापून घ्यावा. नंतर त्यास नमुन्यांतील जागींच भोंके पाडून, तो पुरवणी कागद ज्या जमीनविभागाकरितां असेल त्या जमीनविभागांकरितां लिहिलेल्या पानानंतर घालावा. या पुरवणी पानांवर मागील पानावरील "वगैरे" चा तपशील ( उरलेलीं सर्व नांवें ) लिहावा. पुढें जर यांतील एक दोन नांवांत फेरफार झाला तर तो गां. न. नं. ६ मधील नोंद नंबर लिहून या पुरवणी पानावर करतां येईल.

[ वि. सू.—मराठी जिल्ह्याकरितां. मराठी जिल्हे म्हणजे मध्यभागांतील सर्व, ठाणें, बॉम्बे सबर्बन, कुलाबा आणि रत्नागिरी. ]

मध्यभागांत कमिशनरसाहेबांचे सल्ल्यावरून हे नमुने १६० पानांचीं पुस्तकें पुरवून उपयोगांत आणावे, असें ठरविण्यांत आलें आहे. या माहितीपत्रकांतील भोंकांतून फीत ओंवण्याचे बाबतींतच फक्त फरक पडणार आहे. मध्यभागांतील (मराठी) नमुन्यांना भोंकें न पाडतां त्यांचीं पुस्तकें बांधविण्यांत येतील.

२. प्रत्येक पुस्तकांत १६० पानें असल्यामुळें, खेड्याचे विभाग पाडतांना त्यांत १४०-१५० पेक्षां जास्त जमीनविभाग असणार नाहींत अशी काळजी घ्यावी. विभाग पाडून झाल्यावर, त्यांतील सर्व्हे नंबर शेजानें लिहावेत. अशा रीतीनें सर्व जमीनविभाग लिहून झाल्यावर शेवटीं कांहीं कोरीं पानें उरतील. नंतर कुळकर्ण्यानें सर्व पानांवर अनुक्रमानें नंबर लिहावेत, व शेवटीं असलेल्या कोऱ्या पानांवर पुरवणी पान १, पुरवणी पान २, इत्यादि असें लिहावें.

३. जेव्हां एकाद्या तुकड्याचे पोटविभाग पाडण्यांत आल्यामुळें नवीन पानाची जरुरी पडेल ( माहितीपत्रक पहा ) तेव्हां क्रमवार असलेल्या पानांमध्यें नवें पान घुसडण्याऐवजीं, मूळ हिश्शाचे पानावर शेवटीं, "पुरवणी पान पहा" अशी टीप लिहावी. बाकी सर्व बाबतींत माहितीपत्रकांतील नियम लागू आहेत.

१. (खालील सर्व ठिकाणीं "जमीनविभाग" या शब्दाचा अर्थ एकाच्या ताब्यांत असलेला जा[illegible] मग तो सर्वे स. नं. असो अगर पोट नंबर असो अथवा फाळणी नंबर—ज्या ठिकाणीं असे विभाग अजून [illegible] आहेत—असो अगर हिस्सा असो.)

[या नमुन्याचा वरचा भाग हा पहिल्या प्रथम गां. न. नं. ७ (१९२२, मॅक्स्वेल) जमिनीची अनुक्रमणिका, यांतील प्रत्येक जमीनविभागाबद्दल एक पान याप्रमाणें घेऊन तयार करण्यांत येईल.]

२. समजा एकादे गांवांत गां. न. नं. ७ मध्यें (अगर जेथें मॅक्स्वेलपद्धत सुरू झाली नसेल अशा ठिकाणीं गां. न. नं. ६ मध्यें) जर एकंदर ७७५ नोंदी असतील तर कुळ कर्याला साधारणपणें शेंकडा १० जास्त याप्रमाणें सुमारें ८५० नमुने पुरवण्यांत येतील. प्रथम त्यानें स. नं., हिस्सा नंबर, या शेतानें प्रत्येक जमीनविभागाबद्दल एक फॉर्म (नमुन्याचें पान १२४-ब) उपयोगांत आणावा. नंतर त्यांचीं पुस्तकें तयार करावींत. या फॉर्मांचे १०० ते १५० पानाचे भाग करावेत. अशा तऱ्हेनें भाग केल्यावर तीं पानें दोन ठेवलेल्या भोंकांतून फीत ओंवून बांधावींत. बांधतांना गांठ एवढी मोठी द्यावी कीं ती त्या भोंकांतून सरकतां कामा नये. अशा रीतीनें भाग तयार झाल्यावर जाड पुठ्ठ्याचें अगर गांवठी कातड्याचे अगर इतर कांहीं जें मिळण्य सारखें असेल तें घेऊन त्याचें कव्हर तयार करून त्यावर छापील मुखपृष्ठ चिकटवून तें त्या भागांत ओंवून टाकावें. नंतर हा भाग शेतांत उभें राहून लिहिण्याचे कामीं उपयोगांत आणतां येईल, व असें करण्यांत त्रास कोणत्याहि तऱ्हेचा होणार नाहीं. सर्वसाधारणपणें गां. न. नं. ७-अ आणि १२ हे शेतातच लिहावेत.



अशा- - - - - - रेषांनी गांवाचे १ ते ४ विभाग करण्यांत आले आहेत.

G.P.Z.O. Poona, 1958.

# जमिनीची अनुक्रमणिका. गा. न. नं. ७

| नंबर नामाचा प्रकार जमिनीचे स्थानिक नाव (असेल तर) | पोट हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार | जुडी अगर विशेष अगर बिन शेतकी आकार | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणार | हक्क नोंदणी पत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्क नोंदणी पत्रकांतील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ - अ | | एकर | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | | | |
| भोईवाडा | | ~~१८-७~~ | ~~११-०-०~~ | . . . . | . . . . . | | . . . . | . . . |
| | | १७-२८ | १८-१४-० | . . . . | . . . . . | ६१ | . . . . | . . . |
| | १ | ~~६-३~~ | ~~६-८-०~~ | . . . . | ~~पुंजाजी सखाराम.~~ | १८ | . . . | . . . |
| | | ५-३९ | ६-२-० | . . . . | . . . . . | ६१ | . . . . | . . . |
| | | | | | ~~हरी रामचंद्र टमटेरे.~~ | ६२ | . . . | . . . |
| | | | | | शंकर हरी. | ६४ | १ अ-४ क पहा. | |
| | २ | ~~६-२~~ | ~~७-०-०~~ | . . . . | ~~भाऊ सखाराम.~~ | १९ | . . | . . . |
| | | ५-३९ | ६-१२-० | . . . . | | ६१ | | |
| | | | | | ~~हरी रामचंद्र टमटेरे.~~ | ६३ | . . . . | . . . |
| | | | | | शंकर हरी. | ६४ | १ अ-४ क पहा. | |
| | ३ | ~~३-१~~ | ~~३-१२-०~~ | . . . . | ~~मारुती कुसा कुंद.~~ | २४ | विठ्ठल रामचंद्र याची आंब्याचीं ४ झाडें आहेत. | ३५ |
| | | २-३५ | ३-३-० | . . . . | ~~हरी रामचंद्र टमटेरे.~~ | ५२ | | |
| | | | | | ~~शंकर हरी.~~ | ६१ | ~~गहाण ठेवणारा मारुती~~ | |
| | | | | | | ६४ | ~~कुसा कुंद.~~ | ५२ |
| | | | | | मधु मारुती. | ७० | १ अ-४ क पहा. | ७० |
| | ~~४~~ | ~~३-१~~ | ~~३-१२-०~~ | . . . . | ~~मधु कुसा.~~ | २५ | . . . . | . . . |
| | ४-अ | ~~१-१~~ | ~~१-४-०~~ | | गेनु मधू. | ५० | १ अ ४ क पहा. | . . . |
| | | ०-३८ | १-१-० | | | ६१ | | |
| | ४-ब | ~~१-०~~ | ~~१-४-०~~ | | बाळु मधू. | ५० | १ अ ४ क पहा. | . . . |
| | | ०-३८ | ०-१४-० | | | ६१ | | |
| | ४-क | ~~१-०~~ | ~~१-४-०~~ | | ~~काळू मधू.~~ | ५० | शंकर हरी बाळू मधू व गेनू यांनीं आकार द्यावयाचा. | ७२ |
| १-ब | | ०-३९ | ०-१५-० | | सरकारी पड. | ६१ | | |
| | | | | | | ७२ | | |
| बिन शेतकी गिरणी. | | ०-२० | | २०-०-० | मानाजी आनंदराव शिंदे. | ३४ | . . . . | |
| २ - अ | | ~~२४-१०~~ | ~~५२-०-०~~ | . . . . | . . . . . | ५१ | . . . . | . . . |
| लोणी जमीन | | ~~१५-६~~ | ~~३२-४-०~~ | . . . . | . . . . . | ६७ | . . . . | . . . |
| | | १५-११ | ३१-४-० | . . . . | . . . . . | | . . . . | . . . |
| | १ | ८-३ | १६-२-० | . . . . | राघु रामा माळी. | २२ | नियमीत शर्तीनें | ५१ |
| | २ | ~~८-३~~ | ~~१६-२-०~~ | . . . . | ~~गेनु रामा माळी.~~ | २३ | नियमीत शर्तीनें | ५१ |
| | | | | | तुकाराम अंताजी. | ६६ | | |
| | | ७-८ | १५-२-० | . . . . | . . . . . | ६७ | | |
| २ - ब | | ~~१८-४~~ | ~~११-१२-०~~ | . . . . | . . . . . | ५१ | | . . . |
| | | १४-२ | १०-१०-० | . . . . | . . . . . | ६१ | | . . . |
| | ३ | ४-२ | ८-२-० | . . . . | ~~लक्षुमण कुसाबा~~ | ४१ | | . . . |
| | | | | | विठ्ठल रामचंद्र. | ५६ | | . . . |
| | ~~४~~ | ~~४-२~~ | ~~९-२-०~~ | . . . . | ~~रामचंद्र बळवंत.~~ | ४२ | ~~लक्षुमण कुसाबा शर्तीनें~~ | ४२ |
| | | | | | ~~विठ्ठल रामचंद्र.~~ | ४८ | ~~विकणारा.~~ | |
| | | . . . | . . . | . . . . | सबंध रेलवेकडे. | ६१ | | ६१ |
| | ५ | ५-० | १-४-० | . . . . | ~~लक्षुमण कुसाबा.~~ | ४१ | | . . . |
| | | | | | विठ्ठल रामचंद्र. | ५६ | | . . . |
| | ६ | ५-० | १-४ | . . . . | ~~रामचंद्र बळवंत.~~ | ४२ | लक्षुमण कुसाबा शर्तीनें | ४२ |
| | | | | | विठ्ठल रामचंद्र. | ४८ | विकणारा. | |

# जमिनीची अनुक्रमणिका. गा. न. न. ७

| सर्वे नंबर इनामाचा प्रकार जमिनीचे स्थानिक नांव. (असेल तर) | पोट हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिन शेतकी आकार. | सरकारी जमिनीचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क नोंदणी पत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणि हक्क धारण करणाराचें अथवा बोजा असणाराचें नांव. | हक्क नोंदणी पत्रकांतील नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकर | रु.आ.पै. | रु.आ.पै. | | | | |
| ३ सरकारी गांव चाकरी इनाम तांबडामाळ | | ६-६ | ७-०-० | २-०-० (हिस्सेरशीने) (सर्वे नं. ३,१२५,१३० मिळून २७ रुपये) | राधाबाई कोम अमृतराव. | १५ | मानाजी (हक्कदार वतनदार) गहाण ठेवणार. आनंदराव व त्याचा पुतण्या यादवराव. | १५ |
| | | | | | | ५९ | परंतु २० रुपये खंड देण्याचा. | ५९ |
| ४ जात इनाम | | १९-१२ | १९-०-० | ५-१५-० (आपसांत वाटणी केलेली) | ... | ... | | |
| | १ | १६-४ | १५-१३-६ | ५-०-० | त्रिंबक नारायण. | १ | २ एकरावर हिमायत हक्क. | ७८ |
| | २ | ३-८ | ३-२-६ | ०-१५-० | ~~रामचंद्र बळवंत देशपांडे.~~ विठ्ठल रामचंद्र. | २ ४८ | हिमायत नाहीं | ७८ |
| ५ | | १-२ | १-८-० | ... | ... | | | |
| | १ | ०-११ | ०-९-० | | ~~बळवंतराव यादवराव.~~ नरसिंहराव बळवंत. | ३ ५४ | | |
| | २ | ०-१० | ०-९-० | | सर्जेराव भिवराव. | २७ | ~~रामलाल गिरधरलाल गारवाडी~~ ~~तारण गहाण घेणार.~~ ~~भोगीनाथ रामलाल.~~ | ४९ ५८ ६९ |
| | ३ | ०-२१ | ०-६-० | | लक्ष्मीबाई कोम आनंदराव. विधवा. | २९ | यशवंतराव यांनीं स्वाधीन केलेला | २९ |

[illegible]भाग पाडण्यास सोपें पडावें म्हणून कुळकर्ण्यानें आपल्या गांवचा नकाशा घेऊन नदी, रस्ते, [illegible]सारख्या स्वाभाविक मर्यादांनीं मर्यादित असलेले ५-६ भाग पाडावेत. ७७५ जमीनविभागाचे खेड्यांत जर [illegible]सांपडतील तर फार चांगलें. प्रत्येक भागांत सरासरीनें १३० जमीनविभाग येतील. हे जमीनविभाग (सर्व्ह नंबर) शेजवार असणार नाहींत हें उघड आहे. या प्रत्येक भागाबद्दल एक पुस्तक उपयोगांत आणावें. त्या त्या भागांतील जमीनविभागाचे सर्व्हे नंबर हे मुखपृष्ठावर लिहावे. बिनशेतकी नंबर, ज्याचे पूर्वींचे सर्व्हे नंबर अजून तसेच राहिले असतील, ते शेतकी नंबराबरोबर अनुक्रमवारीनें तसेच येतील. काहीं गांवांत बिगरशेतकी जमीनविभागास निराळे नंबर देण्यात आले आहेत. त्यांपैकीं जर एकाद्या पुस्तकांत येतील तर तेहीं मुखपृष्ठावर लिहावे. खालील छापलेल्या मुखपृष्ठावरून या सर्व गोष्टी कशा लिहाव्या हें ध्यानीं येईल.

४. पान ९२-अ वरील नकाशावरून भाग कसे पाडतां येतात हें समजेल. तपासणीचे वेळीं एकाच भागाची तपासणी करतां येईल. भाग नंबर १ म्हणजे पुस्तक नंबर १ होय. मुखपृष्ठावरून त्यांत स. नं. १–१८, २०, २३–२९ आणि बिनशेतकी स. नं. ८९-अ ते ८९-ई आणि गांवठाण हीं आहेत.

दुसऱ्या भागांकरितां असलेल्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरून त्यांतील जमीनींचे नंबर समजतील.

---

## गांव नमुना नंबर ७ आणि १२

### जमीन, कुळें आणि पिकें यांची अनुक्रमणिका.

मौजे— नहरिगांव.

तालुका— बलसार.

गांवचा विभाग नंबर १

स. नं. १—१८, २०, २३—२९, गांवठाण आणि बि. शे. नं. ८९-अ ते ८९-इ.

१९२७-२८ पासून १९३६-३७ पर्यंत.

प्रथम नंबरवार पानें
१—१३५

(सही) अ. ब.,
तलाठी.

५. जेव्हां सर्व पुस्तकें लिहून तयार होतील तेव्हां नंतर अनुक्रम नंबर घालावे. त्यावरून गांवांत एकंदर जमीन-विभाग किती आहेत हें समजेल. नंतर हीं सर्व पुस्तकें तालुक्यांत नेऊन तालुकासील म रून आणावींत.

एकाद्या जमीनविभागांत नवीन हिस्से पडल्यामुळें म्हणा अगर एकादा जमीनविभाग दुसऱ्या जमीनविभागांत सामील झाल्यामुळें म्हणा, जेव्हां नवीन जमीनविभाग होतो तेव्हां त्याची माहिती कशी लिहावी यासंबंधीं मामलेदारसाहेब स्वतः सब गोष्टी समजावून सांगतील.

६. * * * * * * *

७. जेव्हां एकादा नवीन कुळकर्णी कामाचा चार्ज घेईल तेव्हां त्यानें या पुस्तकांतील पानें तपासून पाहून त्यांत अनुक्रमवारांत खंड पडला नसल्याची खात्री करून घ्यावी. जर एकादा खंड आढळून आला तर त्यानें आपल्या चार्ज रिपोर्टांत त्याबद्दल लिहून हुकूम आणवून खरोखरीच पान काढलें गेलें आहे कीं कसें याबद्दल खात्री करून घ्यावी. पुरवणी पानें जेव्हां एकाद्या जमीनविभागाचे दोन अगर जास्त विभाग करण्यांत येतील तेव्हांच घातलीं जातील.

८. * * * * * * *

९. * * * * * * *

१०. लिहून झालेल्या पुस्तकाचा गां. न. नं. ७ शिवाय आणखी दोन कारणांकरितां उपयोग असतो :—

(१) कुळांच्या वहिवाटी लिहिण्याकरितां गां. न. नं. ७-अ.

(२) पिकें नोंदण्याकरितां गां. न. नं. १२.

## कूळवहिवाटीबद्दलचें रजिस्टर, गां. नं. ७-अ.

११. कबुलायतीचें रजिस्टर व वहिवाटींत झालेला फरक दाखवणारा फेरफार रजिस्टरचा भाग [illegible] या रजिस्टरचा उपयोग होतो. [ ज. म. का. क. १३५-ड (७) पहा. ]

१२. मुख्य खातेदार स्वतः अगर मजूरदारांना मजुरी देऊन जमीन पिकवीत असेल तेव्हां मागाहून नोंद लिहून होणारा घोटाळा टाळण्याकरितां स्वतः पिकवतो हें दाखवणारा "खुद" शब्द लिहावा. जर तो नुसती देखरेख करून भाडोत्री नोकरांकडून पिकवीत असेल तर "मजुरी" असा शब्द लिहावा. जर तो एकाद्या कुळाला ठराविक रक्कम, अगर नियमित धान्य अगर पिकाचा हिस्सा घेऊन पेरण्याला देईल तर अशा कुळाचें नांव [ कायम कूळ, मुळगेणीदार, मिरासदार वगैरे जातींचीं कुळें असतील तर त्यांचीं नांवें गां. न. नं ७ च्या भागांत आल्यामुळें तीं पुन्हा गां. न. नं. ७-अ मध्ये लिहूं नयेत. फक्त कायम कूळ, मिरासदार वगैरे लिहावें ] व तो कशा रीतीनें खंड देतो तें लिहावें. खालीं दिलेली उदाहरणें पहा. ज्या प्रमाणांत पिकांची वांटणी करण्यांत येते तें लिहावें, जसें, अर्धेली वगैरे. जर एकादी विशिष्ट पद्धत प्रचारांत असेल तर "रिवाजी" असें लिहून तिचें वर्णन मुखपृष्ठावर लिहावें. जर खंड हा ठराविक धान्य देण्याचा असेल तर तें ठराविक धान्य किती हें लिहावें. जर कूळ ( जास्त माहिती पान १२४-क वर पहा. )

१२-अ. कुळानें जमीनदारास द्यावयाच्या खंडाचा कमाल दर हा सरकारनें ज्या जमिनींतील पिकास पाणी पुरवठा करण्यांत येतो त्या जमीनीच्या बाबतींत पिकाचा ⅓ भाग किंवा त्याची किंमत, इतर जमिनीच्या बाबतींत पिकाचा ⅓ भाग किंवा त्याची किंमत असा ठरविला आहे. तथापि तलाठ्यानें ह्या बाबतींत जमीनदार व कूळ यांच्यांत प्रत्यक्ष कबुलायत गांवचा नमुना नं. ७ मध्यें नमूद करून ठेवला पाहिजे.

१२-ब. जर 'अ' हे संरक्षित कूळ असून क्ष, य, झ हे सर्व्हे नंबर किंवा हिस्से कशीत असेल तर त्याचे हक्क फेरफाराची रोजनिशी गांवचा नमुना नं. ६ मध्यें दाखल केले पाहिजेत. खरेपणाचा दाखला दिल्यानंतर त्याचें नांव गांवचा न. नं. ७ मध्यें 'इतर हक्क' या रकान्यांत त्या त्या सर्व्हे नंबरांसमोर दाखल केले पाहिजे. गांवचा नमुना नं. ७ अ मध्यें कुळाच्या नांवाची नोंद करण्याचें पूर्वीप्रमाणेंच चालूं ठेवलें पाहिजे.

१२ क. मुंबईचा कूळवहिवाटीबाबत आक्ट याअन्वयें कूळ हें एक तर संरक्षित कूळ असतें किंवा सामान्य कूळ असतें. जर तें सामान्य कूळ असेल तर त्यांस दहा वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत असे कूळ म्हणून चालू रहण्याचा हक्क आहे. कुळें कूळवहिवाट १० वर्षेपर्यंत चालूं ठेवणार किंवा कसें ह्याची गांवकामगारांनीं खात्री करून घेतली पाहिजे आणि गांवचा नमुना नं. ७अ ह्यांत कोणतेहि फेरफार करण्यापूर्वी सदरहू हकीकतीचा मामलेदाराच्या हुकुमासाठीं रिपोर्ट करावा. परंतु जर ठरविलेली १० वर्षांची मुदत संपण्यापूर्वी एखादे कूळ आपली कूळवहिवाट सोडील, तर गांव कामगारांनीं त्यानुसार गांवचा नमुना नंबर ७अ मध्यें नोंद करावी.

१३. जेव्हां जमीन कुळाकडे वहिवाटीस असेल तेव्हां ती तोंडी करारानें आहे अगर लेखी करारानें आहे याची नोंद ठेवावी. जर करार रजिस्टर झाला असेल तर रजिस्टर झाल्याची तारीख लिहावी ( र. १२-७-२७ ).

मुंबईचा कूळवहिवाटीबाबत आक्ट याअन्वयें कुळानें धारण केलेल्या जमिनीचा उपयोग किंवा भोगवटा केल्याबद्दल त्यानें दिलेला किंवा द्यावयाचा अशा पैशाच्या किंवा मालाच्या अथवा दोहोंच्या स्वरुपांतील कोणताहि मोबदला अशी त्याची (फंडाची) व्याख्या केली आहे. परन्तु कुळानें जातीनें चाकरी करणें ह्याचा समावेश होत नाहीं.

१४. गां. न. नं. ७ मध्यें लिहिलेला आकार हा आकाराचें खंडाशीं प्रमाण पाहण्यास उपयोगी पडतो ( लो. फं. हा कधींच विचारांत घेतलेला नसतो). हा आकार गां. न. नं. १ मधून ( अगर हिस्सा आकार फोडपत्रकामधून ) घेतला असतो. व त्यांत लोकलफंडाचा समावेश केलेला नसतो हें ध्यानांत ठेवावें. ज्या जमिनीचा आकार १६ रुपये आहे ती जमीन कुळानें आकार व लोकलफंड परस्पर कुळकर्ण्यास भरावा या अटीवर १२ रुपये खंडानें दिली जाणें शक्य आहे. अशा ठिकाणीं खरा खंड २९ रुपये असतो. पण जर हीच जमीन खातेदारानें स्वतः आकार व लो. फं. भरावा या अटीवर ३२ रुपये खंडानें दिली असेल तर खरा खंड ३२ रुपयेच असतो.

१५. जेव्हां कुळाकडे जमीन असेल तेव्हां संयुक्त जमीनबाब कोण भरतो हें लिहिणें अत्यावश्यक आहे. अशीच लिहिणें वांचवण्याकरितां खालील नियमाप्रमाणें वागणें फायदेशीर होईल :—

(अ) जेव्हां कबजेदार ( मुख्य खातेदार ) स्वतः ( खंडापैकीं रकमेंतून ) देतो, तेव्हां कसलाच शेरा लिहूं नये. शेरा नसलेल्या ठिकाणीं कबजेदार स्वतःच संयुक्त जमीनबाब भरतो असें समजावें.

(ब) जेव्हां कूळ भरीत असेल तेव्हां (कू ) असें अक्षर, कूळ सं. ज. बा. भरतें हें दाखवण्याकरितां लहान वर्तुळांत लिहावें.

(क) जेव्हां कूळ व कबजेदार एकमेकांच्या सल्ल्यानें कांहीं एका प्रमाणांत भरण्याचें ठरवतात, ( जसें कुळानें ½ सं. ज. बा. भरणें व बाकीचा कबजेदारानें भरणें असेल ) तेव्हां ( कू. ½ ) असें लिहावें.

जमीनविभाग दोन किंवा अधिक कुळांस विभागून दिला असेल अगर एकापेक्षां अधिक रीतीनें असल—समजा कांहीं भाग कुळानें व कांहीं कबजेदारानें—तर त्याचें क्षेत्र नजरेनें अदमासानें विभागावें रणामुळें जर प्रत्यक्ष मोजमाप झालें असेल तर अशा ठिकाणीं मोजून आलेलेंच क्षेत्र लिहिणें ). अशा तऱ्हेचे कायम नसलेल्या कूळवहिवाटीबाबतींत जे भाग पाडण्यात येतात ते मालकी हक्काचे विभाग नसल्यामुळें त्याची मोजणी पोट-हिस्सा सर्व्हेप्रमाणें होत नाहीं. प्रत्येक रीतीखालीं लागवडीस आणलेलें क्षेत्र ३ रे कोष्टकांत दाखवावें.

१७. कूळवहिवाटींत होणारे फरक दृष्टोत्पत्तीस आल्याबरोबर नोंदावेत. नवीन कुळांबाबत नोंदी पावसाळ्यांत खात्रीपूर्वक माहिती मिळाल्यास अगर रिपोर्ट आल्यास कराव्यात; पण पीकपहाणीचे वेळीं कुळकर्ण्यानें क्षेत्र भाडें, पेरणारे यांच्यांत होणाऱ्या फरकासंबंधानें पूर्ण चौकशी करावी. हक्कनोंदीचे कायद्याअन्वयें ज्यांचीं नांवें या नमुन्यांत दाखल असतील अशा जमीनदारांना व कुळांना उभयतांनाहि संपादित हक्काबद्दल रिपोर्ट करणें आवश्यक आहे. जेव्हां कोणत्याहि वर्षाच्या नोंदी ( कूळवहिवाटीच्या व पिकाच्या ) पुऱ्या होतील, तेव्हां पानावर सबंध आडवी रेघ मारावी (छापील नमुने पहा).

१८. पुढील वर्षी लागवडीची रीत ( स्वतः मालकाकडून अगर कुळाकडून अगर भाडोत्री मजुराकडून ) कूळ-वहिवाटीचे बाबतींत कोणताहि बदल न होतां तशीच राहील तर, दुसऱ्या कॉलम (कोष्टक) मध्यें सदरहूप्रमाणें असें लिहावें. जागा कोरी सोडूं नये. सोडल्यास त्यामुळें पहाणी झालीच नाहीं असें वाटेल व शिवाय कोरी राहिलेली जागा पुढें उपदव्यापी लोकांना खोट्या नोंदी करण्यास उपयोगी पडेल.

१९. गां. न. नं. ७-ब भरण्यास व मतदारांच्या याद्या तयार करण्यास सोपें जावें म्हणून, जरी कुळांचीं नांवें वगैरे प्रतिवर्षी लिहिलीं नाहींत, तरी क्षेत्र, लागवडीची रीत या गोष्टी प्रतिवर्षी पुन्हां लिहिल्या पाहिजेत.

(अ) जर पुढील वर्षी जमीनविभाग हा दुसऱ्या कुळाकडे दिला तर त्या कुळाचें नांव, भाडेपट्ट्याच्या शर्ती, वगैरे त्या वर्षापुढें मांडावें.

(ब) पूर्वी कुळाकडे असलेला जमीनविभाग अगर त्याचा कांहीं भाग जर कबजेदारानें स्वतः लागण केला तर त्या वर्षापुढें खुद्द असें लिहावें.

(क) जर एकादा जमीनविभाग दोन अगर अधिक कुळांत विभागून दिला तर प्रत्येकाची निराळी नोंद करून (१), (२) असे नंबर द्यावे. यामुळें गां. न. नं. ७-ब लिहितांना (१), (२) असें लिहून त्यांतील निरनिराळीं कुळें दाखवण्यास सोपें जाईल. त्याचप्रमाणें एकाद्या जमीनविभागांत अनेक असलेल्या कूळवहिवाटी एकत्र करण्यांत आल्या तर नवीन भाडेपट्ट्याची एकत्र नोंद करावी.

२०. जर एकाद्या वेळीं जमीनलागवडीच्या शर्ती संशयास्पद असून त्यामुळें जमीन लागवड करणारा हा कूळ आहे का नुसता मेहनतीबद्दल जमीनदारांकडून मोबदला मजुरी घेणारा मजूरदार आहे असा संशय आल्यास त्याची परीक्षा पुढीलप्रमाणें करावी :—जमिनींतून जास्त उत्पन्न निघाल्यास त्याचा फायदा आहे का ? जर त्याला उत्पन्न जास्त यावें अशी आस्था वाटत असेल तर तो कूळ आहे असें समजावें. जर तो उत्पन्नाविषयीं बेफिकिर असेल तर तो मजूरदार आहे असें समजावें.

२१. जेव्हां एकाद्या फेरफाराचे योगानें ( उदाहरणार्थ, गहाण सोडवल्यामुळें ) जर कूळच कबजेदार होईल तर, कूळवहिवाटीची नोंद चालू वर्षाकरितां कशा प्रकारें करावी हें ज्या तारखेस असा फेरफार झाला त्या तारखेवर अवलंबून राहील. या बाबतींत खालील प्रश्नावरून उलगडा होईल :—चालू वर्षी पीक कोणी पिकवून त्याचा फायदा घेतला ? व त्यानें खंड भरला का ?

जर एकाद्या वर्षी कुळकर्ण्यास असें आढळून आलें कीं, मागील एकाद्या वर्षी कूळवहिवाटीबाबत चुकीची माहिती मिळाली व ती नमूद केली गेली आणि जर त्या वर्षाचा जुना गां. न. नं. २ (नवा ७-अ ) हा त्याच्या ताब्यांत असेल तर त्यानें त्या नोंदीची दुरुस्ती करून तारीख घालून छोटी सही करावी.

बऱ्याच वेळेला सारा वसूल करीत असतां, कुळकर्ण्यास सूचक प्रश्न विचारून रिपोर्ट न झालेल्या, अगर विशेष प्रकारच्या कूळवहिवाटी उघडकीस आणतां येतील. हक्कनोंदीच्या कायद्याची अंतिम परीक्षा म्हणजे ही आहे कीं, "सर्व नोंदी, पिकांची विल्हेवाट, व सरकारसारा भरण्याच्या बाबतींत असणाऱ्या जबाबदारीच्या वस्तुस्थितीशीं तंतोतंत जमतात किंवा कसें."

२२. कॉलम ३ व ४. स. ठ. ९७४५—१०-९-२५ अन्वयें असें ठरविण्यांत आलें आहे कीं, सहांपैकीं प्रत्येक रीतीखालीं लागवडींत आणलेल्या जमिनीच्या क्षेत्राचा दरसाल तक्ता तयार केला पाहिजे. म्हणून कुळकर्ण्यानें पीकपहाणी व कूळवहिवाटतपासणी करतांना प्रत्येक जमीनविभागाबद्दल, अगर जमीनविभागाच्या तुकड्याबद्दल ( वरील पॅरा १ पहा ), तो कोणत्या रीतीखालीं पेरला गेला आहे याची नोंद करावी. लागवडीच्या रीती खालीलप्रमाणें आहेत :—

(१) प्रमुख कबजेदारानें स्वतः आपल्या हातानें लागवड करणें—क्वचित् प्रसंगीं भाडोत्री मजुरांची मदत घेणें.

(२) प्रमुख कबजेदार अगर त्याचा एजंट (मुखत्यार) यानें भाडोत्री मजुरांकडूनच देखरेखीखालीं लागवडीस आणणें.

(लागवडीची देखरेख म्हणजे मालकानें अगर त्याचे मुखत्यारानें, वर्षाच्या आरंभीं येऊन कूळवहिवाटीच्या ठरवून सुगीच्या संधीस येऊन खंड गोळा करणें नव्हे. देखरेख याचा अर्थ, नांगरणें, पेरणें, पाणी पाजणें, निरुपयोगी गवत वगैरे उपटून टाकणें, धान्य कापणें, वगैरे पिकाच्या गुणधर्माप्रमाणें, करावी लागणारी प्रत्येक गोष्ट त्याच्या हुकुमाप्रमाणें होणें हा होय.)

२३. जर वर सांगितलेल्या दोन रीतींखालीं जमीन विकवण्यांत आली नसेल तर कुळवहिवाटीचे मुदतीचा विचार न करतां ४ भाग करावेत. वहिवाट ही कूळ काणत्या तऱ्हेनें खंड देतें त्यावरून ठरवण्यांत येतें :—

(३) रोख रक्कम.

(४) उत्पन्नाचा हिस्सा (जसें अर्धेली वगैरे).

(५) ठराविक उत्पन्न (धान्य वगैरे ; जसें १० मण भात, ७ मण ज्वारी, इत्यादि).

(६) वर दिलेल्या रीतींच्यापैकीं कांहींचें मिश्रण.

कुळकर्ण्यानें क्षुल्लक कारणाकरितां जमीन ६ व्या रीतीखालीं लिहूं नये. समजा, एखादें कूळ, भाताच्या पिकाचा अर्धा वांटा जमीनदारास देऊन शिवाय जर ठरोव (१०० पेंढ्या) गवत देत असेल तर आपणास असें म्हणतां येईल कीं ही वहिवाट कांहीं अंशीं (४) खालीं व कांहीं अंशीं (५) खालीं येत असल्यामुळें (६) खालीं लिहिण्यांत यावी. रीत (६) ही भानगडीच्या ठिकाणीं उपयोगांत आणावी. उदाहरणार्थ, जर एकादें कूळ, भाजीपाला पेरलेल्या जमिनीबद्दल रोख रक्कम, खरीप धान्य पेरल्यास पिकांचा अर्धा वांटा, वगैरेप्रकारें खंड देत असेल तर कोणता प्रकार अधिक महत्त्वाचा आहे हें ठरवणें कठीण पडतें. वास्तविक ही वहिवाट प्रतिवर्षी बदलते म्हणून अशा ठिकाणीं विचार करण्याचा प्रश्नच उरत नसून ती रीत (६) खालींच लिहिली पाहिजे. स. नं. ९ हि. नं. २ पहा.

२४. पडीत जमीन बहुधा कुळांकडे दिलेली नसते. अधिक भाड्यानें एकाद्या कुळानें घेतलेली जमीन पाऊस नसल्यामुळें पेरे न झाल्याकारणानें म्हणा अगर अन्य कांहीं कारणामुळें पड राहूं शकेल (जमीन पेरली गेली असेल तर पडीत समजूं नये). जेव्हां कुळांकडे असलेली जमीन पड पडेल तेव्हां ती वर्षारंभीं केलेल्या करारप्रमाणें रीत (३), (४), (५) अगर (६) खालीं लिहावी.

* * * * * * * *

२५. जेव्हां प्रत्यक्ष पिकाच्या उत्पन्नाच्या विषयीं वाद निर्माण झाला असेल व खळ्यांतून पीक दुसरीकडे नेण्यापूर्वी कूळ किंवा जमीनदार सदरहू बाब गांवकामगाराला लिहून कळवील तेव्हां गांवकामगारानें जमिनीच्या प्रत्यक्ष (पिकाच्या) उत्पन्नाचा पंचनामा करण्याची व्यवस्था केली पाहिजे. पंच व गांवकामगार या दोघांनींहि पंचनाम्यावर सह्या केल्या पाहिजेत. पिकाचा हिस्सा ठरविण्याच्या कारणाकरितां पंचनाम्यांत नोंद झालेलें पिकाचें उत्पन्न हें प्रत्यक्ष (पिकाचें) उत्पन्न असेल. (सन १९४६ च्या मुंबईच्या कूळवहिवाटीबाबत कायदेकानू ३) पिकाच्या हिश्श्यांत वसूल करण्याजोग्या खंडाचे रोकड रकमेंत रुपांतर करण्याच्या संबंधीं मुंबईचा कूळवहिवाटीबाबत आक्ट याचें कलम १९-अ (१) याअन्वयें सरकारनें काढलेले जाहीरनामे, संबंध असलेल्या गांवांतील महत्त्वाच्या जागीं लावण्यांत येतात व जाहीरनाम्यांतील मजकूर लागोपाठ तीन दिवस दवंडी पिटून गांवकऱ्यांस कळविण्यांत येतो, हें गांवकामगारानें पाहिलें पाहिजे. (मुंबईच्या कूळवहिवाटीबाबत कायदेकानू ११).

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

# गां. न. नं. ७-ब.

१९२७-२८

[ वि. सू.—रीत २ व ५ या आढळत नसल्यामुळें गाळल्या आहेत. ]

| कुळांचीं नांवें ( मराठी वर्णानुक्रमानें ) | कूळवहिवाटीच्या व लागवडीच्या रीती. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रीत ३. | | | रीत ४. | | | रीत ६. | | |
| | जमीनविभाग. | क्षेत्र. | आकार. | जमीनविभाग. | क्षेत्र. | आकार. | जमीन-विभाग. | क्षेत्र. | आकार. |
| गोपाळ हरी ... | ४/१ | १६-४ | १५ १३ ६ | ... | ... | ... | ... | ... | ... |
| भवान विठ्ठल ... | १-अ/३ (१) | १-३९ | २ ४ ० | ... | ... | ... | ... | ... | ... |
| भीमजी खंडू ... | ९/२ (१) | ८-० | ५ ० ० | ... | ... | ... | ... | ... | ... |
| राधाबाई ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ३ | १२-१६ | ८ ० ० |
| रामा हरी ... | १-अ / १ व २ (१) | ५-३८ | ७ ० ० | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ,, (२) | [ ६·० | ५ १४ ०] | | | | | | |
| वस्तो दाया ... | ... | ... | ... | १-अ / १ व २ (२) | ६ ० | ५ १४ ० | ... | ... | ... |
| | | | | १-अ / ३ (२) | १ ० | ० १९ ० | ... | ... | ... |
| बिनशेतकी. | | | | | | | | | |
| बॉम्बे सॉल्ट रिफाईनरी, स. नं. २५, २५ ए, आकार १२५, भाडें २५०. | कोणत्याहि रीतीखालीं वर्ग केली नाहीं | | | | | | | | |
| सोलोमन रूबेन, स. नं. १-ब, २० गुंठे, आकार २०, भाडें २५०. | | | | | | | | | |
| एकूण १९२७-२८. | ... | ३१-३७ | ३० १ ६ | ... | ७ ० | ६ १३ ० | ... | १२-१६ | ८ ० ० |

कबजेदारांनीं रीत २ खालीं लागवडींत आणलेली जमीन. — ए. गुं. जमीन-विभाग नं. ९/२ (२); क्षेत्र ४–१४ ; आकार रु. ३.

४–१४
३१–३७
७–०
१२–१६
५५–२७

बाकी सर्व जमीन रीत (१) स्वतः लागण केलेली ... २४०–९

२९५–३६ : एकूण वहिवाटींत असलेली आकारी शेतकी.

पान १०७ पहा.

टीप १९२९-३० :—राधाबाईचे नांवासमोर [ ६ गुं. आकार पूज्य ] रीत ६ खालीं आणि ०-६ आकार पूज्य वस्तो दायाचें नांवासमोर रीत ३ खालीं लिहावें, कारण हें क्षेत्र बि. शे. म्हणून दाखवण्यांत आलें नाहीं ( रिपोर्ट केल्यानंतर तें व्हावयास पाहिजे होतें ).

पोटभाड्यानें दिलेल्या $\frac{१\text{-अ}}{१+२}$ (२) ची माहिती कशी लिहिली आहे तें लक्षपूर्वक पहा, त्याचें रीत ३ खालील क्षेत्र गांवच्या एकूण क्षेत्रांत घेतलें नाहीं.

## कूळवहिवाटीची अनुक्रमणिका गां. न. नं. ७-ब.

२५. गां. न. नं. ७-अ मध्यें शेतकी जमीनविभागाबद्दल लागवडीच्या रीतीची नोंद केल्यावर व [illegible] जमीनविभागाबद्दल कूळवहिवाटीची नोंद केल्यावर, त्यांचा खालीं दाखवल्याप्रमाणें नवीन गां. न. नं. ७-ब मध्यें गोषवारा देणें प्राप्त आहे. पुष्कळशा खेड्यांत रीत १ ली—प्रमुख कबजेदारानें स्वतां आपण व जरूर पडेल त्या प्रसंगीं भाडोत्री मजुरांचे सहाय्यानें पेरणें—प्रामुख्यानें आढळून येतें. या कबजेदारांचे नांवाची अनुक्रमणिका करण्याची जरुरी नाहीं. कारण त्यांचीं नांवें गां. न. नं. ११ (व ८-अ) मध्यें वर्णानुक्रमानें त्यांचे ताब्यांत असलेल्या जमिनीच्या क्षेत्रासुद्धां लिहिलेलीं असतात. म्हणून गां. न. नं. ७-ब मध्यें फक्त ५ रीतींची सोय करण्यांत आली आहे. पहाणी संपल्यावर कुळकर्ण्यास जर असें आढळून येईल कीं, यांपैकीं एक दोन रीती अजिबात आढळतच नाहींत, किंवा आढळल्यास त्या मार्जिनमध्यें एक दोन नोंदी करून लिहितां येणें शक्य आहे, अगर नमुन्याचे मागील बाजूस लिहितां येणें शक्य आहे तर त्यानें वाटल्यास तीं रीतीकरितां ठेविलेलीं कोष्टकें गाळून टाकावींत. क्वचित् प्रसंगीं आढळून येणाऱ्या रीतीकरितां वेगळें सदर राखूनच ठेवलें पाहिजे असें नाहीं.

२६. कुळांची वर्णवार अनुक्रमणिका लावणें हें प्रथम जरूर आहे. त्या बाबतींत पहिल्या प्रथम कागदाच्या पुष्कळ चिटोऱ्या घ्याव्या. त्या चिटोऱ्यांत वरील बाजूस एका कुळाचें (बि. शे. जमिनीच्या देखील), ज्याचें नांव गां. न. नं ७ (कायम कूळ) अगर ७-अ (बिनकायम) असेल त्याचें नांव लिहावें. त्या नांवाखालीं त्याचें नांव जितके वेळ गां. न. नं. ७ अगर ७-अ मध्यें आढळेल तितके वेळ तो प्रत्येक रीतीखालीं पिकवित असलेलें क्षेत्र (बि. शे. कूळवहिवाटीसुद्धां) लिहावें. त्या एकाच कुळाकडे पुष्कळ जमीनविभाग असूं शकतील. त्याचप्रमाणें एकाच जमीनविभागांत पुष्कळ कुळें असूं शकतील.

### कूळवहिवाट एकत्र करणारी स्लिप (चिठी).

| जमीनविभाग. | | वस्ती दाया क्षेत्र. | आकार. | रीत. |
|---|---|---|---|---|
| १-अ / १ आणि २ (२) | ... | ५-० | ५-१४-० | ४ |
| १-अ / ३ (२) | ... | १-० | ०-१५-० | ४ |
| (१९३०) ९/१ | ... | ०-६ | पुज्य | बि. शे. |

२७. जेव्हां कूळवहिवाटीमध्यें सांगड असेल, उदाहरणार्थ:—

ल—हा सरंजामदार, अगर इनामदार अथवा सेटलमेंट धारण करणार (कबजेदार) असून मला कायम खंडानें देतो.

म—हा मिरासदार अगर, मुळगेणीदार अगर दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचा कायम कूळ असून फक्त १२ रुपये आकार ला देतो व नला खंडानें देतो.

न—हा ४० रुपये रोख मला देतो व ओला खंडानें देतो.

ओ—हा एकसाली उपरी कूळ असून नला पिकाचा अर्धा वांटा देतो.

तेव्हां या सर्व कुळांची नोंद मागें पान १७५-अ वर समजावून सांगितल्याप्रमाणें करणें, ती अशी;—

म—हा गां. न. नं. ७ मध्यें कायम कुळाचे ठिकाणीं म्हणजे "रेघेखालीं".

न—हा गां. न. नं. ७-अ मध्यें ओळ २.

ओ— सदरहू ओळ ३ नचे खालीं.

स. नं. १-अ, हि. नं. ३ मध्यें माहितीदाखल घेतलेलें-उदाहरण पहा.

या ठिकाणीं लागवडीची रीत (४) असून गां. न. नं. ७-ब मध्यें क्षेत्र व आकार हीं ओच्या नांवापुढें दाखविलीं जातील.

म आणि न हे प्रत्येकजण कूळवहिवाटीची अनुक्रमणिका, गां. न. नं. ७-ब मध्यें दाखविली जाऊन या जमिनीचें क्षेत्र व आकार त्याचे नांवापुढें रीत (३) खालीं लिहिण्यांत येईल. पण तो कंसांत दाखवला जाईल. (रामा हरीचें उदाहरण पहा.) कारण, नाहींतर तेंच क्षेत्र गांवच्या एकूण वेरजेंत दोनदोनदां तीनतीनदां मिळवलें जाण्याचा संभव रहातो.

[illegible]माणें कूळवहिवाटीबाबतींतील सर्व गोष्टी गां. न. नं. ७-अ मध्यें असलेल्या या एकत्र करून [illegible]ाच्या चिठोऱ्यावर लिहून होतील, तेव्हां तीं चिठोरीं चाळून वर्णानुक्रमानें लावावींत. वर्णानुक्रमणिकेंत [illegible]ल नांव येईल त्याची नोंद प्रथम गां. न. नं. ७-ब मध्यें करावी. हें सर्व कशाप्रकारें करावयाचें तें दिलेल्या नमुन्यावरून समजेल. शेतकी जमिनीच्या कुळांची नोंद संपल्यावर ज्या कुळांकडे बिगरशेतकी जमीन असेल अशांची नोंद वर्णानुक्रमानें करून त्याचेपुढें क्षेत्र व आकार लिहावा. पण बिगरशेतकी क्षेत्र व आकार हीं कोणत्याहि रीतीखालीं लिहितां येत नसल्यामुळें सर्वसाधारण खेड्यांत, नमुन्यांत दाखविल्याप्रमाणें लिहावींत. ज्या गांवांत बिनशेतकी जमीन-विभाग जास्त असतील त्या ठिकाणीं त्याची नोंद हा या नमुन्याचा (रीतीचीं कोष्टकें नसलेला) भागच करावा लागेल.

२९. जेव्हां सर्व कुळांच्या नोंदी पुऱ्या होतील तेव्हां आपणास प्रत्येक रीतीखालीं कुळाकडील शेतकी जमिनीची गोळाबेरीज काढतां येईल. त्याचप्रमाणें कुळांकडील बिगरशेतकी जमिनींची गोळाबेरीज काढतां येईल. दुसऱ्या रीतीखालीं धारण केल्या गेलेल्या जमीनविभागाचें क्षेत्र व आकार हीं एकत्र काढलीं पाहिजेत. त्यांचीं नांवें हीं गां. न. नं. ८-अ व ११ मध्यें असतात व त्यांची आपणास या ठिकाणीं जरूर नाहीं. शिल्लक राहिलेलें लावणीलायक क्षेत्र हे कबजेदारांनीं रीत १ खालीं स्वतः लागवड केलेलें क्षेत्र होय. (गांव न. नं. १३, को. ६ पहा.)

| | एकर. | गुंठे. | आकार. |
|---|---|---|---|
| रीत (२) मजुरांकडून लागवडींत आणलेलीं ... | | | |
| ,, (३) कुळाकडे रोख रकमेनें ... ... | | | |
| ,, (४) ,, पिकांचा बांटा ... ... | | | |
| ,, (५) ,, धान्यरूपानें खंड ... ... | | | |
| ,, (६) मिश्रित अथवा वर्ग करतां येण्याजोगी नसलेलीं... | | | |
| शिल्लक अथवा रीत (१) स्वतः पिकवलेलीं ... | | | |
| एकूण वहिवाटींत असलेली लावणीलायक जमीन ... | | | |

या सर्व बेरजांची नक्कल गां. न. नं. १३ च्या शेवटीं करून त्या प्रतिवर्षी मामलेदारास कळविण्यांत येतील.

३०. अजून एक गोष्ट शिल्लक राहिली. गां. न. नं. ७-ब मध्यें कायम अगर हंगामी कूळवहिवाटी अनुक्रमानें लिहून पुरी झाल्यावर, त्याची गां. न. नं. ८-अ (त्यांतील अनुक्रमणिका) बरोबर तुलना करून जो मनुष्य कबजेदार म्हणून नोंदला असेल तोच कूळ म्हणून नोंदला आहे का हें पहावें. बिगरशेतकीच्या यादींत त्याचें नांव दुसऱ्यांदा आढळण्याचा संभव आहे. जर गां. न. नं. ८-अ मधील कबजेदार हा (शेतकी अगर बिनशेतकी) कूळहि पण असेल तर त्याचें नांव मतदारांच्या यादीप्रीत्यर्थ गां. न. नं. ७-ब मध्यें असणें जरूर नाहीं (क्षेत्र व आकार—त्याच्याकडे असलेल्या जमिनींचीं—तशींच ठेवावींत). त्याच्या नांवावर पेन्सिलीची रेघ ओढावी व त्याच्या गां. न. नं. ८-अ मधील खात्यांत खालील नोंद करावी.

"शिवाय कूळ ए. गुं. आ. ."

यानंतर जीं नांवें गां. न. नं. ७-ब मध्यें उरतील तेवढ्यांना गांवांत कबजा असलेली जमीन नाहीं असें झालें.

## गांवचा नमुना नंबर ८-अ.

( जमिनींची खातेवही. )

खाते नंबर १ बाळकृष्ण वासुदेव.

| नमुना नंबर ६ यांतील नोंद नंबर. | सर्व्हे नंबर व हिस्सा. | क्षेत्र. | वसूल करण्याची रक्कम. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आकार किंवा जुडी. | लोकलफंड (व इनामावरील नुकसान). | संयुक्त जमीनबाब. |
| | | ए. गुं. | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| | | | खालसा | (सरकारी). | |
| ५ | १७ पोट १/१ | ० २० | ३ ० ० | | |
| | फाळणी १/१, ६, ७, ८, | ० १० | ० २ ६ | | |
| ३८ | २५-ब १ | २५ ० | ६ ४ ० | | |
| | | २५ ३० | ९ ६ ६ | ० ९ ६ | १० ० ० |
| | | | इनाम. | (५२ ८ ०) | |
| ९ | २७ | २४ २० | ७ ८ ० | ३ १२ ० | ११ ४ ० |
| | | | बिनशेती. | | |
| ५ | २५ अ | २५ ० | १२५ ० ० | ७ १३ ० | १३२ १३ ० |

गणपतराव.

खाते नंबर २, बळवंतराव यादवराव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | खालसा | (सरकारी). | |
| ३ | } ५/१ | ० ११ | ० ९ ० | | |
| | } ६/२ | ० १० | ० २ ० | | |
| | | ० २१ | ० ११ ० | ० ० ९ | ० ११ ९ |
| वजा: ५४ | ५/१ | ० ११ | ० ९ ० | ० ० ९ | ० ९ ९ |
| | १९१०–११ | ० १० | ० २ ० | ० ० ३ | ० २ ३ |
| | | | इनाम. | (३ ० ०) | |
| १४ | १३ | २ ४ | | ० ३ ० | ० ३ ० |
| जास्ती. | | | | (२ ३ ६) | |
| ८७ | ४–२ | ३ ८ | ० १५ ० | ० ३ ३ | १ २ ३ |
| | | | | (५ ३ ६) | |
| | १९१३–१४ | ५ १२ | ० १५ ० | ० ६ ३ | १ ५ ३ |

ज्या दहा सालांकरितां हा नमुना ठेवण्यांत येतो तीं दहा वर्षांची मुदत गुजरून गेल्यावर हा फेरफार झाला. परंतु पद्धतीचे खुलाशाकरितां येथें दिला आहे.

खाते नंबर ३, बाळू मथू.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | खालसा | (सरकारी). | | |
| ६१ | १-अ/४-ब | ० ३८ | ० १४ ० | | |
| ६१,७२ | १-अ/४-क (अ) | ० १९ | ० ७ ६ | | |
| | | १ १७ | १ ५ ६ | ० १ ६ | १ ७ ० |

(अ) अर्धे क्षेत्र व आकार असे बाळूचे नांवें दाखल केले. कारण त्याचा भाऊ काळू यानें राजीनामा दिला. अर्धा आकार खातें नंबर ५ गणू याजकडून वसूल येतो.

पान १९ वरील गांवचा नमुना नंबर १ खालील टीप ३ पहा.

खाते नंबर ४, भोगीनाथ रामलाल.

| [illegible] नंबर ६ यांतील नोंदीचा नंबर. | सर्व्हे नंबर व हिस्सा. | क्षेत्र. | वसूल करण्याची रक्कम. आकार किंवा जुडी. | लोकल फंड (व इनामावरील नुकसान). | संयुक्त जमीनबाब. |
|---|---|---|---|---|---|
| | | ए. गुं. | रु. आ. पै | रु. आ. पै | रु, आ. प |
| | | | खालसा | (सरकारी). | |
| ५७,५८ | ८ | २० ० | १० ० ० | | |
| ५८.७१ | १२/२ | ६ २ | १२ ४ ० | | |
| | | २६ २ | २२ ४ ० | १ ६ ३ | २३ १० ३ |

खाते नंबर ५, गेनू मथू.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | खालसा | (सरकारी). | |
| ६१ | १-अ/४-अ | ० ३८ | १ १ ० | | |
| ६१,७२ | १-अ/४-क(ब) | ० २० | ० ७ ६ | | |
| | | १ १८ | १ ८ ६ | ० १ ९ | १ १० ३ |

(ब) खातें नंबर ३ खालची टीप पहा.

खाते नंबर ६, लक्ष्मण वामनराव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | खातें बंद केलें. | | |

खाते नंबर ७, लक्ष्मीबाई कोम आनंदराव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | खालसा | (सरकारी). | | |
| २९ | ५/३ | ० २१ | ० ६ ० | ० ० ६ | ० ६ ६ |

खाते नंबर ८, मानाजी आनंदराव शिंदे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | खालसा | (सरकारी). | | |
| २८ | ६/३ | १० २४ | ० १२ ० | ६ १२ ० | |
| ३२ | ७ | १० २० | ५ ८ ० | | |
| | | २१ ४ | १२ ४ ० | ० १२ ३ | १३ ० ३ |
| | | इनाम. | | (५ ० ०) | |
| ५९ | ३ | ६ ६ | २ ० ० | ० ७ ० | २ ७ ० |
| | | बिनशेती. | | | |
| ३४ | १-ब | ० २० | २० ० ० | | |
| ३७ | गांवठाण. प्लॉट ३. | ० ८ ४½ | १० ६ ८ | | |
| | | ० २० | ३० ६ ८ | १ १४ ६ | ३२ ५ २ |

खातें नंबर १९, शिवाजी बाळाजी वगैरे.

| नमुना नंबर ६ यांतील नोंदीचा नंबर. | सर्व्हे नंबर व हिस्सा. | क्षेत्र. | वसूल करण्याची रक्कम. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आकार किंवा जुडी. | लोकल फंड (व इनामावरील नुकसान). | संयुक्त जमीनबा |
| | | ए. गुं. | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ पै |
| | | खालसा | (सरकारी). | | |
| २६, ६८ | १६ | २५ ० | ६१ ८ ० | ३ १३ ६ | ६५ ५ |
| खातें नंबर २०, शिवराम शंकर भट. | | | | | |
| | इनाम. | | | | |
| ४ | १४ | १० १५ | ३ ८ ० | (८ १४ ०)<br>० १२ ६ | ४ ४ ६ |
| खातें नंबर २१, त्र्यंबक नारायण. | | | | | |
| | | इनाम. | | | |
| १ | ४/१ | १६ ४ | ५ ० ० | (१० १३ ६)<br>१ ० ० | ६ ० |
| खातें नंबर २२, तुकाराम अंताजी. | | | | | |
| | | खालसा | (सरकारी). | | |
| ६६, ६७ | २-अ/२ | ७ ८ | १५ २ ० | ० १५ ३ | १६ १ |
| खातें नंबर २३, विठ्ठल रामचंद्र. | | | | | |
| | | खालसा | (सरकारी). | | |
| ४१, ५० | २-ब/३,५ | ९ २ | ९ ६ ० | | |
| ४२, ४८ | २-व/६ | ५ ० | १ ४ ० | | |
| ४८ | ९/१ | १२ १६ | ८ ० ० | | |
| ४३ | १७/२ | ० ३० | ३ ८ ० | | |
| | फाळणी. | ० १५ | ० ३ ० | | |
| | १/२, २, ३, ४, ५ | | | | |
| ७५ | २८ | १५ ० | ३ १२ ० | | |
| | | ४२ २३ | २६ १ ० | १ १० ० | २७ ११ ० |
| | | इनाम. | | (२ ३ ६) | |
| २, ४८ | ४/२ | ३ ८ | ० १५ ० | ० ३ ३ | १ २ |

## गांवचा नमुना नंबर ८-अ संबंधीं खुलासा.

कुळवहिवाटी खेरीजकरून बाकी हक्कनोंदणीसंबंधीं खुलासा आतां संपला. या नोंदणीवरून सरकारचे जबाबदारी कोणावर आहे तेंहि समजतें. कुळकर्ण्याचें पुढील जास्त सोपें काम म्हटलें म्हणजे प्रत्येक इसमाकडून काय येणें याचा हिशेब तयार करणें, व तें येणें वसूल करून तालुक्यांत भरणा करणें, हें होय. प्रथमतः त्यास प्रत्येक रयत इसमाचे जबाबदारीचा हिशेब तयार करावा लागतो.

पहिलें कोष्टक हें गां. न. नं. ६ मधील शेवटची नोंद (हा नमुना तयार करण्याच्या वेळीं गां. न. नं. ७ यांत लिहिलेली) दाखविते परंतु ज्याअर्थी सर्व्हे नंबर आणि हिस्सा नंबर हे गां. न. न. ७ यांत सहज सांपडतात, त्याअर्थी त्याची विशेष जरूरी नाहीं परंतु गां. न. नं. ७ (अथवा गां. न. नं. ६ देखील) हरवला तर हें एक माहिती देणारें खात्री दायक साधन आहे.

गां. न. नं. ८-अ वरून गां. न. नं. ६ अथवा ७ यांचा पुष्कळसा भाग तयार करतां येईल म्हणून हे कोष्टक ठेविले आहे.

२. नमुन्यावरून असें दिसून येईल कीं, इनाम जमिनीसंबंधानें गांव न. नं. ३ यांत दर्शविल्याप्रमाणें फक्त नुकसान व जुडीं हीं वसुलांत दाखविलीं आहेत. पूर्ण कमाल आकार वसुलांत काढला नाहीं. व गांव न. नं. ५ नंतर त्याची नक्तीचे हिशेबांत जरूरही लागत नाहीं. शिवाय ज्याअर्थी दहा नंबरांत एक, किंवा त्याहून कमी, यापेक्षां जास्त नंबर इनाम नसतात, त्याअर्थी नुकसानीचे रकमेस वेगळें कोष्टक अखेरपर्यंत दिलेले नाहीं. त्या ऐवजीं नुकसानीची रक्कम लोकलफंडाचे कोष्टकांत दाखविली आहे. कारण या कोष्टकांत लोकलफंडाची आकारणी खात्याच्या गट बेरजेवर केलेली आहे. (पुढें दिलेलें धरसोडीचे नियम पहा) प्रत्येक भागाची बेरीज गां. न. नं. ११ साठीं पाहिजे असलेमुळें येथें दाखविली आहे ती एकूण बेरजेंत घेण्याची जरूर नाहीं. कारण संयुक्त जमीनबाब पुढील कोष्टकांस दिली आहे, म्हणून नुकसानीची रक्कम त्याच कोष्टकांत लोकलफंडाबरोबर नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें दाखविली आहे. ती बेरजेंत घेऊं नये. परंतु तिचा उपयोग लोकलफंडाची आकारणी करण्यांत व गांव न. नं. ११ भरण्यांत करावा.

२-अ. याबुकांत पद्धतीप्रमाणें "सरकार", "लोकलफंड", "अब्बकारी" वगैरे अशीं जुनीं खातीं घालण्याची यापुढें जरूरी नाहीं. खाते हिशेब आहेत ते फक्त रयतेचे आहेत.

३. गांवचा नमुना नंबर ८-अ हा साधारणतः ज्या दशवार्षीक मुदतीपर्यंत कायम राहण्याचा उद्देश असतो त्या मुदतींत तो पुन्हा: लिहिण्यांत आल्याकारणानें कलेक्टर इतर रीतीनें हुकूम करील तें खेरीजकरून, ज्या सालीं गांवचा नमुना नंबर ७ पुन्हां लिहिण्यांत येतो त्या सालीं कुळकर्ण्यानें गांवचा नमुना नंबर ८-अ पूर्ण लिहिला पाहिजे. धारण करणाराचें परिशिष्ट (खातीं) एकदां कुळकर्ण्यानें लिहून काढल्यानंतर तें गांवचा नमुना नंबर ७ जितके मुदत कायम राहील तितक्याच मुदतीपर्यंत (दहा वर्षें अथवा रिव्हिजन सेटलमेंट होईपर्यंत साधारणतः कायम राहील. तितकीच मुदत (१० वर्षें अगर रिव्हिजन सेटलमेंटपर्यंत) कायम राहील. आतां जी काय व्यवस्था लावणेची राहिली ती दहा वर्षांचे मुदतींत होणारे फेरफारावदल राहिली. जेव्हां मार्च, एप्रिल किंवा मे महिन्यांत जमीन खरेदी किंवा गहाण देण्यांत येतें, व जमिनीचा कबजा नवीन खातेदारास देण्यांत येतो, तेव्हां नवीन खातेदारानें पीक करावें. व पुढील (समजा) डिसेंबर महिन्यांत योग्य होणारे सान्यास जबाबदार व्हावें, असा निसंशय समज असतो. साधारण वहिवाटींत तारीख ३१ जुलै पूर्वी कोणताहि कबजा मिळविला कीं त्याबरोबर पुढील हप्त्याची जबाबदारी येते. जर फेरफार, नोंदलेले दस्तऐवजानें होईल, तर तो गां. न. नं. ७ यांत दाखल होणेंपूर्वी नेहमीं २ किंवा ३ महिने जातात. तोंडी किंवा स्थानिक व्यवहार देखील घडल्यानंतर काहीं थोडा काळ गेल्याशिवाय ते कुळकर्ण्यास समजत नाहींत. असे रिपोर्ट करण्यास कायद्यानें तीन महिन्याची मुदत दिली आहे. सबब जूलै व हप्त्याची तारीख यांचे दरम्यान व कुळकर्ण्यानें फेरफार नोंदला, तर पुढील हप्त्याचे जबाबदारीस कांहीं बाध येतो कीं काय याचा त्यानें विचार करावा. त्यास संशय असेल तर त्यानें पक्षकारांस विचारावें. पुढील हप्त्यास बाब येत नसल्यास तो पुढील सालाकरितां म्हणून न. नं. ८-अ मध्यें दाखल करावा.

४. तारीख ३१ मार्चचे पूर्वी राजीनामा दिला म्हणजे त्याचा अम्मल पुढील आगष्ट महिन्याचे १ ले तारखेपासून होतो. तारीख ३१ मार्च नंतर राजीनामा दिला तर पुढील सालाचे महसुलास पुर्वीचा खातेदार जबाबदार धरण्यांत येतो.

५. तारीख ३१ जुलै पूर्वी जमीन कबुलायतीनें घेतली, तर तारीख १ आगष्टपासून सुरू होणारे पुढील सालचे महसुलास खातेदार जबाबदार धरण्यांत येतो. लागण करतां येईल असे मुदतींत जमिनीचा हंगामशीर कबजा देतां आला नाहीं, तर असे विशेष प्रसंगीं कलेक्टरसाहेब यांचे हुकुमावरून पुढील सालचा महसूल माफ करतां येईल.

६. जेव्हां बिनशेतीचे कामास जमीन लावण्याची परवानगी दिली असेल, किंवा परवा[illegible] करण्यांत आला असेल, तेव्हां आकार देण्याची जबाबदारी परवानगी दिल्या तारखेचे पुढील तारीख [illegible] उपयोग केल्याचे तारखेपासून सुरू होते. परंतु विशेषप्रसंगीं टेंपररी उपयोगाबद्दल सबंध चालू सालचा महसूल येतो. सालचे तुटक मुदतीचा महसूल किरकोळ जमीनबाबत म्हणून समजण्यांत येतो.

७. जेव्हां इनाम, सरकारदाखल होतो किंवा परत घेण्यांत येतो, तेव्हां ज्या हकीगतीवरून इनाम खालसा झाला, किंवा परत घेण्यांत आला, ती हकीगत घडल्याचे तारखेपासून पूर्ण आकार देण्याची जबाबदारी सुरू होते. वर्षाचे भागाचा पूर्ण सारा हा "इनाम जमिनीची जुडी" या सदराखालीं साधारण कायम जमीनबाब म्हणून समजण्यांत येतो, (गां. न. नं. ३ व ८-अ, यांत नुकसान कमी करून) व पुढील आगष्ट महिन्याचे १ ले तारखेपासून इनाम, हिशेबांतून अजी कमी करण्यांत येतो.

८. जबाबदारींत फेरबदल करणारे सर्व फेरफार गां. न. नं. ७ मध्यें व नंतर जसजसे होत जातील तसतसे गांवचा न. नं. ८-अ यांत (जर खाजगी असेल तर योग्य शहानिशा करून पान १३३ पहा) दाखल केले पाहिजेत. जर कुळकर्णी नियमितपणें नीटनेटकें काम रोजचेरोज, किंवा निदान प्रत्येक १० किंवा १५ दिवसांनी करील, तर सर्व दुरुस्त्या लिहून होतील परंतु वर्षाचे येण्याचे हिशेब लिहिल्यावर पुढील फेरफार, अर्थात पुढील सालचे येण्यांत फेरबदल करण्यासाठीं, दाखल करावेत. हे फेरफार सालोसाल कसे करावे हें खाते नं. २, गणपतराव याचे खात्यांत व विठ्ठल रामचंद्र याचा खाते उतारा नं. २३ यांत दर्शविलें आहे. जेव्हां जेव्हां खात्यांत जास्ती (वाढ) करण्यांत येईल तेव्हां तेव्हां जास्तीचा तपशील ज्या त्या भागाखालीं म्हणजे, जसें खालसा, इनाम, बिनशेती, असा दाखविला पाहिजे. व भागाची व लोकलफंडाची बेरीज दुरुस्त केली पाहिजे. या एकूण बेरजेची ज्या सालांत वहिवाट होणेची असेल तें साल बेरजेचे समोर शेऱ्याचे कोष्टकीं लिहावें. जेव्हां एकदा तुकडा (प्लाट) किंवा तुकड्यापैकीं भाग खात्यांतून कमी करण्यांत येईल, तेव्हां जुनी नोंद काढून टाकली पाहिजे व तशीच बेरीजहि दुरुस्त केली पाहिजे. परंतु तुकड्याचा (प्लाटचा) फक्त कांहीं भाग कमी केला असेल तर बाकी हिश्याची नोंद पुन्हा नवीन केली पाहिजे. व कोष्टक १ यांत फेरफार रजिष्टरांतील नंबर दाखल केला पाहिजे.

८-अ. जरी हा सर्वसाधारण नियम आहे तरी ७ व ८-अ हे बंद झाल्यावर कुळकर्ण्यानें आपला बुद्धीचा उपयोग केला पाहिजे. कांहीं फेरफार असे असतात कीं, बंद करण्याच्या तारखेपूर्वी (२९ जुलै) त्यांचा पुढील वर्षांपर्यंत परिणाम होत नाहीं व म्हणून ते ८-अमधील बंद करण्याच्या रेषेखालीं लिहिले जातील. हप्त्याच्या तारखेनंतर परंतु जुलै अखेर पूर्वी जे फरक त्याच्या नजरेला येतील व ज्यांचा चालू सालांतच परिणाम होतो ते ८-अमध्यें बंद रेषेच्यावर लिहावेत. म्हणजे ते चालू ८-अमध्यें व न. नं. ११ मध्यें जातील. वसुलाच्या तारखेनंतर न. नं. ८-अ हमेश दुरुस्त करूं नये, कारण तसें केलें म्हणजे ८-ब दुरुस्त केला पाहिजे व वसूल गां. न. नं. ९ मध्यें पूर्वीच भरला गेला असतो.

९. जरी मरणामुळें किंवा दुसरे कारणामुळें एकादे इसमाचे नांवावर जमीन राहिली नाहीं तरी त्याचे पूर्वी नंबर दिलेले खाते, यांत कोरें कायम ठेवलें पाहिजे. खाते नंबर ६ व १५ पहा. गांवचे हिशेबांत पूर्वी दाखल नाहीं असें एखादें इसमाचें नवीन खाते गां. न. नं. ८-अ यांत आलें तर, त्यास नवीन नंबर देऊन तें शेवटी दाखल केलें पाहिजे. या व्यवस्थेचें कारण असें आहे कीं खात्याला एकदां नंबर दिला गेला म्हणजे, जसें बळवंतराव यादवराव नं. ३, याचा मुलगा गणपतराव जरी वारस म्हणून त्याचे जागीं आला तरी, त्याचा खाते नंबर दहा वर्षांचे मुदतीपर्यंत तसाच कायम राहील, व दुसरे खात्यांत फेरबदल झाल्यामुळें हें खातें प्रत्येक वर्षी फेरबदल होण्यास पात्र होणार नाहीं. (बांधीव बुकाऐवजी निरनिराळे कार्डांचा उपयोग केला तर ह्यापेक्षां चांगलें.)

१०. गां. न. नं. ८-अचे सबंध हिशेबी बुकांत छापलेले पुष्कळ फार्म एके ठिकाणीं बांधलेले राहतील. बेताच्या नोंदी किंवा हिस्से असणाऱ्या एका खात्याकरितां साधारणपणें एका इसमास ½ ताव प्रमाणें ठेवावें, परंतु फार मोठ्या खात्याकरितां दोन किंवा त्याहूनहि जास्त कागद लागण्याचा संभव आहे, ज्याअर्थी खातीं नंबराचे अनुक्रमाप्रमाणें व वर्णाच्या अनुक्रमणिकेसह घातलीं जातात, त्याअर्थी पानांस नंबर देण्याची जरूरी नाहीं.

११. नमुन्यावरून असें दिसून येईल कीं, खात्यांत खालसा (सरकारी), इनाम, बिनशेती, असे तीन भाग केलेले आहेत. पान १९६ पॅरा २ (३) पहा. व प्रत्येक भागाची एकूण बेरीज वेगळी दिली आहे. तालुक्याचें व जिल्ह्याचे हिशेब देण्याकरितां या माहितीची जरूर लागते. यांत म्हणण्यासारखी मेहनत मुळींच वाढत नाहीं, कारण लिहिण्याच्या नोंदी फार नसतात. फक्त प्रत्येक भागाखालीं नोंदींची सारखीच संख्या व्यवस्थीतपणें लिहावयाची असते. जेव्हां एकादे इसमाचे खात्यांत खालसा, इनाम किंवा बिनशेती हा तपशील नसेल तेव्हां अर्थात तो भाग लिहूं नये. परंतु प्रत्येक हिशोबाचे प्रत्येक भागाखालीं व भागाचे दरम्यान एकादे भागांत जमीन नसेल तेव्हां पुरेशी जागा जास्त नोंदीकरितां हमेष सोडली पाहिजे. उदाहरण, गेनू मथू नंबर ५, यास इनाम जमीन नाहीं, व बिनशेतीची जमीनही नाहीं म्हणून खालसाचे खालीं ४ किंवा ५ ओळी कोऱ्या सोडल्या पाहिजेत, कारण दहा वर्षांत त्या भागांपैकीं जमीन कदाचित त्याचे कबजांत येईल.

[illegible] आहे याचें अनुमान कुळकर्ण्यानें करावें. गांवचा सावकार किंवा जमिनीचे नवीन तुकडे [illegible] अगर गहाण ठेवणारा असा जमिनीचा मोठा खातेदार यांस बरीच जागा, कदाचित अर्धे पानहि लागेल. [illegible] क्वचित फेरबदल करणारे नेहमींचे खातेदार यांस दोन ओळींचे वर जागा लागणार नाहीं.

१२. वर सांगितल्याप्रमाणें शक्य अशा नवीन नोंदीकरितां लागणारे जागेबद्दल तरतूद केल्यावरही जेव्हां खात्यांत एक किंवा दोन नोंदी असतील तेव्हां त्याकरितां ½ पान सोडण्याची जरूरी नाहीं. दोन किंवा तीन खातों देखील ½ पानांत लिहितां येतील. एकादे खात्यांत थोडी जागा सोडली असेल, व आकस्मिक वारसामुळें किंवा दुसरे कांहीं अकल्पित कारणामुळें खातेदार आपलें खातें पुष्कळ नोंदींनीं वाढविल, तर शेवटीं एक नवीन कागद जोडून त्यास पूर्वीचा नंबर द्यावा. पूर्वींचें लहान खातें कमी करावें, व तेथें नवीन खातें कोठें आढळेल तो दाखला लिहावा.

१३. जेव्हां सबंध खात्याचे किंवा जवळ जवळ सबंध खात्याचें नांवांत वारसामुळें किंवा सबंध विक्रीमुळें बदल होईल; म्हणजे बापाचे नांवाचे ठिकाणीं आतां मुलाचें किंवा खरेदीदाराचें नांव दाखल करणेचें असेल, तर खातें पुन्हां लिहिण्याची जरूरी नाहीं, नांव दुरुस्त करूस आद्य अक्षराची छोटी सही करावी, व गां. न. नं. ६ मधील फेरफाराचा नंबर दाखल करावा.

१४. सर्व खातीं लिहून झालीं म्हणजे वर्ण अनुक्रमाप्रमाणें अनुक्रमणिका लिहून ती आरंभीं जोडावी या पुस्तकांतील अनुक्रमणिका इंग्रजी वर्णाप्रमाणें आहे. परंतु कुळकर्ण्यास मराठी बाराखड्याप्रमाणें लिहिणेंच नेहमी पसंत पडेल. जेव्हां नवीन नांव दाखल करण्यांत येईल, तेव्हां तें योग्य ठिकाणीं वर्ण अनुक्रमाप्रमाणें दाखल केलें पाहिजे, व नवीन खात्याचा नंबर त्याचे समोर लिहिला पाहिजे. किंवा सबंध खातें त्याचे नांवावर वर्ग होऊन आलें असलें (प्यारा ८ पहा) तर जुना नंबर लिहिला पाहिजे.

हें इंडेक्स गां न नं. ७ नंतर पान ८२ वर त्या सांगितलेल्या कारणासाठीं लिहिलें आहे.

१५. सर्व्हे नंबर १-अ—४-क चे निमे आकारांबद्दल खातें नं. ३ यांतील नोंदीकडे लक्ष द्यावें.

कधीं कधीं खातेदार एकादे कंपनीचा, धार्मिक संस्थेचा किंवा सबंध गांवचे लोकांचा व्यवस्थापक म्हणून जमिनीचा भाग धारण करतो. त्यानें जबाबदारी स्वीकारली आहे तोपर्यंत जमीन त्याचे खात्यांत दाखल करावी व त्याचे व्यवस्थापकपणाचा प्रकार गा. न. नं. ६ यांत दाखवावा.

१६. गांवचा न. नं. ६ व ७ वरून गां. न. नं. ८-अ यांत निरनिराळे भागाखालील नोंदी दाखल केल्यावर कुळकर्ण्यानें लागलींच पुढें लोकलफंड दाखल केला पाहिजे. लोकलफंडाचा सन १९२७ चा आक्ट १० प्रमाणें साधारण जमीनबाबत उत्पन्नास पात्र अशा प्रत्येक रुपयामागें एक आणा याप्रमाणें लोकलफंड घेण्यांत येतो. मग तें उत्पन्न इनाम करून दिलें असो अगर नसो. तसेंच जमीनबाब उत्पन्नाचे सर्व मत्यांवर जसें गवताची विक्री, फळांची विक्री, वगैरे, यांजवरहि लोकलफंड घेण्यांत येतो. ज्या किरकोळ जमीनबाब रकमांवर लोकलफंड घेण्यांत येत नाहीं त्या गां. न. नं. ४ चे उपोद्घातांत दिल्या आहेत. गां. न. नं. ८-अ यांतील प्रत्येक भागावरील लोकलफंडाची बेरीज कुळकर्ण्यानें करून संयुक्त जमीनबाबेचे कोष्टक भरलें पाहिजे. याचा अर्थ असा आहे कीं, कुळकर्ण्यानें सर्वांची एकंदर बेरीज दिली म्हणजे त्यानें अखंड एक रकमेनें वसूल केला पाहिजे. आणि जमीनबाब व लोकलफंड अशी पृथक् फोड करण्याचे बाबतींत त्याचा कांहीं एक संबंध नाहीं. हें काम मामलेदार यांनीं तालुक्याचे एकूण वसुलावर सायंत करावें (स. ठ. नं. ४४९५-१५). लोकलफंड आकारणीचें कोष्टक खालीं दिलें आहे:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्येकास १६ रुपयांस | ... | ... | ... | १ रुपया. |
| ,, १ ,, | ... | ... | ... | १ आणा. |
| ,, ४ आण्यास | ... | ... | ... | ३ पै |
| ,, ४ आण्याखालील बाकी रकमेवर (सबंध खात्यांत) | | | ... | ३ पै |
| ,, ३ आणे ११ पै अथवा कमी अशा कोणत्याहि खात्यावर | | | ... | ० पै (१९२७ चा आक्ट १०) |

लोकलबोर्ड ॲक्टाप्रमाणें जेव्हां डि. लो. बोर्ड आपला लो. फंडाचा दर वाढवील तेव्हां तो दर ३ पैच्या गुणकांत वाढविला पाहिजे. जर तो रुपयामागें एक आण्या ऐवजीं दोन आणे केला तर लो. फंड आकारणीचे आणि ½ दराप्रमाणें लो. फंड मिळविण्याचें पत्रक कोणीहि तयार करूं शकेल आणि ता. न. नं. १० खालीं येणारा भाग $\frac{१}{१६}$ ऐवजीं ½ होईल. जर १ आणा ९ पै दर असला तर एका रुपयांत $\frac{१}{६४}$ मिळवावे लागतील आणि याचें पत्रकहि सहज तयार करतां येईल व व ता. न. नं. १० खालीं येणारा भाग $\frac{७}{६४}$ नें होईल. गणिताचें साधारण ज्ञान असणाऱ्या कोणत्याहि मामलेदारास एक आणा दर असतांना ता. न. नं. १० तयार करणें जितकें सोपें जातें तितकेंच हेंहि सोपें जाईल.

१७. सिंधमध्यें धरसोडीची एक विशेष व्यापक पद्धत सुरू होती आणि ह्या पद्धतीचा [illegible] (ठ. नं. ७४८२-१९) १९२३ व २७ आक्टाअन्वयें सुरू झालेली धरसोडीची पद्धत डिस्ट्रिक्ट [illegible] पद्धतीपेक्षां अधिक फायदेशिर आहे. नहिगांवमध्यें सविस्तर लिहीलेल्या खात्यावर जुन्या पद्धतीपेक्षां सुमारें २१ पै ज्यास्त येतात. एकंदरीत ती किरकोळ आहे परंतु गां. न. नं. ११ च्या बेरजेचा (म्हणजे [illegible] इसमाकडून येणारे नक्की रकमेचा) गां. न. नं. ९ चे बेरजेशीं (सर्व्हे वगैरे कागदावरून ज्यांत प्रत्येक व्यक्तीचा संबंध नसतो अशा ठरलेल्या येण्याशीं) मेळ घेण्याकरतां जी रक्कम लागते ती रक्कम ह्या पद्धतीनें बिनचूकपणासाठीं जी रक्कम लागते त्यापेक्षां अधिक होते. मोठ्या गांवांत ह्या पद्धतीनें ९ रुपयाचा फरक पडेल आणि ती तपशीलवार हिशेबांतील कित्येक रुपयांची चूक छपाविण्यास पुरेसी होऊन गां. न. नं. ११ चे पद्धतींत बिघाड करील. सरकारला हा धोका दिसून येईल आणि ज्या जुन्या पद्धतीनें म्हणण्यासारखी तफावत कधींहि पडली नाहीं, त्या पद्धतीचा स्वीकार सरकार करील असा माझा विश्वास आहे. १९२३ च्या आक्टाच्या बहुतेक तरतुदीप्रमाणें ही गोष्ट देखील अर्धवट विचारांत घेतली गेली म्हणून त्यामुळें हिशेब सुलभ करण्याऐवजीं गुंतागुंतीचे झाले आहेत आणि बिघडले आहेत व तसेंच डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डास अशा अयोग्य रितीच्या हिशेबामुळें वार्षिक फक्त थोड्याच रुपयांचा फायदा होतो. सिंधकरितां ठ. नं. ७४८२-१९ पहा. परंतु नवीन आक्टाप्रमाणें सिंधनें त्याच नियमाचा उपयोग करावा हें उघड आहे.

१८. * * * * * * *

१९. * * * * * * *

२०. * * * * * * *

ठक्कर परीश सातारा ९४२०३ २४०००

# गांवचा नमुना नंबर ८-अ.

## खातें उतारा.

(कागदासुद्धां) एक आणा.

तालुका बलसार.
मौजे नहीगांव.
खातें नंबर २३.

खातेदाराचें नांव— विठ्ठल रामचंद्र (रामचंद्र बळवंत.)

| चा नमुना बर ६. | सर्व्हे नंबर व हिसा नंबर. | क्षेत्र. | | वसूल करण्याची रकम. | | | | | | शेरा (व इनामावरील नुकसान). | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आकार अगर जुडी. | | | लोकल फंड. | | संयुक्त जमीनबाब. | | |
| | | एकर. | गुंठे. | रु. आ. पै | | | रु. आ. पै | | रु. आ. पै | | |
| | | | | खालसा. | | | | | | | |
| ४८ | २-ब/४ | ४ | २ | ८ | २ | ० | | | | | |
| | २-ब/६ | ५ | ० | १ | ४ | ० | | | | | |
| ४८ | ८ | २० | ० | १० | ० | ० | | | | | |
| ४८ | ९/१ | १२ | १६ | ८ | ० | ० | | | | | |
| ४३ | १७पोट१/२ फाळणी १/२, २, ३, ४, ५. | १ | ५ | ३ | ११ | ० | | | | | |
| | | ४२ | २३ | ३१ | १ | ० | १ १५ ३ | | ३३ ० ३ | एकूण | १९०८-०९ |
| स्ती ५६ | २-बचा/३, २-ब/५. | ९ | २ | ९ | ६ | ० | | | | | |
| | | ५१ | २५ | ४० | ७ | ० | | | | | |
| मी ५७ | ८ | २० | ० | १० | ० | ० | | | | | |
| | | ३१ | २५ | ३० | ७ | ० | १ १४ ६ | | ३२ ५ ६ | ,, | १९०९-१० |
| मी ६१ | २ब/४ | ४ | २ | ८ | २ | ० | | | | | |
| | | २७ | २३ | २२ | ५ | ० | १ ६ ६ | | २३ ११ ६ | ,, | १९११-१२ |
| धिक ७५ | २८ | १५ | ० | ३ | १२ | ० | | | | | |
| | | ४२ | २३ | २६ | १ | ० | १ १० ० | | २७ ११ ९ | ,, | १९१२-१३ |
| | | | | इनाम. | | | | | | | |
| ४८ | ४/२ | ३ | ८ | ० | १५ | ० | ० ३ ३ | | १ २ ३ | (२-३-६) एकूण | १९०८-०९ |

दाखला देण्यांत येतो कीं, सन १९१२-१३ चे गांवचे हिशोबाप्रमाणें बरोबर आहे.

(सही)

कुळकर्णी.

## गांवचा नमुना नंबर ८-ब.

खातेवही ( जमाखर्चाची ).

खाते नंबर १, बाळकृष्ण वासुदेव.

नांव

| | | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|---|
| बाकी. | तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| | बिनतहकुबीची. | | | |
| चालू साल कायम.. | | | | |
| | | १ खालसा ( सरकारी ). | | १० ० ० |
| | | २ इनाम. | | ११ ४ ० |
| | | ३ बिनशेती. | | १३२ १३ ० |
| फिरतें किरकोळ. | | | | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| | | | एकूण येणें. | १५४ १ ० |
| वजा—सूट. | | | | |
| तहकुबी. | | | | |
| हसे. | पहिला रु. १४४-१-० | दुसरा रु. १०-०-० | निव्वळ येणें. | १५४ १ ० |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| ७ | ५-१ | कायम ( तालुक्यांत मनीआर्डरीनें आली ). | १४४ १ ० |
| ५० | १३-३ | कायम. | १० ० ० |

| साल. | बाब. | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण वसूल | १५४ १ ० |
| (अ) | | | बाकी. | |
| (ब) | | | (अ) तहकुबीची. | |
| | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर २, गणपतराव बळवंतराव.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| बिनतहकुबीची. | | | |

ह साल कायम.

| | | |
|---|---|---|
| १ खालसा (सरकारी). | | ० २ ३ |
| २ इनाम. | | ० ३ ० |
| ३ बिनशेती. | | ० ० ० |

करतें किरकोळ.

१
२
३

| | | |
|---|---|---|
| एकूण येणें. | | ० ५ ३ |

जा—सूट.

तहकुबी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हते. | पहिला रु. ० ५ ३ | दुसरा रु. | निव्वळ येणें. | ० ५ ३ |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | |
|---|---|---|
| ३२ | ७-१ | कायम. |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | ० ५ ३ |
|---|---|---|---|---|
| | | | बाकी. | |
| | | | (अ) तहकुबीची. | |
| (ब) | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर ३, बाळू मधू.

नांवें

| | साल. | रक्कम. | एकूण |
|---|---|---|---|
| बाकी. | | | |
| तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब |
| बिनतहकुबीची. | | | |

चालू साल कायम.

| | | |
|---|---|---|
| १ खालसा ( सरकारी ). | | १ ७ ० |
| २ इमान. | | |
| ३ बिनशेती. | | |

फिरतें किरकोळ.

| | | |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| | एकूण येणें. | १ ७ ० |

वजा—सूट

| | | |
|---|---|---|
| तहकुबी. | | |
| | निव्वळ येणें. | १ ७ ० |

| हते. | पहिला रु. १ ७ ० | दुसरा रु. |
|---|---|---|

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| २९ | १६-१ | कायम. | १ ७ ० |

| साल. | बाब. | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण वसूल. | १ ७ ० |
| | | | बाकी. | |
| (अ) | | | (अ) तहकुबीची. | |
| (ब) | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर ४, भोगिनाथ रामलाल.

| | साल. | रक्कम. | एकूण |
|---|---|---|---|
| बाकी. | | | संयुक्त जमीनबाब. |
| तहकुबीची. | १९१०–११ | ५ ५ ० | |
| बिनतहकुबीची. | १९१०–११ | ५ ५ ० | १० १० ० |
| चालू साल कायम. | | | |
| | १ खालसा ( सरकारी ). | | २३ १० ३ |
| | २ इनाम. | | |
| | ३ बिनशेती. | | |
| फिरतें किरकोळ. | | | |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| | | एकूण येणें. | ३४ ४ ३ |
| वजा—सूट. | | | |
| तहकुबी ५ ५ ० (१९१०-११) ई. | | | ५ ५ ० |
| हसे. | पहिला रु. २३ ४ ३ | दुसरा रु. ११ ० ० | निव्वळ येणें. २८ १५ ३ |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| ८ | ५-१ | बाकी ( बिगरहुकुमी ) १९१०-११ | ५ ५ ० |
| | | कायम. | ५ ५ ० |
| १४ | १०-१ | सदर. | ७ ५ ३ |
| ५६ | १३-३ | सदर. | ११ ० ० |

| साल. | बाब. | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण वसूल. | २८ १५ ३ |
| (अ) १९१०-११ | कायम. | ५ ५ ० | | |
| (ब) | | | बाकी. | |
| | | | (अ) तहकुबीची. | ५ ५ ० |
| | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर ५, गेनू मथू.

नांवें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बाकी. | | साल. | रक्कम. | एकूण. |
| | तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| | बिनतहकुबीची. | | | |
| चालू साल कायम. | | | | |
| | १ खालसा ( सरकारी ). | | | १ १० ३ |
| | २ इनाम. | | | |
| | ३ बिनशेती. | | | |
| फिरतें किरकोळ | | | | |
| १ बिनशेतीचा आकार. | | | १० १० ० | |
| २ गवत. | | | ४ १५ ९ | |
| ३ फळें. | | | ५ ५ ० | |
| ४ नोटीस. | | | ० ४ ० | |
| ५ हक्कनोंदणी फी. | | | १ ० ० | २२ २ ९ |
| | | | एकूण येणें. | २३ १३ ० |
| वजा—सूट. | | | | |
| तहकुबी. | | | | |
| हप्ते. | पहिला रु. १ १० ३ | दुसरा रु. | निव्वळ येणें. | २३ १३ ० |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| २७ | १९-२ | कायम. | १ १० ३ |
| | | बिनशेतीचा आकार. | १० १० ० |
| | | गवत. | ४ १५ ९ |
| | | हक्कनोंदणीची फी. | १ ० ० |
| | | नोटीस. | ० ४ ० |
| ४५ | १८-५ | फळें. | ५ ५ ० |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | २३ १३ ० |
|---|---|---|---|---|
| (अ) | | | बाकी. | |
| (ब) | | | (अ) तहकुबीची. | |
| | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर ४, भोगिनाथ रामलाल.

| | साल. | रक्कम. | एकूण |
|---|---|---|---|
| बाकी. | | | संयुक्त जमीनबाब. |
| तहकुबीची. | १९१०–११ | ५ ५ ० | |
| बिनतहकुबीची. | १९१०–११ | ५ ५ ० | १० १० ० |
| चालू साल कायम. | | | |
| | १ खालसा ( सरकारी ). | | २३ १० ३ |
| | २ इनाम. | | |
| | ३ बिनशेती. | | |
| फिरतें किरकोळ. | | | |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| | | एकूण येणें. | ३४ ४ ३ |
| वजा—सूट. | | | |
| तहकुबी ५ ५ ० (१९१०-११) ई. | | | ५ ५ ० |
| हसे. | पहिला रु. २३ ४ ३ | दुसरा रु. ११ ० ० | निव्वळ येणें. २८ १५ ३ |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| ८ | ५-१ | बाकी ( बिगरहुकुमी ) १९१०-११ | ५ ५ ० |
| | | कायम. | ५ ५ ० |
| १४ | १०-१ | सदर. | ७ ५ ३ |
| ५६ | १३-३ | सदर. | ११ ० ० |

| साल. | बाब. | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण वसूल. | २८ १५ ३ |
| (अ) १९१०-११ | कायम. | ५ ५ ० | | |
| (ब) | | | बाकी. | |
| | | | (अ) तहकुबीची. | ५ ५ ० |
| | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खाते नंबर ५, गेनू मथू.

नांवें

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. | | | |
| तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| बिनतहकुबीची. | | | |

चालू साल कायम.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ खालसा ( सरकारी ). | | | | १ १० ३ |
| २ इनाम. | | | | |
| ३ बिनशेती. | | | | |

फिरतें किरकोळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ बिनशेर्ताचा आकार. | १० | १० | ० | |
| २ गवत. | ४ | १५ | ९ | |
| ३ फळें. | ५ | ५ | ० | |
| ४ नोटीस. | ० | ४ | ० | |
| ५ हक्कनोंदणी फी. | १ | ० | ० | २२ २ ९ |
| एकूण येणें. | | | | २३ १३ ० |

वजा—सूट.

तहकुबी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हते. | पहिला रु. १ १० ३ | दुसरा रु. | निव्वळ येणें. | २३ १३ ० |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| २७ | १९-२ | कायम. | १ १० ३ |
| | | बिनशेतीचा आकार. | १० १० ० |
| | | गवत. | ४ १५ ९ |
| | | हक्कनोंदणीची फी. | १ ० ० |
| | | नोटीस. | ० ४ ० |
| ४५ | १८-५ | फळें. | ५ ५ ० |

| साल. | बाब. | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण वसूल. | २३ १३ ० |
| (अ) | | | बाकी. | |
| (ब) | | | (अ) तहकुबीची. | |
| | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर ७, लक्ष्मीबाई कोम आनंदराव.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| बिनतहकुबीची. | | | |
| साल कायम | | | |
| | १ खालसा ( सरकारी ). | | ० ६ ६ |
| | २ इनाम. | | |
| | ३ बिनशेती. | | |
| तें किरकोळ. | | | |
| | | एकूण येणें. | ० ६ ६ |
| —सूट. | | | |
| तहकुबी. | | | |
| हसे. | पहिला रु. ० ६ ६ | दुसरा रु. | निव्वळ येणें. ० ६ ६ |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| २८ | ८-१ | कायम. | ० ६ ६ |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | |
|---|---|---|---|---|
| | | | | ० ६ ६ |
| | | | बाकी. | |
| (अ) | | | (अ) तहकुबीची. | |
| (ब) | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर ८, मनाजी अनंदराव.

नांवें.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. | | | संयुक्त जमीनबाब. |
| तहकुबीची. | १९०९-१० | ८ ८ ० | |
| बिनतहकुबीची. | | | ८ ८ ० |
| चालू साल कायम. | | | |
| १ खालसा (सरकारी). | | | १३ ० ० |
| २ इनाम. | | | २ ७ ० |
| ३ बिनशेती. | | | ३२ ५ ० |
| फिरतें किरकोळ. | | | |
| १ कबजाहक्काची किंमत. | | ५३ २ ० | |
| २ गांवठाण लागण. | | ५ ५ ० | |
| ३ हक्कनोंदणीची फी. | | १ ० ० | ५९ ७ ० |
| | | एकूण येणें. | ११५ ११ ० |
| वजा—सूट (१९०९-१९१०) ८-८-० (अ) | | | ८ ८ ० |
| तहकुबी. | | | |
| हसे. | पहिला रु. ४९ ४ ५ | दुसरा रु. ७ ० ० | निव्वळ येणें. १०७ ३ ० |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| ३ | २५-८ | कबजाहक्काची किंमत. | १२ २ ० |
| | | गांवठण लागण. | ५ ५ ० |
| तालुक्यांत. | २४-९ | कबजाहक्काची किंमत. | ४० ० ० |
| ९ | ६-१ | कायम. | ४० १२ ५ |
| | | हक्कनोंदणीची फी. | १ ० ० |
| ५२ | १३-३ | कायम. | ७ ० ० |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | |
|---|---|---|---|---|
| | | | | १०७ ३ ० |
| | | | बाकी. | |
| | | | (अ) तहकुबीची | |
| | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर १३, राघू रामा माळी.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. | | | |
| तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| बिनतहकुबीची. | | | |
| चालू साल कायम. | | | |
| | १ खालसा (सरकारी). | | १७ २ ३ |
| | २ इनाम. | | |
| | ३ बिनशेती. | | |
| फिरतें किरकोळ. | | | |
| १ जागाभाडें. | | ५ ५ ० | |
| २ गवत. | | १० १० ० | |
| ३ पाण्याचा आकार. | | १२ १२ ० | २८ ११ ० |
| | | एकूण येणें. | ४५ १३ ३ |
| वजा—सूट (१९१२-१३) ४-४-० (बी) मामलेदार यांचा हु. नं. ६/६-४-१३. | | | ४ ४ ० |
| तहकुबी. | | | |
| हप्ते. पहिला रु. ९ २ ३ | दुसरा रु. ८ ० ० | निव्वळ येणें. | ४१ ९ ३ |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| १ | १९-८ | गवत. | १० १० ० |
| २४ | २४-१ | कायम. | ९ २ ३ |
| | | जागाभाडें. | ५ ५ ० |
| | | पाण्याचा आकार. | १२ १२ ० |
| ५३ | १३-३ | कायम. | ८ ० ० |

| साल. | बाब. | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण वसूल. | ४५ १३ ३ |
| फाजील पुढील मामलेदार यांचा | सालास जमा करणेबद्दल हु. नं. ६, ता. ६-४-१३. | | बाकी.<br>(अ) तहकुबीची.<br>(ब) निनतहकुबीची. | |
| | | | वजा फाजील वसूल. | ४ ४ ० |
| | | | निव्वळ वसूल. | ४१ ९ ३ |

खातें नंबर १९, शिवाजी बाळाजी व इतर.

नांवें.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. | | | संयुक्त जमीनबाब. |
| तहकुबांची. | | | |
| बिनतहकुबीची. | १९१०-११ | १९ १९ ० | १९ १९ ० |
| चालू साल कायम. | | | |
| १ खालसा (सरकारी). | | | ६९ ९ ६ |
| २ इनाम. | | | |
| ३ बिनशेती. | | | |
| फिरतें किरकोळ. | | | |
| एकूण येणें. | | | ८१ ४ ६ |
| वजा—सूट (१९१२-१३) ७-१५-६ (क) मामलेदार यांचा हु. नं. १२१/११-१२-१२. | | | ७ १५ ६ |
| तहकुबी. | | | |
| हप्ते. | पहिला रु. ४९ ४ ६ | दुसरा रु. ३२ ० ० | निव्वळ येणें. ७३ ९ ० |

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| १० | ६-१ | बाकी. | १९ १९ ० |
| | | कायम. | ३३ ९ ६ |
| ५४ | १३-३ | कायम. | २४ ० ६ |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | ७३ ९ ० |
|---|---|---|---|---|
| | | | बाकी. | |
| (अ) | | | (अ) तहकुबीची. | |
| (ब) | | | (ब) बिनतहकुबीची. | |

खातें नंबर २२, तुकाराम अंताजी.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. | | | संयुक्त जमीनबाब. |
| तहकुबीची. | | | |
| बिनतहकुबीची. | | | |
| चालू साल कायम. | | | |
| १ खालसा ( सरकारी ). | | | १६ १ ३ |
| २ इनाम. | | | |
| ३ बिनशेती. | | | |
| फिरतें किरकोळ. | | | |
| १ गवत. | | ४ ९ ६ | |
| २ मळई जमीन. | | २१ ४ ० | |
| ३ पाण्याचा आकार. | | ६ १४ ६ | |
| ४ नोटीस. | | ० ८ ० | |
| ५ चौथाई दंड. | | ३ ० ० | |
| ६ हक्कनोंदणींची फी. | | ० ८ ० | ३६ १२ ० |
| | | एकूण येणें. | ५२ १३ ३ |

वजा—सूट.

तहकुबी.

| हप्ते. | पहिला रु. ८ १ ३ | दुसरा रु. ८ ० ० | निव्वळ येणें. | ५२ १३ ३ |
|---|---|---|---|---|

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | |
|---|---|---|---|
| २ | २५-८ | मळई जमीन. | २१ ४ ० |
| | | गवत. | ४ ९ ६ |
| १५ | १४-१ | कायम. | ८ १ ३ |
| ५१ | १४-५ | पाण्याचा आकार. | ६ १४ ६ |
| | | नोटीस. | ० ८ ० |
| | | हक्कनोंदणीची फी. | ० ८ ० |
| | | चौथाई दंड. | ३ ० ० |
| | | कायम. | ८ ० ० |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | ५२ १३ ३ |
|---|---|---|---|---|
| (अ) | | | बाकी. (अ) तहकुबीची. | |
| (ब) | | | (ब) बिनतहकुबाची. | |

खाते नंबर २३, विठ्ठल रामचंद्र.

नांवें.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. | | | |
| तहकुबीची. | | | संयुक्त जमीनबाब. |
| बिनतहकुबीची. | | | |

चालू साल कायम.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ खालसा ( सरकारी ). | | | | २७ | ११ | ० |
| २ इनाम. | | | | १ | २ | ३ |
| ३ बिनशेती. | | | | | | |

फिरतें किरकोळ.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ बिगरहुकमी कबजाचें भाडें. | ४ | ४ | ० | | | |
| २ बिगरहुकमी कबजाचा दंड. | १० | ० | ० | | | |
| ३ जळाऊ लांकूड. | ४ | ४ | ० | | | |
| ४ बिनशेतीचा सारा मामलेदार यांचा हु. नं. १८/१०-१-१३. | ४ | ४ | ० | २२ | १२ | ० |
| एकूण येणें. | | | | ९१ | ९ | ३ |

वजा—सूट ( १९१२-१३ ) ४-४-० (ड)

तहकुबी ( १९१२-१३ ) ८-८-० (फ) — १२ १२ ०

| हप्ते. | पहिला रु. १४ १३ ३ | दुसरा रु. ११ ० ० | निव्वळ येणें. | ३८ | १३ | ३ |
|---|---|---|---|---|---|---|

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तारीख. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २६-८ | अतिक्रमण. | ४ | ४ | ० |
| | | जळाऊ लांकूड. | ४ | ४ | ० |
| | | अतिक्रमणाबद्दल दंड. | १० | ० | ० |
| २७ | १९-१ | कायम. | ६ | ९ | ३ |
| ६८ * | १७-३ | कायम. | ९ | १२ | ० |
| | | बिनशेतीचा आकार. | ४ | ४ | ० |
| | | एकूण वसूल. | ३८ | १३ | ३ |

| साल. | बाब. | रक्कम. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ८ ८ ० | बाकी. | | | |
| (अ) ( १९१२-१३ ). | कायम. | | (अ) तहकुबीची. | ८ | ८ | ० |
| (ब) | | | (ब) बिनतहकुबीची. | | | |

खातें नंबर २४, मक्ताखातें.

| | साल. | रक्कम. | एकूण. |
|---|---|---|---|
| बाकी. तहकुबी. | | | संयुक्त जमीनबाब. |
| बिनतहकुबी. | | | |

चालू साल कायम.

१ खालसा ( सरकारी )
२ इनामे.
३ बिनशेती.

फिरतें किरकोळ.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ गोविंद हरी—जळाऊ लांकडें. | १ | १ | ० | |
| २ सदर —हक्कनोंदणीची फी. | ० | ८ | ० | |
| ३ रामचंद्र गोविंद—फळें | २ | २ | ० | |
| ४ गोविंद हरी—विक्रीचा खर्च. | २ | ० | ० | ५ ११ ० |
| एकूण येणें. | | | | ५ ११ ० |

वजा—सूट.

तहकुबी.

| हप्ते. | पहिला. | दुसरा. | निव्वळ येणें. | ५ ११ ० |
|---|---|---|---|---|

जमेच्या रकमा.

| पावती नंबर. | तरीख. | | |
|---|---|---|---|
| ११ | ६-१ | रामचंद्र—फळे. | २ २ ० |
| १७ | २-३ | गोविंद हरी—जळाऊ लांकडें. | १ १ ० |

| साल. | बाब. | रक्कम. | एकूण वसूल. | ३ ३ ० |
|---|---|---|---|---|
| (अ) | | | | |
| (ब) किरकोळ. १९१२-१३. | | | बाकी. (अ) तहकुबीची. | |
| | ह. नों. फी. | २ ० ० | | |
| | | ० ८ ० | | २ ८ ० |

# गांवचा नमुना नंबर ८-ब ( इरिगेशन ).

खातें नं. पाणी घेणाराचें नांव

| एक्झिक्युटिव्ह एंजिनिअरकडून आलेल्या मागणी पत्रकांतील नंबर. | बाक्या. | | | चालू मागणी. | | | एकचतुर्थांश दंड. | एकूण. | | वसुल्या. | | | | | | | | शिल्लक. | | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | बाक्या. | | | | | चालू. | | | | | | |
| | साल. | रक्कम. | लोकल फंड सेस. | मोसम. | रक्कम. | लोकल फंड सेस. | | पाणीपट्टी. | लोकल फंड सेस. | तारीख. | पावती नं. | साल. | रक्कम. | लोकल फंड सेस. | मोसम. | रक्कम. | लोकल फंड सेस. | साल. | रक्कम. | लोकल फंड सेस. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | रु. आ. पै | रु. आ. पै | | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | | | | रु. आ. पै | रु. आ. पै | | रु. आ. पै | रु आ. पै | | रु. आ. पै | रु. आ. पै | |
| तहकूब केलेल्या ... | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| तहकूब न केलेल्या... | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण ... | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| वसुलीच्या म्हणून ठरविलेल्या बाक्या. | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## गांवचा नमुना नंबर ८-ब-बाबत खुलासा.

नमुना नंबर ८-अवरून पहिला हप्ता घेण्यास पात्र होण्यापूर्वीच विवक्षित रयत इसमाकडून नक्की कायम जमीनबाब वसूल येणें आहे हें समजतें. परंतु मुलकी साल पुरें होईपर्यंत किरकोळ जमीनबाबेची किती रक्कम त्यांजकडून येण्यास पात्र होईल हें सांगतां येत नाहीं. तसेंच अधिकार असणारा कामगार त्यास सूट किंवा तहकुबी देईल, अगर उलटपक्षीं त्यांजकडून आणखीं जास्त रक्कम वसूल करण्याचा हुकूम करील, हेंहि सांगतां येणार नाहीं. म्हणून खरें म्हटलें म्हणजे प्रत्येक इसमांकडून मुलकी सालांत येणारी रक्कम, व वसूल झालेली रक्कम असें दाखविणारा गांवचा नमुना नंबर ८-ब जुलई अखेरपर्यंत तोंडमिळवणी करून बंद करितां येणार नाहीं. परंतु ऑगस्ट महिन्यांत मुलकी सालाचे आरंभापासून प्रत्येक आठ खात्यास एक पान (दोन बाजू) याप्रमाणें चांगलें बांधलेलें एक बुक तयार ठेवावें व जे जमिनी धारण करीत नाहींत, व त्यामुळें ज्यांची खातीं गांवचा न. नं. ८-अ यांत येत नाहींत, असे इसमांकडून कांहीं येणें निघाल्यास त्यांचे खातें शेवटीं घालावें. या शेवटल्या खात्यास "मक्ते व विक्रया" अगर मक्ता (इजारा) खातें म्हणतात. यांत प्रायः किरकोळ जमीनबाबेशिवाय दुसरें कांहीं येणार नाहीं. जेव्हां गांवचा नमुना नंबर ७ पुन्हा लिहिण्यांत येईल, व गां. न. नं. ८-अ यांत नवीन खातीं घालण्यांत येतील, तेव्हां त्यांत एखादे इसमाकडे कायम जमीनबाबेची मागील बाकी येणें असून त्यांचे नांवें आतां खातें राहिलें नाहीं, असें आढळून आलें तर गां. न. नं. ८-अ किंवा ८-ब यांत त्याचें नावें नवीन पोकळ खातें घालण्यांत कांहीं मतलब नाहीं. परंतु सदर्हू बाकी अर्थात मक्ता खात्यांत आणावी, आणि बाकीदाराचें नांव दाखल करावें व दुसऱ्या सर्व बाक्या वसुलाचे बाबतींत जशी दक्षता ठेवण्यांत येते, तशीच दक्षता या कामीं ठेवावी. नमुना नं. ८-अ-प्रमाणेंच खातेदारांचीं नांवें वर्णअनुक्रमाप्रमाणें लिहावीं.

२. सबब ही येण्याची व वसुलाची खतावणी हेंच एक स्थळ आहे कीं, ज्यांत किरकोळ जमीनबाब वसूल करण्याचे हुकूम आल्याबरोबर, व गांवचा न. नं. ४ यांत ते नोंदल्याबरोबर लागलीच ज्याचे नांवें खातीं असतील त्या सर्वांचे खात्यांत किंवा खातें नसल्यास मक्ताखात्यांत, येण्याचे बाजूस त्याचा दाखला घेतला पाहिजे. जी नोंद करण्यांत येईल ती संयुक्त जमीनबाबेची असली पाहिजे. (लोकलफंड वगळून नुसतीच जमीनबाबेची असूं नये.) लोकलफंडास पात्र नाहीं अशी जरी रक्कम असली तरी ती संयुक्त जमीनबाब म्हणून धरली पाहिजे. कारण या रक्कमा पुढें वेगळ्या करण्याची व्यवस्था तालुक्याचा न. नं. १० यांत केलेली आहे.

गां. न. नं. ७ यांतील फरकांचे २ वर्ग करण्यासारखे आहेत : (१) सरकारी फरक—बक्षीस दिलेली, परत मिळालेली, पुरानें वाहून आलेल्या मातीची नवीन झालेली जमीन व संपादन केलेली जमीन. (२) खासगी फरक—हे नेहमीं कमजास्त पत्रकाच्या योगानें कळविण्यांत येतात. वर्ग १ चे फरक कळविल्याबरोबर गां. न. नं. ८-बमध्यें लिहिले पाहिजेत. वसूल जर पूर्वीच झाला असेल व येणें नसेल तर याचा परिणाम फाजील वसूल होय व त्याची नेहमींप्रमाणें व्यवस्था करावी. सर्व फरक गां. न. नं. १ च्या तेरिजामध्यें व गां. न. नं. ५ मध्यें ताबडतोब नेले पाहिजेत; आणि गां. न. नं. ८-बवरून गां. स. नं. ११ मध्यें उतरलेहि पाहिजेत. चालू सालामध्यें असले फरक ताबडतोब नेण्याच्या या नियमास एकच अपवाद आहे, तो हा कीं, जुलै महिना संपण्यापूर्वी थोडेच दिवस अगोदर हुकूम मिळाला असला कीं, बक्षीस दिलेली अगर परत मिळालेली जमीन वगैरेची अंमलबजावणी पुढील वर्षापासून व्हावी असें स्पष्ट म्हटलें असेल तेव्हां.

खासगी फरक-वर्ग २ करितां गां. न. नं ५ अथवा सर्व जुडीमध्यें फरक होत नाहीं, आणि ह्या हप्त्याच्या तारखेनंतर ८-ब बदलणें सोईचें नाहीं. म्हणून कलेक्टर साहेबानीं प्रत्येक जिल्ह्यांत अगर तालुक्यांत [गांवचा वर्गाप्रमाणें (रब्बी किंवा खरीप) आणि हप्त्यांच्या तारखांप्रमाणें] बंद करण्याची तारीख ठरविली आहे. त्यानंतर गां. न. नं. ७ यांतील फरक गां. न. नं. ८-अमध्यें नेल्याबर ते ८-बमध्यें पुढील सालापर्यंत उतरूं नयेत. ज्या सालांत अंमलबजावणी करण्याबद्दल हुकूम देण्यांत येईल तें साल गां. न. नं. ८-अ यांतील फेरफारानंतर (पान १०६, प्यारा ८ पहा) लिहितात जसें :—३० नोव्हेंबर ही बंद करण्याची तारीख ठरविली असेल व १० डिसेंबरला अनें आपल्या जमिनीचा भाग बला विकला असें कुळकर्ण्यास समजलें तर १५ डिसेंबर रोजीं (हप्त्याचे तारखेचें वेळीं अचें येणें (जुडी) बदलूं नये; परंतु अर्थातच बला अच्या भागापैकीं, पैसे देण्यास व त्याबद्दल बला निराळी पावती देण्यास कुळकर्ण्यास मोकळीक आहे.

३. सालांतून बहुतेक कोणतेंहि वेळीं बाकी काढून टाकणेंबद्दल, सुटीबद्दल किंवा तहकुबीबद्दल, हुकूम येतील. (सूट तहकुबीचे नियम स. ठ. नं. ६५०/१९०७ यांत आहेत. ल्या. रे. हुकूम XX VIII) जेव्हां पिकें बुडतात, व सूट तहकुबी देण्याचें कलेक्टर साहेब ठरवितात, तेव्हां असे हुकूम पहिला हप्ता वसूल करण्याचे पूर्वीच ते पाठवितात. व हुकूम जाहीर करण्यापूर्वी, कमिशनर साहेब यांचे मंजुरीनें हप्ता वसूल करणेचें लांबणीवर सुद्धां टाकतात. प्यारा ८ पहा. जेव्हां असा हुकूम येईल, तेव्हां त्यांत असें म्हणण्यांत येईल कीं अमुक एक इसमास अमुक अमुक रुपये, आणि, पै सूट दिली

आहे. अथवा मोघम शब्दांत असें म्हणण्यांत येईल कीं, शेतकीसंबंधाचे सर्व खात्यांवरून [illegible] निंमे किंवा एक-तृतीयांश महसुलाची सूट दिली आहे, किंवा तहकुबी दिली आहे, किंवा असेल प्रकारे [illegible] रक्कम हुकूम आल्याबरोबर कुळकर्ण्यानें प्रथमतः प्रत्येक खातेदारावर याचा परिणाम काय होईल हें काढलें [illegible] गा. न. नं. ८-अ तपासावा, आणि त्यावरून हुकुमाचा परिणाम काय होतो तें पहावें. हुकुमांत निंमे वसूल तहकूब [illegible] असें असेल तर त्यानें वर्षाचें येणें, पैकडे लक्ष न देतां, निंमे करावें, आणि पै वसूल कराव्या. उदाहरण, मनाजी नंबर ८ याचे खात्याची रक्कम विभागून निंमे करण्याची असली तर त्यानें रुपये ६-१४-३ वसुलांत काढावे व रुपये ६-२-० तहकूब म्हणून दाखवावे. कुळकर्ण्यानें हें लक्ष्यांत ठेवावें कीं, संबंध असलेल्या लोकल बोर्डाचा अर्ज आल्याखेरीज सान्याबरोबर लोकलफंड तहकूब ठेवला जात नाहीं. सबब सारा तहकूब ठेवला असला तरी कुळकर्ण्यानें लोकलफंड आकार पुरा वसूल करावा. जर कलेक्टर साहेब यांनीं पाण्याची जादा आकाराची सबंध सूट दिली असेल, परंतु जमिनीचे भागाचा बाकी सारा वसूल करण्याचा असेल, किंवा भातजमिनीवरील आकार तहकूब ठेवण्याची परवानगी देऊन, बाकी सर्व उत्पन्न वसूल करण्याचा, किंवा असेच प्रकारचा दुसरा कांहीं हुकूम दिला असेल तर कुळकर्ण्यानें सदर हुकुमाचा अमल गांवाचा न. नं. ८-अ यांत करण्यापूर्वी (नंबराचें विभाग झालें नसल्यास) त्यानें तलावाचे पाण्याचें पत्रक किंवा दुसरे पाण्याचे दराचें पत्रक पाहिलें पाहिजे. किंवा न. नं. १ यांत पाण्याचा वेगळा आकार दिला असल्यास न नं. १ पाहिला पाहिजे. आणि (नंबराचे विभाग झाले असतील तर) आकार फोडपत्रकाचा भाग, ज्यांत तलावाचे किंवा दुसरे पाण्याचा आकार हिस्सेवार वांटून दिला असतो, तें पाहिले पाहिजे. जेव्हां कुळकर्ण्यास हुकुमाचा परिणाम प्रत्येक खातें एका मागून एक तपासून काढावयाचा असेल तेव्हां त्यानें एका वेगळे कागदावर परिणामाचें कोष्टकवार पत्रक तयार करावें, व तें पुरें झाल्यावर किती सूट अगर तहकुबी द्यावी लागेल ती नक्की रक्कम मामलेदार यांस कळवावी. मामलेदार यास याबद्दल कलेक्टर साहेब यांजकडे रिपोर्ट करावा लागतो व कलेक्टर साहेब यांस कमिशनर साहेब यांचे मार्फत सरकारास रिपोर्ट करावा लागतो. तसेंच अकौंटंट जनरल यांजकडेहि कळवावें लागतें. (रुळींतील सूट तहकुबीचे हुकूम व स. ठ. न. नं. २२२५-१० पहा) नंतर त्यानें सूट किंवा तहकुबीचा हुकूम न. नंबर ८-ब यास जोडलेले फैलींत ठेवून द्यावा. त्यानें पहिले हुकुमास अ, दुसरे हुकुमास ब व याप्रमाणें पुढें अशी संज्ञा द्यावी. नंतर त्यानें खातेवार सूट किंवा तहकुबी विभागणीचें तपशीलवार पत्रक एकूण बेरजेसह हुकुमास जोडून ठेवावें. हुकुमांत खात्यांतील इसमांचीं नांवें देऊन सूट किंवा तहकुबीची नक्की रक्कम लिहिली असेल तर तपशीलवार विभागणीपत्रक करण्याचें कारण नाहीं. पूर्वी दिलेल्या तहकूब किंवा बिनतहकूब बाकीबद्दल हुकुमाचा परिणाम देखील न. नं. ८-ब दाखविण्यांत येतो.

विक्री न करतां जेव्हां खातें खालसा करण्यांत येतें व बाकी कमी करण्यांत येते तेव्हां ही सूट समजावी. (रुळ १९) काढून टाकलेली बाकी नव्हे. (स. ठ. नं. ६४१३/१९०५.)

"शर्तीचा भंग केल्यावरून एखादा भाडेपट्टा रद्द करण्याचा प्रश्न उद्भवेल तेव्हां मामलतदार, प्रांत किंवा कलेक्टर यांनीं, तें प्रकरण निकालांत निवेपर्यंत गावांत किंवा तालुक्यांत भाडें वसूल करण्यांत येऊं नये म्हणून त्या भाडेपट्ट्याबाबतच्या भाड्याचा मागणी रद्द करणारा हुकूम द्यावा. भाडेपट्टा रद्द करावयाचा नाहीं असा निकाल झाल्यास सदरहू मागणी मामलतदार, प्रांत किंवा कलेक्टर यांच्या हुकुमाअन्वयें पुन्हां दाखल करण्यांत यावी."

४. नंतर कुळकर्ण्यानें न. नं. ८-ब ची खतावणी द्यावी व प्रत्येक खात्यांत सूट किंवा तहकुबी दाखल करावी. प्रत्येक ठिकाणीं हुकुमाचा नंबर, तारीख व पूर्ण तपशील देण्याचें भाग पडूं नये म्हणून अ हुकुमाचे आधारे जितकी सूट दिली असेल तितक्या रकमांसमोर अ असें अक्षर लिहावें. व दुसरें हुकमाचे आधारे सूट पडली असेल तर त्या रकमांचे समोर ब क ड वगैरे अशीं अक्षरें लिहावीं. अशा नोंदीवरून कोणते खातेदारास सूट किंवा तहकुबी मिळाली हें पहाणें फार सोपें होईल. व यामुळें अनुक्रमणिकेंतील नांवासमोर (स. ठ. नं. ४७१२/१९१२ प्रमाणें) फुली करण्याची यापुढें आवश्यकता नाहीं.

५. वारंवार अशी हरकत घेण्यांत येते कीं, जेव्हां सूट व तहकुबी देण्यांत येते तेव्हां याबद्दलची माहिती कुळास न देऊन कुळकर्णी त्यांस फसवितो. परंतु पुस्तकाच्या नियम पाळले, पावत्यांची बरोबर रीतीनें रुजुवात व तपासणी केली व शिवाय आणखी, रयत लोकांनीं मागितलेला पैसा देतेवेळीं गुदस्त सालचा गां. न. नं. ८-ब पाहिला व गां. न. नं. ९ यांत जमीनबाबेची पद्धतशीर पावती घेण्याची नेहमी काळजी घेतली तर अशा प्रकारची लुचेगिरी, ती करणारास, केवळ तुरुंगांत नेऊन पोचवील. सुटीचे रुळींतील हुकूम XLII वरून, सुटीचें पत्रक चावडीस प्रसिद्ध करून, गांवांत टिमकीनें दौंडी देऊन, व विशेषेंकरून रयत इसम वसूल देण्यास येतील त्यावेळीं सुटीसंबंधीं काय काय नोंदी केल्या आहेत, हें प्रत्येक रयत इसमास कळविणें कुळकर्ण्यास भाग आहे; आणि रयत इसमास कळूं दिल्याशिवाय सूट किंवा तहकूब केलेली रक्कम लबाडीनें वसूल करणें हा फार मोठा गुन्हा आहे. (स. ठ. नं. ६५०/१९०७) सूट किंवा तहकुबीचा हुकूम, प्रत्यक्ष वसूल होऊन पावती दिली गेल्यानंतर आला तर कुळकर्ण्यास खातेदाराचे इच्छेप्रमाणें चाललें पाहिजे. तो भरलेली रक्कम परत मागेल तर ती त्यास परत दिली पाहिजे. वसूल दिलेली रक्कम तहकुबीपैकीं असेल व ती बहुधा पुढील सालीं वसूल होण्याची

ती परत घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें त्यास वाटेल तर, वसूल आलेली रक्कम त्याचे नांवे जमा करावी. असें केल्यानें देखील स्वाभाविक रीतीनें मिळणारे सुटीचा त्यास फायदा होईल. कालिक फायदा खातेदार सोडून देण्यास खूप नसला तर वसूल झालेली रक्कम फाजील वसूल म्हणून धरून पाहिजे व ती त्यास परत दिली पाहिजे.

६. सन १९१२-१९१३ सालांत वसुलाची तहकुबी दिली असली तर सन १९१३-१४ सालांत पहिला हप्ता सुरू होणेंपूर्वी तहकुबीची रक्कम वसूल करावी कीं नाहीं याबद्दल कलेक्टर साहेब फेर हुकूम देतील. वसूल करण्याचा हुकूम आल्याबरोबर ती बाकी तहकुबीचे वर्गांतून कमी होऊन बिनतहकुबीची बाकी या वर्गांत जाते; व नंतर दोन तीन सबंध वर्षे तहकूब ठेवलेले बाकीप्रमाणें ती ओघानें मिळणारे सुटीस पात्र होत नाहीं. तहकूब बाक्या वसूल करण्यासंबंधाचे असे हुकूम, सूट व तहकुबीचे हुकुमाचेच फैलींत अक्षरीं अनुक्रम नंबर देऊन ठेवले पाहिजेत. सन १९१३-१४ सालअखेर बाक्या वसूल होणेच्या राहिल्यास त्या बाक्या बिगरहुकुमी बाक्या या वर्गांत नेण्यास आधार म्हणून ते अक्षरीं नंबर न. नं. ८-ब यांत दाखल केले पाहिजेत. (स. ठ. नं. ५६५४-०९.)

* * * * * * *

७. कायम येणें, सालांतील फिरतें उत्पन्न व सूट तहकुबीच्या रकमा, या सर्व योग्य होतील अशा वेळोवेळीं कुळकर्ण्यानें दाखल केल्या म्हणजे खातेदाराचे खतावणीची येणें बाजू पुरी झाली. नंतर सूट अगर तहकुबी लक्षांत न घेतां येणें कसे हप्त्यानें वसूल करावयाचें तें दाखल करावें. साधारणपणें हप्ते दोन असतात. संयुक्त जमीनबाबेचे दोन सारखे विभाग करावे. परंतु विषम रक्कम व रुपयाचा अंश हे पहिले हप्त्याबरोबर वसूल करावे. उदाहरण, रु. १७-४-० संयुक्त जमीनबाबेचा पहिला हप्ता रु. ९-४-० व दुसरा हप्ता रु. ८ होईल.

८. * * * * पांच रुपयांहून जास्त नाहीं अशी साधारण जमीनबाबेची सर्व रक्कम व बिनशेतीचे सर्व उत्पन्न हीं पहिले हप्त्याबरोबर येण्यास योग्य होतात. परंतु विशेष कामांत बिनशेतीचे उत्पन्न दोन किंवा अधिक हप्त्यांनीं वसूल करण्याचें कलेक्टर साहेब यांस ठरवितां येईल. अथवा दुसऱ्या हप्त्याबरोबर घेतां येईल. (ल्यां. रे. को. रु. ८७.) किरकोळ जमीनबाबेस हप्ते नसतात.

९. हप्त्याचे ठरले तारखेस, किंवा पुढील तारखेस, पैसा वक्तशीर वसूल आला नाहीं तर पाटील व कुळकर्णी यांनीं रयतेकडील येणें वसूल करण्यास लागावें. वसूल आल्याबरोबर कुळकर्ण्यानें अर्थात तो गांवचा न. नं. ९ यांत दाखल केला पाहिजे व त्यानंतर होतां होईल तितके लवकर गां. न. नं. ८-ब यांतही दाखल केला पाहिजे. अर्थात मुदत होऊन गेलेलें येणें सक्तीचे उपायांनीं किंवा दुसरे तऱ्हेनें वसूल करण्याबद्दल नेहमीं त्यानें शिकस्त केली पाहिजे. बाक्या, फाजील वसूल व त्यामुळें द्यावें लागणारे रिफंड, हीं कुळकर्ण्याचे हिशेबी कामांत घोंटाळा करण्यांत पुष्कळ भर घालतात. म्हणून या दोन्हीं गोष्टी टाळण्याचे कामीं जितका जास्त तो यशस्वी होईल तितकें त्याचें आयुष्य त्यास जास्त सुखावह होईल. परंतु शक्य तितका वसूल त्यानें केला, आणि जुलई अखेर जवळ आली, तर त्यानें न. नं. ८-ब यांतील खातीं बंद करण्याचे कामास लागावें. खातेदाराकडून बाकी येणें आहे कीं नाहीं हें त्यास सहज समजेल. बाकी असेल तर ती कशाबद्दल आहे हें त्यास समजूं शकेल. नंतर त्यानें रकमेखालीं बाकीचा तपशील नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें दाखवावा. पुढील हिशेबांत सरकारी, इनाम, बिनशेतीचा सारा, फिरतें उत्पन्न असा तपशील, फरक कळण्यासाठीं, देण्याचें कारण नाहीं. परंतु अशा सर्व रकमा "बाक्या" म्हणून एकच सदराखालीं दाखवाव्या. परंतु रयतलोक कदाचित तक्रार करतील कीं, आपले नांवासमोर बाकीचें येणें कां दाखविलें आहे हें आपल्यास समजत नाहीं. व पुष्कळवेळां कुळकर्ण्याचे लबाडीमुळें व चुरशीमुळें या बाक्या निघाल्या असें दाखवितात. परंतु हल्लीं तयार केलेले नमुन्यांतील हिशेबावरून कुळकर्ण्यास असा आरोप पूर्णपणें नाशाबीत करून घालवितां येईल. त्याला स्वतःला समजून येऊन शक्य तितक्या स्पष्ट रीतीनें रयत लोकांसहि असें दाखवितां येईल कीं, त्यांचे नांवासमोर जें बाकीचें येणें दाखविलें आहे तें अगदीं वाजवी असून तक्रार करितां येणेसारखें नाहीं.

१०. वसूल पोष्टाचे मनीआर्डरीनें पाठविणेची परवानगी आहे. (नियमांकरितां स. ठ. नं. ३५८९/१९०८, ४०२/१९११, २०५८/१९११ व सिंधप्रांतासंबंधानें स. ठ. नं ५८२/१९०५ पहा.) स्वतः गांवीं पैसा दिला असतां कुळकर्णी घेणार नाहीं असें समजून, जमिनीचे गहाणदाराचा हक्क नाहींसा करण्यासाठीं किंवा स्वतःचा हक्क बळकट करण्यासाठीं, कांहीं मूर्ख व दुसऱ्यानें पढविलेले लोक मनीआर्डरीनें पैसे पाठविण्याचें पद्धतीचा स्वीकार करतील असा अगदीं संभव आहे. पोष्टाचे शिपायानें मनीआर्डर प्रथमः कुळकर्ण्यास आणून दिल्यावर मनीआर्डर पाठविणाराकडे कांहीं येणें आहे कीं काय हें कुळकर्ण्यानें पहावें. आणि कांहीं येणें नसेल, किंवा पुढील सालाबद्दलहि त्यांजकडून कांहीं घेणें नसेल तर, कुळकर्ण्यानें ती मनीआर्डर नाकारली पाहिजे, परंतु येणें आहे, अगर रक्कम फाजील म्हणून जमा करणें इष्ट आहे, असें असेल तर कुळकर्ण्यानें मनीआर्डरमधील पावतीचा भाग भरावा व तालुक्यांत वसूल घेण्यासाठीं तो मामलेदार यांजकडे पाठवावा. नोंदीचे व पुढील चलनाबरोबर कूपन पाठविण्याचे पद्धतीबद्दल नमुन्याचे हिशेबांत सविस्तर खुलासा केला आहे.

११. कधीं कधीं इनामदाराचे, किंवा दुसरे जमीनबाबेचे अगर किरकोळ जमीनबाबेचे पैसे आणतात. परंतु आणलेली रक्कम येण्याप्रमाणें बरोबर आहे, व ती पूर्वी गांवीं भरलेली नाहीं, अशी [illegible] मामलेदार यांनीं अशा रकमा घेऊं नयेत. मनीआर्डरीचे बाबतींत सांगितल्याप्रमाणेंच, जो पैसा गांवीं पू[illegible] भरला आहे अगर भरणार आहे असा पैसा मामलेदार यांनीं घ्यावा, म्हणून कांहीं मूर्ख भांडकुदळ लोक प्रयत्न करतात. कायदा असा आहे कीं, वसुलाचा भरणा कुळकर्ण्याकडे केला पाहिजे. कारण कुळकर्ण्याजवळ येण्याचा तपशीलवार हिशेब असतो ; वास्तविक किती रक्कम येणें ही माहिती मामलेदार किंवा वरिष्ठ कामगार यांचेपेक्षां कुळकर्ण्यास जास्त असते. सबब गांवांत देण्याचा वसूल तालुक्यांत भरण्याचा प्रयत्न केला म्हणजे त्यांत अर्थात कांहीं तरी भानगड आहे असें समजावें. परंतु कांहीं प्रसंगीं संशयास जागा असणार नाहीं. जसें कबजाहक्काची किंमत लिलांव मंजूर झाल्यावर तालुक्यांत भरण्याची असते, म्हणून दिलेल्या उदाहरणांत सांगितल्याप्रमाणें तालुक्यांत भरणा करणें अगदीं बरोबर असें मामलेदार यांस आढळून येईल. तालुक्यांत रोख आलेला वसूल व मनीआर्डरीनें आलेला वसूल हे दोन्हीं गांवचे हिशेबी कसे आणले आहे हें नमुन्याचे हिशेबावरून दिसून येईल. अर्थात मामलेदार यांनीं असें वसूल कुळकर्ण्यास कळविण्यास कधीं चुकूं नये.

बॉरलोनवरील व्याज लयांड-रेव्हेन्यू खातीं वर्गवारीनें जमा होणेंसाठीं अशीच पद्धत सांगितलेली आहे.

१२. जेव्हां कोणत्याहि वसुलाचे रिफंड, तसेंच येणें वसूल होऊन मागाहून तें रद्द झालें किंवा सुटींत दाखल झालें तर त्याबद्दलचे रिफंड, तालुक्यांत दिले जातील. तेव्हां याबद्दलही मामलेदार यांनीं कुळकर्ण्यास कळविलें पाहिजे. कांहीं प्रसंगीं मामलेदार यांनीं लहान रकमा मुद्दाम खर्च घालून, कुळकर्ण्याकडे पक्षकारास देण्यासाठीं पाठवून पावत्या मागण्यास हरकत नाहीं. रकमा परत दिल्याबरोबर कुळकर्ण्यानें चालू किंवा मागील सालचा न. नं. ८-ब. यांत फाजील रकमांसमोर परत दिल्याचा दाखला ठेवला पाहिजे. इलाख्याचे हिशेबांत चालू किंवा मागील सालांत वसूल केलेले उत्पन्नाचे रिफंड "खर्च" म्हणून खर्ची घालतात, व त्या सालाचे महसुलाचे पत्रकास बाध येत नाहीं.

१३. * * * * * * *

१४. लिहितां वाचतां येतें अशा रयत इसमानें कुळकर्ण्याचे दप्तरांतील चालू व मागील सालचा गां. न. नं. ८-अ व ८-ब पहाण्याची तसदी घेतली, तर त्याजकडील येणें, काढलेली बाकी, व खात्यासंबंधीं सर्व तपशील, अशी पूर्ण माहिती त्यास मिळूं शकेल. इसम लिहिणार वाचणार नसेल तर त्यानें आपले स्नेह्याकडून नमुने वाचून घ्यावे. हे हिशेब पाहाण्याची कोणतेहि जमीनमहसूल देणाराची इच्छा असली तर ते त्यास दाखविण्यास कुळकर्णी बांधला गेला आहे. अर्थात हे हिशेब कुळकर्ण्यानें आपले समक्ष किंवा पाटलाचे समक्ष दाखवावे व त्यांत कांहीं लबाडी करण्यास संधी देऊं नये.

१५. वादाचे कारणासाठीं, किंवा लग्न जुळविण्याचे बाबतींत मुलीचे कुटुंबांत दाखविण्यासाठीं, किंवा इतर कारणासाठीं, खात्याच्या नकला किंवा गां. न. नं. ८-अ अगर ब किंवा दोन्ही कागदाच्या समग्र नकला मिळाव्या अशी कबजेदाराची इच्छा असली तर त्यास त्या मिळण्याचा हक्क आहे. ताबडतोब नकला दिल्या पाहिजेत. कोऑपरेटिव्ह सोसायटीचे बाबतींत हें फार महत्त्वाचें आहे. न. नं. ८-ब ची नक्कल साल बंद होण्यापूर्वी दिली तर "अजून पुरी नाहीं" म्हणून तिजवर शेरा मारला पाहिजे. (परंतु सर्व येणें वसूल झालें असलें, व नमुना शिल्लक काढून बंद करण्याचे स्थितीपर्यंत आला असला तर शेरा मारण्याचें कारण नाहीं.) गां. न. नं. ८-अ खातेवही, गां. न. नं. ८-ब याचे कुळकर्ण्यास जितके कोरे फार्म लागतील तितके त्यास पुरविण्यांत येतील. प्रत्येक फार्माची किंमत सार्वजनिक लोकांस (३) पै प्रमाणें पडेल. नक्कल करण्याची फी (९) नऊ पै पडेल, म्हणजे एकंदरींत जर खात्याला एकापेक्षां जास्त लागत असतील तर प्रत्येक फार्माला एक आणा पडेल. साधारण लहान खात्याबद्दल हा मुशाहिरा मुबलक आहे. मोठे नकलेची फी कमी आली तर लहान नकलेचा जास्त येईल, अशी सरासरी कुळकर्ण्यास करून घ्यावी लागेल. पांच वर्षांचे मुदतींत न. नं. ८-अ यांत दुरुस्ती झाली असली, तर जी नक्कल देण्यांत येईल ती कुळकर्ण्याचे बुकांत हिशेब असतील त्याबरहुकूम कमी केले नोंदीची व नवीन जाहलेले नोंदीची हुबेहुब नक्कल असली पाहिजे. गांवचे हिशेबाचीं बुकें पाहून एकादे इसमाचें समाधान झाले नाहीं तर त्याचे खात्याची संबंध नक्कल एक आण्यास, व गेले सालचे हिशेबाची नक्कल ही आणखी एक आण्यास, मिळूं शकेल. वीस फार्माचे एक गटास चार आणे (स. ठ. नं. ४८२५-१६ पहा.) याप्रमाणें दर खेपेस कुळकर्ण्यास फार्म देण्यांत येतील. म्हणजे फार्मांबद्दल पुन्हा लहान लहान जमा खजिन्यांत भरण्याची जरूरी पडणार नाहीं. नकलेची फी (एक आण्यापैकीं ९ पै) त्यानें स्वतःकरतां घ्यावी, त्याचा हिशेब देण्याची जरूरी नाहीं.

१६. खातेवहीचा उतारा आरंभीच दिला असेल, किंवा ५ वर्षांची मुदत संपण्यापूर्वी दिला असेल व त्यानंतर खातेदाराचे खात्यांत आलीकडील सालांत पांच वर्षांची मुदत संपण्यापूर्वी कमी किंवा जास्त झालें असेल तर त्यानें पहिला खातेवहीचा उतारा हजर केला असतां, कांहीं खर्च न घेतां, तो दुरुस्त करून मिळण्याचा त्याचा हक्क आहे. [ल्यां. रे.

कलसबधीं. ] एकादे फरकामुळें खातेउताऱ्यांतील जमिनीचे तुकड्यांत कांहीं कमी करण्याची किंवा [illegible] आहे असें कुळकर्ण्यास आढळून येईल, तर त्यानें खातेदारास बोलवावें. फेरफाराचे खरेपणाची उत्तम व [illegible] म्हटली म्हणजे खात्यांतून तुकडा कमी करण्याबद्दल खातेदाराची कबुली ही होय.

" १७. आपल्याला फाजिल वसूल झालेली किंवा आगाऊ वसूल झालेली रक्कम ही संबंध असलेल्या वर्षांपैकीं प्रत्येक वर्षाच्या येणें असलेल्या रकमेंतून वजा करावयाची रक्कम म्हणून किंवा ( येणें असलेल्या रकमेंतून फेरबदल न करतां ) आगाऊच वसूल केलेली रक्कम म्हणून समजतां येईल.

(अ) सदरहू मुदत पांच वर्षांहून जास्त असेल तर ( खालीं लिहिलेल्या प्रसंगी ) येणें असलेल्या रकमेंत फेरबदल करणेंच उत्तम :—

(अ) ( जमीन खालसा शेतीची असेल तर ) " माफीची किंवा विशेष रीतीनें सारा कमी केलेली जमीन " या सदरास तो वर्ग केली पाहिजे व तिची नोंद गां. न. नं. २, वर्ग ३ खालीं करून माफी किती मुदतीपर्यंत चालावयाची तें दर्शविलें पाहिजे,

(ब) ( जमीन बिनशेतीची असेल तर ) गां. न. नं. २ यांत वर्ग (१) अगर (२) खालीं " सारामाफीची जमीन " म्हणून दाखविली पाहिजे.

नंतर दोन्हीं बाबतींत बाकीचें हिशेब इतर " माफीची किंवा विशेष रीतीनें सारा कमी केलेली जमीन " किंवा " सारा न बसविलेली जमीन " यांच्याप्रमाणें पुरे करून असें क्षेत्र गां. न. नं. ८-अ यांत व पुढील हिशेबांत बिनसाऱ्याचें क्षेत्र म्हणून दाखल केले पाहिजे.

(ब) परंतु सदरहू मुदत ५ वर्षे किंवा त्याहून कमी असेल तर गांवचा न. नं. १ यांतील ठरीव येण्यांत फेरबदल करणें किंवा गां न. नं. २ किंवा ३ चा उपयोग करणें इष्ट नाहीं. अशी जमीन गां. न. नं. ८-अ यांत नेहमीचे वर्गाखालीं व आकारासह दाखवून ती न. नं. ८-ब यांत नेली पाहिजे. कोणत्याहि येणें असलेल्या रकमेच्या हिशेबास हात लावूं नये, तर तो व्यवहार सर्वस्वीं वसुलीच्या बाजूस झालेला दाखवावा. गां. न. नं. ८-ब यांत वार्षिक येण्याची बेरीज करून " पुढें आणलेला फाजिल " ही रक्कम त्या वर्षांत वसूल झालेली पहिली बाब म्हणून दाखवावी व ती रोख रकमेहून वेगळी असल्याचें दर्शविण्यासाठीं ( तिच्या खालीं ) एक रेघ मारावी परंतु तिचा गां. न. नं. ११ (२०) मध्यें संयुक्त जमीनबाबाच्या एकूण वसुलामध्यें समावेश व्हावा.

## गांवचा नमुना नं. ९.

१

| | संयुक्त जमीनबाब. | | | हातीं असलेली एकूण शिल्लक. |
|---|---|---|---|---|
| | बाकी. | कायम. | फिरते. | |
| | ४ | ५ | ६ | ७ |
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| १. तारीख १५ माहे ऑगस्ट सन १९१२. | | | | |
| २. खातें नं. १३. | | | | |
| ३. कबजेदार व वसूल देणारा— | ... | गवत ... | १० १० ० | १० १० ० |
| | | | १० १० ० | १० १० ० |
| रघू रामा माळी, हस्तें खुद भरणा—तारीख १६ माहे ऑगस्ट सन १९१२ रोजी चलन नंबर १ बरहुकूम दहा रुपये दहा आणे मात्र हस्तें घेड मवल्या दाजी महार. | | | | (सही) पाटील. पूज्य. |

मौजे नहीगांव, तालुका बलसाड, खातें नंबर १३.

पावती नंबर १
तारीख १५ माहे ऑगस्ट सन १९१२.

| संयुक्त जमीनबाब. | | | वसूल देणारा. |
|---|---|---|---|
| बाकी. | कायम. | फिरते. | |
| रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | |
| ... | ... | १० १० ० | गवत, हस्तें खुद. |

रघू रामा माळी याजकडून दहा रुपये दहा आणे मात्र पावले.

अ. ब. क. ड.

पाटील. कुळकर्णी.

या नमुन्याखेरीज इतर नमुन्यांत जमीन बाब महसुलाची पावती कायदेशीर नाहीं.
प्रत्येक जमीनबाब वसूल देणारास आपलें खातें मोफत पाहण्याचा हक्क आहे.

२

| | संयुक्त जमीनबाब. | | | |
|---|---|---|---|---|
| | बाकी. | कायम. | फिरते. | वसूल देणारा. |
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | |
| १. तारीख २५ माहे ऑगस्ट सन १९१२. | | | | |
| २. खातें नंबर २२. | | | | |
| ३. कबजेदार व वसूल देणारा— | ... | ... | २५ १३ ६ | गवत व मळई हस्त खुद. |
| तुकाराम अंताजी, हस्तें खुद. | | | | |

| | |
|---|---|
| गवत ... | ४ ९ ६ |
| मळई जमिनींतील लागण. | २१ ४ ० |
| | २५ १३ ६ |

मौजे नहीगांव, तालुका बलसाड, खातें नंबर २२.

पावती नंबर २
तारीख २५ माहे ऑगस्ट सन १९१२.

तुकाराम अंताजी याजकडून पंचवीस रुपये तेरा आणे सहा पै पावले.

अ. ब. क. ड.

पाटील. कुळकर्णी.

या नमुन्याखेरीज इतर नमुन्यांत जमीनबाब महसुलाची पावती कायदेशीर नाहीं.
प्रत्येक जमीनबाब वसूल देणारास आपलें खातें मोफत पाहण्याचा हक्क आहे.

[illegible]कलसबधीं. ] एकादे फरकामुळें खातेउताऱ्यांतील जमिनीचे तुकड्यांत कांहीं कमी करण्याची किंवा [illegible] आहे असें कुळकर्ण्यास आढळून येईल, तर त्यानें खातेदारास बोलवावें. फेरफाराचे खरेपणाची उत्तम व [illegible] म्हटली म्हणजे खाल्यांतून तुकडा कमी करण्याबद्दल खातेदाराची कबुली ही होय.

उत्पन्न निवळ लोकलफंड, अबकारी, पोलीस किंवा गांवी वसूल येणारे इतर उत्पन्नाबद्दल.

मौजे तालुके

चलन नंबर गां. न. नं. ९ यांतील नोंदीचे नंबर

| बाबी. | रक्कम. | भरण्याचा तपशील. |
|---|---|---|
| वेगवेगळे सदरास जमा होणारे रकमेबद्दल वेगवेगळें चलन पाठविलें पाहिजे. (जसें अबकारी, फॉरेस्ट, लोकलबोर्ड). | | नोटी.<br>सोन्याचें नाणें.<br>रुप्याचें नाणें.<br>निकेल.<br>तांब्याचें नाणें.<br>एकूण (अक्षरीं) रु. |
| एकूण ... | | |

भरणा केला. हस्तें

तारीख

कुळकर्णी. पाटील.

दाखल झाल्याची तारीख व वेळ

अवल कारकून.

खतावणी नं. यांत खतविली.

तारीख

कारकून.

नंबर

रुपये (अक्षरीं)

ता. न. नं. यांत जमा केले.

तारीख

अवल कारकून.

सराफ

अगर मामलेदार.

## सक्तीचे उपाय.

मागणीप्रमाणें वसूल दिला नाहीं तर कुळकर्ण्यास जी तजवीज करावी लागते, त्याचा विचार आतां दिला आहे. प्रथमतः त्यानें व पाटलानें नेहमींच्या मनवळणीच्या उपायानें वसूल करण्याची आपली शिकस्त करावी. परंतु यांत त्यांनीं पुष्कळ वेळ घालवूं नये. जेव्हां त्यांस असें वाटेल कीं, सक्तीचे उपायाची योजना केल्याशिवाय राहिलेला बाकी वक्तशीर वसूल होण्यास अडचण पडेल, तर मग कुळकर्ण्यानें विलंब करूं नये. हें काम तो जितकें लांबणीवर टाकील तितका त्याला स्वतःलाच जास्त त्रास होईल. बाकी नसली किंवा बाकीच्या नोंदी थोड्या असल्या तर गांवचे हिशेब सरळ व सोपे असतात. परंतु बिगरहुकमी बाक्यांची संख्या वाढली, तर हिशेब ठेवण्यास लागणारे श्रम व होणारा घोंटाळा सहजीं दुप्पट होईल.

२. जंगम माल विक्रीपर्यंत व विक्री धरून सक्तीचे उपायाचे जे प्रकार आहेत त्यांचा प्रथमतः उपयोग करावा. यास सक्तीचे हलके उपाय असें म्हणतात. जेव्हां हे उपाय निष्फळ होतात तेव्हां जमीन जप्त करणें, विक्री करणें, खालसा करणें वगैरे असे जास्त सक्तीचे उपायांचा उपयोग करावा लागतो. * * * * ऋतुमानाप्रमाणें व गांवचे स्थितीप्रमाणें सक्तीचे उपायांची किती निकड लावावी याबद्दल मामलेदार तोंडी व वट हुकुमाचे द्वारें वेळोवेळीं कुळकर्ण्यास हुकूम देतील. हल्लीच्या पद्धतीप्रमाणें जेव्हां पिकाच्या स्थितीवरून जरूरी पडते तेव्हां साधारणपणें तहकुबी देण्यांत येते. म्हणून जें येणें तहकूब केलें नाहीं तें येण्याची मुदत होऊन जातांच कायदेशीर असे सक्तीचे सर्व उपाय चालू करणें हें कुळकर्ण्याचें सक्तदर्शनीं पहिलें कर्तव्यकर्म आहे.

जंगम मालाची जप्ती करण्यांत त्यानें कायदा १९०८ चा सि. प्रो. को. ५ कलम ६० (१) पाळला पाहिजे. राहतीं घरें किंवा त्यांचे दरवाजे खुले करूं नयेत. तसेंच शेतीचीं जनावरें, आउतें, वापरण्याचे कपडे, किंवा शेतकऱ्याचे रहाते घराचें सामान किंवा भांडीं, हीं कायद्यानें जप्त करण्याची मनाई आहे, सबब तीं जप्त करूं नयेत. माल रास्त रीतीनें जप्त केला किंवा कसें याबद्दल कलेक्टरसाहेब यांचा निकाल अखेरचा आहे. (स. ठ. नं. २१७९–९१.)

३. पहिली तजवीज म्हटली म्हणजे नोटिसा करणें ही होय. प्रत्येक रयत इसमास माहीत असतें कीं आपल्यास सारा द्यावयाचा आहे, सबब कायद्याप्रमाणें नोटीस करण्याची आवश्यकता नसते. कलेक्टर किंवा मामलेदार यांनीं हुकूम दिला तर नोटीस न करतां पिकाची किंवा इतर जंगम मालाची जप्ती हीच पहिली तजवीज करतां येईल. परंतु खालील नमुन्यावरून नोटीस प्रथम दिली पाहिजे असें गृहीत धरलेलें आहे. कुळकर्ण्यानें प्रथमतः बाकीदारांची यादी तयार करावी. नंतर त्यानें मामलेदार यांजकडे रिपोर्ट करून नोटीसा सहीशिक्के करून आणाव्या. अवल कारकुनास नोटिसा सही करतां येतात. सक्तीचे उपायांचे रजिस्टर फक्त तालुक्यांत ठेवण्यांत येईल. त्यांत व तालुक्याचे हिशेबांत नोटीस-फी दाखल केली पाहिजे. खालील नमुन्याचा पुरेसा खुलासा नमुन्यावरून होतो.

## सक्तीचे हलके उपायांचा नमुना नं. १.

त्पन्न- रसाहेब, तालुके यांस.

रिपोर्ट.

सोबतच्या पत्रकांत तपशील दिल्याप्रमाणें बाकीदारांच्या नोटीसा यासोबत सही व शिक्क्यासाठीं पाठविल्या आहेत.

| खात्याचा नंबर. | गांव. | बाकीची रक्कम. | फी. | बजाविल्याची तारीख. | वसुलाची तारीख. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

पाटील. कुळकर्णी.

### हुकूम.

सहीशिक्के करून नोटीसा परत पाठविल्या आहेत. त्या बजावून नोटीसफीसह वसूल करावा. नोटिशींत नेमून दिले मुदतींत वसूल न दिल्यास, कायद्याप्रमाणें जंगम जिनगी जप्त करावी. आणि जप्तीच्या यादी, व विक्रीचा जाहीरनामा असे पाठवावे.

तारीख सही

मामलेदार.

जमाबंदी कारकून याचे मार्फत—नोटीस–फी ता. न. नं. ४ व सक्तीचे उपायाचें रजिष्टर ता. न. नं. ६ यांत नोंदावी.

नोंदली.

( सही )

जमाबंदी कारकून.

## रिपोर्ट.

पत्रकांत दाखविले इसमांनीं वसूल दिला. ज्यांनीं प्रत्यक्ष नोटीस निघण्यापूर्वी वसूल दिला, त[illegible] आहेत. या इसमांची नोटीस फी-माफ करावी किंवा कसें, याबद्दल हुकूम मिळावा. खालील इसमांनीं वसूल [illegible] त्यांची जंगम जिनगी जप्त करून इसमाबर जप्तीच्या यादी यास जोडल्या आहेत, व विक्रीचे जाहीरनामे पाठविले आहेत.

| खात्याचा नंबर. | नांव. | नोटीस-फीसह अजून येणें बाकी. | जप्तीची तारीख | विक्रीची तारीख | वसूल झालेली रक्कम. | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | | | | | | जप्ती करण्यासारखी जिनगी न सांपडल्यास ती गोष्ट या पत्रकांत दाखवावी. |

पाटील व कुळकर्णी.

उत्तर.

लिलांवांच्या तारखा २२-३-१३ नेमल्या आहेत. व लिलांव करण्याबद्दल कारकुनास हुकूम दिला आहे. खातीं नंबर ची नोटीस-फी रद्द केली आहे. (किंवा खातीं नं. ची फी प्रांताचे साहेब यांनीं माफ केली आहे.)

तारीख.

मामलेदार.

जमाबंदी कारकूनाचे मार्फत—नोटीस-फीची माफी व जप्त्या यांचा दाखला ता. न. नं. ४ व ६ यांत द्यावा.

दाखला घेतला.

जमाबंदी कारकून.

कुळकर्ण्याचा रिपोर्ट मामलेदार यांजकडे.

विक्रया तारीख रोजीं झाल्या, व त्यांचे परिणाम पत्रकांत दाखविले आहेत. विक्रीचा खर्च वजा जातां बाकी रुपये बाकीदाराचे खात्यास जमा केले; व खरेदीदारांचे नांवें पावत्या दिल्या. विक्री पुरी करण्यापूर्वी आलेला वसूल वरील पत्रकांत दाखविला आहे. अजून राहिले बाकीदारांबद्दल (खातीं नंबर ) वेगळ्या यादी पुढील तजविजीसाठीं पाठविण्यांत येत आहेत.

पाटील. कुळकर्णी.

दप्तरीं दाखल.

मामलेदार.

साधारण पत्रक किंवा यादी यांबरून तजविजीचीं सर्व कुळें संपलीं म्हणजे सक्तीचे मोठे उपायाकडे वळून, कुळकर्ण्यानें प्रत्येक कुळाबद्दल वेगळा रिपोर्ट करावा तो असा.

## सक्तीचे मोठे उपायाचा नमुना नंबर २.

हब यांस.

पन्न-
नंबर

बाकीदाराचें नांव

अजून येणें बाकी

नोटीस बजावल्याची तारीख

जंगम मालाची विक्री केली असल्यास तारीख.

बाकी नाठाळीची आहे, किंवा गरीबीमुळें, किंवा वाईट हंगामामुळें वगैरे आहे किंवा कसें.

लगाईची बाकी आहे कीं काय अगर दुसरे कांहीं बोजे आहेत कीं काय

शेरे.

नोटिशींत लिहिले बाकीदारांच्या जमिनी विक्री करण्याच्या नोटिसा मंजुरीकरितां हुकुमाकरितां यासोबत पाठविल्या आहेत (जर खात्याचा कांहीं भाग खालसा करावयाचा असेल तर बाकीचा कमी करावा.)

पाटील व कुळकर्णी.

मे. असिस्टंट कलेक्टरसाहेब यांजकडे हुकुमासाठीं रवाना.

मामलेदार.

हुकूम.

विक्रीच्या नोटिसा योग्य रीतीनें मंजूर व सही करून कायद्याप्रमाणें प्रसिद्धीसाठीं व तजविजीसाठीं परत पाठविल्या आहेत.

असिस्टंट कलेक्टर.

जमाबंदी कारकुनानें ता. न. नं. ६ यांत दाखला घ्यावा.

मामलेदार.

दाखला घेतला.

जमाबंदी कारकून.

उपायाचा परिणाम काय झाला याबद्दल कुळकर्ण्यानें रिपोर्ट करावा.

मामलेदार.

(जमिनीची विक्री करण्याची, किंवा खातें खालसा करण्याची, किंवा दुसरा स्थावर माल जप्त करण्याची, किंवा पकडण्याचें वारंट करण्याची, आवश्यकता उत्पन्न झाली तर तें काम पत्रव्यवहाराचे रूपानें चालू राहील.)

जेव्हां बाकीदाराची जमीन खालसा करण्यांत येतें, किंवा लिलांव न करतां नवीन शर्त त्याच्या कुळाकडे वर्ग केली जाते (रूल १२०) तेव्हां वसूल न झालेली बाकी, सूट (ल्यां. रे. को. रू. ६९.) वसूल करण्याचे सर्व प्रयत्न संपल्यावर, अगर ते निष्फळ आहेत असें आढळून काढून टाकतां येते. (सूट नव्हे.) हिशेब चालू ठेवण्यापेक्षां बाकी ताबडतोब काढून टाकणें जास्त चांगलें होणारी बाकी काढून टाकण्याचा अधिकार १०० रुपयेपर्यंत कलेक्टरसाहेब यांस आहे. (ल्यां. रे. को. रू. पहा.) २०० रुपयेपर्यंत अधिकार कमिशनरसाहेब यांस आहे. [स. ठ. नंबर ४६५३ (९)-०८.]

जमीन खालसातीचे नोटिसांवर (आर्. एन्. २७) मामलेदार सही करतात [स. ठ. नं. ५२९५—(७४)—११];

खालसातीनंतर विक्रीच्या नोटिसांवर (आर्. एम्. ६१) प्रांताचे साहेब सही करतात.

सक्तीचे मोठे उपायाचे नमुन्यासंबंधानें खुलाशाची आवश्यकता नाहीं. ज्याअर्थी प्रत्येक हुकूम तालुक्यांतून सुटतो त्याअर्थी मामलेदार हे आपले सक्तीचे उपायाचे रजिष्टराकरितां काय काय तपशील पाहिजे, तो दिला आहे कीं नाहीं हें पहातील.

जंगल माल किंवा जमीनविक्रीचे समयीं खरेदीदारानें कुळकर्ण्यास पैका दिला, किंवा तालुक्याचे ठिकाणीं भरला, तर ती रक्कम खरेदीदाराचे हस्तें म्हणून बाकीदाराचे खात्यांत जमा केली पाहिजे, असें लक्षांत ठेवावें. फक्त विक्रीचा खर्च वजा करण्याचा हुकूम झाला असला तर तो किरकोळ जमीनबाबीस वेगळा जमा करावा. या बाबतींत गां. न. नं. ४ यांतील नोंदीस विक्रीचे प्रकर्णाचा आधार लिहावा. वसूल आलेली रक्कम येणें रकमेहून जास्त असली तर अर्थात् जास्त रक्कम फाजील वसूल होईल, व तो फाजील वसूल बाकीदारास परत दिला पाहिजे, किंवा त्यास पसंत पडल्यास पुढील सालचे वसुलांत तो पुरविला पाहिजे, किंवा त्याचें दुसरें खातें असल्यास त्यास जमा केला पाहिजे.

# गांवचा नमुना नंबर ११

ठरावबंदांतील सर्व बाबी [illegible]

| हिशेबाचा नंबर. | नांवें. | क्षेत्र. खालसा (सरकारी) विशेष रीतीनें कमी केलेले साऱ्यासह. | | क्षेत्र. इनाम. | | क्षेत्र. * बिनशेती. | | इनामावरील नुकसान. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ | | |
| | | ए. | गुं. | ए. | गुं. | ए. | गुं. | रु. आ. पै | | |
| १ | बाळकृष्ण वासुदेव ... | २५ | ३० | २४ | २० | २५ | ० | ५२ ८ ० | | ... |
| २ | गणपतराव बळवंतराव ... | ० | १० | २ | ४ | ... | | ३ ० ० | | ... |
| ३ | बाळू मथू ... | १ | १७ | ... | | ... | | ... | | ... |
| ४ | §भोगिनाथ रामलाल ... | २६ | २ | ... | | ... | | ... | | ... |
| | | | | | | | | | | तहकूब (ई). |
| ५ | गेनू मथू ... | १ | १८ | ... | | ... | | ... | | ... |
| ७ | लक्ष्मीबाई भ्रतार अनंदराव ... | ० | २१ | ... | | ... | | ... | | ... |
| ८ | मनाजी अनंदराव शिंदे ... | २१ | ४ | ६ | ६ | ० | २० | ५ ० ० | | ... |
| | | | | | | | | | | सूट (अ). |
| | | | | | | | | | | वसूल. |
| ९ | §मणिलाल हिराशंकर व इतर. | ... | | १५ | २० | ... | | २० ८ ० | | ... |
| | | | | | | | | | | वसूल. |
| | | | | | | | | | | बाकी. |
| १० | मथू मारुती ... | २ | ३५ | ... | | ... | | ... | | ... |
| ११ | नारायण कुळकर्णी ... | ६ | ३० | २२ | १० | २ | २० | २९ ८ ० | | ... |
| १२ | नरसिंहराव बळवंत ... | ० | ११ | १२ | १७ | ११ | ८ | ... | | ... |
| | | | | | | | | | | वसूल. |
| | | | | | | | | | | बाकी. |
| १३ | राघू रामा माळी ... | ८ | ३ | ... | | ... | | ... | | ... |
| | | | | | | | | | | सूट (ब). |
| | | | | | | | | | | वसूल. |
| १४ | रघुनाथ बळवंत ... | १२ | १४ | ... | | ... | | ... | | ... |
| १६ | रेव्हरंड मि. शिलिंदी ... | ... | | ... | | १ | ० | १८ ० ० | | ... |
| | | | | | | | | बिनशेतीचा. | | वसूल. |

टीप.—कोष्टक ७ ते १६ यांची बरीज घेण्यास सोपें पडावें म्हणून ८-ब वरून सूट व तहकुबी यांचे

* हा तपशील गांवीं नसेल तर

...रि. सन १९१२-१३.

...पन्न— संयुक्त जमीनबाब.

बाकी. *

| तहकुबीची. | | | बिगरहुकुमी. | | |
|---|---|---|---|---|---|
| १९०९-१० | १९१०-११ | १९११-१२ | १९१०-११ | १९११-१२ | दुसरीं वर्षें. |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ९ ९ ० | ... | ९ ९ ० | ... | ... |
| ... | ९ ९ ० | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८ ८ ० | ... | ... | ... | ... | ... |
| ८ ८ ० | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ९ ९ | ... | ... | ... |
| ... | ... | ४ ९ | ... | ... | ... |
| ... | ... | १ ० | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ४ ४ ० | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |

आंकडे घालण्यापूर्वी येणें लिहून त्याची एकूण बेरीज केली पाहिजे व तें सिद्ध केलें पाहिजे.
कोष्टकें आखूं नयेत.

| हिशेबाचा नंबर. | नांवें. | संयुक्त जमीनबाब. चालू साल. कायम. खालसा (सरकारी). | इनाम. | * बिनशेती. | फिरतें किरकोळ उत्पन्न. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | बाळकृष्ण वासुदेव ... | १० ० ० | ११ ४ ० | १३२ १३ ० | ... |
| २ | गणपतराव बळवंतराव ... | ० २ ३ | ० ३ ० | ... | ... |
| ३ | बाळू मथू ... | १ ७ ० | ... | ... | ... |
| ४ | § भोगीनाथ रामलाल ... | २३ १० ३ | ... | ... | ... |
| | तहकूब (इ) ... | ... | ... | ... | ... |
| ५ | गेनू मथू ... | १ १० ३ | ... | ... | २२ २ ९ |
| ७ | लक्ष्मीबाई भतार अनंदराव ... | ० ६ ६ | ... | ... | ... |
| ८ | मनाजी अनंदराव शिंदे ... | १३ ० ३ | २ ७ ० | ३२ ५ २ | ५९ ७ ० |
| | सूट (अ) ... | ... | ... | ... | ... |
| | वसूल ... | १३ ० ३ | २ ७ ० | ३२ ५ २ | ५९ ७ ० |
| ९ | § मणिलाल हिराशंकर व इतर. | ... | ११ ६ ० | ... | ... |
| | वसूल ... | ... | ७ ६ ० | ... | ... |
| | बाकी ... | ... | ४ ० ० | ... | ... |
| १० | मथू मारुती ... | ३ ६ ३ | ... | ... | ... |
| ११ | नारायण कुळकर्णी ... | १० १० ० | १८ ५ ० | ५३ २ ० | ... |
| १२ | नरसिंहराव बळवंत ... | ० ९ ९ | १९ १४ ९ | १८६ ८ ६ | ... |
| | वसूल ... | ० ९ ९ | १९ १४ ९ | १८६ ८ ६ | ... |
| | बाकी ... | ... | ... | ... | ... |
| १३ | राघू रामा माळी ... | १७ २ ३ | ... | ... | २८ ११ ० |
| | सूट (ब) ... | ४ ४ ० | ... | ... | ... |
| | वसूल ... | १२ १४ ३ | ... | ... | २८ ११ ० |
| १४ | रघुनाथ बळवंत ... | ८ ८ ० | ... | ... | ... |
| १६ | रेव्हरंड मि. शिलिदी ... | ... | ... | ३ ४ ० | ... |
| | वसूल ... | ... | ... | ३ ४ ० | ... |

टीप.—कोष्टक ७ ते १६ यांची बेरीज घेण्यास सोपें पडावें म्हणून ८-ब वरून सूट व तहकुबी यांचे

* हा तपशील गांवीं नसेल तर

| उत्पन्न येणें. | * सुट अगर काढून टाकलेली बाकी. | * तहकूब. | वसूल. | * बिगर-हुकुमी बाकी. | * फाजील वसूल, किंवा पुढील सालचा वसूल. | हप्ते. पहिला. ता. ५ वी जानेवारी १९१३. | हप्ते. दुसरा. ता. ५ वी मार्च १९१३. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| १९४ १ ० | ... | ... | १९४ १ ० | ... | ... | १४४ १ ० | १० ० ० | |
| ० ९ ३ | ... | ... | ० ९ ३ | ... | ... | ० ९ ३ | ... | |
| १ ७ ० | ... | ... | १ ७ ० | ... | ... | १ ७ ० | ... | |
| ३४ ४ ३ | ... | ... | २८ १९ ३ | ... | ... | २३ ४ ३ | ११ ० ० | |
| ... | ... | ९ ९ ० | ... | ... | ... | ... | ... | |
| २३ १३ ० | ... | ... | २३ १३ ० | ... | ... | १ १० ३ | ... | |
| ० ६ ६ | ... | ... | ० ६ ६ | ... | ... | ० ६ ६ | ... | |
| ११९ ११ ९ | ... | ... | ... | ... | ... | ४९ ४ ९ | ७ ० ० | |
| ... | ८ ८ ० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | १०७ ३ ९ | ... | ... | ... | ... | |
| ११ ६ ० | ... | ... | ... | ... | ... | ६ ६ ० | ९ ० ० | |
| ... | ... | ... | ७ ६ ० | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | ४ ० ० | ... | ... | ... | |
| ३ ६ ३ | ... | ... | ३ ६ ३ | ... | ... | ३ ६ ३ | ... | |
| ८२ १ ० | ... | ... | ८२ १ ० | ... | ... | ६८ १ ० | १४ ० ० | |
| २१२ ६ ० | ... | ... | ... | ... | ... | २०२ ६ ० | १० ० ० | |
| ... | ... | ... | २११ ६ ० | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | १ ० ० | ... | ... | ... | |
| ४९ १३ ३ | ... | ... | ... | ... | ... | ९ २ ३ | ८ ० ० | |
| ... | ४ ४ ० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ११ ९ ३ | ... | ४ ४ ० | ... | ... | |
| १२ १२ ० | ... | ... | १२ १२ ० | ... | ... | ८ १२ ० | ४ ० ० | |
| ३ ४ ० | ... | ... | ... | ... | ... | ३ ४ ० | ... | |
| ... | ... | ... | ३ ४ ० | ... | २ ० ० | ... | ... | तारीख २५-७-१३ रोजीं रिफंड दिला. |

आंकडे घालण्यापूर्वी येणें लिहून त्याची एकूण बेरीज केली पाहिजे व तें सिद्ध केलें पाहिजे.
कोष्टकें आखूं नयेत.

| हिशेबाचा नंबर. | नांवें. | क्षेत्र. खालसा (सरकारी) विशेष रीतीनें कमी केलेले सान्यासह. | इनाम. | *बिनशेती. | इनामावरील नुकसान. | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| १७ | सर्जेराव भिवराव ... | ४ २३ | १० ९ | ... | १९ ११ ६ | ... |
| १८ | शंकर हरी ढमढेरे ... | ११ ३८ | ... | ... | ... | ... |
| १९ | शिवाजी बाळाजी व इतर ... | २९ ० | ... | ... | ... | ... सूट (क.) वसूल |
| २० | शिवराम शंकर भट ... | ... | १० १९ | ... | ८ १४ ० | ... |
| २१ | त्र्यंबक नारायण ... | ... | १६ ४ | ... | १० १३ ६ | ... |
| २२ | तुकाराम अंताजी ... | ७ ८ | ... | ... | ... | ... |
| २३ | विठ्ठल रामचंद्र ... | ४२ २३ | ३ ८ | ... | २ ३ ६ | ... सूट (ड.) तहकूब (फ.) वसूल. |
| २४ | मक्ते व विक्रया ( मक्ता ) ... | ... | ... | ... | ... | ... वसूल. बाकी. |
| | रुजुवात पाहण्याची पद्धत. (दुसरे प्रकारें सांगितलें नसेल तर) गां. न. नं. ५ यांतील बाब. | १६+१७+१९+२० | १८ | २२ | १२+२४ | ... |
| | एकूण ... | १९८ ७ | १२२ २९ | ४० ८ | १४८ २ ६<br>१८ ० ० | इनाम.<br>बिनशेती इनाम. |
| | §बिनशेतकऱ्यांनीं धारण केलेलें. ४१-२२ | २६ २ | १५ २० | | | |
| | शेतकऱ्यांनीं धारण केलेलें. २७९-१४ | १७२ ५ | १०७ ९ | | | |
| | ३२०-३६ | | | | | |
| | गां. न. नं. ५ अनुक्रम नं. २१ | | | | | |

* हा लपशील गांवीं नसेल तर

संयुक्त जमीनबाब.

बाकी. *

| उत्पन्न | | तहकुबीची. | | | | बिगरहुकुमी. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०९-१० | | १९१०-११ | | १९११-१२ | | १९१०-११ | | १९११-१२ | | दुसरीं वर्षें. | |
| ७ | | ८ | | ९ | | १० | | ११ | | १२ | |
| ... | | ... | | ... | | ... | | ५ | ५ | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | १५ | १५ | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | १५ | १५ | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| ... | | ... | | ... | | ... | | ... | | ... | |
| गुदस्तसालाचा गा. न. | | | | नं. ८-ब. | | ... | | ... | | ... | |
| ८ | ८ | ९ | ९ | ९ | ९ | २५ | ८ | ९ | ९ | ... | |

कोष्टकें आखूं नयेत.

| हिशेबाचा नंबर. | नांवें. | संयुक्त जमीनबाब. चालू साल. कायम. खालसा (सरकारी). | इनाम. | * बिनशेती. | फिरतें किरकोळ उत्पन्न. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १३ | १४ | १५ | १६ |
| १७ | सजराव भिवराव ... | ९ ३ ९ | ५ १२ ९ | ... | ... |
| १८ | शंकर हरी ढमढेरे ... | १३ ११ ० | ... | ... | ... |
| १९ | शिवाजी बाळाजी व इतर ... | ६५ ५ ६ | ... | ... | ... |
| | सूट (क) ... | ७ १५ ६ | ... | ... | ... |
| | वसूल ... | ५७ ६ ० | ... | ... | ... |
| २० | शिवराम शंकर भट ... | ... | ४ ४ ६ | ... | ... |
| २१ | त्र्यंबक नारायण ... | ... | ६ ० ० | ... | ... |
| २२ | तुकाराम अंताजी ... | १६ १ ३ | ... | ... | ३६ १२ ० |
| २३ | विठ्ठल रामचंद्र ... | २७ ११ ० | १ २ ३ | ... | २२ १२ ० |
| | सूट (ब) ... | ४ ४ ० | ... | ... | ... |
| | तहकूब (क) ... | ८ ८ ० | ... | ... | ... |
| | वसूल ... | १४ १५ ० | १ २ ३ | ... | २२ १२ ० |
| २४ | मक्ते व विक्रया ( मक्ता ) ... | ... | ... | ... | ५ ११ ० |
| | वसूल ... | ... | ... | ... | ३ ३ ० |
| | बाकी ... | ... | ... | ... | २ ८ ० |
| | रुजुवात पाहण्याची पद्धत. ( दुसरें प्रकारें सांगितलें नसेल तर) गां. न. नं. ५ यांतील बाब. | १६+१७ १९+२० सदर रकमेवरील लोकल फंड ३ पै घरसोडीमुळें कमी. | १७+(१७+१२.) वरील लोकलफंड. | २५+लोकलफंड (२५+२४ वरील). | २७+३० |
| | एकूण ... | २२२ ९ ३ | ८० ११ ३ | ४०८ ० ८ | १७५ ७ ९ |

* हा तपशील गांवीं नसेल तर

| उत्पन्न. | * सूट अगर काढून टाकलेली बाकी. | * तहकूब. | वसूल. | * बिगर-हुकमी बाकी. | * फाजील वसूल, किंवा पुढील सालचा वसूल. | हप्ते. पहिला. ता. ५ वी जानेवारी १९१३. | हप्ते. दुसरा. ता. ५ वी मार्च १९१३. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| २० ९ ६ | ... | ... | २० ९ ६ | ... | ... | १३ ९ ६ | ७ ० ० | |
| १३ ११ ० | ... | ... | १३ ११ ० | ... | ... | ७ ११ ० | ६ ० ० | |
| ८१ ४ ६ | ... | ... | ... | ... | ... | ४९ ४ ३ | ३२ ० ० | |
| ... | ७ १९ ६ | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ७३ ९ ० | ... | ... | ... | ... | |
| ४ ४ ६ | ... | ... | ४ ४ ६ | ... | ... | ४ ४ ६ | ... | |
| ६ ० ० | ... | ... | ६ ० ० | ... | ७ १९ ० | ४ ० ० | २ ० ० | |
| ९३ १२ ३ | ... | ... | ९३ १२ ३ | ... | ... | ८ १ ३ | ८ ० ० | |
| ९१ ९ ३ | ... | ... | ... | ... | ... | १४ १३ ३ | १४ ० ० | |
| ... | ४ ४ ० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ८ ८ ० | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ३८ १३ ३ | ... | ... | ... | ... | |
| ९ ११ ० | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ३ ३ ० | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | २ ८ ० | ... | ... | ... | |
| बाकी+३३ | तपशील पाठीवर आहे तो विशेष फाइलीवरून तयार केला असून गां. न. नं. ८ ब. शीं रुजू घेतला आहे. | | गां. न. नं. ९ पानांतील शेवटचे तेरजाची ओळ. | गां. नं. ८-ब. शीं रुजुवात पहा. | गां. न. नं. ९ तेरीज. | दोन्ही हप्त्यांची रक्कम रुपये ७६१-४-२=को. ७ ते १९ ची बेरीज. | | |
| ९३६ ११ ११ | २४ १९ ६ | १३ १३ ० | ८९० ७ ९ | ७ ८ ० | १४ ३ ० | ६२३ ४ २ | १३८ ० ० | |

कोष्टक आंखूं नयेत.

## तेरीज.

| | संयुक्त जमीनबाब. | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाकी. | | | | | | चालू साल. | | | | | | | | | | |
| | तहकूब. | | | बिगरहुकमी. | | | कायम. | | | किरते किरकोळ उत्पन्न. | | | | | | | |
| | १९०९-१०. | १९१०-११. | १९११-१२. | १९१०-११. | १९११-१२ | आणखीं सालें. | खालसा. | इनाम. | बिनशेती. | | एकूण येणें. | सूट व काढून टाकलेली बाकी. | तहकूब. | वसूल. | बिगरहुकमी बाकी. | फाजील वसूल किंवा पुढील साला-करितां वसूल. | शेरा. |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| येणें ... | ८ ८ ० | ५ ५ ० | ५ ५ ० | २५ ८ ० | ५ ५ ० | | २२२ ९ ३ | ८० १० ३ | ४०८ ० ८ | १७५ ७ ९ | ९३६ ११ ११ | | | | | | |
| सूट ... | ८ ८ ० | | | | | | १६ ७ ६ | | | | | †२४ १५ ६ | | | | | |
| तहकूब ... | | ५ ५ ० | | | | | ८ ८ ० | | | | | | १३ १३ ० | | | | |
| वसूल ... | | | ४ ५ ० | २५ ८ ० | ५ ५ ० | | १९७ ९ ९ | ७६ ११ ३ | ४७८ ० ८ | १७२ १५ ९ | | | | ८९० ७ ५ | | ‡१४ ३ ० | ‡ परत दिले रु. २ ० ० दोन आणे अगर त्याचे आंतील रकमा —० पुढील सालास जमा केले. १२ ३ ० |
| | | | | | | | | | | | | | | | | | १४ ३ ० |
| बिगरहुकमी बाकी. | | | १ ० ० | | | | | ४ ० ० | | २ ८ ० | | | | | ७ ८ ० | | |
| | | | | | | | | | | | | | | | १३ १३ ० | हुकुमी बाकी. | |
| | | | | | | | | | | | | | | | २१ ५ ० | एकूण बाकी. | |

† सुटीचा वगैरे तपशील ( विशेष फायलीवरून ).

| | १९०९-१० | १९१२-१३ |
|---|---|---|
| अ. ओघानें मिळालेली ... ... ... | ८ ८ ० | |
| ब. जमिनींत पाणी सांचल्यामुळें ... | | ४ ४ ० |
| क. पावसाचे कमतरतेमुळें ... ... ... | | ७ १५ ६ |
| ड. जमीन वाहून गेल्यामुळें ... ... ... | | ४ ४ ० |
| एकूण ... | ८ ८ ० | १६ ७ ६ |
| | २४ १५ ६ | |
| त्यांपेकीं खालसा कायम संयुक्त जमीनबाबीची ... ... | ८ ८ ० | १६ ७ ६ |

(सही) अ. ब.

# गांवचा नमुना नंबर ११ (इरिगेशन).

## इरिगेशनच्या महसुलाचें तात्पुरतें आढावापत्रक.

| १ अकौंट नंबर. | २ खातेदाराचें नांव. | बाक्या. | | | | | | चालू. | | | | | सूट. | | तहकुबी. | | वसुल्या. | | अनधिकृत शिल्लक | | जादा वसुल | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अधिकृत. | | | | अनधिकृत. | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | पाणीपट्टी. | | | लोकल फंड. | पाणी-पट्टी. | लोकल फंड. | खरीप. | रब्बी. | इतर. | एकूण. | लोकल फंड. | पाणी-पट्टी. | लोकल फंड. | पाणी-पट्टी. | लोकल फंड. | पाणीपट्टी. | लोकल फंड. | पाणीपट्टी. | लोकल फंड. | पाणीपट्टी. | लोकल फंड. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| | | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | |

## गांवचा नमुना नंबर ११ बाबत खुलासा.

ह्या हिशेबास टेस्ट ब्यालन्सशीट म्हणजे "पडताळा पत्रक" असें नांव दिलें आहे. चुका नं ह्या पत्रकाचा हेतु आहे. एक गोष्ट (म्हणजे बाकीचा तपशील) खेरीजकरून तालुक्याचे हिशेबाकरि कोणतीहि माहिती मिळविण्याचें साधन हें पत्रक नव्हे.

२. (१) कबजांतील शेतीचे किंवा बिनशेतीचे क्षेत्राचे लहान लहान पुष्कळ तुकडे केलेले असतात. त्यापैकीं प्रत्येक तुकडा कोणाचे तरी हिशेबांत दाखविलेला असतो. असे हिशेबाची एकूण बेरीज करण्यांत येते व हे हिशेब कुळकर्ण्याचे जमीनबाबत महसुलाचे पाये होतात. परंतु गां. न. नं. ५ (ठरावबंद) लिहिण्यांत येतो तेव्हां अशा विभागाचे तुकडे विचारांत घेण्यांत येत नाहींत. गां. न. नं. १ चे तेरजावरून तयार झालेलीं व दुसरें कांहीं नमुन्यावरून, एकंदर क्षेत्रें घेण्यांत येतात व त्यावरून लोकलफंडखेरीज सर्व येणें एकगटानें काढण्यांत येते. म्हणून हक्कनोंदणींतील सर्व जमिनीचे पोटविभाग खतावणींत दाखल करतांना कुळकर्ण्यानें जर एकादे ठिकाणीं एक गुंठा जमीन गाळली असली, किंवा हिशेब करतांना एकादा रुपया दाखल करण्याचा सोडला असला, तर तो जो काय वसूल करील त्याची बेरीज व खात्यात दाखल असलेले जमिनीची एकूण बेरीज, ह्या ठरावबंदाशीं मिळणार नाहींत, या सर्व अवघड कामांत चूक झाली नाहीं असें शाबीत करणें हा पडताळापत्रकाचा हेतू आहे.

(२) गांवठाणांतील बिनशेतीचे तुकडे, हे ह्या नमुन्यांत सामील केलेले नाहींत. खातें नं. ८ व १२ पहा. कारण गांवठाणचें एकूण क्षेत्र नाकीर्दसार म्हणून ठरावबंदांत वजा केलें आहे. जेव्हां असे तुकडे पुष्कळ असतील व गांवठाणची सर्व्हे झाली असेल, तेव्हां गां. न. नं. ८-अ. यांतील तपशीलवार नोंदीच्या खरेपणाची चांचणी गां. न. नं. ११ यांत नवीन कोष्टक घालून किंवा वेगळें टिपण करून पहावी.

(३) जी जमीन बिनशेतीची आहे व इनामहि आहे, ती इनाम-कोष्टकांत दाखविली आहे. पान (१४५) पहा. आणि ती जर वर्ग ७ पैकीं असेल तर बिनशेतीची या कोष्टकांत धरली जाते.

३. हा हिशेब दुसऱ्या एका कारणाच्या उपयोगीं पडतो. तें कारण हेंच कीं, हुकुमी व बिगरहुकुमी बाकीचा सालवार वेगळा तपशील यांत ठेवतां येतो. गांव सुखी असून कुळकर्णी चांगला असला व बाकी नसेल, तर हीं सर्व कोष्टकें गाळण्यास हरकत नाहीं. जेथें बाकी एकाच प्रकारची असेल, म्हणजे हुकुमी किंवा बिगरहुकुमी, तेथें बाकीची ३ कोष्टकें गाळण्यास हरकत नाहीं. बाकी एकच सालची असली तर बाकीचीं इतर कोष्टकें कमी करण्यास हरकत नाहीं. शिवाय २०० खातीं आहेत अशा गांवांत फक्त ५ किंवा ६ खात्यांत बाकी असली तर २०० खात्यांकरितां सर्व कोष्टकें आंखण्यापेक्षां प्रत्येक खातेदाराचे नांवासमोर बाकी गट रकमेनें दाखवावी व बाकीचा तपशील नमुन्याचे पायथ्याशीं टीपेनें द्यावा. असें करण्यांत जागा व श्रम उघड वांचविल्यासारखें होईल. तथापि एकादे प्रकारची बाकी अजिबात नसल्याशिवाय तेरीज संक्षिप्त करूं नये. मासल्याच्या नमुन्यांत जितकीं कोष्टकें दिलीं आहेत, तितक्या कोष्टकांची कोणतेहि गांवीं जरूर लागणार नाहीं, अशी खरोखर अशा आहे. या नमुन्यांतील कोष्टकांची एकूण संख्या २४ आहे. परंतु या नमुन्यानें जो पूर्वीचा नमुना रद्द झाला आहे त्या तिसऱ्या आवृत्तींत ९२ कोष्टकें होतीं व त्यांत सुद्धां सुटीचा तपशील जोडावा लागत असें. (स. ठ. नं. २९०२-१२.)

४. बाकीसुद्धां येण्याकरितां तपशिलाचे मानानें एक ओळ, नंतर चालू सालचे किरकोळ बाकीसह सुटीकरितां एक ओळ, पुन्हा तहकुबीकरितां आणखी एक ओळ, त्यानंतर वसुलाकरितां एक ओळ व अखेरीस बिगरहुकुमी बाकीकरितां एक ओळ, अशी एकेक ओळ कशा रीतीनें दिली आहे इकडे विशेष लक्ष द्यावें. अर्थात् खातेदाराकडील एकूण बाकींत तहकुबीची व बिगरहुकुमी बाकी अशा सामील असतात. या प्रत्येक ओळीची आडवी बेरीज कोष्टक १७ ते २१ पैकीं एका कोष्टकांत दिली आहे. परंतु बेरजा सरळ उभ्या न देतां पायऱ्यापायऱ्यानें बेरजा याव्या अशी व्यवस्था केली आहे. कदाचित् असें वाटेल कीं, या ओळी भरण्यास ९२ कोष्टकांच्या जुन्या पद्धतीप्रमाणें जितक्या नोंदी लागतात तितक्या पुष्कळ नोंदी लागत असतील. परंतु विचार केल्यावर असें दिसून येईल कीं, तशी गोष्ट नाहीं. जेव्हां खातेदार आपलें सर्व देणें देऊन टाकतो, तेव्हां या ओळींपैकीं एका ओळीचीहि मुळींच जरूर लागत नाहीं. कारण तेथें बाकीच काढावयाची नसते. खातें नंबर १, २, ३ पहा. साधारण गांवाचे खात्यांपैकीं पुष्कळ खातीं नं. १ ते ७ चे खात्यांहून जास्त अवघड नसतील.

५. सालअखेरीस या नमुन्याची एकूण करतांना सुटींत वसूल मिळविणें : अगर अशासारखें कांहीं केलें जाणार नाहीं अशाबद्दल काळजी घ्यावी लागेल. प्रत्येक ओळीची आडवी बेरीज कोष्टकें १७ ते २१ यांपैकीं योग्य कोष्टक येईपर्यंत घेतली पाहिजे. ह्या १७ ते २२ कोष्टकांची उभी बेरीज घ्यावी.

[illegible]ळीं प्रत्येक कोष्टकाचे एकूण बेरजेची गां. न. नं. ५, ८-ब व ९ यांच्याशीं कशी [illegible]ल आहे. जर या एकूण बेरजा मिळाल्या तर गांवचे सर्व हिशेब बरोबर असले पाहिजेत. [illegible] उत्पन्न [illegible]ईल तर चूक असली पाहिजे. चूक कोठें आहे हें कुळकर्णी बहुतकरून सहज शोधून काढूं शकेल. [illegible] नोंदीची बेरीज चुकीची आली, त्या नोंदींत चूक आहे हें त्याला समजून येईल. दुसरें हिशब बरोबर [illegible] हें सिद्ध करतां यावें हा ह्या नमुन्याचा मुख्य उपयोग आहे. शिवाय या नमुन्यावरून प्रत्येक कबजेदाराकडे [illegible]वार बाकी किती आहे हें काढण्यास कुळकर्ण्यास सुलभ पडेल व त्यावरून पुढील सालचा गां. न. नं. ८-ब., [illegible]ल पहिल्या नोंदी सहज भरतां येतील. हल्याचीं २ कोष्टकें (कोकणांत ४) न. नं. ८-ब मध्यें फोड [illegible]प्रमाणें भरण्यांत येतात. चलनांतील वसुलाचे चढते बेरजेवर नजर ठेवण्यास त्याचा उपयोग होतो.

७. फाजील वसुलाची व्यवस्था व रिफंडबद्दल टिपा यांजकडे लक्ष द्यावें. पान (१२६) पहा. सूट व काढून [illegible]लेल्या बाक्या यांचा संक्षिप्त गोषवारा व वर्गवारी हीं नमुन्यांत दाखविल्याप्रमाणें केलीं आहेत. शिवाय गां. न. नं. ८-अ [illegible]ल प्यारा १९ व गां. न. नं. ८-ब वरील प्यारा ३ पहा.

हा नमुना साल अखेर होईपर्यंत पुरा करतां येणार नाहीं. परंतु अर्थात् को. १ ते ६ बाकीचें येणें व चालू [illegible]चें कायम जमीनबाब येणें हीं साल अखेरीचे पूर्वी पुष्कळ दिवस आधीं भरतां येतील व त्यांची बेरीज करून [illegible]क ७ ते १६ यांत सूट, वसूल व बाकी दाखल करण्यापूर्वी गा. न. नं. ५ शीं मुकाबला करतां येईल. [illegible]र गां. न. नं. ८-ब यांतील प्रत्येक खात्याचा जसजसा निकाल होऊन हिशेब बंद होत जातील, तसतशा [illegible] खात्यांच्या नोंदी यांत करतां येतील. हा नमुना वेळींच तयार करण्याकडे लक्ष ठेवलें तर जुलैअखेर फारशी अडचण पडणार नाहीं. ही गोष्ट अत्यंत जरुरीची आहे कीं, तारीख ३१ जुलैचे पूर्वी सर्व हिशेब बंद करून [illegible]वा मेळ घेतला पाहिजे. कारण कुळकर्ण्यास आपला हिशेब बरोबर आहे व आपला वसूल तालुक्याचे [illegible]लाशीं मिळता असून ठरावबंद व दुसरें हिशेबाशींहि मिळता आहे, असें स्वतः सिद्ध केल्याशिवाय तालुक्याचे हिशेबांत सामील होण्यास तो त्यास पाठवितां येणार नाहीं. हे हिशेब पुरे करण्यांत उशीर केला तर त्यामुळें सर्व [illegible]क्याचे व जिल्ह्याचे हिशेब तयार करण्यांत उशीर होईल. म्हणून कुळकर्ण्यानें हे हिशेब ता. ३१ जुलैचे संध्याकाळपर्यंत पुरे न करणें म्हणजे गांवकामगार या नात्यानें फार मोठे गुन्ह्यांपैकीं एक गुन्हा केला असें होईल.

८. गां. न. नं. ८ व ११ एकत्र करणें.—ज्या वेळीं एकादे गांवास तहकुबीच्या किंवा बिगर तहकुबीच्या बाक्या नसतील आणि वस्तुतः प्रत्येक बाबतींत सर्व खातेदार त्यांच्याकडेस येणें असलेला सारा बक्तशीर देतील अशी [illegible]णास खात्री वाटेल तर गां. न. नं. ११ मध्यें को. ७ ते १२ आणि १८, १९ व २१ अथवा ६ व ७ चे दरम्यानची [illegible]गा ठेवावयाची जरुरी नाहीं. गां. न. नं. ८-ब न लिहितां व त्यांतील सर्व तपशील गां. न. नं. ११ मध्यें एकदम दाखल करून को. १७ पर्यंत येण्याचें पत्रक म्हणून २ नमुन्याचें सहज एकीकरण करतां येईल. नंतर को. १८ व [illegible] यांचा पावतीची तारीख व नंबर लिहिण्याकडे उपयोग करावा. नंतर को. २० मध्यें वसुलाचा तपशील (प्रत्येक पावतीची एकूण) द्यावा. को. २१ अथवा २२ मध्यें एकहि नोंद बहुधा येऊं नये. कदाचित् फार त[illegible] एका गांवांत एक अथवा दोन नोंदी येतील. नंतर को. २०+२१ यांची बेरीज गां. न. नं. ९ च्या एकूण बेरजेशीं [illegible]वितां येईल. अशी तजवीज केल्यानें देखील गां. न. नं. ११ चा उपयोग पडताळापत्रक म्हणून करतां येईल आणि हल्लीचे गां. न. नं. ८-ब मध्यें जी माहिती मिळते ती सर्व त्यांत मिळेल व त्या नमुन्याची जरूरी राहणार [illegible]ही. परंतु ज्या वेळीं बाक्या व तहकुबी असतील त्यावेळीं असें करतां कामा नये. आनंद तालुक्यांत ह्या [illegible]चा अनुभव घेऊन पाहिला परंतु ज्यावेळीं तहकुबीचे हुकूम दिले गेले त्यावेळीं भयंकर घोटाळा झाला. परंतु [illegible] वेळीं परिस्थिति चांगली आहे असें मामलेदारास वाटेल त्या वेळीं त्यांनीं वरीलप्रमाणें करण्यास तलाठ्यास [illegible]ठवावें. अर्थात् अशा बाबतींत ह्या नमुन्यांमधील इतर ठिकाणीं दाखविलेल्या गां. न. नं. ८-ब व ११ च्या [illegible]रीबद्दलचे सर्व संदर्भीचा अर्थ नवीन तयार केलेल्या पत्रकाशीं संबंध ठेवून लावला पाहिजे.

जेथें गां. न. नं. ८-ब चा उपयोग वार्षिक बदलून सारा वसूल करणेंच्या कामासाठीं केला जातो अशा [illegible]टी-सर्व्हे झालेल्या गांवीं हें एकीकरण सुलभ आणि सोपें होईल. अशा महसुलास सूट व तहकुबीचे नियम [illegible]गू पडत नाहींत, आणि अशा रकमा हल्यानें घ्यावयाच्या नसतात. जर मेंटेनन्स सर्व्हेअर (अथवा कुळकर्णी) [illegible]ीं वसुलाचें काम चांगलें केलें तर बाकी क्वचितच राहील आणि जर बाक्या फार थोड्या ठेवल्या असतील तरच [illegible]नें एकीकरण करतां येईल. शिवाय बहुतेक बिनशेती धारण करणारे खातेदाराजवळ प्रत्येकीं फक्त एक तुकडाभर जमीन असते, अशीं कांहीं उदाहरणें आहेत. अशा ठिकाणीं ज्या खातेदाराजवळ एक तुकडाच जमीन असते [illegible]ा सर्व खातेदारांचे बाबतींत गां. न. नं. ८-अ गाळून आणखी जास्त एकीकरण करतां येईल. अशा [illegible]बतींत या नमुन्यांतील को. ३, ४ व ६ ची जरुरी बहुतेक लागणार नाहीं म्हणजे कोष्टक ३ चा उपयोग त्या तुकड्याच्या [illegible]टी-सर्व्हे नंबर दाखविण्यासाठीं करतां येईल.

स्पष्ट हुकूम असल्याखेरीज असें एकीकरण करूं नये. परंतु अशा प्रकारचें [illegible] नसतांनाहि आणि नमुन्यांचीं कोष्टकें फक्त जरुरीचीं असल्यामुळेंच ठेवण्यांत आलीं आहेत, [illegible] सोपें पडतें म्हणून तलाठी असें एकीकरण करील अशी भीति आहे. मामलेदार व प्रांतसाहेब [illegible] घेतली पाहिजे.

९. पुष्कळसे खातेदार शेतकरी आणि बिनशेतकरीहि असतात. ह्यामुळें त्यांची जुनी वर्गवारी अंदाजी व चुकीची अशी होते. ती (स. ठ. नं. ९७४५ तारीख ११-९-२४ आणि १०-९-२५) (सिंधला स. ठ. नं. ९७४५ तारीख २३-९-२६ नें मुद्दाम दुरुस्ती केली आहे) रद्द करून त्याऐवजीं तीन वर्ग करण्यांत आले आहेत. शिवाय खातेदारानें आपलें खात्यांतील प्रत्येक तुकडा ज्या प्रकारानें लागवडीस आणला असेल त्या तुकड्याच्या क्षेत्राबद्दलही वर्गवारी तयार केली जाते. जर गेनूनें ५ एकर जमीन स्वतः पेरली आणि आणखी ५ एकर जमीन भाड्यानें मजूर लावून तिच्यावर देखरेख करीत असेल आणि आणखी [illegible] एकर त्यानें कुळाला खेडण्यास दिली असेल तर त्यास कोणत्या वर्गांत घालावे याबद्दल अद्याप नियम नाहीं; कारण हे आपल्या जमिनीचा सर्वांत मोठा भाग तो ज्या रीतीनें उपयोगांत आणीत असेल त्यांवर अवलंबून राहील.

१०. जे तीन प्रकार वर सांगितले ते खालीलप्रमाणें आहेत —

(अ) स्वतः जमिनीची लागवड करणें मग मदतीसाठीं जास्त मजूरदार लावो अगर न लावो.

(ब) स्वतः जमिनीची लागवड करीत नाहीं परंतु जरी कधींकधीं तो कांहीं कामांत भाग घेत असला तरी मजूर लावून देखरेख करतो.

(क) गां. न. नं. ७-अ मध्यें दिलेल्या चार रीतींपैकीं कोणत्याहि रीतीनें जमीन कुळाला खेडण्यास देऊन त्याबद्दल स्वामित्व घेतो.

ह्याप्रमाणें वर्गवारी करणेंसाठीं आपणांस गां. न. नं. ११ चीं कोष्टकें जास्त वाढविलीं पाहिजेत. प्रत्येक वर्षी नव्हे तर ज्या ज्या सालीं डिस्ट्रिक्ट फार्म नं. ५ पाठविणेचा असतो अशा दर पांचवे वर्षी १-१०-३२ व पुढें दर ५ वर्षांनीं.

११. नवीन कोष्टकें खालीलप्रमाणें घालावीं.—

गां. न. नं. ११ च्या पंचवार्षिक जादा माहितीचा खुलासा.

ज्या खातेदारांना परगांवीं देखील जमीन आहे किंवा परगांवीं जमीन आहे असें आपणास समजलें आहे अशा खातेदारांचे नांवापुढें त्या परगांवचें नांव लिहावें.

| खातें नंबर. | खातेदाराचें नांव. | ज्या दुसऱ्या गांवीं जमीन आहे त्या गांवचें नांव. | वर्ग—अ, ब, क. | खालसा. (जिचा सारा विशेष रीतीनें कमी केलेला आहे अशी जमीन धरून). | | | | | | इनाम. | | | | | | ५ पासून इतर कोष्टकें नेहमींच्या नमुन्यांत लिहिलेप्रमाणें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ. | | ब. | | क. | | अ | | ब. | | क. | | |
| | | | | एकर. | गुंठा. | एकर | गुंठा. | एकर. | गुंठा. | एकर. | गुंठा. | एकर. | गुंठा. | एकर. | गुंठा. | |
| १ | २ | २ अ | २ ब. | ३ | | | | | | ४ | | | | | | ५ |
| | | | | | | | | | | | | | | | | जर कुळकर्ण्यास असे आढळून येईल की, वर्ग ब (अथवा क) ची जमीन नाहीं (अथवा १ अथवा २ तुकडे आहेत) तर त्यानें तें कोष्टक वगळून हातानें टीप द्यावी. |

इतर कोष्टकें भरल्याशिवाय को. २-अ व ब हीं (कोष्टकें) भरतां यावयाचीं नाहींत. प्रत्येक खातेदाराची जमीन गां. न. नं. ८-अ मध्यें दाखविली असते व तिचे प्रत्येक तुकड्याचा वर्ग गां. न. नं. ७-अ मध्यें दाखविला असतो. जर एखाद्यास पुष्कळ तुकडे असतील तर ८-अ मध्यें प्रत्येक तुकड्यासमोर रीत १, रीत २ किंवा इतर ४ रीतींपैकीं ज्या रीतीनें ते तुकडे लागवडींत आणले असतील त्याप्रमाणें "अ, ब किंवा क" लिहावें. नंतर इनाम व खालसा असा भेद ठेवून प्रत्येक वर्गवारींत जे तुकडे येतील त्यांची बेरीज द्यावी आणि गां. न. नं. ११ मध्यें हा तपशील वाढविलेल्या सदरांत दाखल करावा. बदलून साऱ्यानें दिलेल्या जमिनीची वर्गवारी दाखवूं नये.

परंतु असें समजा कीं, त्यास दुसरे गांवच्या जमिनी आहेत अशा ठिकाणीं कुळकर्ण्यास को. ३-अ, ब, क आणि ४-अ, ब, क हीं भरण्यापलिकडे कांहीं एक करतां यावयाचें नाहीं. मात्र को. २-अ मध्यें गांवचें अगर गांवचीं

अशा प्रकारें अधिक जमीन धारण करणाराची बाकी राहिलेली वर्गवारी डिस्ट्रिक्ट [illegible] जाईल.

उत्पन्न [illegible]कापेक्षां जास्त गांवचा खातेदार नसेल तर मग त्याच्या खात्यापैकीं जास्त जमीन ज्या प्रकारची [illegible] वर्ग को. २-ब मध्यें अ, ब अथवा क नें दाखवावी. हें संपल्यानंतर डिस्ट्रिक्ट फार्म नं. ५ तयार करण्याची सर्व तयारी होते.

को. ३ व ४ यांतील अ, ब आणि क ह्या पोट सदरांची बेरीज (पोटसदरें नसतांना) को. ३, ४ यांतील आंकड्याशीं जुळेल व ती गां. न. नं. ५ मधील दिलेले कोष्टकांशीं जमेल. शिवाय या योगानें गांवची जमीन कशी काय धारण केली जाते ह्याबद्दल अंदाजी कल्पना करतां येईल. अर्थात् गां. न. नं. ७-ब मध्यें दाखविल्याप्रमाणें तंतोतंत करतां येणार नाहीं.

## पोट-खराब.

ह्या भागांत पो.ख.=पोट-खराब.

शेतीच्या कामासाठीं जेव्हां शेताची प्रत करण्यांत येते. तेव्हां कांहीं भाग इतका कनिष्ठ प्रतीचा आढळून येतो कीं, तो लागवडीच्या उपयोगीं नसतो. कोठें भुईसपाट उघडा खडक असेल, कोठें नाला असेल, कोठें खड्डा असेल, किंवा कोठें जुनी खाण असेल. त्याचप्रमाणें कोठें सार्वजनिक रस्ता असेल, पाण्याचा पाट असेल, सार्वजनिक तलावाचे बांधाचा भाग असेल, किंवा दुसरें कांहीं कारण असें असेल कीं, ज्यामुळें जमीन लागवडीजोगी असली तरी लागवड करण्याची परवानगी नसते. मुख्य उपयोगाच्या आड न येणारा असा वर्षाच्या दिवसापुरता केलेला हंगामी उपयोग हिशोबीं धरला जात नाहीं. (जसें उन्हाळ्यांतील रस्ता). सर्व पोट-खराब, मग तो खालसा जमिनींतील असो अगर इनाम जमिनींतील असो, तो गां. न. नं. १ (तेरीज) यांतून एक गटानें वजा करण्यांत येतो व त्यापुढें तो सर्व हिशेबांतून दिसेनासा होतो. गां. न. नं. ३ मध्यें पोट-खराब येत नाहीं. तरी पुढें खुलासा करण्यांत येईल त्याबरून पीकपाहणींत चूक न होऊं देणेंसंबंधानें सावधगिरी म्हणून, न. नं. १२ आणि गां. न. नं. ६ यांत (पान ५७-५८ प्यारा १२ व १३ पहा) त्याचें क्षेत्र घ्यावें लागतें. परंतु हिशेबासाठीं घ्यावें लागत नाहीं.

२. खराब दोन प्रकारचे असतात.—(१) जमीन लागणीलायक नाहीं असा व (२) जमीन लागणीलायक असते, परंतु ती शेतीकडून काढून दुसरे कांहीं कामाकरितां राखून ठेवलेली असते, असा. १९१५ पूर्वी खराब्याचे हे दोन प्रकार हिशेबांत वेगळे करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. परंतु हल्लींचे पुस्तकांत ते वेगळे धरलेले आहेत.

३. * * * * * * *

४. * * * * * * *

५. * * * * * * *

६. * * * * * * *

७. जेव्हां कुळकर्णी पीकपहाणी करील तेव्हां त्यानें पुढील नियमाप्रमाणें चालावें. शेतांत पीक न केलेलें असें कांहीं क्षेत्र असलें तर त्यांत कांहीं पोट-खराब आहे कीं नाहीं हें पहावें. पोट-खराब असेल व पीक न केलेलें क्षेत्र पोट-खराब्याचे क्षेत्रापेक्षां जास्त नसेल तर तिकडे लक्ष देऊं नये. दुसऱ्यापक्षीं, पीक न केलेलें क्षेत्र पोट-खराब्याचे क्षेत्रापेक्षां जास्त असेल, तर क्षेत्राचा वाढावा (पीक न केलेलें सबंध क्षेत्र नव्हे) लागण पड म्हणून समजावा व त्याची योग्य प्रकारचे पडींत वर्गवारी करावी. कुळकर्ण्यास असें आढळलें कीं, जरी जमिनींत पोट-खराब आहे, तरी पोट-खराबासह सर्व जमिनींत पीक केलें आहे, तर त्यानें शेताची निव्वळ लागणीलायक सर्व जमीन पीक केलेली म्हणून दाखवून पोट-खराबांतील पीक सोडून द्यावें. परंतु हा पोट-खराब वर्ग २ पैकीं असून लागण न करण्यापैकीं असेल, तर अर्थात् कुळकर्ण्यानें त्या गोष्टीचा दाखला ठेवून वेगळी तजवीज करावी.

८. पोट-खराब जमिनींतील पिकांकडे दुर्लक्ष करणें हें माहितीच्या दृष्टीनें वाजवी नाहीं. परंतु अशीं क्षेत्रें इतकीं क्षुल्लक असतात कीं, तिकडे दुर्लक्षच करावें लागतें. परंतु कांहीं उदाहरणांत कुळकर्ण्याचे नजरेस जर असें आलें कीं, वर्ग १ चे पोट-खराब्यांत बरीच म्हणजे अर्धा एकर व त्याहून जास्त लागण आहे तर त्यानें या गोष्टीची टीप घेऊन तें क्षेत्र बिनआकारी जमिनींतील व शेतीसाठीं योजलेली नाहीं अशा जमिनींतील लागणींत, गां. न. नं. १३ यांत दर्शविल्याप्रमाणें मिळवावे.

९. (शेतीचें नाहीं असें) घर किंवा गिरण, किंवा (इनाम नाहीं अशा) पोट-खराब्यांत दुसरा एखादा बिन-शेतीचा उपयोग, हीं शेतीचे जमिनीप्रमाणेंच, बिनशेतीचा सारा बसण्यास पात्र असतात. शेतकीच्या दृष्टीनें पोट-खराब जमिनीवर आकार न बसवितां तो वजा करण्यांत येतो. परंतु इमारतीची जागा या दृष्टीनें जमिनीचे पृष्ठभागा-बरोबर खडक असलेली जागा गांवांत एक फार किंमतीचा तुकडा होऊं शकेल.

१०. जेव्हां पोट-खराब्यांत किंवा बिनआकारी जमिनींत, असा बिनशेतीचा उपयोग करण्याची परवानगी दिली असेल तेव्हां त्यावर आकार बसविला पाहिजे व सर्वेकडील कमजास्ती पत्रकानें पोट-खराब्याचें क्षेत्र रहीत करून बिनशेतीचे कामाकडे ठेवलेले जमिनीस वर्ग केले पाहिजेत.

## गांवचा नमुना नंबर १२ ( पिकें ) बाबत खुलासा.

हा नमुना फेरफाराचे रजिष्टरापैकीं कूळवहिवाटीचे भागाशीं जोडला आहे. कारण, दोन्ही एकाच पीकपहाणीसमयीं चौकशी करणें अवश्य असतें. नाहीं तर दोन्ही भागांचा परस्परांशीं [illegible] गां. न. नं. ६ पुन्हां लिहून तयार होताच पांच वर्षे राहणारा गां. न. नं. १२ तयार करावा. गां. न. नं. ७ व [illegible] पूर्वी वर्णन केलेलेंच आहे. गां. न. नं. १२ बद्दल ह्यापेक्षां जास्त वर्णनाची जरुरी नाहीं. पान ९३ ते १०८ वर उदाहरणें दिलीं आहेत.

नमुन्यांत दिल्याखेरीज सन १९२७-२८ मधील इतर स. नं. मधील पिकें गां. न. नं. १३ तयार करण्यासाठीं लागतात. परंतु ती जमीन स्वतः मालक खेडत असल्यामुळें नमुना नं. ७-अ चा भाग कोरा राहील सबब संपूर्ण नमुना ( कार्ड ) छापला नाहीं.

पाणी दिलेली, दुबार, रबी, आणि खरीप पिकें कशीं दाखविलीं आहेत तीं नमुन्यांत पहा.

| स. नं. | हिस्सा. | पीक. | क्षेत्र. |
|---|---|---|---|
| १-अ | ४-अ | मिरची ... | ०–३० |
| | | वांगी ... | ०–८ |
| | | | ०–३८ |
| १-अ | ४-ब | बाजरी ... | ०–३० |
| | | कुलीथ (ख) | ०–८ |
| | | | ०–३८ |
| १-अ | ४-क | बाजरी ... | ०–२० |
| | | तंबाखू ... | ०–१० |
| | | निवडुंग पडीत | ०–९ |
| | | | ०–३९ |
| ४ जातइनाम | २ | बाजरी ... | २–२० |
| | | केळी(वि)... | ०–१५ |
| | | तांदूळ ... | ०–१३ |
| | | | ३–८ |
| | | दुसरें पीक हरबरा | ०–८ |
| ६ | ४ | गवत पोट-खराबांत असल्यानें क्षेत्र नाहीं. | |

| स. नं. | हिस्सा. | पीक. | क्षेत्र. |
|---|---|---|---|
| ७ | ... | पाण्यांत मुरलेली ... | ०–१० |
| | | पड फेरपाळीचे ... | ३–० |
| | | कोद्रा. ... | ९–० |
| | | तुरी ... | ०–१० |
| | | गहूं (र) .... | २–० |
| | | | १०–२० |
| ८ | ... | तांदूळ ... | १०–० |
| | | ज्वारी (ख) ... | ९–० |
| | | गवत ... | ९–० |
| | | | २०–० |
| २५-ब | ... | तांदूळ ... नबसाध्य केलेली बाकीची. | ११–२० |
| गांवठाणांतील प्लॉट पट्टयानें दिलेला. | | बटाटे ... | ०–९ |
| | | रताळी ... | ०–६ |
| | | ... | ०–१५ |

२. मुंबई इलाख्यांत साधारणपणें उत्पन्न होणारीं सर्व पिकें गां. न. नं. १३ चे खुलाशांत ( वेगळें परिशिष्टांत ) दिलीं आहेत. कुळकर्ण्यानें, अर्थात् पिकाचें वर्णन मराठींत त्याला स्वतःला व सर्कल इन्स्पेक्टर यास समजूं शकेल इतक्या अल्प भाषेंत द्यावें. ज्याअर्थी हिशेबीं दाखविलेलें प्रत्येक विभागाचें क्षेत्र नमुन्यांत दिलें असतें व तें नेहमीं मोजणीनें नक्की केलेलें असतें, त्याअर्थी विभागाचे एकूण क्षेत्राची भरती होईपर्यंत प्रत्येक पिकाला बरोबर रीतीनें क्षेत्र वांटून देण्यास कांहीं एक अडचण पडण्यासारखी नाहीं. त्यानें प्रथमतः पोट खराब व लागणपड यांजकडे लक्ष दिलें पाहिजे. नंतर गवत, किंवा गवत व बाभळ असल्यास, त्यांजकड लक्ष दिलें पाहिजे. परंतु अशा जमिनी नांगरून त्यांत रबी हंगामांत पिकें होण्याचा संभव असला, तर पहिल्या पाहणीचे वेळींच अखेरचीं क्षेत्रें दाखवूं नयेत. दुसरी अडचण मिश्रपिकासंबंधानें येईल. जेव्हां एक एकर जमिनींत ज्वारीच्या ओळी २ व तुरीच्या ओळ १ याप्रमाणें मिश्रपीक केलें असेल, तर एक एकरांत ज्वारीचें क्षेत्र २७ गुंठे व तुरीचें क्षेत्र १३ गुंठे आहे असें ठरविणें सोपें आहे. मिश्रपिकाच्या वेगवेगळ्या ओळींचें प्रमाण कसें असतें हें कुळकर्ण्यानें तपासानें ठरवावें, आणि लक्षांत ठेवावें कीं, कधीं कधीं एका ओळींत निरनिराळे प्रकारच्या कडधान्याचें बींहि पेरतात.

ठराविक मिश्रणाचे कांहीं प्रकार :—

(अ) गहूं ( ३ रांगांचा पाभर असें २ ते ३ पाभर ) व करडई ( ५ रांगांचा पाभर ).

[illegible] रांगा किंवा ३ पाभरी ) तूर ( १ रांग किंवा १ पाभर ) ही पद्धत पुणें आणि नगर जिल्ह्यांत आहे.

[illegible] रा ८½ पौंड, ज्वारी १¾ पौंड, मूग ¼ पौंड, तूर २ पौंड, वाल ½ पौंड, चवळी ½ पौंड, रताळी ½ पौंड, उत्पन्न [illegible] सर्वांचें मिश्रण करून रांगांत १८ इंच अंतर ठेवून पेरलेलें.

(क) खालीं एक एकर पिकांची वांटणी अशी होईल—

बाजरी २० गुंठे, ज्वारी ४ गुंठे, मठ व तूर ४ गुंठे बाकी प्रत्येकीं २ गुंठे.

तथापि जरी बियांच्या प्रमाणाखेरीज निराळे रीतीनें आपणास क्षेत्रांची वांटणी करतां येत नाहीं तरी देखील एका एकराचे क्षेत्रामध्यें गहूं व कापूस एका आड एक अशा रांगेनें पेरले म्हणजे बीं पेरण्याचें वेळीं कपासी ½ एकर जमीन व्यापेल आणि गहूं ½ एकर जमीन व्यापेल. त्या क्षेत्रांतील एकूण उत्पन्न ½ एकरांत निव्वळ कपाशी पेरली आणि ½ एकरांत निव्वळ गहूं पेरला असतां जें येईल तितकेंच येईल असें ममजणें चूक आहे. तें बरेंच वेळां फार अधिक असूं शकेल आणि अशीं कांहीं उदाहरणें उघडकीस आलीं आहेत कीं, एका एकरांत जितका कापूस होतो आणि एका एकरांत जितका गहूं होतो तितकेंच उत्पन्न जवळ जवळ वरील एका एकरांत होईल ह्याचें कारण असें कीं दोन्हीं पिकें एकाच वेळीं पक्व दशेस येत नाहींत. एक तयार होतें आणि तें दुसरें तयार होऊन कांपलें जाण्यापूर्वीच कापण्यांत येतें. कपाशीच्या मुळ्या खोल असतात आणि गव्हाच्या वरवर असतात म्हणून त्या एकमेकांचे आड येत नाहींत. मिश्र पिकांमध्यें फायदा नसतां तर ह्या पद्धतीचा इतका मोठा प्रसार झाला नसतां ; तथापि प्रत्येक पिकांचें क्षेत्र लिहितांना एकूण मिश्रपिकाखालीं जेवढी जमीन असेल तिच्याशीं मेळ ठेविला पाहिजे.

३. जिराईत पिकांत एक गुंठ्याहून कमी क्षेत्र लक्षांत घेतलें जात नाहीं. पाण्यावरील किंवा बागाईत पिकांत ¼ गुंठ्याहून कमी क्षेत्र लक्षांत घेतलें जात नाहीं.

३-अ. कांहीं गांवें व प्रदेश यांमध्यें मिश्रित पिकें करण्याची ठराविक चाल आहे. आपण अशी कल्पना करूं कीं, ५ रांगा कापसाच्या, अर्धी तुरीची रांग व अर्धी आंबाड्याची आहे, अथवा ४ रांगा बाजरीच्या व मठ, उडीद व तूर ह्यांची प्रत्येकीं ½ रांग आहे. जर पुष्कळ हिश्शांत हीं मिश्र पिकें असलीं व प्रमाण नेहमीं तेंच असलें तर रजिष्टराच्या आरंभीं ठरीव एकत्र प्रमाण व मिश्रणाचें नांव नमूद करावें ; म्हणजे प्रत्येक अशा हिश्शावर बाजरी मिश्रण १, कापूस मिश्रण १, बाजरी मिश्रण २, वगैरे लिहिल्यानें कमी त्रास पडेल. जेव्हां गां. न. नं. १३ ( तेथें अशा प्रत्येक ठराविक मिश्रणास एक कोष्टक पडेल ) यांत सर्व पिकें उतरलीं जातील तेव्हां एकूण क्षेत्र मिळेल व नंतर निरनिराळ्या पिकांचें त्यावरून क्षेत्र निघेल. जर कपाशी मिश्रण १ मध्यें तूर चांगली असेल पण आंबाडीचा समूळ नाश झाला असेल तर प्रत्येक मिश्रित ६ गुंठ्याचे ५॥ कपाशी व ½ तूर असे भाग पाडावे. अथवा विशिष्ट मिश्रणास लागणारें दुसरें प्रमाण योजावें. या युक्तीचा उपयोग जर शहाणपणानें केला तर गां. न. नं १२ यांतील पुष्कळ लिहिणें कमी होईल व प्रत्येक हिश्शासमोर तपशील दिल्यानें जो कार्यभाग व्हावयाचा असेल तो यानेंहि होईल. कित्येक वेळां पांच अगर सहा देखील पिकें अशी मिश्रित आढळतात ; त्यापैकीं कांहीं एका हंगामांत व कांहीं दुसऱ्या हंगामांत चांगलीं वाढतात.

४. पिकांची व लागणपड व लागणपडीचे प्रकारची नोंद नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें पुरी झाल्यावर, कुळकर्ण्यानें फळें येण्यास योग्य झालेलीं अशीं खालीं लिहिलेले सहा प्रकारचीं झाडें शेतांत इकडेतिकडे असतील तीं मोजून १६ वें कोष्टकांत दाखल करावीं.

१ आंबा, २ चिंच, ३ फणस, ४ नारळ, ५ ताड व ६ शिंदी.

एकादे वेळीं दुसरीं कांहीं झाडें, जसें, महू अगर खिरणी, मोजण्याचा हुकूम होईल तर तें सहज करतां येईल. परंतु जेव्हां सबंध शेत किंवा शेताचा कांहीं नक्की भाग ताड किंवा फळझाडें लावण्याकडे स्वतंत्र राखून ठेवला असेल, तेव्हां झाडांची संख्या न देतां क्षेत्र दिलें पाहिजे.

जेव्हां फळझाडें मोजण्यांत येतात, तेव्हां तीं जमिनीचें नक्की असें एक क्षेत्र व्यापित नसून इकडेतिकडे पसरलेलीं असतात, असें अनुमान असतें. शिंदी, किंवा ताडी उत्पन्न करणारीं ताडाचीं झाडें, यांचेखालील सबंध क्षेत्र "गूळ उत्पन्न करणारीं इतर झाडें" असें सदर घालून त्याखालीं दाखवावें. ( ही हिंदुस्थान सरकारची वर्गवारी आहे, आणि ती उघड गैरसमजाचे पायावर बसविलेली आहे. तरी असें सदर वेगळें ठेवल्यानें त्याचा परिणाम अपायकारक नाहीं. )

५. जेव्हां एखादें पीक पाण्याचे मदतीनें केलें असेल, तेव्हां कोणते प्रकारच्या पाण्याचा उपयोग केला, तें त्या पिकासमोर लिहिलें पाहिजे. पाण्याचे प्रसिद्ध असे वर्ग आहेत ते : तलाव, विहिरी, पंप ( नदीचे किंवा विहिरीचे कांठावर तेलाचे योगानें किंवा वाफेनें चालणारीं इंजिनें ), सरकारी कालवें, खासगी कालवे किंवा पाट, भुडक्या. असे पाण्यानें केलेल्या पिकावर त., वि., पं., वा., स. का., खा. का., भु. अशी संज्ञा लिहिली म्हणजे पुरे आहे. कधीं कधीं

एकाहून जास्त पद्धतीचा उपयोग करण्यांत येतो. जसें, तलावाचें पाणी पाटांत पोहो[illegible] उचलून घ्यावें लागतें. अशा प्रसंगीं मुख्यत्वें पाण्याचे साधनाचे मानानें पाटपाण्याची वर्गवारी [illegible] जसें तलावापासून किंवा विहिरीपासून. परंतु साधन सार्वजनिक नदी असेल, तर पाणी घेण्या[illegible] वर्गवारी केली पाहिजे.

विहिरी पाटाचे पाण्याची कमताई भरून काढतात, म्हणून पाटाच्या पाण्यावरील पिकें अशी पिकांची वर्गवारी करावी. परंतु मोटस्थलचें सहाय्य असें दाखविणेंसाठीं ( वि. ) लिहावें.

५-अ. नवीन केलेली भातजमीन ओळखण्यासाठीं शेरा लिहिला पाहिजे. कारण अशी जमीन तयार झाल्यानंतर ती पुढच्या फेरसेटलमेंटमध्यें एक सेटलमेंटचे मुदतीपर्यंत कांहीं माफीस पात्र असते.

आणि असें शक्य आहे कीं, यापुढें नवीन तयार झालेली भातजमीन आणि ती तयार झाल्याची तारीख हें ओळखणें व नवीन आणि जुनी भातजमीन ओळखून काढणें हें फार महत्त्वाचें होईल.

६. गवत, किंवा बाभूळमिश्रित गवत हें पीक समजून वर्गवारी करणें ही एक महत्त्वाची नवीनच टूम आहे. यामुळें नापेर किंवा लागणपड जमिनीचे वर्गांतून गवत व चारणी वगैरे, हे प्रकार नाहींसे होतील. जमीन नापेर ठेवण्याचें खरें कारण गां. न. नं. १३ यांत दिलें वर्गवारीप्रमाणें दाखल केलें पाहिजे. कारण तो नमुना ह्या नमुन्यावरूनच तयार करावयाचा असतो. पीक न केलेले एकूण क्षेत्रापैकीं बरेंच प्रमाण गवतानें व्यापलेलें आढळेल. पुष्कळ ठिकाणीं गवत मुद्दाम उत्पन्न करतात. कबजेदारास वाटेल तर त्यास जमीन नांगरून कांहीं दुसरें पीकही करतां येण्याजोगें असतें. परंतु त्यास असें आढळलें कीं, गवतापासून होणारा निव्वळ फायदा, दुसरे पिकापासून होणारे फायद्यापेक्षां जास्त असतो. कारण त्यांत त्यास नांगरणी, खुरपणी व बियासंबंधीं कांहीं एक खर्च येत नाहीं. किंवा निदान त्याला गवत उत्पन्न करणें आवडतें, ह्याचें कारण त्यांत त्रास कमी होतो, व दुसरें कांहींतरी करण्यास मोकळीक सांपडते. विशेषेंकरून गुजराथेंत गवताची व सर्पणाचे बाभळीचीं अशीं हमेष एकचद पिकें करण्यांत येतात व तीं सारखींच फायदेशीर होतात. अर्थात जसजशीं बाभळीचीं झाडें मोठीं होत जातात तससें गवत नादान होत जातें. परंतु बाभळीचीं झाडें तोडलीं म्हणजे बरीच किफायत होते. असें कोणालाहि आढळून येईल कीं, दोन किंवा तीन रुपये आकाराचे जमिनींत गवत राखून कुंपण घातलें आणि त्यांतील गवत चारणीकरितां किंवा कापून विकलें, तर दर एकरीं १० किंवा त्याहून जास्त रुपये येतात. तसेच खाल्यांतील जमिनीपैकीं एकादा तुकडा गवताकरितां म्हणून राखून ठेवण्यांत येतो, असें वारंवार आढळतें. परंतु त्या जमिनींत पीक करण्याविषयीं जर कबजेदारास आग्रह केला तर तो म्हणेल कीं, मला तसें करतां येत नाहीं. कारण वर्षांतून जेव्हां कधीं वैरण नसते, त्यावेळीं माझीं गुरें चारण्यासाठीं सदरचा तुकडा अवश्य लागतो. सबब जेव्हां जमीन गवताकरितां मुद्दाम राखून ठेवून, जमिनीचा राजीनामा न देतां, गवत बाढूं देऊन सारा देण्याचें कबजेदार पसंत करतो, तेव्हां तशी जमीन लागणपड म्हणून न समजतां, गवताचे पिकाची म्हणून तिची वर्गवारी केली पाहिजे.

७. परंतु जेव्हां नेहमीं पिकाखालीं असणारी जमीन एकदोन वर्षें पाऊस बरोबर नसल्यामुळें, किंवा जनावरांचे मजुरीचे अगर बियांचे कमतरतेमुळें पड पडली व त्यांत गवत उगवत असलें व शक्य असलें तर कबजेदारांनीं कांहीं लागणहि केली असती, तरी अशी गवताची जमीन एक प्रकारचे लागणपडीपैकीं म्हणून समजावी. एका वर्गापासून दुसरा वर्ग ओळखण्याची परीक्षा अशी :—

कबजेदार गवताकरितां मुद्दाम जमीन राखून ठेवतो काय ? अथवा नाइलाजामुळें व गवत नको असतांहि, त्याचे इच्छेविरुद्ध गवत उगवतें कीं काय ?

जर जमिनींत पुष्कळ काळपर्यंत गवतच उत्पन्न होत असेल, तर ती पहिले क्लासाखालीं, म्हणजे गवताचे पिकाची जमीन या वर्गाखालीं येते असें समजावें. कारण जमिनींत पीक करतां येत नाहीं व जमीन फायदेशीर नाहीं, असें आढळेल तर अशी जमीन ठेवून कोणीहि सारा देत बसणार नाहीं. नंबराचा राजीनामा न देतां आकार देत बसणें, हीच गोष्ट गवत हें पीक आहे, या गोष्टीचा पुरावा आहे. अर्थात् ही गोष्ट सर्व नंबराचे लहान तुकड्यास किंवा पोट-हिश्शास लागू पडणार नाहीं. कारण राजीनामा द्यावा असें जरी त्याला वाटलें, तरीसुद्धां स्वतंत्र रीतीनें त्याला राजीनामा देतां येत नाहीं. अशा बाबतींत कबजेदार सारा देण्याचें चालू ठेवून राजीनामा देतां येत असतांहि जर जमिनींत गवत उत्पन्न करील, तर तें गवत हें पीक समजावें. लागणपड समजूं नये. कारण जमीन फायदेशीर नाहीं, असें तो उघडपणें मानीत नाहीं. निदान आकाराइतकी तिची किंमत आहे असें समजून आकाराचें ओझें दुसऱ्या पिकावर पडूं न देतां सोसण्यास तो समर्थ असतो.

८. ( पावसाळ्यांत पेरलेलीं ) पिकें खरीप अथवा ( हिवाळ्यांत पेरलेलीं पिकें ) रब्बी असतात. मुंबई इलाख्यांत पुष्कळ पिकें निव्वळ खरीप असतात. जसें बाजरी, किंवा बहुतकरून सर्वअंशी रब्बी असतात, जसें गहूं. परंतु दुसरीं पिकें कांहीं अंशीं खरीप व कांहीं अंशीं रब्बी असतात, जसें ज्वारी. पिकें खरीप किंवा रब्बी असतील,

डायरेक्टरसाहेब हे पिकाचे उत्पन्नाचे वेगवेगळे अंदाज करतात. म्हणून जीं पिकें खरीप व [illegible] तीं लिहितांना खरीप आहेत कीं रब्बी आहेत, हें कुळकर्ण्यानें दाखविलें पाहिजे. त्यानें [illegible] उत्पन्न किंवा र. असें लिहावें. परंतु त्याचे गांवांत जीं पिकें नेहमीं खरीप असतात, किंवा नेहमीं रब्बी [illegible], त्याबाबतींत त्यानें गां. न. नं. १३ चे कोष्टकाचे पायथ्याशीं त्याप्रमाणें लिहावें. परंतु गां. न. नं. १२ यांत कांहीं एक टीप करण्याचें कारण नाहीं.

९. ज्याअर्थी, गां. न. नं. १२ यांत कूळवहिवाटी दाखल करावयाच्या असतात, त्याअर्थी सदर नमुन्यांत बिनशेतीचे व इतर तुकडे (प्लॉट) दाखल केले पाहिजेत. कारण त्याचे धारण करणारे बरेवार ते भाड्यानें देतात. जेव्हां अशा जमिनींत कांहीं पीक नसेल तेव्हां पिकाचे कोष्टकांत अर्थात् कांहीं नोंद देणार नाहीं. पुष्कळदां गिरणीच्या, किंवा मोठ्या बंगल्याच्या कंपाउंडांत मौल्यवान गवताचें भक्कम क्षेत्र असूं शकेल, किंवा पिकेंहि केलेलीं असतील. परंतु अशीं पिकें नोंदूं नयेत. त्याचप्रमाणें कुळकर्ण्यास सरकारी पड नंबरांत, गांवठणांत, रस्त्यांत, रेल्वेचे जमिनींत किंवा तलावाचे पात्रांत, किंवा दुसरे एखादे ठिकाणीं बिगरहुकुमी लागण आढळली, तर त्यानें तपासणीचे वेगळे रजिष्टरांत त्या नोंदीसमोर टीप द्यावी व अतिक्रमणासंबंधानें, किंवा गैराशस्तपणासंबंधानें योग्य ती तजवीज करावी. परंतु पिकाचें क्षेत्र लक्षांत घेऊं नये, व गां. न. नं. १३ यांत तें नेऊंहि नये. परंतु बिनकबजा जमिनींतील सर्व्हे नंबरांत सामील नाहीं अशा जमिनींतील व नवसाध्य करण्याकरितां पट्टयानें वगैरे दिलेल्या बिनआकारी जमिनींतील परवानगीनें केलेलीं पिकें, हीं नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें हिशेबांत आणलीं पाहिजेत. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे कीं, कुळकर्ण्यानें पडीत अथवा कबजा नसलेल्या जमिनीची पहाणी करण्याची हयगय करूं नये. त्याचे तपासणींत गांवांतील प्रत्येक तुकडा (प्लॉट) आला पाहिजे. परंतु पीक नसेल किंवा गैरशिस्त उपयोग झालेला नसेल, तर अर्थात् या पहाणीस फारच थोडा वेळ लागेल.

जेव्हां मळई किंवा पाण्यानें वाहून गेलेली जमीन दृष्टीस पडेल, तेव्हां त्याचा दाखला शेऱ्याचे कोष्टकीं द्यावा, म्हणजे कायदेशीर इयत्तेचे वर जमीन गेली असतां कुळकर्ण्यास रिपोर्ट करतां येईल. (लँ. रे. को. रू. ४९) गां. न. नं. ७ चे शेरेकोष्टकींहि याचा दाखला द्यावा. वाहून गेलेली जमीन म्हणजे ती लागणपड जमीन समजावी. परंतु मळई जमिनींतील जादा पिकें, मळई जमीन, आकारी जमीन म्हणून दाखल होईपावेतों, सोडून द्यावी.

१०. जमीन पेरली, बीं उगवून आलें व त्यांत पुन्हां कांहीं पीक केलें नाहीं, म्हणजे तें पीक म्हणून समजलें पाहिजे; मग तें पीक पूर्णतेस येण्यापूर्वी वाळून जाऊन उत्पन्न कांहीं झालें नसलें तरी हरकत नाहीं. पिकें किंवा पिकांचा मोठा भाग याजपासून कांहीं उत्पन्न झालें नाहीं परंतु पाऊस न पडल्यामुळें तीं सर्व जळून गेलीं, ह्या गोष्टीचा विचार पिकाचे अंदाजपत्रकांत व गां. न. नं. १३ बरील उत्पन्नासंबंधी टीपेंत केला जाईल. परंतु जेव्हां अवर्षणामुळें, किंवा किड्यांचे रोगामुळें, बीं उगवून येणार नाहीं किंवा गव्हांसारखे एकादें पीक उगवलें परंतु टोळांनीं सर्वस्वी खाऊन टाकलें, व त्यामुळें रयत इसमानें पुन्हां आपल्या जमिनींत दुसरें पीक केलें तर प्रथम परलेलें क्षेत्र हिशेबांत धरूं नये. फक्त दुसऱ्यानें केलेले त्याच जमिनींतील पीक मात्र नोंदावें. कुळकर्ण्यानें कांहीं टीपा, जसें "गहूं बुडाल्यानंतर हरभरा" अशा देण्यास हरकत नाहीं. परंतु त्यानें तीं दोन पिकें धरूं नयेत. एकाच क्षेत्रांत दोन किंवा जास्त पिकें एकामागून एक पूर्ण स्थितींत येतात असें असल्याशिवाय, कोणत्याहि कुळकर्ण्यानें दाखल केलेलें पिकाचें क्षेत्र, नापरे क्षेत्र, व लागणपडीचें क्षेत्र हीं तिन्हीं मिळून विभागाचे क्षेत्राचे एकूण बेरजेचे वर जातील, इतकें निष्काळजी असूं नये. तथापि त्यानें त्याच क्षेत्रांत केलेलें दुसरें किंवा तिसरें पीक नेहमीं नोंदलें पाहिजे.

११. कूळवहिवाटीची व पिकाचे पहिले तपासणीची वेळ सप्टेंबर महिन्यांत किंवा आक्टोबरचे अवेलीस असते. यावेळीं फक्त खरीप व रबी पिकांपैकीं अवेलीचीं कांहीं पिकें इतकींच आढळतील. परंतु तीळ, बाजरी, भात अशासारखीं अवेलीचीं खरीप पिकें काढलीं जाईतोंपर्यंत तपासणीस विलंब लाऊं नये. पीक काढण्यापूर्वी कुळकर्ण्यानें पहिलें नाहीं तर, सर्व शेत एकाच पिकानें भरलें होतें असें असल्याशिवाय त्याला सहज रीतीनें क्षेत्र सांगतां येणार नाहीं, किंवा पिकाची आणेवारीहि सांगतां येणार नाहीं. परंतु ज्याअर्थी पहिल्या तपासणीच्या वेळीं अद्याप पेरलें नाहीं असें किंवा उगवलें नाहीं असें पुष्कळ क्षेत्र असण्याचा संभव असतो, त्याअर्थी, त्यानें पोटविभागाचे क्षेत्राची एकूण बेरीज पुरी करतां कामा नये. त्याचप्रमाणें, त्यास बिनपेरलेलें क्षेत्रहि सुरक्षितपणें दाखवितां येणार नाहीं. कारण तीं क्षेत्रें पुढें पेरलीं जातील व विशेषेंकरून पाऊस चांगला पडला तर आक्टोबरमध्येंच पेरलीं जातील. पहिली तपासणी पुरी झाली म्हणजे कुळकर्ण्यास गां. न. नं. १३ तयार करण्यास आरंभ करतां येईल. त्यानें जीं पिकें पाहिलीं असतील तितक्यांचा तपशील दाखल करावा. फारकरून सर्व्हे नंबराचे किंवा पोटविभागाचे संबंध क्षेत्राचा हिशेब देतां येणार नाहीं व त्यानें दुसऱ्या तपासणीचा तपशील, किंवा लागणपडीचा तपशील भरणेचा, किंवा क्षेत्रांची एकूण बेरीज देणेचा प्रयत्न करूं नये, परंतु जीं पिकें पाहिलीं असतील व नोंदलीं असतील त्यांचा तपशील गां. न. नं. १३ यांत भरून कांहीं पिकांच्या तात्पुरत्या एकूण बेरजा, मागितलेल्या अंदाजपत्रकांकरितां त्यास करतां येतील व हे श्रम फुकट जाणार नाहींत. कारण दुसरे तपासणीनंतर तितकें खतावणी करण्याचें काम कमी होईल.

११. दुसरी तपासणी गांवचे वहिवाटीप्रमाणें डिसेंबर, जानेवारी किंवा फेब्रुवारी [illegible] गांवें अशीं असतात कीं, त्यांत रबीची पेर नोव्हेंबरपुढें होत नाहीं. कांहीं अशीं असतात [illegible] पेरणी इतकी उशिरां होते कीं, ती होईपर्यंत मे महिना येतो. दुसरी तपासणी वास्तविक १५ मेचे [illegible] पाहिजे व दुसरीं पिकें काढलीं जाईपर्यंत ती लांबवूं नये. पेरणी उशिरा झाली नसली, तर ही पाहणी [illegible] जानेवारीचे आंत (म्हणजे कापसाचे अखेरचे अंदाजपत्रकाची तारीख) पुरी झाली पाहिजे. आणि गांवांत उसाचें पीक करण्यांत येत असेल तर त्याचें क्षेत्र ता. १४ फेब्रुवारीचे पूर्वी मिळविलें पाहिजे. यापुढें जो ऊंस लावण्यांत येईल तो, पुढील सालचें पीक म्हणून समजावा. ऊंस साधारणपणें १३ महिने जमिनींत राहतो. जुनें काढण्यास झालेलें पीक गेल्या वर्षी नोंदलें गेलें असलें पाहिजे. सबब तें सोडून द्यावें (हें मागील कोष्टकावरून दिसून येईल). कुळकर्ण्यानें कांहीं वेळ वाट पहावी, व पुढें कोणतें पीक करण्यांत येतें तें पहावें. दुसऱ्या तपासणीचे वेळीं कुळकर्ण्यानें लागणपड व पहिल्या तपासणीचे वेळीं नव्हतीं अशीं दुसरीं पिकें, अखेरचीं भरावीं. नंतर प्रत्येक पोट-विभागाचे क्षेत्राची बेरीज करावी व दुसोटा पिकें वजा जातां बाकी क्षेत्र पोट-विभागाचे सबंध क्षेत्राइतकें झालें किंवा नाहीं, तें पहावें. कांहीं पिकें कधीं रब्बी असतात, व कधीं खरीप असतात. सबब रब्बीचे सर्व पेरणीस "र" असे अक्षराची खूण करावी. त्याचप्रमाणें, पीक पाण्यावर केलें असेल तर पहिल्या पाहणीप्रमाणेंच पाण्याचें साधन दाखल करावें. कधीं कधीं एकाच क्षेत्रांत दोन पिकें करतात व पहिलें व दुसरें असें दोन्हीं पिकांस पाणी दिलेलें असतें. कधीं कधीं फक्त दुसरेच पिकास पाणी दिलेलें असतें.

१३. * * * * * *

१४. * * * * * *

१५. या नमुन्यांत कबज्यांत असलेली सर्व आकारी जमीन, मग ती खालसा असो अगर इनामी असो, ही येते. तसेंच बिनआकारी जमिनींत, किंवा नबसाध्य केलेले जमिनींत, अगर बिनशेतीचे जमिनींत हुकुमानें केलेलीं पिकें हीं येतात. परंतु या नमुन्याची एकूण बेरीज करण्याची आवश्यकता नाहीं. पीक केलेले एकूण क्षेत्राची सिद्धता पुढील न. नं. १३ यांत घडवून आणलेली आहे.

### पिकाच्या तपासणीवरील सामान्य शेरे.

कुळकर्णी व तलाठी यांस नेमून दिलेल्या सजांत किंवा त्यांच्या चार्जमधील प्रदेशांच्या विस्तारांत—विशेषत: बरीचशीं कुळकर्णी बतनें कम्पूट करण्यांत आल्यापासून [मि. जे. मेंकूनील, आय्.सी.एस्., आतां आयरिश फ्री स्टेटचे गव्हर्नर-जनरल, ह्यांनी केलेला रे. डि. ठ. २६५९-१३ मधील रिपोर्ट पहा.]—बाद झाल्यामुळें, गांवच्या कुळकर्ण्यास दरसाल आपल्या चार्जमधील दरेक सर्व्हे नंबर व दरेक सर्व्हे नंबराचा हिस्सा ह्यांची प्रत्यक्ष तपासणी करणें क्वचितच शक्य असून, त्यास तसें करतां आल्याशिवाय, गांवचे नमुने ७-अ व १२ हें प्रत्यक्ष तपासणी करून भरणें त्यास शक्य नाहीं असें सांगण्यांत आलें. रे. डि. ठ. ४४८८, ता. २४ माहे जुलै सन १९२३ मध्यें पंच-वार्षिक तपासणीसंबंधीं एक योजना सरकारनें मंजूर केली. या योजनेचा तपशील सदरहू ठरावांत पहावयास मिळेल. परंतु, कूळवहिवाटींची नोंद करणें व निवडणूक करणाऱ्या मतदारांच्या यादी तयार करणें यासंबंधांत कांहीं व्यावहारिक व कायद्याच्या अडचणी उपस्थित होत आहेत असें सांगण्यांत आल्यावरून व पिकांची आणेवारी ठरविण्याच्या गोष्टीचे महत्त्व लक्षांत घेऊन वरील हुकूम रे. डि. ठ. ४४८८, तारीख ३ माहे जानेवारी सन १९२५ मध्यें फिरविण्यांत आले. हे हुकूम अद्यापहि मला पसंत नाहींत हें नमूद करण्यास खेद वाटतो. तथापि तपासणी ही आतां दरसाल करण्यांत आली पाहिजे हें क्रमप्राप्तच आहे. कूळवहिवाट व निवडणूक करणाऱ्या मतदारांच्या यादी यांसंबंधीं पाहतां कुळवहिवाट पतकरणाऱ्या सर्व मनुष्यांनीं, ह्याबद्दल कुळकर्ण्यास—मग तो शेतांवर जावो किंवा न जावो—कळविलें पाहिजे अशी तजवीज कायद्यांत अगोदरच केलेली आहे व ही माहिती निःसंशय कशीतरी नमूद करण्यांत येते, व कुळकर्णी हा प्रत्यक्ष शेतांची तपासणी करून येत नाहीं ही वास्तविक हकीकत निखालस खात्रीची आहे तरी बहुतेक गांवांतून पिकांसंबंधीं आंकड्यांची नोंद कशीतरी करण्यांत येते. परंतु तहकुबीसाठीं जेव्हां आणेवारीची गरज असते तेव्हां मात्र अर्थातूच बरीचशी तपासणी—परंतु हीसुद्धां दरेक हिस्स्याची होते असें नाहींच—होत असली पाहिजे. मोठ्या चार्जमध्यें, तहकुबीचे हुकूम सुटण्याची वेळ येईतोपर्यंत, दरेक शेताची तपासणी केली जाणें शक्य नसतें हें अत्यंत उघड आहे. सबब माझ्या मतें ह्या अडचणी दूर करतां येऊं शकतील व पंच-वार्षिक तपासणीची योजना अव्यवहार्य नाहीं. तथापि मुख्य मुद्दा असा आहे कीं,

[illegible] किंवा नसो, परंतु आपला विद्यमान नोकरवर्ग, सर्वच्या सर्व तपासणी करणें त्यास शक्य [illegible]रारिकदृष्ट्या असमर्थ आहे. जी गोष्ट करणें कुळकर्ण्यास शक्य नाहीं ती अर्थात्च त्यास [illegible]तां यावयाची नाहीं. कुळकर्ण्यास, दर दिवसास शेतामागून शेतांतून चालत जाण्याशिवाय दुसरें [illegible] कसल्याहि प्रकारचें काम नाहीं असें धरून चाललें तरीहि असे कित्येक सजे आहेत कीं त्यांत मिळण्यासारख्या वेळेच्या आंत तपासणीचें काम उरकणें शक्य होणार नाहीं.

२. अमेरिकेंतून येणारे पिकांचे अंदाज किंवा ब्यूरो रिपोर्ट हे नेहमीं आपल्या कानावर येतात. अमेरिकन सरकारप्रमाणें हिंदुस्थान सरकार जर "योग्य असें पिकांचें अंदाज" करील तर त्यापासून व्यापार वगैरेस कितीतरी फायदा होईल असें लंडनमध्यें मजला सांगण्यांत आलें. सबब अधिकृतरीत्या मिळालेल्या माहितीवरून वास्तविक हकीकतीचा एक आराखडा येथें दिला असतां तो अस्थानीं ठरणार नाहीं.

(१) क्षेत्र (क्षेत्रफळ).—समजा गव्हाच्या लागवडीचें क्षेत्र ठरवावयाचें असेल तर तें, दर दहा वर्षांनीं एकदां शेतवार पहाणी करून प्रत्यक्ष ठरविण्यांत येतें. असें असलें तरीहि दरेक शेत व हिस्से ह्यांच्या प्रत्यक्ष क्षेत्राची नोंद, आपल्याकडील नोंदीइतकी बिनचूक असल्याचें फारसें दिसून येत नाहीं. या दशवार्षिक (पिकांच्या) खानेसुमारींतहि कांहींसा अंदाजी कारभार असल्याचें दिसून येतें. सदरहू खानेसुमारीच्या पुढील वर्षींच, पिकांचा अंदाज करणारा (अंमलदार) रिपोर्ट करतो कीं, "या वर्षीचें (लागवडीचें) क्षेत्रफळ, गेल्या वर्षी पेरणी केलेल्या क्षेत्रफळाच्या सुमारें शेंकडा ९५ (किंवा ११०) टक्के झालें आहे.", नंतर पुढल्या वर्षी याच रीतीनें मागील वर्षाच्या क्षेत्रफळाशीं पडणाऱ्या प्रमाणांतच अंदाज करण्यांत येतो. अशा रीतीनें खानेसुमारीच्या सालीं कोणतीहि चूक राहिलेली असल्यास ती दहा वर्षेंपर्यंत तशीच चालू राहते. जर खानेसुमारीनंतरच्या कोणत्याहि वर्षी, शेंकडावार अंदाजांत कोणतीहि चूक होईल तर, म्हणजे असें कीं, जर पेरणी केलेल्या क्षेत्रफळाचा अंदाज तो शेंकडा ९७ टक्के इतका असावयास पाहिजे असतांना शेंकडा ९५ टक्के इतका केला गेला तर, ही चूक सबंध १० वर्षभर सालोसाल वाढत जाऊन ९ व्या वर्षी ती बरीचशी फुगलेली असल्याचें आढळून येईल यांत शंका नाहीं.

(२) दर एकरीं पीक.—या बाबतींत ठरीव प्रमाण असें कांहीं नाहीं. परंतु दरसाल अंदाज करणारा (अंमलदार) रिपोर्ट करतो कीं, त्याच्या मतें पीक "नेहमींचे" पीक म्हणून जें त्यास वाटतें त्या पिकाच्या "शेंकडा अमुक टक्के" इतकें येईल. नेहमीचें पीक म्हणजे किती हें ठरविण्याबाबत कोणत्याहि कानू नाहींत. अशा रीतीनें एका वर्षी करण्यांत आलेली चूक, पुढल्या वर्षी नव्यानें सुरू होणाऱ्या वर्षांत पुन्हां द्विरुक्त होत नाहीं व पिकाचे कमी अंदाज, भारी अंदाजांच्या जवळजवळ बरोबरीनें ठरतील हें शक्य दिसतें. हें अंदाजाचें काम दरेक कौंटीकरितां असलेल्या (व हा कौंटी हिंदुस्थानांतील जवळजवळ जिल्ह्याच्या आकाराएवढा असतो) खात्याच्या खास अंमलदारांकडून करण्यांत येते. हे अंमलदार म्हणजे प्रांतिक सर्व्हिसमधील रेव्हेन्यू ऑफिसरांच्या शैक्षणिक दर्जाच्या जवळजवळ बरोबरीच्या दर्जाचे म्हणजे आपले मामुली सर्कल इन्स्पेक्टर व तलाठी यांहून कितीतरी वरिष्ठ दर्जाचे असतात.

३. सरकारनें असेंहि ठरविलें आहे कीं, (रे. डि. मेमो. २८११-बी/२४, तारीख १९ माहे जानेवारी सन १९२८) पाटस्थळ तपासणी संबंधींच्या सूचनांचा या मॅन्युअलमध्यें (पुस्तकामध्यें) समावेश करण्यांत यावा. सर्व्हे अँड् सेटलमेंट मॅन्युअलची पुरवणी—जींत पाटस्थळ पाटबंधाऱ्याची पूर्णपणें चर्चा करण्यांत आली आहे—ती पहा. पहिल्या प्रथम ही गोष्ट कां इष्ट आहे त्याचा खुलासा केला पाहिजे. पाटस्थळांबाबतच्या सर्व आकारण्या, दरसाल दरेक पाटानें भिजविलें जाऊं शकणारें क्षेत्रफळ, पाट दरसाल किती मुदतीपर्यंत वाहत असतो ती मुदत व दर दहा वर्षांतील जितक्या वर्षांत पाटास भरपूर पाणी असते त्या वर्षांची संख्या—यासंबंधीं कित्येक गृहीत गोष्टींच्या आधारावर, करण्यांत येतात. शिवाय, पुष्कळ टापूंत पाटस्थळांतून पाणी मिळण्याची व्यवस्था अशाश्वत असते या मुद्यावर सरकारनें पाटस्थळाबाबत आकारणी काढून टाकली आहे; तर दुसऱ्या कित्येक टापूंत, ज्यावर्षी पाटस्थळाचें पाणी मिळत नाहीं अशा कांहींएक वर्षांत सदरहू आकारणी काढून टाकण्यांत येते. शिवाय नवीन किंवा पाण्याचा भरंवसा नसलेले असे कित्येक पाट असतात व यांवर सेटलमेंटचें वेळीं कायमची आकारणी बसविण्यांत आलेली नाहीं, परंतु यांतून पाणी जेव्हां जेव्हां प्रत्यक्ष घेण्यांत येईल तेव्हां त्यांबाबत जादा पट्ट्या (लँ. रे. को. ५५) बसविण्यांत आल्या पाहिजेत. सबब, चालू किरकोळ महसुलासाठीं व कोणत्याहि पाटांवर आकारणी बसवावयाची किंवा काढून टाकावयाची यांसंबंधीं प्रश्न जेव्हां जेव्हां उपस्थित होतील तेव्हां तेव्हां, कलेक्टर व इतर अधिकारी ह्यांच्या मार्गदर्शकत्वासाठीं—या उभय प्रसंगी, व सेटलमेंटचे वेळीं सेटलमेंट ऑफिसरास पाटांवरील आकारणी कायम ठेवावयाची किंवा ठेवावयाची नाहीं तें किंवा सदरहू पाटांचें (त्यांतील पाण्याचा पुरवठा कमी झाल्यामुळें—व याबद्दल रयत तक्रार खात्रीनें करणारच—) पुन्हां वर्गीकरण करावयाचें किंवा कसें तें ठरवावयाचें असतें त्या वेळीं आपल्याजवळ योग्य अशी वार्षिक नोंद असणें अत्यंत महत्त्वाचें आहे हें दिसून येईल.

४. पहिल्या प्रथम, ही वार्षिक नोंद गांवच्या नकाशाच्या आधारानें ठेवण्यांत येते. या बंधाऱ्याची जागा दाखविण्यांत येऊन तीस नंबर देण्यांत येतो व त्या बंधाऱ्यापासून निघणारा पाटाचा मार्ग असतो किंवा असावा लागतो. जर कोणत्याहि गांवचे बाबतींत, बंधारा व पाटसरी हीं नकाशांत योग्य रीती आलेलीं नाहींत असें केव्हां दृष्टीस येईल तर तीं तशीं दाखविण्याबद्दल डि. इ. ऑफ्. लँ. रे. यानें ताबडतोब तजवीज पाहिजे. नंतर, या बंधाऱ्यांच्या नकाशांच्या साहाय्यानें, कुळकर्ण्यानें, जरी त्यास दुसरी कोणतीहि पीकतपासणी करण्यास वेळ नसला तरीहि, निदान पुढील गोष्ट करण्याची काळजी घेतली पाहिजे; ती म्हणजे ही कीं, त्यानें पाटानें पाणी मिळणाऱ्या शेतांत जाऊन तीं पाहिलीं पाहिजेत व विद्यमान जुने बंधारे किंवा एखादा नवीन बंधारा यांतून निघणाऱ्या पाटसरीनें कोणतींहि जादा शेतें भिजलीं जात आहेत अशाबद्दलचा कोणताहि पुरावा दिसून येतो कीं काय हें पाहण्यासाठीं त्यानें आसपासच्या प्रदेशाकडे नजर टाकली पाहिजे. अशा प्रकारची कोणतीहि गोष्ट त्यास दिसून आल्यास त्यानें लगेच हे हिस्से व सर्व्हे नंबर ह्यांच्या पीकतपासणीचा रिपोर्ट, त्यांत कोणतें क्षेत्रफळ भिजविलें जात आहे व कोणत्या पिकास पाणी मिळतें त्या गोष्टी नक्की दाखवून, लिहून काढला पाहिजे. तसेंच त्यानें, पाटाचें पाणी मिळत असलेल्या, कायमच्या व पद्धतशीरपणें आकारणी केलेल्या सर्व सर्व्हे नंबरांतील पाटाच्या पाण्यावर होणाऱ्या पिकांचा तपशीलहि तयार केला पाहिजे. हें करण्यांत आल्यानंतर जर ५५ व्या कलमाअन्वयें जादा आकारणी होण्यासाठीं कोणताहि रिपोर्ट करावयाचा असेल तर तो अर्थात्च तसा रिपोर्ट करील; किंवा जर त्या वर्षी पाट न वाहिल्यामुळें तें वर्ष त्या दृष्टीनें फार खराबीचें गेलें असेल तर, सुटीबद्दलच्या हुकुमांचे कारणासाठीं बिनचूक तपशीलाचा रिपोर्ट करणें हें त्याचें कर्तव्य असेल.

५. कांहीं सोइस्कर प्रदेशांतून (उदाहरणार्थ, पश्चिम सातारा, पश्चिम पुणें, वायव्य नाशिक व पश्चिम खानदेश यांतून), वर वर्णन केलेल्या कुळकर्ण्याच्या तपासणीशिवाय आणखी, दरेक 'सजांतील' पाटस्थळ तपासणीच्या कामाचा निदान बऱ्याचशा प्रमाणांतील भाग देखरेखीखालीं यावा या हेतूनें, खास सर्कल इन्स्पेक्टर नेमण्याचें मूळ योजिलें होतें. दरेक गांवची दरेक वर्षी चांचणी घेणें अर्थात्च शक्य नाहीं. तथापि कुळकर्ण्यास, सर्कल इन्स्पेक्टर आपल्या चार्ज-मधील गांवांपैकीं एखाद्या गावीं केव्हां अकस्मात् कोणत्या वेळीं येऊन थडकेल याचा नेम नाहीं या गोष्टीची सतत जाणीव राहून त्यामुळें तो आपल्या कामांत जरा अधिक दक्ष राहील यांत शंका नाहीं. हा सर्कल इन्स्पेक्टर म्हणजे ज्यास या प्रकारच्या कामाची विशेष माहिती आहे असा असावा व त्यानें तपासणीचे रिपोर्ट बारकाईनें तपासावे व तपासणींत अज्ञानामुळें वगैरे कोणतीहि चूक झाली असल्यास ती नजरेस आणावी व कामांत हयगय केल्यामुळें किंवा त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळेंच केवळ चुका घडून आलेल्या आहेत असें त्याच्या नजरेस आल्यास त्यानें त्यासंबंधांत योग्य ती तजवीज केली पाहिजे. सर्कल इन्स्पेक्टरनें खुल्या मोसमांतील (ओपन सीझनमधील) तपासणीचें आपलें काम, समजा मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत, संपविल्यानंतर—व यानंतर तपासणीचें असें कोणतेंहि काम शिल्लक उरणें फारच असंभवनीय आहे—जादा पाणीपट्टीबद्दलच्या सर्व कैफियती (गां. न. नं. ४) बारकाईनें तपासून पाहण्याचें काम त्याजकडे त्यानंतर सोपविण्यांत यावें. या योगानें या कामांत एकजातपणा व बिनचूकपणा येईल.

६. कैफियतीसंबंधीं विचार करतांना अर्थात्च हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जमिनीची प्रतवारी माहीतच असते व पाट ज्या वर्षी प्रत्यक्ष वाहिला असेल व त्यामुळें पीक निघालें असेल अशाच फक्त वर्षी आकारणी करावयाची असते ही गोष्ट काळजीपूर्वक लक्षांत ठेविली म्हणजे या बाबतींत आपणांस पाटस्थळाचे कमाल दर लावितां येऊं शकतील. ३० वर्षांच्या सेटलमेंटच्या मुदतीसाठीं पाटांवर आकारणी करतांना आपण, ते पाट दरसाल, किंवा १० वर्षांतून ८ वर्षें, किंवा १० वर्षांपैकीं ६ वर्षें व अशाच प्रमाणांत वाहत राहतील ही गोष्ट गृहीत धरून चालतो. परंतु जेव्हां ५५ व्या कलमाअन्वयें प्रकारची व्यवस्था आपणास लावावयाची असेल तेव्हां, योग्य अशी पट्टी म्हणजे जो पाट दरसाल वाहतो व पीक पूर्ण भरेपर्यंत जो टिकतो त्या पाटावरील पट्टी ही होय.

७. सर्वांत अत्यंत महत्त्वाच्या नोंदींपैकीं एक नोंद म्हणजे जे सर्व्हे नंबर व हिस्से नकाशांत पाटाखालच्या प्रदेशांतील म्हणून दाखविण्यांत आले आहेत परंतु ज्यांत पाटाच्या पाण्यावरील पिकें काढण्यांत आलीं नाहींत अशा सर्व्हे नंबरांतील व हिश्श्यांतील पिकांची नोंद ही होय. जिराईत पिकें काढण्याबद्दलच्या कारणांची नेहमीं चौकशी करण्यांत येऊन तीं नमूद करण्यांत आलीं पाहिजेत. (जमीन) धारण करणारा कदाचित याबाबत पाटांत पाणी नव्हते असेंहि कारण सांगण्याचा संभव आहे; किंवा यास कारण, बंधारा पुन्हां पहिल्यासारखा करण्याची किंवा त्या कामीं मदत करण्याची किंवा पाटसरी चालू ठेवण्याची त्यानें तसदी घेतली नसली पाहिजे हें किंवा इतर कोणी पाटाचें पाणी दुसऱ्या कोणत्याहि जमिनींत फिरवून नेलें असलें पाहिजे हेंहि असूं शकेल. ह्या सर्व गोष्टींची नोंद करण्यांत यावी. तसेंच ज्या बाबतींत पाटाचें पाण्यावरील पिकें काढण्यास चुकल्याचें कारण, केवळ हयगय, आळशीपणा, मुद्दलाचा अभाव व यांसारखेंच इतर कांहीतरीं—खुद्द पाण्याच्या पुरवठ्याचा अभाव किंवा त्यांतील बिघाड हें नव्हें—असण्याचा संभव आहे अशाहि बाबती आढळून येतील. अशा प्रकारची नियमितपणें तयार केलेली व दरवर्षी नाहीं तरी निदान वारंवार, खास सर्कल इन्स्पेक्टराकडून किंवा सामान्य सर्कल इन्स्पेक्टराकडून किंवा मामलतदार किंवा महालकरी किंवा प्रांत ऑफिसर यांजकडून पडताळून पाहण्यांत आलेली नोंद, सेटलमेंटच्या कामीं अत्यंत महत्त्वाची ठरेल यांत शंका नाहीं. मागील काळात,

कारणी, ते कोणत्याहि रीतीनें उपयुक्त असण्याचें बंद झालें या मुद्यावर, काढून टाकण्यांत आली [illegible] काढून टाकल्यापासून एक किंवा दोन वर्षांच्या आंत ते पुन्हां पाण्यानें भरपूर वाहत असल्याचें उघड असें घडून आलें आहे. ह्या चुका बहुधा योग्य नोंदीच्या अभावामुळेंच घडून आल्या असाव्या.

* * * * * * *

८. सबब प्रांत ऑफिसर व कलेक्टर ह्यांचें, ज्या जिल्ह्यांतील पाटस्थळ जमिनींतील पिकांस कांहीं महत्त्व आहे अशा जिल्ह्यांपैकीं एखादा जिल्हा त्यांच्याकडे असेल तर पाटस्थळ टापूंत, संबंध असलेले सर्वजण ही योग्य नोंद ठेवण्याचे गोष्टीकडे लक्ष देत आहेत याबद्दल विशेषेंकरून खात्री करून घेणें हें त्यांचें कर्तव्य असेल. ज्याच्या नेमणुकीबद्दल शिफारस करण्यांत आली आहे तो खास सर्कल इन्स्पेक्टर, नेमण्याबाबत तजवीज करणें हल्लीं सरकारास शक्य नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.

९. सुपरिंटेंडेंट ऑफ् लँड् रेकॉर्ड्स व डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ् लँड रेकॉर्ड्स व इतर अंमलदार ह्यांनीं बंधाऱ्याखालील प्रदेशांतील पिकांची नोंद शक्य तितक्या बिनचूकपणें ठेवण्यांत येत आहे हें पाहिले पाहिजे.

वर्गवार पिकाचें व पडीचें पत्रक,

| सव्हें नंबर. | वर्ग १. | | | | | वर्ग २. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ज्वारी. | बाजरी. | भात. | गहू. | कोद्रा (हरीक). | तूर. | कुळीथ (हुलगा). | हरभरा. | वाटाणा. |
| १ | | | | | | | | | |
| १ | ... | ६ १० | ... | ... | ... | ... | २ ३ खरीप. | ... | ... |
| २ | ११ ० | ६ ० | ... | ... | ३ ११ | १ २ | ... | ... | ... |
| ५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | ... | ५ १० | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ | ... | ... | ... | २ ० | ५ ० | ० १० | ... | ... | ... |
| ८ | ५ ० | ... | १० ० | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ | १० ० | ८ ० | ... | ... | ... | ४ ० | ... | ... | ... |
| २८ | ... | ... | ... | ... | ५ ० | ... | ... | ... | ... |
| इतर आकारी वहिती नंबर... | ५ १५ | ३ १७ | त. ८ ० (४ २५) दुसोटा. | २ ३० | ३ ० | १ ० | ३ ० रबी. | १ ० खरीप. | २ ० |
| एकूण खालसा ... | ३१ १५ | २८ ३७ | १८ ० | ४ ३० | १६ ११ | ६ १२ | ५ ३ | १ ० | २ ० |

उत्पन्न सन १९१२-३३.

| वर्ग ३. | | | | | | | | वर्ग ४. | वर्ग ५. | वर्ग ७. | वर्ग ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. कंदमुळें. | | | ब. हिरवी भाजी. | | | क. | ड. | | | | |
| बटाटे. | रताळीं. | सुरण. | कोबी. | वांगी. | दुध्या भोपळा. | सुंडचा. | केळी. | तंबाखू. | मसाले (आलें). | ऊंस. | एरंडी. |
| खालसा (सरकारी) जमीन. | | | | | | | | | | | |
| ... | ... | ... | ... | ० ८ | ० १० | ... | ... | २ ३० | ... | ... | ४ १० |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | त. ० ८ दुसोटा. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| वि. ० ८ | वि. ० १० | ० १२ | ... | ... | खा. पा. ० ४ | वि. ० १२ | त. १ ० वि. १ ० | त. ० २४ वि. ० १६ | वि. ० ३० | ३ ७ | १ ० |
| ० ८ | ० १० | ० १२ | ० ८ | ० ८ | ० १४ | ० १२ | २ ० | ३ ३० | ० ३० | ३ ७ | ५ १० |

| सर्व्हे नंबर. | वर्ग ९. | वर्ग १०. | | वर्ग ११ अ. | इतर पिकें तपशीलवार. | | एकूण पीक केलेलें क्षेत्र. | वजा दमोटा पिकाचें क्षेत्र. | पीक केलेलें क्षेत्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | करडई. | कापूस. | आंबाडी. | गवत. | पिकाचें नांव. | क्षेत्र. | | | |
| १ | | | | | | | | | |
| १ | ... | ... | ... | ... | मिरची | १ २८ | १७ १९ | ... | १७ १९ |
| २ | ... | ४ ० | ... | ४ ० | ... | ... | २९ १३ | ... | २९ १३ |
| ५ | ... | ... | ... | ० २१ | ... | ... | ० २१ | ... | ० २१ |
| ६ | ... | ... | ... | ५ ० | ... | ... | १० १८ | त. ० ८ | १० १० |
| ७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ७ १० | ... | ७ १० |
| ८ | ... | ... | ... | ५ ० | ... | ... | २० ० | ... | २० ० |
| ९ | ... | ... | ... | १ २२ | ... | ... | २३ २२ | ... | २३ २२ |
| २८ | ... | ... | ... | ... | ... | ... | ५ ० | ... | ५ ० |
| इतर आकारी वहिती नंबर ... | ० १४ | ३ ० | त. ० २६<br>० ७ | २ ० | मिरची फुलें. | ० ३०<br>० १६ | ४५ ३८ | त. ४ २५<br>वि. १ ० | ४० १३ |
| एकूण खालसा ... | ० १४ | ७ ० | ० ३३ | १८ ३ | मिरची फुलें. | २ १८<br>० १६ | १५९ २१ | ५ ३३ | १५३ २८ |

| उत्पन्न | | लागवड व पड. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इतर. | | | | | |
| फेर पाळीची खरी पड. | शिदाड किंवा राबाची जमीन. | निवडुंग. | गरिबी-मुळें किंवा तंटयामुळें नापेर. | पावसाचे प्रतिकूलते-मुळें. | कारण. | क्षेत्र. | एकूण लागण-पड. | एकूण क्षेत्र. | शेरे. कोष्टक १ व २ आणि ४ व ५ यांचे दरम्यानचीं सर्व कोष्टकें मजोंवरचीं आहेत. |
| | | | | | | | ५ | ६ | ७ |
| ... | ... | ० ९ | ... | ... | ... | ... | ० ९ | १७ २८ | ४ चिचा, २ आंबे, ३ शिंदी, १ ताड=१०. |
| ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | २९ १३ | |
| ... | ० १० | ... | ... | ० ११ | ... | ... | ० २१ | १ २ | |
| ० १० | ... | ० २२ | ... | ... | शेतांतील घर. | ० २ | ० ३४ | ११ ४ | ३ आंबे, १ फणस, २ आंबे सरकारी=६. |
| ३ ० | ... | ... | ... | ... | दलदल. | ० १० | ३ १० | १० २० | |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २० ० | ३ चिंचा, २ आंबे=५. |
| ... | ... | १ २ | ... | ... | झोंपडी. | ० ६ | १ ८ | २४ ३० | ३ चिंचा=३. |
| ... | ... | १० ० | ... | ... | ... | ... | १० ० | १५ ० | |
| १ १० | ० २० | ० २७ | १ ० | ... | ... | ... | ३ १७ | ४३ ३० | २३ चिंचा, २ नारळ, ५ ताड, २० शिंदी=५०. |
| ४ २० | ० ३० | १२ २० | १ ० | ० ११ | घरें<br>दलदल. | ० ८<br>० १० | १९ १९ | १७३ ७ | |

| सर्व्हे नंबर. | वर्ग १. | | | | | वर्ग [illegible] | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ज्वारी. | बाजरी. | भात. | गहूं. | कोद्रा (हरीक). | तूर. | कुळीथ (हुलगा). | हरभरा. | वाटाणा. |
| १ | | | | | | | | | |
| ३ | ४ ० | ... | १ ० | ... | ... | १ ० दुसोटा. | ... | ... | ० २० |
| ४ | ... | ५ ० | १ १२ | ... | ... | ... | दुसोटा. ० १२ रबी. | दुसोटा. ० ८ रबी. | ... |
| १० | १ ० | ... | त. १ ० दुसोटा. | ... | ४ ० | १ ० | ० १५ रबी. | ... | ० २० |
| ११ | ४ ० | ... | ... | खा. पा. २ ० | ५ ० | ... | | १ ० खरीप. | ... |
| इतर इनाम नंबर ... | ५ ० | ५ ० | ४ ० | ४ २८ | १ १६ | २ ० | २ ० रबी. | १ ० खरीप. | २ ० |
| एकूण इनाम ... | १४ ० | १० ० | ७ १२ | ६ २८ | १० १६ | ४ ० | २ २७ | २ ८ | ३ ० |
| बिनआकारी किंवा बिनवहिती जमिनीतील हुकुमी लागवड. (२५-अ गांवठाण. जंगल (फॉरेस्ट)) | ... ... ... | ... ... ... | ११ २० ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | .. ... ... | ... ... ... |
| पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटानें पट्टयानें दिलेला तळ्याच्या तळाचा प्रदेश | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण एकंदर ... | ४५ १५ | ३८ ३७ | ३६ ३२ | ११ १८ | २६ २७ | १० १२ | ७ ३० | ३ ८ | ५ ० |
| खरीप ... | ... | ३८ ३७ | ३६ ३२ | ... | २६ २७ | १० १२ | २ ३ | ३ ० | ... |
| रबी ... | ४५ १५ | ... | ... | ११ १८ | ... | ... | ५ २७ | ० ८ | ५ ० |

| वर्ग ३. | | | | | | | | वर्ग ४. | वर्ग ५. | वर्ग ७. | वर्ग ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न [illegible]. | | | ब. हिरवी भाजी. | | | क. | ड. | | | | |
| बटाटे. | रताळीं. | सुरण. | कोबी. | वांगी. | दध्या भोपळा. | सुंडघा. | केळी. | तंबाखू. | मसाले (आलें). | ऊंस. | एरंडी. |
| ... | इनाम. ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ० २० |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | वि. ० १५ | ... | ... | वि. २ २५ | ० २७ दुसोटा. |
| ... | ... | वि. १ ० | ... | ... | ... | ... | वि. १ ० | ... | ० १० | त. ० ३० | ... |
| वि. २ ० | ... | वि. १ ० | ... | ... | ... | ० १० | ... | ... | ... | भु. ४ ० | ३ • |
| त. ० २० (दुसोटा). | त. ० २० (दुसोटा). | वि. १ ० | वि. ० ३३ | त. ० १२ | वि. ० २० | ख. १ ० | वि. ० २० | त. १ ० | २ १० | त. ६ २३ | ४ • दुसोटा. |
| २ २० | ० २० | ३ ० | ० ३३ | ० १२ | ० २० | १ १० | १ ३५ | १ ० | २ २० | १३ ३८ | ८ ७ |
| ... ० ५ ... | ... ० ६ ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... | ... ... ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २ २३ | ० ३६ | ३ १२ | १ १ | ० २० | ० ३४ | १ २२ | ३ ३५ | ४ ३० | ३ १० | १७ ५ | १३ १७ |

| सर्व्हे नंबर. | वर्ग ९. | वर्ग १०. | | वर्ग ११ अ. | इतर पिकें तपशीलवार. | | एकूण पीक केलेलें क्षेत्र. | वजा दमोटा पिकाचें क्षेत्र. | निवळ पीक केलेलें क्षेत्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | करडई. | कापूस. | आंबाडी. | गवत. | पिकाचें नांव. | क्षेत्र. | | | |
| १ | | | | | | | २ | ३ | ४ |
| | | | | | | | | इनाम. | |
| ३ | ... | ० ६ | ... | ... | ... | ... | ७ ६ | १ ० | ६ ६ |
| ४ | ... | ... | ... | १० ० | ... | ... | २० १९ | १ ७ | १९ १२ |
| १० | ... | ... | ० ५ | ... | नागली. | २ ० | १३ ० | त. १ ० | १२ ० |
| ११ | ... | ... | ... | ... | ... | ... | २२ १० | ... | २२ १० |
| इतर इनाम नंबर ... | ... | ... | ... | २ ० | ... | ... | ४८ २ | ४ ० | ४४ २ |
| एकूण इनाम ... | ... | ० ६ | ० ५ | १२ ० | नागली. | २ ० | ११० ३७ | ७ ७ | १०३ ३० |
| बिनआकारी किंवा बिनवहिती जमिनीतील हुकुमी लागवड. — २५-अ. | ... | ... | ... | ... | ... | ... | ११ २० | ... | ११ २० |
| गांवठाण | ... | ... | ... | ... | ... | ... | ० ११ | ... | ० ११ |
| जंगल (फॉरेस्ट) | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटानें पट्टयानें दिलेला तळधाच्या तळाचा प्रदेश. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण एकंदर ... | ० १४ | ७ ६ | ० ३८ | ३० ३ | मिरची फळें नागली. | २ १८<br>० १६<br>२ ०<br>४ ३४ | २८२ ९ | १३ ० | २६९ ९ |

| लागणपड व पड. | | | | | | | | एकूण क्षेत्र. | शेर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फेर-पाळीची खरी पड. | शिंदाड किंवा रावाची जमीन. | निवडुंग. | गरीबीमुळें किंवा तटबामुळें नापेर. | पावसाचे प्रतिकूलतेमुळें. | इतर. कारण. | इतर. क्षेत्र. | एकूण लागणपड. | | कोष्टक १ व २ आणि ४ व ५ यांचे दरम्यानचीं सर्व कोष्टकें मर्जीवरचीं आहेत. |
| | | | | | | | ५ | ६ | ७ |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ६ ६ | |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १९ १२ | |
| ... | ... | ... | ... | ० १७ | ... | ... | ० १७ | १२ १७ | ३ नारळी, ५ आंब, २ फणस=१०. |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २२ १० | |
| १६ २३ | ... | ... | ... | ... | दलदल. | १ ३९ | १८ २२ | ६२ २४ | ५२ शिंदी, ३१ ताड, ४० आंबे=१२३. |
| १६ २३ | ... | ... | ... | ० १७ | ... | १ ३९ | १८ ३९ | १२२ २९ | |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ११ २० | बिनआकारी जमिनीपैकीं पीक न केलेला भाग हा लागणपड म्हणून धरलेला नाहीं. |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १० ११ | |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| २१ ३ | ० ३० | १२ २० | १ ० | ० २८ | ... | २ १७ | ३८ १८ | ३०७ २७ | |

## नमुना नंबर १३ चें तेरीज.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण पीक केलेलें क्षेत्र ... ... ... | | | २९५ | ३६ |
| वजा—बिनआकारी, गांवठाण जमिनींतील, अगर बिनवहिती जमीन तात्पुरतीं लावणीस दिली असेल त्यांतील पिकें. | | | ४ | ३२ |
| अणीक— बिनवहिती आकारी ... ... ... | | | ३०० | २८ |
| गां. न. नं. १ चें तेरीज [ अ (१) ] बरहुकूम | | | | |
| अधिक—वहितींतून ता. ३१ जुलै १९१२ पासून गेलेली | | | | |
| पाण्यानें वाहून | ० | ३५ | | |
| रेल्वेकडे | ४ | २१ | | |
| मिठागराकडे | २५ | ० | | |
| विटांचे आवाराकडे | ५ | ० | ३५ | १६ |
| गुदस्त साल गां. न. नं. ५ (११) बरहुकूम ... | | | ३३६ | ४ |

### पाण्यावरील पिकाचे तेरीज.

| पाण्याचें साधन. | गहूं. | भात. | इतर मुख्य धान्य व कडधान्यें. | ऊस. | आहाराचीं इतर धान्यें. | बिनआहाराचीं धान्यें. | वैरण. | एकूण. | वजा दुसोटा. | बाकी निव्वळ पाणी दिलेलें क्षेत्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सरकारी कालवा. | | | | | | | | | | |
| २. खासगी पाट ... | २ ० | ... | | ... | ० ४ | ... | ... | २ ४ | ... | २ ४ |
| ३. विहीर ... | ... | ... | ... | ५ ३२ | ९ २६ | १ ६ | ० १२ | १६ ३६ | ... | १६ ३६ |
| ४. तलाव ... | ... | ९ ० (५ २५ दुसोटा). | ... | ७ १३ | २ २० (१ ८ दुसोटा ). | २ १० | १ ० | २२ ३ | ६ ३३ | १५ १० |
| ५. दुसरीं साधनें. ढेकुडी (उक्ती). | ... | ... | ... | ४ ० | ... | ... | ... | ४ ० | ... | ४ ० |
| एकूण ... | २ ० | ९ १० +५ २५ | ... | १७ ५ | १२ १० + १ ८ | ३ १६ | १ १२ | ४५ ३ | ६ ३३ | ३८ १० |
| | | | वर्ग १ व २ चीं बाकी पिकें. | वर्ग ७. | वर्ग ३ अ, ब व ड. वर्ग ६ व ८. | वर्ग ४, ५. ९ व १०. | वर्ग ३ क व वर्ग ११ अ (गवत). | | | |

१. यामध्यें (१) पाट ( सरकारी ), (२) कालवे ( सरकारी ), (३) तलाव व गांवचे सुलकी हिशेबांचे पुस्तक यांमधील गांवचा न. नं. १३ यामध्यें निर्दिष्ट केलेले तलाव, म्हणजे ( वर्ग १ आणि २ ), (४) बंधारे ( सरकारी ) ज्यांची दुरुस्ती सरकारकडून केली जाते असे बंधारे ( सरकारी ), याचा समावेश होतो.

२. यांमध्यें (१) पाट ( खाजगी ), (२) कालवे ( खाजगी ), (३) बंधारे ( खाजगी ), (४) शेतकऱ्यांनीं घातलेले तात्पुरते बांध घालून घेतलेले पाणी यांचा समावेश होतो.

३. यांमध्यें मोटेवर अथवा पंपावर चालणाऱ्या सर्व बांधकाम केलेल्या अथवा कच्चयाविहिरी ( सरकारी आणि खाजगी ) वगैरे यांचा समावेश होतो.

४. यांमध्यें सरकारी अथवा खाजगी ( म्हणजे वर्ग १ व २ खेरीजकरून ) इतर तलावांचा समावेश होतो.

५. यांमध्यें नदींतून किंवा ज्या खळग्यांत नदींचे किंवा नाल्याचें पाणी वळवून सोडलें आहे अशा खळग्यांतून पाणी काढण्यासाठीं वापरलेल्या ढेकुड्या, पंप ( तेलावर वाफेवर अथवा पवनचक्कीवर चालणारे ) वगैरे, (२) वर निर्दिष्ट न केलेलें इतर कोणतेंहि साधन, यांचा समावेश होतो.

### फळझाडांची बेरीज.

| जात. | सरकारी. | खाजगी. | एकूण. |
|---|---|---|---|
| आंबा ... | २ | ५२ | ५४ |
| फणस ... | ... | ३ | ३ |
| चिंच ... | ... | ३३ | ३३ |
| नारळ ... | ... | ५ | ५ |
| ताड .. | ... | ३७ | ३७ |
| शिंदी ... | ... | ७५ | ७५ |
| एकूण ... | २ | २०५ | २०७ |

हा एकूण, शेतीचें पत्रक नंबर १ याचे शेवटले कोष्टकांत जातें.

तारीख ( सही ) पाटील.

( सही ) कुळकर्णी.

## गांवचा न. नं. १३ बाबत खुलासा.

पुरी होतांच कुळकर्ण्यानें गां. न. नं. १३ भरून पुरा केला पाहिजे. या नमुन्यांत, सर्व पिकांच्या व उत्पन्नएकूण बेरजा उपलब्ध करून घेण्याच्या असतात व तसेंच (कांहीं शेतें किंवा शेतांचे भाग सोडून मोठी झाली नाहीं, याची खात्री होणेसाठीं) एकूण क्षेत्र गां. न. नं. १ चे तेरजाशीं ताडून पाहिलें पाहिजे. परंतु शेतीसाठीं भोगवट्यांत असलेले व आकारी जमिनींतच पिकें आढळण्याचा सुमार असतो. म्हणून पिकांचे व लागणपडीचे क्षेत्राचा ताळा गां. न. नं. १ शीं पाहणेचा, तो पिकासाठीं म्हणून राखलेले एकूण क्षेत्राचा जो भाग, त्याचपाशीं पाहिला पाहिजे, म्हणजे भोगवट्यांत असलेले आकारी क्षेत्राचे एकूण बेरजेशीं घेतला पाहिजे. मग तें क्षेत्र, खालसा असो, इनाम असो, किंवा चालू किंवा नवीन शर्तीवरचें असो. नंतर बिनआकारी किंवा भोगवट्यांत नसलेली जमीन, किंवा नवसाध्य करण्याकरितां दिलेली जमीन, किंवा शेतीचे कामासाठीं दुसरे असेच एकादे शर्तीवर दिलेली जमीन, यांत पिकें आढळलीं तर तें क्षेत्र त्यांत मिळविलें पाहिजे. परंतु अशा पिकाचें क्षेत्र ठरावबंदाशीं मिळालेंच पाहिजे अशी आवश्यकता नाहीं. फॉरेस्ट डिपार्टमेंटानें (जंगलखात्यानें) संबंध असलेल्या रेव्हेन्यू अधिकारी वर्गास लागवडीकरितां दिलेल्या जंगलांच्या पीकांच्या सविस्तर तपशिलासह त्यांच्या लागवडीच्या क्षेत्रांसंबंधीं आंकडे पुरविले पाहिजेत. गां. न. नं. १ चे तेरजावरून हें एकूण क्षेत्र कशा रीतीनें घेतलें आहे ती रीत नमुन्यांचे तेरजेंत दाखविली आहे.

२. कूळवहिवाटीचे भागांत असा खुलासा केला आहे कीं, त्यांतील सर्व सर्व्हे दुरुस्त्या गां. न. नं. १ व ७ यांतील दुरुस्त्यांबरोबरच केल्या पाहिजेत. सबब पुष्कळ वेळ असें घडेल कीं, गां. न. नं. १३ बंद केल्यावर त्यांतील भोगवट्यांत असलेलें एकूण क्षेत्र, हें जुलईपूर्वी व नंतर तयार केलेले ठरावबंदांतील क्षेत्रापासून भिन्न राहील. हें कसें तयार करावें तें गां. नं. १३ चे शेवटीं दाखविलें आहे.

३. जेव्हां एकाच क्षेत्रांत एकामागून एक अशीं दोन पिकें करण्यांत येतात तेव्हां तीं प्रत्येकीं पिकांत नोंदण्यांत येतात. परंतु एकूण क्षेत्राचा मेळ जमण्यासाठीं दुसोट्यांचीं पिकें कोष्टक ३ यांत वजा करणें भाग पडतें. पडीचा तपशील पूर्वीप्रमाणें वेगळें पत्रकांत न देतां नमुन्यांतच दिला आहे.

४. इलाख्यांत उत्पन्न होत असलेले, व होण्याचा संभव असणारे सर्व पिकांची यादी, गट व वर्गवारीसह हिंदुस्थान सरकारास लागणारे माहितीसाठीं वेगळे परिशिष्टांत दिली आहे. इलाख्यांत उत्पन्न होणारे पिकांची संख्या व त्यांची वर्गवारी फार मोठी आहे, तरी बहुतेक गांवांत फारशी पिकें असणार नाहींत. साधारणपणें गांवांत उत्पन्न होणारे प्रत्येक पिकाकरितां गां. न. नं. १३ यांत एक कोष्टक असावें व छापील लिस्टांत दिलेल्या अनुक्रमाप्रमाणें व वर्गवारीप्रमाणें तीं व्यवस्थित रीतीनें लिहावीं. शेवटीं "इतर" म्हणून एक कोष्टक आहे त्यांत, प्रचारांत नाहीं असें जें पीक एकाददुसरे गांवांत आढळेल, तें लिहावें. नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें त्या पिकांचें नांव व त्याचें क्षेत्र हीं दाखल करावीं. जेव्हां हें नमुने तालुक्यांत एकंदर करण्यांत येतील तेव्हां असे प्रकारचीं पिकें दुसरे पुष्कळ गावांतहि आहेत, असें मामलेदार यांस आढळून येईल व असें झालें म्हणजे त्यानीं आपले नमुन्यांत अशीं प्रचाराबाहेरील पिकें योग्य वर्गांत एक ठिकाणीं करावीं.

५. या कारणासाठीं पिकांचे कोष्टकांचे सदरास नंबर दिलेला नाहीं. नहीगांवांत जीं पिकें करण्यांत येत होतीं त्याप्रमाणेंच कोष्टकें नमुन्यांत दिलीं आहेत. जीं कोष्टकें कायम ठेवावयाचीं असून तीं कधीं बदलावयाचीं नाहींत त्या कोष्टकांतच नंबर दिले आहेत.

६. जिल्ह्याचें माहितीपत्रक (जि. न. नं. ४) तयार करण्यास लागलें म्हणजे खालसा जमिनीचे क्षेत्राहून भिन्न जीं इनाम जमिनींतील लागणपडीचे क्षेत्राची माहिती लागेल. सबब सदरहू नमुन्याची रचना नवीन तऱ्हेनें केली आहे. प्रथमत: प्रत्येक सरकारी सर्व्हे नंबर दाखल केला आहे. आणि ते सर्व झाल्यावर मागाहून इनाम (मिश्रित इनामसुद्धां) सर्व्हे नंबर दाखल केले आहेत. यामुळें सरकारी आकारी क्षेत्राची एकूण (१७३ ए., ७ गुं.) व इनामाचे क्षेत्राची एकूण (२२ ए., २९ गुं.) यांचे मुकाबले (न. नं. १ चे तेरजाशीं) करतां येतात. सबब एकादी चूक झाली असली तर ती कोणते भागांत झाली आहे हें समजतें. पुढें बिनआकारी जमिनींतील वगैरे पिकें मिळविलीं आहेत, परंतु त्यामुळें मुकाबल्यांस बाध येत नाहीं. कारण हें जादा क्षेत्र शेतीचें पत्रक नं. २ यांत वजा केलें आहे. (नमुना पहा.) यावरून असें दिसून येईल कीं, गां. न. नं. १३ यांत भागवार अशा तऱ्हेनें नोंदी केल्यानें लागणारी मेहनत कोणतेहि प्रकारें वाढत नाहीं; कारण नोंदींची संख्या सारखीच असते.

७. पाणी दिलेली पिकें ओळखतां येण्यासाठीं पाण्याचा प्रकार दाखविणारीं अक्षरें नमुन्यांत पिकाचे वर लिहिलीं पाहिजेत (गां. न. नं. १२ चा पिकाचे भागाचा प्यारा ५). भातजमिनीचे नवीन क्षेत्रासहि अशीच खूण केली पाहिजे. (गां. न. नं. १२ पिकाचे भागाचा प्यारा ५ अ). नमुन्यांत नोंदी सबंध भरून झाल्या म्हणजे पुढें कुळकर्ण्यानें पायथ्याशीं तेरीज तयार करावें व त्यांत पाणी दिलेले पिकाचें एकूण क्षेत्र, पाटपाण्याचे साधनाप्रमाणें वर्गवारीनें, दाखवावें. जमिनीचे एकाच तुकड्यांत २ पिकें एकामागून एक अशीं केलीं तर प्रत्येक पीक नोंदलें पाहिजे व नमुन्यांत दाखविल्याप्रमाणें दुसोटा पिकाचें क्षेत्र वजा केलें पाहिजे (सर्व्हे क. सा. यांचा हु. नं. ८१०/१०-५-९९).

८. तसेंच कांहीं पिकें अशीं आहेत कीं, तीं खरीप करतात किंवा रबीहि करतात. [illegible] रबी पिकें कोणतीं आहेत तें दाखविलें पाहिजे. नंतर पायथ्याशीं खरीप व रबी असा वेगळा तपशील [illegible] कुळकर्ण्यास सहज करतां येईल. पीक एकच प्रकारचें असल्यास पिकाचे एकूण बेरजेखालीं खरीप किंवा [illegible] पाहिजे. ज्या गांवास गव्हांचीं किंवा कापसाचीं अंदाजपत्रकें पाठवावीं लागतात, तेथें कापूस देशी किंवा [illegible] जिराईत किंवा बागाईत, असा फरक दाखवावा लागतो.

९. अखेर, नोंद करण्याचे ठरलेल्या सहा किंवा अधिक प्रकारच्या फळें येणाऱ्या झाडांचें तेरीज कुळकर्ण्यास करावें लागतें. ज्या गांवांत पिकें फार नसतील तेथें शेऱ्यासाठीं राखलेले कोष्टकांत वेगवेगळें प्रकारचे झाडांकरितां कोष्टकें आंखून त्यांत सर्व्हे नंबरवार झाडें दाखल केलीं तर श्रम वांचतील व तेरजाशिवाय शेवटीं एकूण बेरीज सहज करतां येईल. लागण जमिनींत सरकारी झाडें फार असणार नाहींत. सबब तीं ओळखण्यासाठीं त्यास "स" या अक्षराची खूण करावी.

१०. गां. न. नं. १३ वरून असें आढळून येईल कीं, या नमुन्यांत सर्व्हे नंबरचे पोट-विभाग दाखविलेले नाहींत. न. नं. १२ यांत जीं पिकें दाखल करण्यांत येतील त्यांची एकूण बेरीज न. नं. १३ करितां कुळकर्ण्यानें नंबरवार जुळवावी. नंतर त्यास अर्थात् गां. न. नं. १३ यांतील एका ओळीचे क्षेत्राची एकूण बेरीज, न नं. १२ यांतील सर्व्हे नंबराचे लागणीलायक क्षेत्राचे एकूण बेरजेशीं मिळते कीं नाहीं हें पाहतां येईल.

११. परंतु कुळकर्ण्यास न. नं. १३ मामलेदार यांजकडे सबंध पाठवावा लागत नाहीं. तो तपासणी करणारे कामगारास वारंवार गांवीं लागतो, म्हणून कुळकर्णी तो गांवींच ठेवतो. मामलेदार यांस नंबरवार तपशील लागत नाहीं. त्यांस जें काय लागतें तें हें कीं, नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें, जाड अक्षराचे सदरांसमोरच्या बारीक आंकड्यांच्या (इनाम, खालसा व एकूण) बेरजा. दुसरी तपासणी पुरी करून ती नमुन्यांत भरल्यावर, व सर्कल इ. यांनीं शक्य तितक्या नोंदींची तपासणी केल्याबरोबर, लागलीच एकूण बेरजा फळझाडांच्या बेरजासहित (प्यारा ९) व तेरीज आणि पाण्याच्या पिकांचें एकूण क्षेत्र अशीं तालुक्यास पाठविलीं पाहिजेत. कोणत्याहि बाबतींत हीं पत्रकें पाठविण्यांत होणारा उशीर ता. ३१ मे पुढें कधींहि जाऊं नये.

१२. पिकाच्या किंमती व वजनें यांचे अंदाज करण्यास, आणि धान्यांत येणारे खंडाची पैशांत किंमत करण्यास मदत व्हावी, म्हणून कुळकर्ण्यानें आपले पिकाचे पत्रकाबरोबर गांवांत साधारणपणें जीं निरनिराळें प्रकारचीं धान्यें करण्यांत येत असतील, त्या प्रत्येकाचे पौंडांत, किंवा ८० तोळ्यांचें ठराविक शेरांत, वजन दाखविणारें एक कोष्टक ठेविलें पाहिजे. आणि धान्यें वजनानें न मोजतां मापानें मोजण्यांत येत असतील तर विशेषेंकरून ठेविलें पाहिजे. कापसाचे एका गठ्ठ्याचें वजन व तसेंच गवताचें, किंवा कडब्याचें, किंवा गांवांत जीं दुसरीं पिकें करून विकलीं जात असतील त्यांचें १०० पेंढ्यांचें ठराविक वजन कुळकर्ण्यास माहित असलें पाहिजे. जिनसांच्या किंमती करण्यासाठीं मामलेदार यांनीं जी जंत्री स्वीकारली असेल त्या जंत्रीशीं आपली जंत्री किंवा कोष्टक जमतें कीं नाहीं, हें कुळकर्ण्यानें पाहावें.

ज्या गांवीं पाटाच्या पाण्यानें पिकें होतात (सारा असो अगर नसो) त्या सर्व गांवांत कुळकर्णी यानें आपल्या नकाशावर ओढ्याचे प्रवाहास जेथें बंधारा असेल तेथें खूण करून त्याचा नंबर, याचा साधारण ओघ व त्यानें भिजणारीं क्षेत्रें हीं सर्व दाखविलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें पिकास पाणी पुरविणारे सर्व तलावांना खुणा केल्या पाहिजेत. यांपैकीं बहुतेक तलाव पुढें तयार होणारे गांवचे नकाशांत छापून निघतील. नंतर दरसाल पाहाणी करीत असतांना पाणी दिलेलीं पिकें आहेत अगर नाहींत हें त्यानें मुद्दाम लक्षपूर्वक पाहावें. यावरून गां. न. नं. १३ करितां पाणीपत्रक तयार करण्यास त्यास मदत होईल, इतकेंच नव्हे तर कायम सारा नसलेलें पण ल. रे. को. क. ५५ प्रमाणें सारा बसवितां येणारें पाण्याचें पत्रक त्यास कोणत्याहि गांवांत तयार करून पाठवितां येईल. सर्व्हे नंबर व हिस्से यांपैकीं ज्यांना पाणी मिळतें व ज्यांवर पाटस्थळ अगर हिमायत सारा पूर्वीच बसला आहे असे नंबर व हिस्से यांची नोंद करून वरील पत्रक सहज तयार करितां येईल, पृष्ठ (३) पहा. बाकीच्या पाणी दिलेल्या जमिनीबद्दल तात्पुरता सारा घेण्याविषयीं किंवा सूट देण्याविषयीं प्रांताचे हुकुमांची जरूर लागेल. हें वार्षिक पत्रक किरकोळ जमीनबाबींसंबंधाचा एक दाखला होईल (गां. न. नं. ४). पाहणी करणाऱ्या कामदारांनीं अर्थातच नकाशांत दाखविलेलीं ठिकाणें पाहावींत व विशेषतः ज्या जमिनीवर कुळकर्णी यानें सारा घेण्याचें लिहिलें असेल त्या जमिनी पाहण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांतल्या त्यांत विशेष लक्षपूर्वक जुने पाट किंवा तलावांच्या आसपासच्या जमिनी पाहाव्यात, अशाकरितां कीं, चालू सालीं ज्या पाण्यावर आकार बसविण्यासंबंधानें रिपोर्ट करावयाचे असतील त्यांची हयगय होऊं नये.

## अंदाजपत्रकें.

[illegible]जपत्रकांसाठीं कुळकर्ण्यास कांहीं माहिती मामलेदार यांजकडे पाठवावी लागते आणि डॉयरेक्टर ऑफ् [illegible] यांचे ऑफिसांत ती खालीं नमुन्यांत दिलेले तारखांस पाठविण्यास योग्य होते.

| पाठविण्याची तारीख. | डायरेक्टरकडे पाठविण्याची तारीख. | पत्रक. | कोणते पिकाबद्दल. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २५ जुलै ... | १-८ | १ लें पत्रक. | कापूस, तीळ, भुईमूग व ऊंस. |
| १० सप्टेंबर ... | १५-९ | १ लें पत्रक. | भात. |
| २५ सप्टेंबर ... | १-१० | २ रें पत्रक. | कापूस, तीळ, भुईमूग व ऊंस. |
| २० आक्टोबर ... | १-११ | १ लें पत्रक. | खरीप, ज्वारी, बाजरी. |
| १० नोव्हेंबर ... | १५-११ | २ रें पत्रक. | भात. |
| २५ नोव्हेंबर ... | १-१२ | ३ रें पत्रक. | कापूस. |
| ५ डिसेंबर ... | १०-१२ | अखेरचें-सदर. | तीळ व भुईमूग. |
| ५ डिसेंबर ... | १०-१२ | १ लें पत्रक. | जवस व शिरस. |
| ५ जानेवारी ... | १०-१ | सदर. | गहूं. |
| १५ जानेवारी ... | २०-१ | अखेरचें-सदर. | ऊंस. |
| २५ जानेवारी ... | १-२ | सदर-सदर. | कापूस. |
| | | १ लें सदर. | एरंडी. |
| १० फेब्रुवारी ... | १५-२ | २ रें सदर. | गहूं, जवस व शिरस. |
| २० फेब्रुवारी ... | १-३ | १ लें सदर. | रबी ज्वारी. |
| १० मार्च ... | २०-३ | ३ रें सदर. | गहूं. |
| २५ एप्रिल ... | १-५ | अखेरचें-सदर. | गहूं, जवस व शिरस. |

जुलैचें कापसाचें पत्रक फक्त दक्षिणेंतील जिल्ह्यांतच पाठविण्याचें असतें.

कापसाचें ५ वें पत्रक डायरेक्टर ऑफ् अ. कडून ३० मार्च रोजीं येत असतें. परंतु तें गांवाहून येणारे रिपोर्टांवरून तयार होत नाहीं. परंतु हवामानाचा शेवटच्या पत्रकावर (१ फेब्रुवारी) कसा परिणाम झाला आहे तें मामलेदार कळवितात.

ज्या जिल्ह्यांतून हीं पत्रकें जावीं लागतात ते जिल्हे येणेंप्रमाणें :—

कापूस व गहूं, खरीप ज्वारी, बाजरी आणि रबी ज्वारी.—कोंकणखेरीज बाकी सर्व जिल्हे.

जवस.—दक्षिणेंतील व कर्नाटकांतील सर्व जिल्हे.

तीळ.—सातारा व ठाण्याखेरीज सर्व जिल्हे.

शिरस.—(फक्त गुजराथेंतील एतद्देशीय संस्थानांकडून.)

भुईमूग.—दक्षिणेंतील जिल्हे व बेळगांव.

ऊंस.—अहमदाबाद, भडोच, खेडा, पंचमहाल, कुलाबा, ठाणें, रत्नागिरी, व पूर्व आणि पश्चिम खानदेश-खेरीज, सर्व जिल्हे.

भात.—खेडा, सुरत, पुणें, बेळगांव, धारवाड व सर्व कोंकण.

नीळ.—(सिंधमधील दोन जिल्हे.)

एरंडबी.—सर्व गुजराथ व खानदेश (ठ. ९७९५-२८-४-२४) सोलापूर, विजापूर, बेळगांव.

एतद्देशीय संस्थानें व सिंधबद्दल स. ठ. नं. ९०२६—१३ पहा.

२. कुळकर्ण्यास जी माहिती पाठवावी लागते, ती खालीं लिहिलेले नमुन्यांत दर्शविली आहे. कोष्टक ४ ते ७ यांची फक्त गहूं व कापूस यांकरितां जरूर लागते. ज्याअर्थी, पीकपहाणी इतकी लौकर कीं ता. २५ सप्टेंबरचे आंत पुरी होण्याची कल्पना नसते, त्याअर्थी, पहिले दोन पत्रकांत चालू सालचें नक्की तपासलेलें क्षेत्र उघडच कोष्टक २ यांत देतां येणार नाहीं. परंतु गुदस्तसालचें नक्की क्षेत्र त्यास देतां येईल. नंतर साधारणपणें रयत लोकांनीं चालू सालीं

गेले सालापेक्षां किंवा गेले एक दोन सालांपेक्षां कमी पेर केली आहे किंवा जास्ती केली आहे, हें करून सहज ठरवितां येईल. पहिल्या अंदाजपत्रकांत नक्की आंकडे यावे अशी इच्छा केलेली नसते. कापूस २२१ एकर, १७ गुंठे होता, आणि साधारण समज असा आहे कीं चालू सालीं ज्वारी जास्त पेरल्या... पेरणी थोडी कमी झाली आहे, तर चालू सालचे पहिले अंदाजपत्रकांत १८० किंवा २०० एकर कुळकर्ण्यानें दाखल... वाजवी होईल. याप्रमाणें अगदीं नक्की माहितीची जरी आशा केलेली नसते, तरी बेडगळ चुका टाळतां येतील. आक्टोबर महिन्यानंतर जेव्हां मागाहूनचीं अंदाजपत्रकें पाठविण्यास योग्य होतात, तेव्हां कुळकर्ण्यास हमेष नक्की आंकडे देतां येतील. परंतु जवस किंवा रबी गव्हांचे पहिले पत्रकाचे बाबतींत देखील त्यानें विशेष पाहणी करावयास पाहिजे असें नाहीं. परंतु दुसरे तपासणींत जेव्हां नक्की आंकडे कळून येतील, तेव्हां ते त्यानें कळविले पाहिजेत. शेवटचे अंदाजी पत्रक पाठविण्याच्या वेळेपर्यंतदेखील कोणीहि पाहणी न करतां कुळकर्ण्यानें डोळे झाकून रिपोर्ट करण्यामुळें अंदाजी पत्रकांत आणि जुलैच्या शेवटच्या पिकाचे माहितीचे पत्रकांत मोठ्या भयंकर चुका (एका जिल्ह्यांत एक लाख एकराचा फरक) उत्पन्न झाल्या आहेत. प्रांत आणि मामलेदार ह्यांनीं याकडे लक्ष देऊन हे आकडे तपासून पाहावे व अशा भयंकर चुका न होऊं देण्याबद्दल खबरदारी घ्यावी.

३. दोन वर्षांचें क्षेत्र व समंजस अशा शेतकऱ्यांचे माहितीप्रमाणें कमजास्तीचीं कारणें देऊन शिवाय पीक पेरलेनंतर लागलींच त्याचे भावी स्थितीबद्दल आपलें मत, अथवा (पीक पूर्णावस्थेस येत चाललें असेल तर) त्याची आणेवारी, हीं कुळकर्ण्यास शेवटीं द्यावीं लागतात. सरासरी पीक म्हणजे १२ आणे समजण्यांत येतें. याचा अर्थ असा कीं, १२ आणे पीक म्हणजे नेहमीप्रमाणें शेतकी करून उत्तम वर्षांत जें पीक येईल असें रास्त रीतीनें वाटतें, तें पीक होय. अर्थात् चांगल्या जमिनींतील पिकें वाईट जमिनींतील पिकांपेक्षां जास्त चांगलीं असतील. परंतु वाईट जमिनींतील पिकें सुद्धां एकादे वर्षी, दुसऱ्या एकाद्या वर्षापेक्षां जास्त चांगलीं असतील. कुळकर्ण्यानें जो काय प्रयत्न करावयास पाहिजे तो हा. त्यानें आपले अनुभवाचे मानानें असें लक्षांत ठेवावें कीं, साधारण वर्षांत किंवा त्याहून चांगल्या वर्षांत शेतांचे अमुक एक गटांत पिकांचा साधारण देखावा कसा काय असतो. आतां चालू सालीं पिकें जरा जास्त चांगलीं असलीं, किंवा थोडीं वाईट असलीं, किंवा पुष्कळच वाईट असलीं, तर त्या मानानें त्यानें त्यांची आणेवारी करावी. नेहमीं जें उत्पन्न होतें त्याचें फक्त निमें उत्पन्न येईल असा सुमार असला तर तें पीक ६ आणे झालें. साधारण नेहमीं उत्पन्न होतें त्याहून कांहींसें जास्त होणेंसारखें असेल तर तें पीक १४ आणे होईल. नेहमींपेक्षां पुष्कळच चांगलें असेल तर तें १६ आणे पीक होईल. खरोखर भरपूर पीक जें कधीं १० किंवा २० वर्षांतून एकदां प्राप्त होतें तें वाजवी रीतीनें १८ ही आणे किंवा २० आणे होईल. वास्तविक पिकें असतात त्यापेक्षां आपलीं पिकें जास्त वाईट आहेत असें मानावयाचा सर्व जगांतील शेतकऱ्यांचा कल असतो. कदाचित पिकें जितकीं चांगलीं येतील म्हणून ते आशा करितात, तितकीं चांगलीं आलीं नाहींत तर ते नाखुष होतात. आणेवारीची चांगली परीक्षा म्हटली म्हणजे, शेतकरी लोकांस असें विचारावें कीं, एखाद्या विशिष्ट शेतांतील पीक गेल्या सालापेक्षां किंवा दुसरें एकादें अलिकडील साल—जें त्यांस आठवत असेल त्यापेक्षां एकंदरींत कमी आहे कीं जास्त आहे. यानें पिकाचे अंदाजावर उपयुक्त असा दाब राहील. कोष्टक ८ यांत कुळकर्ण्यानें "आणेवारी आणे; गुदस्त सालापेक्षां पिकें कांहीं बरीं आहेत अशी समज आहे. कदाचित् एक आणा जास्त चांगलीं" असें लिहावें. तसेंच त्यानें "नागतोड्यांनीं फार नुकसान केलें", "कोल्ह्यांनीं उंसाचें फार नुकसान केलें" असे किंवा अशासारखे शेरे लिहावे. त्याचप्रमाणें त्यानें "आणखीं एक पावसाची सर पडेल तर फार चांगलें पीक येईल असा सुमार आहे." असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. आणेवारीबद्दल पूर्ण खुलासा रुळींतील खुलाशांत दिला आहे.

४. हीं पत्रकें मामलेदार यांजकडे मुदतशीर जाऊन पोंहोंचणें फार महत्त्वाचें आहे. कारण त्यांजला हीं पत्रकें नेमले मुदतीस शेतकीखात्याचे डायरेक्टरसाहेब यांजकडे पाठवावीं लागतात. (स. ठ. नं. ५९२०–१५.) नमुना व शेरे फार लहान असतात, व ते पोष्टाचे कार्डावरहि सहज लिहितां येतात. म्हणून उशीराबद्दल कांहीं सबब नसते व मामलेदार यांस, तगादे पाठविणें भाग पडावें असें कांहीं कारण नसतें. वरिष्ठ कामगारांनीं तयार केलेले पत्रकांत चालू स्थितीची, त्याच वेळच्या गुदस्त सालचे स्थितीशीं, तुलना केलेली असली पाहिजे. (स. ठ. नं. ५७०३–१५.)

५. मार्च व एप्रिल महिन्यांत गव्हांबद्दल तिसरा आणि अखेरचा रिपोर्ट पाठवितांना गहूं नेहमीं परठिकाणीं पाठविण्यांत येतो किंवा कसें व दुसरीं आहाराचीं पिकें, म्हणजे ज्वारी, बाजरी, भात, नागली वगैरे हीं एकंदरींत समाधानकारक आहेत कीं नाहींत हें लिहावें.

## तेरीज.

उत्पन्न गव्हांचे / कापसाचे } लागवडीबद्दल तपशील मौजे

| सन १९१२-१३ सालांतील एकूण क्षेत्र. | सन १९१३-१४ सालांतील एकूण क्षेत्र. | कमी किंवा जास्तीचें कारण. | चालू सालचे क्षेत्राचा तपशील. | | | | गुदस्तसालाशीं तुलना करून पिकाचे आणेवारीबद्दल, हवालाबद्दल किंवा उत्पन्नाबद्दल शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पाणी दिलेलें (अ). | | पाणी न दिलेलें (अ). | | |
| | | | परदेशी (ब). | | देशी (ब). | | |
| | | | प्रकार. | क्षेत्र. | प्रकार. | क्षेत्र. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

(अ) गव्हांबद्दल. (ब) कापसाबद्दल.

दुसरीं पिकें म्हणजे, तीळ, भुईमूग, ऊंस, शिरस व जवस यासंबंधानें कोष्टकें ४ ते ७ गाळावीं.

## मुंबई इलाख्यांत उत्पन्न होणारे पिकांची यादी.

नंबर पिकाचें नांव.

वर्ग १.—मुख्य धान्यें.

१ ज्वारी, जोंधळा, शाळू.
२ बाजरी, सजगुरे.
३ भात, साळ.
४ गहूं, खपली.
५ सातू, जव.
६ मका.
७ कोद्रा, कोद्रू, हरीक.
८ नागली, नाचणी.
९ कांगू, कांग, राळे.
१० वरी, सावा, भगर.
११ बर्टी.
१२ भादली.
१३ इतर.

वर्ग २.—कंडधान्यें.

१ तुरी, तूर.
२ हरभरा, चणे.
३ मूग.
४ उडीद.
५ चवळी.
६ कुळीथ, कुळथी, हुलगे.
७ वाटाणे.
८ मसूर.
९ लाख.
१० वाल, पावटे.
११ मठ, मटकी.
१२ इतर.

वर्ग ३.—फळांच्या बागा व बागाइती उत्पन्न.

(अ) भाजीपाला (कंदमुळें).

१ बटाटे.
२ रताळी.
३ गोराडू, कोन, घोरकन.
४ सुरण.
५ गाजर.
६ मुळा.
६-अ कांदा.
७ इतर.

(ब) हिरव्या भाज्या.

१ कोबी.
२ वांगी.
३ बेलवांगी, टमाटो.
४ मेथी.
५ भेंडी.
६ खरबुज.
७ टरबुज, कलिंगड.
८ इतर.

(क) जनावरांकरितां हिरवी वैरण.

१ विलायती गवत.
२ कडवळ.
३ गिनी गवत.
४ वत्तार.
५ इतर.

(ड) फळझाडें.

१ केळ.
२ आंबा.
३ लिंबू.
४ साखरलिंबू.
५ नारिंग.
६ म्हाळूंग.
७ पपनस, चाकोत्रा.
८ डाळींब.
९ जांब, पेरू.
१० सिताफळ.
११ अननस.
१२ अंजीर.
१३ फणस.
१४ पोपया, पपई.
१५ काजू.
१६ रामफळ.
१७ द्राक्ष.
१८ इतर.

वर्ग ४.—औषधें व कफ आणणारे जिन्नस.

१ तंबाखू.
२ भांग, गांज्या.
३ अफू.
४ काफी, बूंद.
५ चहा.
६ सिंकोना.
७ विड्याचीं पानें.
८ सुपारी.
८-अ ओंबा.
९ इतर.

वर्ग ५.—मसाले.

१ वेलदोडे.
२ मिरची.
३ आलें.
४ मिरीं.
५ हळद.
६ बडीशेप.
७ धणे.
८ जिरे.
९ मेथी.
१० लसूण.
११ चिंच.
१२ इतर.

[illegible]कण पदार्थ.

[illegible] ( तवकील ).

२ इतर.

वर्ग ७.—गूळ.

१ ऊंस.

२ ताड.

३ खजुरी, शिंदी.

४ इतर.

वर्ग ८.—गळिताचीं धान्यें.

१ तीळ.

२ जवस, अळसी.

३ एरंडी.

४ शिरस.

| नंबर | पिकाचें नांव. |
|---|---|
| ५ | खुरासणी, कारळा. |
| ६ | भुईमूग. |
| ७ | बाळंतशेप. |
| ८ | मोहरी. |
| ८-अ | नारळ. |
| ८-ब | कुसुंब. |
| ९. | इतर. |

वर्ग ९.—रंग.

१ नीळ, गुळी.

२ सुरंगी.

३ इतर.

| नंबर | पिकाचें नांव. |
|---|---|
| | वर्ग १०.—तंतू. |
| १ | कापूस. |
| २ | ताग, सण, सनब. |
| ३ | अंबाडी. |
| ४ | जूट. |
| ५ | रिहा. |
| ६ | इतर. |
| | वर्ग ११.—किरकोळ. |
| १ | राजगिरा. |
| २ | रीठा. |
| | वर्ग ११ अ. |
| १ | गवत. |
| २ | सुरु. |
| ३ | बाभळ. |

जन्ममृत्यूचें रा[illegible]

सन १९११ चे खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या, [illegible]

| | | जन्म. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष किंवा स्त्री. | | | | | |
| नंबर. | तारीख. | मुलगा. | मुलगी. | नांव. | बापाचें व आज्याचें नांव. | जात. | शेरा. |
| १ | २ | ३ | ४ | ५-अ | ५-ब | ६ | ७ |
| | १९१३ | | | | | | |
| | जानेवारी. | | | | | | |
| १ | १ ली. | १ | ... | रामू ... | राघू मोहन ... | कुणबी. | |
| २ | ३ री. | ... | | | मकन दुलभ ... | कछी. | मेलेलें उपजलें. |
| | | १ | | एकूण जानेवारींतील जन्म. | | | |
| | फेब्रुवारी. | | | | | | |
| ३ | ९ वी. | ... | १ | सिता ... | कसेन राजासिंग ... | रजपूत. | |
| ४ | १६ वी. | १ | ... | | जानू बापू ... | महार. | |
| | जानेवारी. | | | | | | |
| ५ | १० वी. | ... | १ | रमी ... | लक्ष्मण जगन्नाथ ... | ब्राम्हण. | वेळींच कळविलें नाहीं. |
| | | १ | १ | | | | |
| | | | १ | जानेवारींत नोंदणेंचे राहिलेलें. | | | |
| | | ९ | ७ | डिसेंबरपर्यंत बाकी महिन्याबद्दल आणखी दाखल. | | | |
| | | ७ | ९ | ता. १ जानेवारी पासून ता. ३१ डिसेंबर पर्यंत बेरीज. | | | |

सन १९१३.

व एकूण

मृत्यू.

| नंबर. | तारीख. | नांव व बापाचें नांव, किंवा लग्न झालेली स्त्री असल्यास नवऱ्याचें नांव. | जात. | वय. | पुरुष किंवा स्त्री. पुरुष. | स्त्री. | मरणाचें कारण व शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | १९१३ जानेवारी. | | | | | | |
| १ | १९ वी. | बाळा बिन बापू रावजी ... | कुणबी ... | ५० | १ | ... | श्वास. |
| २ | २० ,, | रामा वल्लद आपा बापू ... | महार ... | २० | १ | ... | देवी. |
| ३ | २१ ,, | श्रीधर नरहर ... | ब्राह्मण ... | २५ | १ | ... | आत्महत्या. |
| | | एकूण ... | जानेवारींतील मृत्यु | | ३ | | नक्कल मामलेदार यांजकडे पाठविला. १-२-१३. पाटील. |
| | फेब्रुवारी. | | | | | | |
| ४ | ६ वी. | मोहिद्दीन वल्लद इमाम ... | मुसलमान. | ६० | १ | ... | माहामारी. |
| ५ | ७ ,, | इनाम बी कोम मोहिद्दीन. | सदर ... | ५० | ... | १ | सदर. |
| ६ | ८ ,, | नरहर गणेश ... | ब्राह्मण ... | ४० | १ | ... | बुडवून (खून). |
| ७ | ९ ,, | सिता कोम नरहर ... | सदर ... | २० | ... | १ | बाळंत होऊन. |
| ८ | १६ ,, | जानू बापूचें मूल ... | महार ... | एक तास. | १ | ... | अशक्त जन्मलें (अपुरे महिन्यांचें). |
| | जानेवारी. | | | | | | |
| ९ | २० | रामा गणेश ... | ब्राह्मण ... | २० | १ | ... | |
| | | | | | ३ | २ | नक्कल मामलेदार यांजकडे पाठविली. १-३-१३. |
| | | जानेवारींत नोंदणेंचे राहिलेलें. | | | १ | | पाटील. |
| | | | | | ३ | १० | |
| | | | | | १० | १२ | तारीख १ जानेवारी १९१४. पाटील. कुळकर्णी. |

## नमुना नंबर १४ बाबत खुलासा.

१. हा नमुना पोलिसपाटलानें ठेवावयाचा आहे. परंतु पोलीसपाटलास लिहितां येत नस[illegible] किंवा पाटलाचे हुकुमाखालीं दुसऱ्या लायक इसमानें, तो लिहिला पाहिजे. हा नमुना रक्षण करण्या[illegible] पोलीसपाटलावर आहे. गांवास पुष्कळ वाड्या असल्या, तर वाडींतील मुख्य इसमाकडून माहिती मिळविण्याची व्यवस्था पाटलानें केली पाहिजे व मधून मधून वाड्यांत स्वत: गेलें पाहिजे. तथापि जेव्हां एका वाडीला स्वतंत्र पोलीसपाटील असतो तेव्हां सदरहू पाटलानें त्याकरितां स्वतंत्र गांवचा नमुना नं. १४ ठेवला पाहिजे.

ही माहिती सॅनिटरी किंवा पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट ह्यांच्याच केवळ उपयोगाकरितां गोळा केली जाते. ह्या नोंदींचा उपयोग वय, वंशावळ वगैरेचा पुरावा म्हणून करण्याकडे सहज आणि वाढत्या प्रमाणांत प्रवृत्ति आहे. परंतु हिंदुस्थानांतील सोमरसेट हाऊसमधील नोंदींच्या पद्धतीशीं जुळणारी पद्धत दुसरीकडे कोठें नाहीं. संमतीचे वयाचा कायदा, आयुष्याच्या विम्याचें वाढतें महत्त्व, कॉलेजप्रवेश वगैर लक्षांत घेतां ही गोष्ट हातांत घ्याव्यास पाहिजे आहे. परंतु आजपर्यंत तसें झालेलें नाहीं. अधिकाऱ्यांनीं तिकडे लक्ष देऊं नये. नोंदींच्या खरेपणाबद्दल वास्तविक फक्त सिव्हिल कोर्टांत जशी तपशीलवार चौकशी केली जाते त्याप्रकारची चौकशी मामलेदार अगर प्रांत यांनीं केल्याचीं उदाहरणें आहेत. तक्रारीचा संभव असेल तेथें अशी चौकशी करूं नये, ती नोंद "संशयात्मक" म्हणून लिहून ठेवावी. परंतु मामलेदार व प्रांत यांनीं कबूल केलेल्या चुका दुरुस्त कराव्यात : मात्र त्याबद्दल लेखी चौकशी करूं नये. [पहा क. २२ (३), १८८९ चा आक्ट ९].

हा नमुना परिपाठांतील आहे. मुलाचें नांवाकरितां वेगळे कोष्टक आखलें आहे, याखेरीज यांत कांहीं एक फरक केलेला नाहीं. नांव दिलें जाईपर्यंत हें कोष्टक कोरें ठेवावें. मुलाचे जन्मानंतर योग्य वेळ गेल्यावर पाटलानें तपास करावा व नांव दाखल करावें. कोष्टक ५-अ. यांत सर्व नांवें लिहिलीं जाईतोंपर्यंत, किंवा मूल नांव ठेवण्यापूर्वीच मयत झालें असल्याशिवाय, हा नमुना कुळकर्ण्यानें तालुक्यास दप्तरीं दाखल होणेंकरितां बिलकूल पाठवूं नये. शाळेचे, विश्वविद्यालयाचे, सरकारी नोकरीचे व परदेशीं गमन करण्यासाठीं दाखला देणेचे बाबतींत पुरावा म्हणून, या रजिष्टराचें महत्त्व वाढतें आहे.

युरोपियन, अँग्लो इंडियन आणि इतर इंडियन नसलेले ब्रिटिश प्रजाजन आणि परकी लोक ह्यांच्या जन्ममृत्यूबद्दल शक्य तितका पूर्ण दाखला असावा म्हणून त्यांच्यामध्यें होणाऱ्या जन्ममरणाच्या नोंदी ह्या नमुन्यांत कराव्यात. ह्या नमुन्यांत असा जन्म अथवा मृत्यू नोंदला गेला म्हणजे मामलेदारानें कलेक्टरकडे उतारा पाठवावा व कलेक्टर ता. ५ माहे ऑक्टोबर सन १९३६ चा जनरल डिपार्टमेंटचा सरकारी ठराव नंबर २५९७ यामध्यें ठरविलेल्या नमुन्यांत मासिक पत्रकाच्या दोन दोन प्रती तयार करील आणि एक प्रत डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ यांचेकडे व दुसरी जन्म, मृत्यु आणि विवाह यांचे रजिस्ट्रार जनरल यांचेकडे पाठवील. जी २९८७—१०-९-३०; २५९७—५-१०-१९३५ व १२-५-१९४९.

२. जात बरोबर लिहिण्याबद्दल काळजी घ्यावी. धंदा म्हणजे जसें कोष्टी, सुतार, ही मेहमींची जात नसते. मुसलमानाचे बाबतींत पंथ, किंवा वर्ग म्हणजे जसें शिया, बोहरी, शेख, असे शब्द मुसलमान शब्दाचे दाखल करावें. इतर राष्ट्रीय प्रजा म्हणजे जसें यहुदी, पारशी, युरोपियन, जे जात मानीत नाहींत, त्यांचे बाबतींत, वर्ग व धर्म, जसें "जर्मन, हबशी," किंवा ख्रिस्ती धर्माचा पंथ माहित असेल तर पंथ, म्हणजे जसें "क्याथॉलिक" असें लिहावें. ख्रिस्ती किंवा इसलाम धर्म स्वीकारलेले इसम हे त्यांचे पूर्वीचे जातीनें न दाखवितां, ख्रिस्ती किंवा मुसलमान असें दाखवावें.

३. वारंवार चूक करण्यांत येते ती ही कीं, मुलाचे बापाचे नांव देण्याचे ऐवजीं आईचे बापाचें नांव देण्यांत येतें. लग्न झालेल्या बायका बाळंतपणासाठीं आपले आईचे घरीं परत जातात असा साधारण प्रघात आहे. तेव्हां "राघू मोहन याचे घरांत झालेली मुलगी" अशा सारख्या नोंदी पुष्कळ वेळां आढळतात. परंतु राघू हा मुलाचे आईचा बाप आहे, मुलाचा बाप नाहीं. जेव्हां मूल अनौरस असेल किंवा जातींत विवाहाची वहिवाट नसेल, तेव्हां आईचे नांव व आईचे बापाचें किंवा आईचें नांव कोष्टक ५-ब यांत दाखल करावें. बापाचें नातें जेव्हां कबूल केलें असेल तेव्हां बापाचें नांव त्याच कोष्टकांत दाखल करावें. कोष्टकांतील नोंदींत सदराची पुनरावृत्ति करूं नये. ३ रे कोष्टकांत मुलाचे सदराखालीं "एक मुलगा," जातीचे कोष्टकांत "जात कुणबी," व वयाचे कोष्टकांत "वय ३०" असें वारंवार आढळते. या नोंदी संक्षिप्त कराव्या व "१" "कुणबी" व "३०" इतकेंच लिहावें. जुळ्या मुलांकरितां प्रत्येक नांवास एक अशा दोन ओळी पुरवाव्या.

४. जेव्हां दांडगाईचा परिणाम मृत्यूंत होईल तेव्हां त्यासंबंधानें एकादा गुन्हा करण्यांत आला आहे, किंवा तो मृत्यु आकस्मिक कारणानें किंवा आत्महत्येमुळें घडला आहे, याबद्दल पाटलाची खात्री होणे पुष्कळ वेळां शक्य नसतें. तथापि मृत्यूनंतर प्रथमचे थोडे दिवसांत ज्या गोष्टी कळून येतील त्यावरून निर्णय ठरवून त्यानें रजिष्टर भरावें. मॅजिस्ट्रेट किंवा सेशन कोर्ट यांजकडून निकाल होईपर्यंत वाट पाहूं नये.

[illegible]ले मृत्यूचे वर्ग फरकानें दाखविले पाहिजेत, ते असे :—

| | |
|---|---|
| आत्महत्येमुळें. | रानटी जनावरामुळें. |
| बुडून. | सर्प चावल्यामुळें. |
| फांस लावून. | पिसाळलेला कुत्रा किंवा कोल्हा चावल्यानें. |
| जखमेनें. | रेलवे अपघातानें. |
| विषप्रयोगानें. | इतर कारणानें. |

जेव्हां मृत्यू आत्महत्येमुळें घडला असें शक्य तितक्या रीतीनें ठरविण्यांत येईल, तेव्हां, जबरदस्तीचा प्रकार म्हणजे बुडून, फांस लावून, विषप्रयोगानें वगैरे, यांपैकी कोणत्या प्रकारचा उपयोग करण्यांत आला, हें दाखविण्याचें कारण नाहीं.

५. स्वाभाविक मृत्यूचें कामीं मरणाचीं नेहमींचीं कारणें, आणि विशेषेंकरून भूल जन्मतांना किंवा जन्मल्यानंतरचे एकांचे मृत्यू यांचीं कारणें दाखल केलीं पाहिजेत. साथींपासून म्हणजे जसें महामारीनें, देवीनें, प्लेगानें, गोवरानें होणारे सर्व मृत्यू तसें दर्शविलें पाहिजेत. जेव्हां मूल मेलेलें उपजेल तेव्हां मृत्यूचे कोष्टकांत त्याची नोंद करण्याचें कारण नाहीं. जन्माचे नोंदीसमोर "मेलेलें जन्मलें", अशी टीप लिहावी. ते एकूण जन्म या सदरीं मिळवितां कामा नये. एक तासपर्यंत जरीं तें जिवंत असलें तरी तो मृत्यू मृत्यूच्या कोष्टकांत नोंदला पाहिजे व ते जन्म व मृत्यू यांत दोंकडे धरलें जातें.

६. पूर्वी योग्य तारखेस दाखल झाला नाहीं असा एकादा जन्म किंवा मृत्यू पाटलास किंवा तपासणी करणारे कामगारास आढळून आला तर तो चालू महिन्यांत शेवटले नोंदींखालीं दाखल करून घेतला पाहिजे. परंतु नक्की महिना व तारीख समजली असेल तर ती तारीख को. २ व ९ यांत लिहावी. व ती नोंद चालू महिन्याच्या एकूण नोंदींत धरून घ्यावी. ज्या ठिकाणीं चूक झाली असेल त्या ठिकाणीं मागील रजिष्टरीं चुकीबद्दल दाखला ठेवावा.

७. हा नमुना इंग्रजी वर्षानें म्हणजे जानेवारी ते डिसेंबर अशा वर्षानें ठेवण्यांत येतो. प्रत्येक महिन्याचे अखेरीस जन्म व मृत्यूच्या बेरजा देऊन महिन्याचे सर्व नोंदींची पूर्ण नक्कल पुढील महिन्याचे १ ले तारखेस मामलेदार यांजकडे नियमित पाठविली पाहिजे. (मां. न. नं. १४ वरील खुलासा पहा.) सर्व नांवांची नक्कल करणें वगैरे बहुतेक आवश्यक आहे असें वाटत नाहीं. परंतु तसें केल्यास न. नं. १४ हरवला असतां तें एक न. नं. १४ ची महत्त्वाची नक्कल होईल. कारण निष्काळजी पाटील नेहमीं जन्ममृत्यू हरवून टाकतात.

८. हे रजिष्टर अर्थात् कायम ठेवण्याचें आहे. परंतु ज्या सालचें तें रजिष्टर असेल त्या सालचे अखेरीपासून दोन वर्षें होईतों पावेतों तालुक्याचें रेकॉर्डांत पाठवूं नये. जर तें एकदम पाठविलें तर देवीडॉक्टर किंवा हें पत्रक तपासणी-साठीं गांवीं जाणारे दुसरे कामगारांस त्याची तपासणी करितां येणार नाहीं. सबब तारीख ३१-१२-१४ अखेरचें रजिष्टर तारीख १-१-१७ पर्यंत गांवीं ठेवलें पाहिजे. त्यानंतर तें तालुक्यास पाठविलें पाहिजे.

९. कांहीं गांवांत आरोग्यरक्षणासंबंधीं बुकें (सॅनिटरी इन्स्पेक्शन बुकें) ठेवण्यांत आलीं आहेत.

# गांवचा नमुना नंबर १४-स.

देवी काढल्याबद्दलचें रजिष्टर मौजे नहीनांव, तालुका बळसार, सन १९१३.

| नंबर. | नांव. | बापाचें नांव, आडनांव व राहण्याचें ठिकाण. | जात. | पुरुष किंवा स्त्री. | | वय. | | | देवी काढल्याची तारीख. | पूर्वी देवी काढल्या होत्या. | पूर्वी देवी काढल्या नव्हत्या. | देवीडॉक्टरची सही. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष. | स्त्री. | एक वर्ष व त्याचे आंतील. | एक वर्षावर व ६ वर्षांपर्यंत. | सहा वर्षांचे वर. | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

हा नमुना देवीडॉक्टर यांनीं पाटलाचे मदतीनें भरावा.

गांवचा नमुना नंबर १४-ब.

इन्फ्लुएंझा—पीतज्वर*
आपोआप देवी†
पटकी†
प्लेग†

} बद्दल रजिष्टर, मौजे नहीगांव, तालुका बलसार, सन १९१३.

| अनुक्रम नंबर. | लागल्याची तारीख. | लागले इसमाचें नांव, बापाचें नांव व रहाण्याचें ठिकाण. | पुरुष किंवा स्त्री. | | वय. | जात. | पूर्वी देवी काढल्या होत्या किंवा नाहीं? ‡ पूर्वी प्लेगच्या देवी टोचल्या होत्या किंवा नाहीं? § | | तारीख. | | शेरा. आजार दुसरे गांवाहून आणला किंवा कसें? आणला असेल तर कोणते ठिकाणाहून? औषधोपचार चालू आहेत कीं नाहीं? किंवा काय उजवीज चालू आहे? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष. | स्त्री. | | | होय. | नाही. | दुरुस्तीची. | मृत्यूची. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

* साथीचे स्वरुप साले असल्याचे जाहीर झालेला इतर कोणताहि "रोग". † जें कोणतें पाहिजे असेल तें. ‡ आपोआप देवीचे बाबतींत. § प्लेगचे बाबतींत.

## गांवचा नमुना नंबर १४-ब बाबत खुलासा.

१. जेव्हां एकादी सांथ उत्पन्न होते, तेव्हां या नमुन्यांत नोंदी लिहिण्याची जरुरी पडते. तिन्हीं प्रकारचे सांथीबद्दल एकच नमुना आहे. जो आजार नोंदावयाचा असेल तेवढेंच सदर ठेवून दुसरी टाकावीं. सांथ सुरू होतांच केवळ मृत्यूबद्दलच नव्हे, तर किती इसम लागले व दुरुस्त झाले, याचे संख्येचा माहितीचे पाटलानें मिळविली पाहिजे. लागलेले इसमास पूर्वी देवी काढल्या होत्या कीं नाहीं (देवीचे बाबतींत) व देवी टोंचल्या होत्या कीं नाहीं (प्लेगचे बाबतींत) याबद्दल काळजीपूर्वक तपास करून कोष्टकें ८ व ९ भरणें फार महत्वाचें आहे. लागलेला इसम बरा झाला कीं नाहीं हें समजण्यापूर्वीच त्यानें गांव सोडलें, तर कोष्टक १०, ११ यांत "समजलें नाहीं" असें लिहावें.

२. दुर्दैवानें एकाच सालीं एकाहून जास्त आजार गांवांत उत्पन्न झाले, तर दुसरें किंवा तिसरें रजिष्टर सुरू करणेचा प्रसंग येईल. वेगवेगळ्या आजाराचे तपशिलाची एके ठिकाणीं मिसळ करूं नये.

३. ज्या महिन्यांत कोणत्याहि साथीच्या रोगाची लागण किंवा मृत्यू नसेल, त्या महिन्याचे अखेरीस पाटलानें कोरे रजिष्टरावर छोटी सही केली पाहिजे. असे करण्याचा हेतू इतकाच कीं, रजिष्टरांत नोंदी नाहींत त्या पाटलाचे कसुरीमुळें नसून, आजाराचे अभावामुळें नाहींत असें दिसून यावें. तसेंच सालअखेरीस रजिष्टराची बेरीज द्यावी. रजिष्टर कोरें असेल तर अर्थात् एकूण बेरीज असणार नाहीं. परंतु कांहीं नोंदी असल्या तर एकूण बेरीज केली पाहिजे व बरे झाले इसमाचे व मयत झाले इसमाचे बेरीजेस पूर्वी देवी काढल्या होत्या किंवा नव्हत्या असे विभाग केले पाहिजेत. या योगानें देवी काढलेले व प्लेगची लस टोंचलले यांच्या मध्यें दुरुस्तीचें किंवा मरणाचें मान, जास्त किंवा कमी अनुकूल आहे हें समजून येतें. ही एकूण बेरीज गां. न. नं. १४ चे एकूण बेरजेबरोबर मामलेदार यांजकडे ता. न. नं. २१ भरण्यासाठीं पाठविली पाहिजे.

## गांवचा नमुना नंबर १४-क.

रोजचा रिपोर्ट (पटकीबद्दल), मौजे नहीगांव, तारीख ७-१०-१२.

| हल्लीची सांथ सुरू झाल्याची तारीख. | नवीन. | | | | चालू सांथ सुरू झाल्यापासून एकूण बेरीज. | | | | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागले. | | मेले. | | लागले. | | मेले. | | |
| | पुरुष. | स्त्री. | पुरुष. | स्त्री. | पुरुष. | स्त्री. | पुरुष. | स्त्री. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| २८-९-१२ | ३ | २ | १ | १ | १३ | ८ | ६ | ४ | |

(सही)

पाटील.

## नमुना नंबर १४-क बाबत खुलासा.

य गांवीं अस्तित्वांत आहे तोंपर्यंत नवीन लागण किंवा मृत्यू होईल अशा प्रत्येक दिवशीं हा रिपोर्ट उपकडे पाठविला पाहिजे. हा नमुना पोष्टाचे कार्डाएवढें नमुन्यांत तयार केलेला आहे, अशासाठीं कीं पोष्टाचें वळण उपलब्ध असेल तेथें सर्व्हिस पोष्टकार्डावर तो लिहितां किंवा छापतां यावा.

२. गांवांत आजार उत्पन्न झाला असा योग्य कारणानें संशय उत्पन्न झाला कीं, लागलीच पहिला रिपोर्ट पाठविणें विशेष महत्त्वाचें आहे. पुढें तो आजार बिनसांथीचा आहे असें आढळून आलें तर रिपोर्ट परत घेण्यास हरकत नाहीं. तु मुळींच रिपोर्ट पाठविला नाहीं तर मामलेदार यांस औषधोपचारासंबंधीं मदत करण्याची किंवा सल्लामसलत देण्याची जबाबदारी करतां येणार नाहीं.

३. साल अखेरीस गां. न. नं. १४ चीं बेरीज, व गां. न. नं. १४-ब वरून प्रत्येक आजाराबद्दल वेगळी बेरीज, शा बेरजा पाटलानें मामलेदार यांजकडे रिपोर्टानें पाठविल्या पाहिजेत. हे रिपोर्ट तारीख १ ते १० जानेवारीचे दरम्यान पाठविले पाहिजेत.

जेव्हां सांथीचा रोग नसतो तेव्हां गां. न. नं. १४ चे माहेवारी नकलेवर त्याबद्दल सर्टिफिकेट द्यावें. (पान १९५) (ठ. नं. ६०५७–११, ७२८२–१९) जेव्हां प्लेगाचे साथींत लस टोंचली जाते तेव्हां लस टोचणारे अधिकाऱ्यांनीं फार्म अ रावा (ज. ४९५३-१९ यांत मंजूर झालेला). जे अधिकारी गां. न. नं. १४ लिहितात त्यांनीं फार्म ब (खालीं दिलेला) भरावा आणि सांथीच्या अखेरीस तो डेप्युटी सॅनिटरी कमिशनरकडे पाठविणेंसाठीं मामलेदाराकडे पाठवावा.

### फार्म ब.

गांव तालुका

लोकसंख्या महिन्याचें पत्रक.

(अ) पहिल्यानें इसम लागल्याची तारीख ( )

(ब) शेवटीं ,, ,, ( )

(क) पहिल्यानें टोंचण्याची तारीख ( )

(ड) अखेरची टोंचण्याची तारीख ( )

(इ) ड नंतर टोंचणें

| एकूण टोंचलेल्या इसमांची संख्या. | न टोंचलेल्याची संख्या. | टोंचलेले. | | न टोंचलेले. | | बाहेरगांवीं गेले. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागण. | मृत्यू. | लागण. | मृत्यू. | टोंचलेले. | बिन टोंचलेले. |
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | |
| | | | | | | | |

## गांवचा नमुना नंबर १४-ड.

पशुचे आजाराबद्दल पत्रक, मौजे नहीगांव, तालुका बलसार.

( पशुवैद्यकी खात्याचा नमुना नंबर १. )

| रोग झालेले जनावरांचा वर्ग किंवा जात. | रोग प्रथम उद्भवल्याची तारीख. | गेल्या रिपोर्टाचे तारखेपर्यंत लागलेले जनावरांची संख्या. | गेल्या रिपोर्टाचे तारखेपर्यंत मेलेले जनावरांची संख्या. | चालू आठवड्यांत या रिपोर्टाप्रमाणें नवीन लागलेले जनावरांची संख्या. | चालू आठवड्यांत या रिपोर्टाप्रमाणें मेलेले जनावरांची संख्या. | रोगाचें मराठींत नांव. | लक्षणें आढळून आली असतील तीं. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | पशुवैद्यकी-खात्याचे कामगार यांचे उपचार, भेटी, वगैरेसंबंधीं. |

### गांवचा नमुना नंबर १४-ड बाबत खुलासा.

जेव्हां कोणत्याहि पाळीव पशूंचा रोग उत्पन्न होतो तेव्हां हा रिपोर्ट पाठवावा लागतो. अती मोठी महत्वाची गोष्ट ही कीं, गांवांत रोग उत्पन्न झाला आहे असें गांवकामगार यांस कळेल त्याच दिवशीं रिपोर्ट रवाना केला पाहिजे. व्हेटरनरी असिस्टंट सर्जनकडे जनावरांचे रोगाचा रिपोर्ट पाठविणेंस उशीर होऊं नये म्हणून जनावरांचे रोगांबद्दल जो रिपोर्ट मामलेदार साहेबाकडे पाठविला जातो त्याचबरोबर त्या रिपोर्टाची एक नक्कल व्हेटरनरी सर्जनकडे पाठविण्याची गांवचे पाटलानें तजबीज करावी. ( ठ. न. नं. ५८३७-२८ ता. ७-११-३० ). या पहिल्या रिपोर्टानंतर रोगाची स्थिति दाखविणारे पुढील रिपोर्ट प्रत्येक शनिवारीं पाठविले पाहिजेत. पहिला रिपोर्ट दाखल झाल्याबरोबर मामलेदार यांनीं शक्य असेल तीं औषधोपचारिक मदत देण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे आठवडे रिपोर्ट पाठवितां यावे, म्हणून पाटलानें नवीन लागण व मृत्युबद्दल एक टिपणबूक ठेवावें. पूर्वी रिपोर्ट केलेले आंकडे पुन्हा दाखल करूं नयेत. परंतु पूर्वीचे आठवड्यांत लागले म्हणून रिपोर्ट केल्यापैकीं बहुतकरून कांहीं मयत झाले असतील. प्रत्येक आठवडे-रिपोर्टांत चालू तारखेपर्यंत एकूण बेरीज द्यावी. नवीन लागण होते ती कोष्टक ५ यांत दाखल करावी. पाटलाजवळ छापील नमुने शिल्लक नसतील तर त्यानें या नमुन्याप्रमाणें हातानें लिहून रजिष्टर तयार करावें व लागलेले वगैरे जनावरांची संख्या दाखविण्यासाठीं तयार ठेवावें.

गुरांचे नेहमींचे सांसर्गिक रोगांचीं लक्षणें दाखविणारा छापील नमुना आहे.

## गावचा नमुना नंबर १५.

गुरेढोरें आणि साधनें यांचें पांचसालीं पत्रक, मौजे.....तालुका.....

| १ घरच्या अनुक्रम नंबर. | २ घराच्या किंवा कुटुंबाच्या मुख्याचें नांव. | बैल व गाई. नर. ३ उत्पत्तीचे बैल म्हणजे उत्पत्तीच्या कारणांसाठीच ठेवलेले अथवा उपयोगांत आणलेले तीन वर्षांवरील खच्ची न केलेले नर. | ४ कामाचे बैल म्हणजे फक्त कामासाठींच ठेवण्यांत आलेले बैल व तीन वर्षांवरील खच्ची न केलेले नर. | ५ उत्पत्तीसाठीं अथवा कामासाठीं उपयोगांत नसलेले तीन वर्षांवरील खच्ची न केलेले व खच्ची केलेले बैल. | ६ तीन वर्षांवरील एकूण नर. | मादी. ७ उत्पत्तीच्या गाई म्हणजे, उत्पत्तीसाठीं अथवा दुधासाठीं ठेवलेल्या तीन वर्षांवरील गाई. दुभत्या. | ८ आटलेल्या | ९ न व्यालेल्या. | १० एकूण. | ११ कामासाठींच उपयोगांत आणलेल्या तीन वर्षांवरील गाई. | १२ कामाच्या किंवा उत्पत्तीच्या कारणासाठीं उपयोगांत न येणाऱ्या तीन वर्षांवरील गाई. | १३ तीन वर्षांवरील एकूण माद्या. | लहान जनावरें. १४ एक वर्षाखालील नर. | १५ एक वर्षाखालील मादी. | १६ १ ते ३ वर्षांचीं नर. | १७ १ ते ३ वर्षांचीं मादी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | |

| म्हशी. नर. १८ उत्पत्तीचे रेडे म्हणजे उत्पत्तीच्या कारणांसाठीं ठेवले किंवा उपयोगांत आणलेले तीन वर्षांवरील खच्ची न केलेले नर. | १९ कामाचे रेडे म्हणजे फक्त कामासाठींच ठेवण्यांत आलेले खच्ची केलेले किंवा खच्ची न केलेले तीन वर्षांवरील नर. | २० उत्पत्तीसाठीं अथवा कामासाठीं उपयोगास न येणारे खच्ची केलेले अथवा खच्ची न केलेले तीन वर्षांवरील नर. | २१ तीन वर्षांवरील एकूण नर. | माद्या. २२ उत्पत्तीच्या म्हशी म्हणजे उत्पत्तीसाठीं किंवा दुधासाठीं ठेवलेल्या तीन वर्षांवरील सर्व म्हशी. दुभत्या. | २३ आटलेल्या | २४ न व्यालेल्या. | २५ एकूण | २६ फक्त कामासाठींच उपयोगांत आणलेल्या तीन वर्षांवरील म्हशी. | २७ कामाच्या किंवा उत्पत्तीच्या कारणांसाठीं उपयोगांत न येणाऱ्या तीन वर्षांवरील म्हशी. | २८ ३ वर्षांवरील एकूण माद्या. | लहान जनावरें. २९ १ वर्षाखालील. नर. | ३० १ वर्षाखालील. मादी. | ३१ १ ते ३ वर्षांची. नर. | एकूण गुरांची |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | |

गांवचा नमुना नंबर १५—चालू.

| घराचा अनुक्रम नंबर. | घराच्या किंवा कुटुंबाच्या मुख्याचें नांव. | मेंढरें. | | | शेरडें. | | | घोडे व घोड्या. | | | | | | खेचरें. | गाढवें. | | उंट. | डुकरें. | एकूण चतुष्पाद जनावरें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक वर्षापर्यंतचीं. | एक वर्षावरील. | | एक वर्षापर्यंतचीं. | १ वर्षावरील. | | ३ वर्षांवरील घोडे. | ३ वर्षावरील. घोड्या. | लहान जनावरें. | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | १ वर्षावरील. | | १ ते ३ वर्षेपर्यंतचीं. | | | | | | | |
| | | | नर. | मादी. | | नर. | मादी. | | | नर. | मादी. | नर. | मादी. | | नर. | मादी. | | | |
| १ | ३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४६ | ४७ | ४८ | ४९ | ५० | ५१ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

| घराचा अनुक्रम नंबर. | कोंबड्या. | कोंबडे. | कोंबडीचीं पिलें. | एकूण. | बदकें (मादी). | नर बदकें. | बदकाचीं पिलें. | एकूण. | एकूण कोंबडीं बदकें. | शेतकी. | | | | यंत्रें आणि अवजारें. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोंबडीं, बदकें. | | | | | | | | | नांगर. | | गाड्या. | | उंसाचे चरक. | | | पाणी देण्याच्या कारणासाठीं पंप असलेली तेलाचे योगान चालणारीं इंजिनें. | ट्युब-विहिरी-साठीं विजेचे पंप. | ट्रॅक्टर. | तेलावर चालणारीं इंजिनें व वाफेवर चालणारीं इंजिनें. | पाणी काढण्याचीं साधनें. | | | | शेरे. |
| | | | | | | | | | | लांकडी. | लोखंडी. | बसण्याच्या. | ओझ्याच्या. | विजेवर चालणारे. | बैल जुपून चालविण्यांत येणारे. | | | | | | रहाटगाडगें. | मोटा. | हातमाग. | तेलाचे घाणे. | |
| | | | | | | | | | | | | | | | लांकडी. | लोखंडी. | | | | | | | | | | |
| ५२ | ५३ | ५४ | ५५ | ५६ | ५७ | ५८ | ५९ | ६० | ६१ | ६२ | ६३ | ४६ | ६५ | ६६ | ६७ | ६८ | ६९ | ७० | ७१ | ७२ | ७३ | ७४ | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## गांवचा नमुना नंबर १५ बाबत खुलासा.

[illegible] नमुना परिपाठांतला आहे. हा दर पांचवे वर्षी म्हणजे १९१५-१६, १९१९-२०, (स. ठ. नं. ६३६८-१६) [illegible]रण्यास पात्र होतो. हा नमुना तारीख १५ जानेवारीचे आंत सुरू केला पाहिजे व महिनाअखेरीचे आंत पुरा क[illegible]न त्याचें तेरीज मामलेदार यांजकडे तारीख १ फेब्रुवारी रोजीं बक्तशीर पाठविलें पाहिजे. कधींकधीं जनावरें दुसरे [illegible] चारणीस पाठवितात. या बाबतींत नियम असा असे कीं, जेवढीं गांवचीं जनावरें, तेवढींच या नमुन्यांत दाखल [illegible]ण्यांत येऊन, परगांवचीं चारणासाठीं आलेलीं जनावरें सोडून देण्यांत येत असत. यावरून अशी कल्पना होई कीं दुसरे ग[illegible]चा कुळकर्णी गांवीं नसलेल्या जनावरांची माहिती बरोबर धरून घेतो. परंतु तत्त्वाप्रमाणें पाहिलें तर ही निव्वळ चूक [illegible]हे. मनुष्यांचे खानेसुमारीचे वेळीं प्रत्यक्ष हजर असतील तितकीं माणसें नेहमीं दाखल करून घ्यावीं लागतात. [illegible]नावरांसंबंधानें गांवीं नसले जनावरांच्या नोंदी बरोबर करणें जाणत अडचणीचे आहे. तीं जिवंत आहेत कीं मेलीं आहेत. ह[illegible]याचे मालकास देखील माहीत नसतें व पुष्कळ वेळां त्यांस बरोबर माहितीहि सांगतां येत नाहीं. परंतु प्रत्यक्ष हजर [illegible]सणारे जनावरांचे कामीं अशी अडचण नसते जेव्हां चारणीसाठीं म्हणून पुष्कळ जनावरें गांवीं हजर असतील व तीं [illegible]चीं नसतील, तेव्हां ही गोष्ट शेऱ्याचे कोष्टकीं नमूद केली पाहिजे. सर्व सरकारी व म्युनिसिपालिटीचीं जनावरें यांचा समावेश केला पाहिजे.

२. कोणाचे मालकीचे नव्हत असे देवास अर्पण केलेले व मोकार सोडलेले बिनवडविलेले बैल, पायघ्याशीं दाखल [illegible]वे. घरविरहित अशीं जनावरें गांवचे हद्दींत आहेत कीं काय, याचा तपास पाटलानें खानेसुमारीचे वेळीं करावा. घ[illegible]विरहित म्हणजे फिरतें गुराखी व धनगर यांचे ताब्यांतील जनावरें, मेंढरें, वगैरे जीं रात्रीं गांवचे घरवस्तींत येत नाहींत.

३. नांगर व [illegible]ख्या या सदरांत मोडके व निरुपयोगी असे नांगर किंवा अशा गाड्या दाखल करूं नयेत. फक्त [illegible]पयोगी असतील तितकेच नग दाखल करावे.

४. ज्या गांवीं गाढवें, खेचरें, उंट व हत्ती आढळून येतील त्या गांवीं तीं जनावरें दाखल करावीं. गांवांत अशीं [illegible]नावरें नसलीं तर फाजील कोष्टकें आखूं नयेत व केवळ थोडींच असतील तर शेऱ्याचे कोष्टकीं तीं दाखल करावीं. ज्या गांवीं मोठा आढळून येतील त्या गांवीं त्या आसन (२९) मध्यें दाखल कराव्या आणि त्या लोखंडी किंवा चामड्याच्या [illegible]त हें शेऱ्याच्या आसनांत स्पष्टपणें निर्दिष्ट करावे. ज्या गांवांत त्या नसतील तेथें हें आसन आंखण्याचें कारण नाहीं. [illegible]सतील तर आसन ७१ व ७२ गाळण्यांत यावी.

चराईची फी बिनचुकपणें आकारिली जाईल अशी खात्रीची तजवीज व्हावी म्हणून जंगल खात्याच्या सल्लामसलतीनें [illegible]क्टर साहेब फर्मावतील अशा गांवांतील सर्व जनावरांची खानेसुमारी गांवकामगारानें केली पाहिजे. सदरहू खानेसुमारीचे [illegible]कडे दरेक वर्षीत जूनमध्यें चालू तारखेपर्यंत आणण्यांत आले पाहिजेत. सदरहू खानेसुमारींत प्रत्येक मालकाचें नांव, [illegible] धारण करीत असलेलें क्षेत्र व त्याच्या जनावरांची संख्या इतक्या गोष्टी दाखविलेल्या असल्या पाहिजेत.

जेव्हां रेंज आणि राऊंड फॉरेस्ट अंमलदार आपआपल्या चार्जमधील जनावरांची खानेसुमारी ताडून पाहून ती बिनचूक [illegible]ण्याकरितां कामगारांस तसें फर्मावतील तेव्हां गांवकामगारांनीं पहाटेच्या वेळीं जंगलच्या गांवांतील सर्व जनावरें [illegible]का ठिकाणीं जमविलीं पाहिजेत.

५. कोष्टक ७३ यांत गांवचे स्थितीसंबंधीं जी माहिती वेळोवेळीं दाखल करण्याचा हुकूम होईल, तीं दाखल करावीं. [illegible]ती माहिती म्हणजे हातमाग, तेलाचे घाणे, वाफेनें व तेलाचे योगानें चालणारी यंत्रें, उंसाचे चरक व कढया ( लाकडी व [illegible]खंडी या करितां निरनिराळ्या माहिती ) वगैरे स्थानिक धंद्याचे मानानें दाखल करावे, म्हणून कदाचित हुकूम होण्याचा [illegible]व असतो.

## गांवचा नमुना नंबर १६.

पाण्याचे पुरवठ्याबद्दल पत्रक, मौजे नहीगांव, तालुका बलसार, सन १९१२-१३.

| अनुक्रम नंबर | पाण्याचे पुरवठ्याची साधनें. | ठिकाण. | पक्की किंवा कच्ची. | ज्या कारणाकरितां उपयोग करण्यांत येत असेल तें कारण. | सरकारी किंवा खाजगी. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | आड ... | गांवठाण–गोविंद दाजीचे घरांत. | पक्का ... | पिण्यासाठीं ... | खासगी ... | |
| २ | पायऱ्यांचीं विहिर. | सदर–आत्माराम गोविंदचे आवारांत. | पक्की ... | पिण्यासाठीं व पिकांस पाणी देण्यासाठीं. | सदर ... | मुख्य साधन. |
| ३ | विहिर बिनपायऱ्यांची. | सदर–देसाई यांचे वाड्यांत. | सदर ... | पिण्यासाठीं ... | सदर ... | |
| ४ | सदर, सदर | सदर–माहारवाड्यांत ... | सदर ... | फक्त माहार लोकांस पाणी पिण्याकरितां. | लोकलफंड ... | |
| ५ | सदर, सदर. | सदर–हरी नारायणाचे घराजवळ. | कच्ची ... | धुण्यासाठीं ... | खासगी ... | |
| ६ | विहीर पवनचक्कीसहित. | सदर–दवाखान्यांचे कांपाउंडांत. | पक्की ... | पिण्यासाठीं व पिकांस पाणी देण्यासाठीं. | लोकलफंड ... | मुख्य साधन. |
| ७ | तलाव ... | सदर–ब्राह्मणआळीजवळ. | सदर ... | धुण्यासाठीं व पिकांस पाणी देण्यासाठीं. | सरकारी, क्षेत्र ½ एकर. | |
| ८ | विहीर हळासह. | सर्व्हे नंबर २-अ ... | सदर ... | पिकांस पाणी देण्यासाठीं व जनावरांस पाणी पाजण्यासाठीं. | सरकारी ... | |
| ९ | विहीर बिनपायऱ्यांची. | सर्व्हे नंबर ८ ... | कच्ची ... | उपयोगांत नाहीं (पडली असल्यामुळें). | खासगी ... | |
| १० | ढकुडी (उक्ती). | सर्व्हे नंबर १० ... | सदर ... | पिकांस पाणी देण्यासाठीं. | सदर ... | |
| ११ | भुडकी ... | सर्व्हे नंबर १२ ... | सदर ... | सदर ... | खासगी, (तगाईची). | |
| १२ | तलाव ... | सर्व्हे नंबर १८ ... | सदर ... | सदर ... | सरकारी, एकर १०-२९. | |
| १३ | नाला ... | गांवच्या हद्दीवर ... | | पिकांस पाणी देण्यासाठीं व गुरांस पाणी पाजण्यासाठीं. | सरकारी ... | |

| | | पिकास पाणी देण्यासाठीं. | | | | | | मनुष्यांस पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठीं पण पिकासाठीं नव्हे. | | जनावरांसाठीं, धुण्यासाठीं व इतर कारणांसाठीं पण पिकांस पाणी देण्यासाठीं किंवा माणसांस पिण्यासाठीं नव्हे. | | ( ३-ब आणि क व ४-ब आणि या आसनांत नोंदलेल्यांशिवाय इतर ) निरुपयोगी. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पक्के. | | | कच्चे. | | | | | | | नादुरुस्त होऊन पडलेले. | | इतर कारणानें. | |
| | | प्रत्यक्ष उपयोगांत असलेले. | चालू स्थितींत असलेले पण उपयोगांत नसलेले. | टाकलेले. | प्रत्यक्ष उपयोगांत असलेले. | चालू स्थितींत असलेले पण उपयोगांत नसलेले. | टाकलेले. | पक्के. | कच्चे. | पक्के. | कच्चे. | पक्के. | कच्चे. | पक्के. | कच्चे. |
| १ | २ | ३-अ | ३-ब | ३-क | ४-अ | ४-ब | ४-क | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| अ | सरकारी कालवे ... | | | | | | | | | | | | | | |
| ब | खाजगी कालवे ... | | | | | | | | | | | | | | |
| क | तळीं व बंधारे ... | | | | | | | | | | | | | | |
| ड | विहिरी, मुडकी वगैरे ... | | | | | | | | | | | | | | |
| इ | इतर साधनें धेकुडी, ( तेल, वाफ किंवा वारा यांच्या शक्तीनें चलणारे ) पंप. | | | | | | | | | | | | | | |

टीप.—उपयोगांत असलेली विहीर (हींत मुडकीचाहि समावेश होतो) म्हणजे लगत पूर्वीच्या १२ महीन्यांच्या मुदतींत शेतातील पिकांस पाणी देण्यासाठीं ज्या विहीरीतून पाणी काढण्यांत आले असेल ती विहीर होय.

## गांवचा नमुना नंबर १६ बाबत खुलासा.

१. हा नमुना ५ वर्षांनीं एकदां तयार करावयाचा आहे, व यापुढील नमुना १९२२-[illegible] करण्यास पात्र होईल. (ठ. ५७५६-२१-१२-२२).

ज्या सालांत तो तयार करावयाचा असतो त्या सालीं तारीख ३१ माहे डिसेंबरचे पूर्वी तो तयार केला पाहिजे, व सर्कल इन्स्पेक्टर व दुसरे कामगाराचे तपासणीसाठीं गांवीं एप्रिल अखेरपर्यंत राहिल्यावर, त्याचें तेरीज मामलेदार यांजकडे तारीख १० मेचे आंत, व सर्व जिल्ह्याचें पत्रक शेतकी खात्याचे डायरेक्टर साहेब यांजकडे तारीख ३१ मेचे पूर्वी पोहोंचलें पाहिजे.

२. प्रथमारंभीं ही माहिती बहुतकरून एखादी हकिगत सांगावी अशासारखे नमुन्यानें जुळविण्यांत येते. पाण्याचीं साधनें बगळलीं जाऊं नयेत म्हणून कुळकर्ण्यानें प्रतमत: गांवठाण घ्यावें, त्याचे भाग करावे, प्रत्येक भाग तपासावा, व गांवठाणांतील सर्व साधनें संपेतोंपर्यंत प्रत्येक भागा भागाची माहिती टिपून घ्यावी. नंतर त्यानें सर्व्हे नं. १ पासून आरंभ करून अखेर नंबरापर्यंत फेरी करावी. फेरी करण्याचे श्रम दुबार न पडावे म्हणून ही तपासणी पीक-पाहणीबरोबर करणें कुळकर्ण्यास फार सोयीचें आहे. सर्व गांव पुरे होतांच गांवचे लोकाचीं पाणी पिण्याचीं मुख्य साधनें कोणतीं आहेत, तीं शेऱ्याचे कोष्टकीं लिहावीं. एकादे तलावाचा किंवा विहिरीचा उपयोग पिकास पाणी देण्याचे कामीं करण्यात येत असेल तर एकर अजमासानें दाखल करावे. अर्थात हें क्षेत्र दरसाल बदलण्याचा संभव आहे. व नक्की पाणी दिलेलें क्षेत्र नमुना नंबर १२ यांत देण्यास येतें. परंतु या नमुन्यांतील दाखल्याचा उद्देश बागायतीचीं मोठीं साधनें कोणतीं, व लहान साधनें कोणतीं, इतकेंच दाखविण्याचा आहे. फक्त ठोक आकड्यांचीच आवश्यकता असते. नवीन विहिरी व तलाव, विशेषेंकरून तगाईचे पैशानें बांधलेले, हे सर्कल इन्स्पेक्टर यांस नकाशांत दाखल करावे लागतात.

३. मडकी म्हणजे हातानें किंवा उचलून घेण्याचें एकादे प्रकारचे साधनानें पाणी वर काढणेंसाठीं ओढ्याचे कांठीं केलेली पोकळी व आड म्हणजे शेंदून पाणी काढण्याची अरुंद अशी बाटोळी विहीर. ढेकुडी (उक्ती) हें एक पाणी उचलून घेण्याचें साधन आहे. पाण्यांत डोल बुचकळण्याचे भोकावर किंवा तलावावर फळी घालून त्यावर कधीं कधीं दोन इसम उभे राहून हातांनी डोल वर उचलून घेतात, किंवा कधीं कधीं उभ्या बांशाचे माथ्यावर एक आडवा बांसा, कांड्याप्रमाणें बसवूनहि पाणी वर घेतात. पाट म्हणजे पाण्याचा ओघ, स्वाभाविक लहान ओढा, किंवा ओढ्यास नेहमीं बंधारा घालून पिकास पाणी नेण्यासाठीं केलेला पाट. पक्का म्हणजे विटांनीं किंवा दगडांनीं चुन्यांत बांधलेला, किंवा तलावाचे बावतींत फाजील पाणी बाहेर जाण्यासाठीं बांधलेल्या सांडी किंवा द्वारें. याखेरीज जीं इतर साधनें अशीं बांधलेलीं नाहीत तीं कच्चीं समजावीं.

४. नदी हें पाण्याचें साधन असें मानलेलें नाहीं. परंतु सर्व पाट, ढेकुडी (उक्त्या), वाफेचे, तेलाचे, इंजनाचे किंवा पवनचक्कीचे योगानें चालणारे पंप, नदीचे पाण्याचा उपयोग करण्याचीं इतर साधनें, हीं वेगवेगळीं कोष्टकावर दाखवावीं. ओढा आणि नदी ह्यांतील फरक फक्त आकारमानांत असतो. जेव्हां एका साधनाचा दोन अथवा अधिक कामाकडे उपयोग केला जातो तेव्हां त्याची वर्गवारी कशी करावयाची हें मथळ्यावर पाहून ठरवावें.

५. नमुना व त्यावरील खुलासा पुरा झाला म्हणजे दिलेले नमुन्यांत तेरीज तयार करावें, व मामलेदार यांजकडे ता. १०-५-१९२१ चे पूर्वी पाठवावे. पीकपहाणीचे तपासणी-रोबर सर्कल इन्स्पेक्टर यानीं ह्याची तपासणी करावी, व ती तारीख ३० एप्रिलचे पूर्वी नेहमीं पुरी झाली पाहिजे.

## गांवचा नमुना नंबर १७.

...क व जावक पत्रव्यवहाराची बारनिशी, मौजे नहीनांव, तालुका बलसार, सन १९१२-१३.

| कोणाकडून आलें अगर कोणांस लिहिले. | आलेल्या पत्राचा नंबर व तारीख. | दाखल तारीख, व आले पत्रांतील सारांश. | जावक पत्राची नकल व तारीख. | पुढील नोंदीचा नंबर. | ज्या आधारावरून दप्तरीं दाखल केले त्या. अ, ब, क, ड यादींतील नंबर व शेरे. |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| मामलेदार ... | | ..... | जाबत लिलांवाची नोटीस व पंचांनीं केलेले किंमतीचे पत्रक, असे ह्यासोबत सहीकरितां, व लिलांवाचा हुकूम मिळण्याकरितां पाठविले आहेत, ता. १०-१०-१२. | ३ | |
| मामलेदार ... | नंबर ७६ ... | १२-१०-१२. | | | |
| | ता. ७-१०-१२. | नागर दाजीचा अर्ज. बनगिन तलावाचें पाण्यानें जिराईत स. नं. २९० यांत भातजमीन केली त्यावर पाण्याचा आकार बसवावा म्हणून; तलावाचे पाण्यानें एकूण क्षेत्र किती भिजलें, हें जास्ती क्षेत्र भिजण्यास तलावाचें पाणी पुरेल कीं नाहीं, व यास दुसरे खातेदारांचा हरकत आहे कीं काय, तें कळवावें म्हणून. | तलावाचे पाण्यानें एकूण ४० एकर क्षेत्र भिजल. जास्त पाणी तलावांतून सहज देतां येईल. यांस कोणाची हरकत नाहीं. १२-११-१२. | ६ | |
| मामलेदार ... | ता. न. नं. ४. | | | | |
| | १९-१०-१२. | १६-१०-१२. नोटिसा सही केल्या आहेत, व लिलांवाची तारीख दाखल केली आहे. | मामलेदारसाहेब यांस लिलावाचें पत्रक मंजुरीस पाठविलें आहे. १-११-१२. | ९ | |
| मामलेदार ... | | | फकीर मना, बैलाकरिता १०० रुपये तगाई मागतो, त्यास योग्य अर्जासह व लायकीचे दाखल्याचे पूर्ण तपशीलवार पत्रकासह पाठविलें आहे. २-११-१३. | ७ | टीप.—असा रिपोर्ट लिहिण्याचें कारण नव्हतें. अर्जदार यास मामलेदार यांचे समोर समक्ष हजर होतां आलें असतें. |

| नंबर. | कोणाकडून आलें अगर लिहिलें. | आलेल्या पत्राचा नंबर व तारीख. | दाखल तारीख, व आलेल्या पत्रांतील सारांश. | जाबक पत्राची नक्कल व तारीख. | पुढील नोंदीचा नंबर. | रद्द |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५ | मामलेदार ... | ता. न. नं. ४. २-११-१२. | ३-११-१२. विक्रीचें पत्रक आठ रुपयांस मंजूर केलें आहे. गां. नं. ४ यांचा दाखला घ्यावा, व पैसा वसूल करून गां. न. नं. ९ यास जमा करावा. | दप्तरीं दाखल ४-११-१२ | | ल्यां. रे. ९१ क. (म्हणजे नवीन अ, ब, क, ड फेरिस्ता-प्रमाणें ५ वर्षें ठेवणें). |
| ६ | मामलेदार ... | नंबर ७६ ... २३-१-१३. | २३-१-१३. कलेक्टर साहेब यांनीं हु. नं. २१, ता ९-१-१३ यांत नागर दाजीचा अर्ज, तलावाचे पाण्याचा आकार बसविणेबद्दल, मंजूर केला आहे. दाखला घेऊन नागरजीस कळवावें, व दुरुस्ती पत्रकाची वाट पहावी. | दाखला घेतला. कागदांत दुरुस्ती करण्यावर तहकूब. २६-१-१३ दुरुस्तीपत्रक आल्यावरून कागदांत दुरुस्ती केली, व कागद दप्तरीं राहण्याकरितां तालुक्यास पाठविले ११-६-१४. | | |
| ७ | मामलेदार ... | नंबर २७ ... २३-२-१३. | २४-२-१३. फकीर मनाचा २ बैलाकरितां तगाईचा अर्ज, जामीन नाहीं म्हणून मंजूर झाला नाहीं. परंतु त्यानें स. नं. १३१ ची जमीन तारण देण्यास काढल्यामुळें, त्याजवरील बोजासंबंधानें जाहीरनामा प्रसिद्ध करण्याकरितां पाठविला आहे. | नोटिसा योग्य रीतीनें प्रसिद्ध केल्या. परंतु जमिनीवर हक्क सांगण्यास कोणी पुढें आला नाहीं. २७-३-१३. | १३ | |
| ८ | फौजदार ... | नंबर ११ ... २८-२-१३. | २-३-१३. खानेसुमारीप्रमाणें, रामलो दाजी यास पांढरे तोंडाची सुमारें ६ वर्षें वयाची घोडी होती कीं काय, तें कळवावें म्हणून, ती चोरीस गेली आहे असें तो म्हणतो. | फौजदार यांस त्यांचे नांवावर घोडी दाखल आहे, परंतु तिचें वय व वर्णन दिलेले नाहीं. तथापि पाटील म्हणतो कीं, तशा वयाची व खुणेची घोडी होती. | | |

## गांवचा नमुना नंबर १७ बाबत खुलासा.

[illegible]ना परिपाठांतील आहे. यांत आलेला व गेलेला सर्व पत्रव्यवहार कुळकर्णी दाखल करतो. ठरल्या [illegible]र्षण्याचीं मुदतींचीं पत्रकें, हीं यांत दाखल करण्याचें कारण नाहीं. परंतु तीं पाठविल्याचा दाखला, ज्या [illegible]छरांवरून किंवा नमुन्यांवरून तीं तयार करण्यांत येतात, त्या नमुन्याचे पायथ्याशीं ठेवला पाहिजे. त्याचप्रमाणें [illegible]णें ( चलने ) व त्यांच्या पावत्या, हीं यांत दाखल करण्याची जरूरी नाहीं. जेव्हां अ. सरक्युलर हुकूम, अगर कायम [illegible]ण्याचे वहिवाटीचे बटहुकूम येतात, व ज्यांचीं उत्तरें पाठविण्याचीं नसून नुसते फेरिस्तार ( गा. न. नं. १८ यांत ) चढवून [illegible]ीं दाखल करण्याचे नसतात, ते सुद्धां बारानिशींत दाखल करूं नयेत.

२. ज्या पत्रकांचीं उत्तरें किंवा रिपोर्ट पाहिजे असतात, तीं उत्तरें तयार होईपर्यंत आले पत्राचा तपशील यांत [illegible]खल करण्यांत येत नाहीं, अशी अप्रशस्त वहिवाट प्रचारांत आहे अर्थात् ही फार गैरशिस्त आहे, व ती चालू राहू [illegible] नये. आलेलीं सर्व पत्रें दाखल झाल्याबरोबर तीं एकदम बारानिशींत दाखल केलीं पाहिजेत.

३. येणारा व जाणारा बहुतेक सर्व पत्रव्यवहार तालुक्याचे मामलेदार यांच्याशीं असतो. म्हणून कुळकर्ण्यानें "मामलेदार, तालुके बलसार" अशी लिहिण्याची वहिवाट न ठेवतां फक्त "मामलेदार" इतकें लिहिलें असतां बस होईल. [illegible]शा रजिस्टरांत शिष्ट सांप्रदायिक वाक्यें, किंवा बहुमानासाठीं दिलेल्या पदव्या लिहित जाण्याचें कारण नाहीं. मामलेदार [illegible]हेब किंवा प्रांतसाहेब, इतकें लिहिलें असतां पुरें होईल. परंतु "मेहेरबान, रावसाहेब," वगैरे लिहित जाण्याची [illegible]आवश्यकता नाहीं. जे कागद गांवांतच फैल करण्याचे असतात, ते पुढें शोधून काढणें, हें गांवीं शिस्तवार फाईल करण्या- [illegible] अवलंबून असतें, किंवा तालुक्यास फैल होणेचें असल्यास तालुक्यांत शिस्तवार फैल करण्यावर अवलंबून असतें. [illegible]तसेंच कोष्टक ६ यांत नंबरांची सांखळी बरोबर लिहिणें हेंही महत्वाचें आहे. एकाच विषयासंबंधीं मागील व पुढील दाखले [illegible]शोधून काढण्यांत येतात, तें यावरून काढण्यांत येतात.

४. कागद फैल करण्याचे व ठेवण्याचे मुदतीचे हुकुमासाठीं अ. ब. च्या यादी ( गांवचे तेरीज ) पहाव्या.

५. जेव्हां कुळकर्ण्याचे ताब्यांत पुष्कळ गांवें असतील, तेव्हां प्रत्येक गांवाबद्दल वेगळें बारानिशीं बुक ठेवलें पाहिजे. [illegible]वचे तुटकपणासंबंधानें घोंटाळा होऊं न देणें हें फार महत्वाचें आहे. कारण त्या गांवांपैकीं एकादें गांव यापुढें वर्ग होऊन दुसरे भागांत जाण्याचा संभव असतो.

६. गांवचीं प्रकरणें फार नसल्यामुळें त्याबद्दल डाकेटस्लीप सिस्टीम किंवा केस सिस्टीम सुरू करणें जरूर नाहीं.

---

## गांवचा नमुना नंबर १८ बाबत खुलासा.

हा नमुना म्हणजे पाटील व कुळकर्णी यांचे उपयोगासाठीं व वहिवाटीसाठीं जीं पुस्तकें किंवा छापील कायमचे बटहुकूम मिळतात, त्यांचे व तसेंच जे सरक्युलर हुकूम कायम किंवा अनियमित मुदत ठेवण्याचे उद्देशानें येतात यांचें हें केवळ फेरिस्त आहे. प्रत्येक नोंदीस वेगळा नंबर द्यावा, व बुकें वगैरे त्याच क्रमाप्रमाणें दप्तरीं ठेवावीं.

२. जेव्हां नवीन अ. सरक्युलर हुकूमानें जुना सरक्युलर हुकूम रद्द होतो, तेव्हां नवीन सरक्युलर [illegible]कूमांत फर्माविलें असेल त्याप्रमाणें जुना सरक्युलर हुकुम फैलींतून काढावा, व फेरिस्तांत जुन्या सरक्युलर हुकुमासमोर तशी टीप द्यावी.

३. तात्पुरतें तजविजीचें कायम ठेवण्यालायक नाहींत असें सरक्युलर हुकूम ( जसें न. नं. १६ चें पंचवार्षिक मुदतीचें पत्रक या सालीं तयार करावयाचें आहे, किंवा प्रांत सोहब अमुक दिवशीं तपासणी करणार आहेत अशासारखे ) हे सज्यापैकीं मुख्य गांवचा न नं. १७ यांत दाखल करावे. या फेरिस्तांत दाखल करूं नयेत.

४. जेव्हां कुळकर्ण्याकडे एकाहून जास्त गांवें असतील तेव्हां त्यानें सरक्युलर हुकुमाची, पुस्तकाची व कायम हुकुमांची, एकच फैल आपले सज्यापैकीं मुख्य गांवाचे नांवानें ठेवावी. लहान गांवापैकीं एकादे गांवास कामासाठीं त्यास बोलावणें आलें तर त्यानें सदरहू फैल व गां. न. नं १८ बरोबर नेण्यास विसरूं नये. कारण सर्व गांवांमिळून हा नमुना एकच असतो. जर यांपैकीं एकादा गांव वेगळा करून दुसरे सज्यांत किंवा तालुक्यांत घालण्यांत आला तर नवीन कुळकर्ण्यास चालू सज्याकरितां सरक्युलर हुकुमाची वगैरे फैल मिळाली आहे कीं नाहीं हे मामलेदार यांनीं पहावें. रद्द झालेलीं नाहींत अशा सर्व सरक्युलर हुकुमांची एक नवीन फैल तालुक्यांतून फालतू प्रती घेऊन करावी. तालुक्यांत फालतू प्रती नेहमीं शिल्लक ठेवल्या पाहिजेत.

## सालअखेर हिशेब बंद करणें व कुळकर्ण्याचा वार्षिक रि[illegible]

सालाचे हिशेब बंद करण्याची कुळकर्ण्याची पद्धत अशी असली पाहिजे :—

जुलै अखेरचे पूर्वी त्यानें गां. न. नं. ८-ब अद्याप अपुरा असेल त्यांत त्यानें नोंद करण्याची असल्या[illegible] अर्थात् कल्पना अशी आहे कीं, या सर्व नोंदी उपस्थित होतात तशा वेळचे वेळींच केल्या आहेत. नंतर त्यानें किरकोळ जमीनबाबवसुलाची एकूण बेरीज गां. न. नं. ४ चे योग्य कोष्टकांत भरावी, व त्यांचा मेळ गां. न. नं. ८-ब, व न. नं. ५ यांतील एकूण रकमेशीं घ्यावा. नंतर न. नं. ११ भरून पुरा करावा व त्याचा दुसरे हिशेबी मेळ घ्यावा आणि नंतर त्यानें गां. न. नं. ११ यांतील वसुलाचा व राहिलेल्या बाकीचा ठरावबंदाशीं मेळ घेऊन नंतर ठरावबंद पुरा करावा. शेवटीं सुटीचा व कमी केलेले बाकीचा वगैरे तपशील गां. न. नं. ११ चे तरजाशीं मिळतो असें पहावें. नंतर त्यानें तालुकाकचेरींत जाऊन न. नं. ९ चा ता. न. नं. ४ व चलनाशीं मेळ घेतला पाहिजे. नंतर त्यानें जुलै अखेर तारीख ३१ चे आंत वार्षिक रिपोर्ट पाठवावा, तो असा :—

मामलेदारसाहेब यांस.

वार्षिक रिपोर्ट नहीगांव, कुळकर्णी, यांजकडून तारीख २८-७-१३.

